काशक :
ी. ए. कदम, बी. ए.
फ ऑफिसर, कोल्हापूर म्युनिसिपल बरो,
ल्हापूर.

सर्व हक्क नगरपालिकेच्या स्वाधीन

मुद्रक :
मा. कृ. सहस्रबुद्धे,
प्रोप्रायटर, श्रीज्ञानेश्वर प्रेस,
३९३ सी, शिवाजी रोड, कोल्हापूर.

# कोल्हापूर नगरपालिका

कोल्हापूर नगरपालिकेच्या शताब्दि महोत्सवासाठीं नेमलेली कार्यकारी समिति व तिला सल्लागार समित्या म्हणून जनरल कमिटीकडून निवडणेंत आलेल्या समित्यांची यादी.

## कार्यकारी समिति

१ मे. बी. एस्. मुटकेकर, चेअरमन
२ मे. डी. एम्. साळोखे
३ मे. एस्. एस्. घाटगे
४ मे. के. बी. जगदाळे
५ मे. बी. टी. सरनाईक
६ मे. एस्. एस्. बोंद्रे

★

## सल्लागार समित्या

### कुस्त्या समिति

१ मे. पां. ह. हळदकर, चेअरमन
२ मे. पां. वि. पोवार
३ मे. मा. बा. साळोखे
४ मे. के. व. जगदाळे
५ मे. बी. बी. पाटील
६ मे. रं. ज्ञा. पाटील
७ मे. श्री. ति. चव्हाण

★

### नाटक करमणूक समिति

१ मे. गो. य. गुणे, चेअरमन
२ मे. ज. द. भोसले
३ मे. वाय्. बी. पाटील
४ मे. शं. खं. डिगे
५ मे. स. आ. जानवेकर
६ मे. द. ह. शेळके
७ मे. मा. भा. भालेकर

★

### साफसफाई व प्रदर्शन समिति

१ मे. भा. सा. पाटील, चेअरमन
२ मे. बी. पी. चव्हाण
३ मे. डी. बी. पाटील
४ मे. दि. ह. चव्हाण
५ मे. क. न. घाटगे
६ मे. रं. कृ. साळुंखे
७ मे. ध. आ. लिगाडे

★

## शताब्दि महोत्सव समित्या

### प्राथमिक शाळेंतील मुलांना मिठाई वाटणारी समिति

१ मे. कु. अं. गो. सोनटक्के, चेअरमन
२ मे. नि. द. निकम
३ मे. सौ. इं. म. नलवडे
४ मे. सौ. विमलाबाई व. बागल
५ मे. सौ. विमलाबाई भि. करमरकर
६ मे. वि. द. मिसाळ
७ मे. द. मा. साळोखे

★

### डेकोरेशन कमिटी


१ मे. डी. बी. पाटील, चेअरमन
२ मे. बी. डी. शिंगे
३ मे. ह. अ. शेख
४ मे. बी. बी. लोंढे
५ मे. बी. बी. मणेर
६ मे. दा. म. चौगुले
७ मे. ग. ना. चोडणकर

★

### स्पोर्ट्स् कमिटी

१ मे. वि. भा. पाटील, चेअरमन
२ मे. डी. ए. लिगाडे
३ मे. या. दा. डंगरी
४ मे. रा. बा. पाटील
५ मे. शं. द. माने
६ मे. द. रा. बुवा
७ मे. वाय्. बी. पाटील

### नगराध्यक्ष




मे. बाबूराव सटवाजीराव मुटकेकर
बी. ए., एलूएल्. बी. (वकील)

मे. बा. स. मुटकेकर यांनीं प्रथमच स्थानिक स्वराज्य संस्थेंत पदार्पण करून आपल्या कार्यतत्परतेनें व लोकसंग्राहक वृत्तीनें ही बहुमानाची जागा मिळविली आहे. दुसऱ्या महायुद्धांत लष्करी अधिकारी म्हणून त्यांनीं उत्तम कार्य केलें आहे. कोल्हापूर संस्थानांत न्याय खात्यांतील कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांचा लौकिक होता. नोकरींतून मुक्त झाल्यावर सहकारी चळवळींतही त्यांनीं स्पृहणीय कामगिरी केली आहे. गेलीं दोन वर्षें सभासद म्हणून काम करीत असतांना नगरपालिकेंतील निरनिराळ्या विभागांतील कामांवर त्यांनीं सूक्ष्म नजर ठेवून कामांत चोखपणा निर्माण केला आहे. गेल्या वर्षीं सॅनिटरी कमिटीवर काम करीत असतांना ड्रेनेजच्या योजनेवर त्यांनीं लक्ष केंद्रित केलें होतें. त्या ड्रेनेज योजनेस आतां त्यांच्या कारकीर्दींत सुरवात होत आहे.

★

### उपाध्यक्ष



मे. पांडुरंग हरिबा हळदकर


कोल्हापूरच्या सार्वजनिक क्षेत्रांत श्री. दादा हळदकर ही व्यक्ति सर्वपरिचित आहे. सहकारी चळवळींत हळदकरांचें स्थान फार मोठें आहे. नियंत्रणाच्या काळांत कापड वांटपाची मोठी कामगिरी होलसेल सोसायटी मार्फत केली. कोल्हापूर गव्हर्मेंट सर्व्हंटस् को-ऑप. बँकेंत चार वर्षें अध्यक्ष म्हणून काम केलें आहे. अर्बन को-ऑप. बँकेच ईतर अनेक सहकारी संस्थांमधून कामें केलीं आहेत. कोल्हापूर येथील मार्केट कमिटीवर नगरपालिकेचे प्रतिनिधि म्हणून त्यांचीच नियुक्ति झाली आहे. श्री. हळदकर यांचा लोकसंग्रह फार मोठा आहे. कोल्हापूर जिल्हा विभागाचे सदस्य म्हणून महाराष्ट्र मार्केट सल्लागार समितीवर त्यांची निवड झालेली आहे.

## कोल्हापूर नगरपालिकेचे विद्यमान सभासद

( ता. ३१-३-१९५४ रोजीं असलेले )



मे. श्रीपतराव शंकरराव बोंद्रे



मे. भाऊसाहेब सावबा पाटील



मे. माधवराव भाऊसाहेब भालेकर



मे. कु. अंबुजा गोपाळ सोनटक्के, एम्. ए.



मे. माधवराव बाबूराव साळोखे



मे. दत्तात्रय रामगिरी बुवा

## कोल्हापूर नगरपालिकेचे विद्यमान सभासद




मे. रंगराव ज्ञानदेव पाटील



मे. भानुदास तुकाराम सरनाईक



मे. दत्तात्रय हरी शेळके
बी. ए., एल्एल्. बी. ॲडव्होकेट



मे. केशवराव बळवंत जगदाळे



मे. दत्तात्रय बापू पाटील



मे. दिनकरराव हरिबा चव्हाण

## कोल्हापूर नगरपालिकेचे विद्यमान सभासद



मे. निवास दत्तात्रय निकम,
एम्. एस्सी.



मे. जनार्दन दत्तात्रय भोसले



मे. सौ. विमलाबाई भिकाजी करमरकर
बी. ए.



मे. शंकरराव दत्ताजीराव माने




मे. बालेचांद बुराणुद्दीन मणेर




मे. गजानन नाना चोडणकर

## कोल्हापूर नगरपालिकेचे विद्यमान सभासद




मे. आ. शं. ऊर्फ भाऊसाहेब जगताप



मे. पांडुरंग पिराजी पोवार



मे. सदाशिव आत्माराम जानवेकर



मे. शंकरराव खंडेराव डिगे, बी.ए.,बी.टी.



मे. दत्तात्रय मारुती साळोखे



मे. सौ. विमलाबाई वसंतराव बागल

## कोल्हापूर नगरपालिकेचे विद्यमान सभासद



मे. यामीनसाहेब दाऊदसाहेब डंगरी,
डी. सी. ई.



मे. गोविंदराव यशवंत गुणे, डी.सी.ई.




मे. यशवंतराव भाऊसाहेब पाटील



मे. भिकूगौंडा बाबगौंडा पाटील
बी. एस्सी. (ऑनर्स)




मे. रं. कृ. साळुंखे ऊर्फ अपराध



मे. विश्वासराव दत्तोबा मिसाळ

## कोल्हापूर नगरपालिकेचे विद्यमान सभासद





मे. सखाराम माधव घाटगे,
बी. ई. (सिव्हिल) ए. एम्. आय्. ई. (इंडिया)



मे. विश्वासराव भाऊसाहेब पाटील



मे. बाबासाहेब बचाराम लोंढे,
बी. ए., बी. टी., एल्एल्. बी.



मे. केशवराव नरसिंगा घाटगे, मातंगगुरु



मे. दादोबा मल्लाप्पा चौगुले



मे. धनपाल आप्पासाहेब लिगाडे

## कोल्हापूर नगरपालिकेचे विद्यमान सभासद



मे. श्रीपाल तिप्पाण्णा चव्हाण



मे. राजाराम बाबाजी पाटील



मे. बाबूराव पांडुरंग चव्हाण



मे. हसन अब्दुल रहिमान शेख



मे. बळवंत धोंडदेव शिंगे



मे. सौ. इंदूबाई महादेव नलवडे

## म्युनिसिपल स्कूलबोर्ड ऑफिस कोल्हापूर

मे. निवास दत्तात्रय निकम, एम्. एस्सी.




चेअरमन, म्युनिसिपल स्कूलबोर्ड

मे. व्ही. बी सुळे, एम्. ईडी.



ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर
म्युनिसिपल स्कूलबोर्ड




म्युनिसिपल स्कूलबोर्ड ऑफिसकडील नोकरवर्ग

# विद्यमान पोटसमित्यांचे चेअरमन

मे. दत्तात्रय हरी शेळके
बी. ए., एल्एल्. बी. ॲडव्होकेट



चेअरमन बायलॉज कमिटी

मे. यशवंतराव भाऊसाहेब पाटील



चेअरमन भा. बा. वाचनालय कमिटी

मे. पी. बी. साळोखे
एल्एल्. बी.



को-ऑप्ट मेंबर लॅ ॲण्ड रेफरन्स कमिटी

मे. भाऊसाहेब तुकाराम पाटील



सभासद म्युनिसिपल स्कूल बोर्ड

# प्रस्तावना

कोल्हापूर नगरपालिकेचा हा शतसांवत्सरिक महोत्सव ग्रंथ वाचकांना सादर करतांना मला व नगरपालिकेच्या इतर सभासदांना मनःपूर्वक आनंद होत आहे. कोल्हापूर नगरपालिकेची गेल्या शंभर वर्षांतील प्रगति, नगरपालिकेचा सध्यांचा कारभार व कोल्हापूर शहराचा इतिहास या ग्रंथांत देण्यांत आला आहे. कोल्हापूर नगरपालिकेची स्थापना १२ ऑक्टोबर १८५४ रोजीं झाली, तेव्हां तिचा वार्षिक खर्च फक्त २०० रु. होता व शहराची लोकसंख्या ४० हजार होती. आतां नगरपालिकेचा खर्च दरसाल २७ लक्ष रु. चा झाला असून शहरची लोकसंख्या १ लक्ष ४० हजार झाली आहे. यावरून नगरपालिकेवर पडणाऱ्या वाढत्या जबाबदारींची कल्पना येते.

या वाढत्या जबाबदारीबरोबर नगरपालिकेच्या प्रगतीचीं साधनें मात्र वाढलीं नसून गेल्या पांचसहा वर्षांत तीं कमीच झालीं आहेत, असें आढळून येतें. संस्थानांच्या विलीनीकरणाच्या इतर परिणामांचा विचार करण्याचें हें स्थान नसलें, तरी कोल्हापूर संस्थानाच्या विलीनीकरणाचा कोल्हापूर नगरपालिकेवर फार मोठा परिणाम झाला यांत शंका नाहीं. विलीनीकरणापूर्वी, शहराची वाढ करण्याची जबाबदारी कांहीं अंशीं संस्थानी सरकारवरहि होती. शहरांतील मोठमोठ्या सार्वजनिक इमारती, बागा, पूल, रस्ते इत्यादि करण्यासाठीं संस्थानी सरकारचें फार मोठें आर्थिक साहाय्य झालें व त्यांपैकीं कित्येक कामें संस्थानी सरकारनें संपूर्णपणें स्वतःच केलीं, हें येथें नमूद करणें अगत्याचें आहे. कोल्हापूर ही छत्रपतींची राजधानी असल्यानें छत्रपतींनींहि वेळोवेळीं या शहराच्या प्रगतीसाठीं अत्यंत जारीनें प्रयत्न करून शहराला अद्यावत् स्वरूप आणलें. छ. शाहू महाराज, छ. राजाराम महाराज व रीजन्सी कौन्सिलच्या कारकीर्दींत रेल्वे स्टेशन, शाहूपुरी पेठ, निरनिराळ्या शैक्षणिक संस्था, उद्योगधंदे इत्यादिबाबत झालेलें महनीय कार्य पाहिलें, म्हणजे याची अधिक निश्चित कल्पना येते. अर्थातच नगरपालिकाहि शहरसुधारणेचें काम शक्य तेवढ्या जोमानें करीत होतीच.

अशा रीतीनें, विलीनीकरणापूर्वी, कोल्हापूर शहराची आर्थिक, शैक्षणिक, औद्योगिक इत्यादि वाढ करण्याचें कार्य छत्रपति, संस्थानी सरकार व नगरपालिका यांच्यांत विभागलें जात असे. पण विलीनीकरणानंतर मात्र हें सर्व कार्य एकट्या नगरपालिकेलाच करावें लागतें. इतकेंच नव्हे, तर मुंबई सरकारचे निरनिराळे कायदे कोल्हापूर शहरास विलीनीकरणानंतर लागू झाल्यानें नगरपालिके-वरील जबाबदारी पूर्वीपेक्षां कितीतरी वाढली आहे. पूर्वीं सरकार व न्यायालयें यांचें केंद्र

कोल्हापुरासच होतें, तें आतां मुंबईस गेल्यानें नगरपालिकेस महत्त्वाच्या कामासाठीं सरकारवर अवलंबून रहावें लागतें व त्यांत कालापव्यय होतो. संस्थानच्या राजधानीचें शहर व संस्थानांतील सर्वांत मोठी नगरपालिका म्हणून पूर्वीं नगरपालिकेस मिळणाऱ्या सवलती आतां बंद झाल्या. या सर्व अडचणींतून कोल्हापूर नगरपालिका मार्ग काढीत असून नागरिकांच्या जास्तींत जास्त हिताचीं कामें हातीं घेत आहे.

या नगरपालिकेनें गेल्या शंभर वर्षांत कौतुकास्पद कार्य केलें आहे हें खरें. पण नागरिकांच्या हिताचीं मोठमोठीं कामें अजून व्हावयाचीं आहेत, हेंहि नाकारतां येणार नाहीं. अंडरग्राऊंड ड्रेनेज योजना पूर्ण करणें, शहरांतील गलिच्छ वस्तीची पुनर्रचना करणें, प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करणें, पाणीपुरवठ्याची व्यवस्था नगरपालिकेकडे घेणें इत्यादि महत्त्वाचीं कामें नगरपालिकेस अद्याप पुरीं करावयाचीं आहेत. हीं कामें अवघड आहेत, म्हणूनच तीं अजून अपुरीं राहिलीं आहेत. कोल्हापूर नगरपालिकेनें ड्रेनेज योजना, गलिच्छ वस्तींचें आधुनिकीकरण, वॉर्डवार दवाखाने, इत्यादि अनेक योजना हातीं घेतल्या असून आरोग्य आणि शहरसुधारणा यासाठीं आवश्यक त्या सर्व योजना हातीं घेतल्या जातील यांत शंका नाहीं. या सर्व योजना सरकार आणि जनतेच्या सहकार्यावांचून नगरपालिकेस पार पाडतां येणार नाहींत. म्हणून हीं कार्यें पार पाडण्यासाठीं सरकार व जनतेनें नगरपालिकेस हार्दिक सहकार्य करावें अशी विनंति आहे.

कोल्हापूर नगरपालिकेच्या शतसांवत्सरिक महोत्सवाचे मुख्य पाहुणे म्हणून रॅं. सर र. पु. परांजपे आम्हांला लाभले असून, या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ दक्षिण विभागाचे डायरेक्टर ऑफ लोकल ॲथॉरिटीज श्री. मोनानी यांच्या हस्तें होत आहे, याबद्दल नगरपालिकेस अतिशय आनंद होत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखालीं आणि नागरिकांच्या सहकार्यानें कोल्हापूर नगरपालिका जोमानें प्रगति करील असा विश्वास वाटतो.

कोल्हापूर

ता. ११-१०-५४

# अनुक्रमणिका


| | | पान |
|---|---|---|
| **१ कोल्हापूर नगरपालिका शताब्दि महोत्सव समित्या** | .... | (३) |
| **२ प्रस्तावना** | .... .... | (१३) |
| **३ कोल्हापूर नगरपालिकेचा इतिहास** | .... .... | |
| १ नगरपालिकेची स्थापना | .... .... | १ |
| २ पहिलें युग | .... .... | १० |
| ३ नगरपालिकेच्या उत्पन्नाची वाढ | .... .... | २१ |
| ४ शहरसुधारणेची जोरदार मोहीम | .... .... | ३३ |
| ५ पहिली लोकनियुक्त नगरपालिका | .... .... | ५५ |
| ६ सर्वाधिकाऱ्यांचा काल | .... .... | ७३ |
| ७ दुसरी लोकनियुक्त नगरपालिका | .... .... | ८६ |
| ८ क्रांतिकाल | .... .... | १०२ |
| ९ विलीनीकरणानंतर | .... .... | १२१ |
| १० नगरपालिकेचें शैक्षणिक कार्य | .... .... | १३८ |
| **४ आजची कोल्हापूर नगरपालिका** | | |
| १ नगरपालिकेची हद्द | .... .... | १५१ |
| २ निवडणुका | .... .... | १५१ |
| ३ पदाधिकारी व पोटसमित्या | .... .... | १५३ |
| ४ सर्वसामान्य विभाग | .... .... | १५६ |
| ५ कर वसुली खातें | .... .... | १६० |
| ६ ऑक्ट्राय खातें | .... .... | १६१ |
| ७ बांधकाम खातें | .... .... | १६४ |
| ८ आरोग्य खातें | .... .... | १६७ |
| ९ गुमास्ता खातें | .... .... | १६८ |
| **५ कोल्हापूर शहराचा इतिहास** | | |
| १ प्राचीन कोल्हापूर | .... .... | १७३ |
| २ मध्ययुगीन कोल्हापूर | .... .... | १८१ |
| ३ आधुनिक कोल्हापूर | .... .... | १९३ |
| ४ उद्यांचें कोल्हापूर | .... .... | २१९ |
| **६ आभार** | .... .... | २३१ |
| **७ शुद्धिपत्र** | .... .... | २३२ |

## चित्रसूचि



| | | पान |
|---|---|---|
| १ | कोल्हापूर नगरपालिकेचे विद्यमान सभासद : | |
| | अध्यक्ष–उपाध्यक्ष .... .... | ( ५ ) |
| | सभासद .... .... | ( ६ )–( १२ ) |
| २ | कोल्हापूर शहरांतील दृश्यें .... .... | पान १६ च्या समोर |
| ३ | कोल्हापूर शहरांतील दृश्यें .... .... | पान ४८ च्या समोर |
| ४ | कोल्हापूर नगरपालिकेचे अध्यक्ष ( १९२१–५४ ) .... | पान १२० च्या समोर |
| ५ | विद्यमान पोटसमित्यांचे चेअरमन .... .... | पान १५४ च्या समोर |
| ६ | नगरपालिकेचा प्रमुख नोकरवर्ग .... .... | पान १६० च्या समोर |



# कोल्हापूर नगरपालिकेचा इतिहास

( १८५४–१९५४ )

# कोल्हापूर नगरपालिकेचा इतिहास

## प्रकरण १ लें
## नगरपालिकेची स्थापना
### ( १२-१०-१८५४ )

कोल्हापूर हें नांव व आज या शहराला आलेलें प्रचंड स्वरूप या दोन्ही गोष्टी बऱ्याच आधुनिक आहेत. पण या शहराची ज्या मूळ खेड्यांतून उत्पत्ति झाली, त्यांची स्थापना शेंकडों वर्षांपूर्वी झाली असली पाहिजे. एवढेंच नव्हे, तर ज्या "करवीर" तीर्थापासून आजचें कोल्हापूर मुख्यतः निर्माण झालें, तें करवीर तीर्थही फार पुरातन कालापासून प्रसिद्ध आहे आणि कोल्हापूरला शहराचें स्वरूप प्राप्त झाल्यालासुद्धां जवळ जवळ दोन हजार वर्षें होऊन गेलीं असावींत, असें ज्ञात इतिहासावरून सिद्ध करतां येतें. या जुन्या इतिहासाची तपशीलवार माहिती इतरत्र उपलब्ध असल्यामुळें तिची येथें पुनरुक्ति करण्याची जरूरी नाहीं. म्हणून या नगरपालिकेच्या इतिहासाची सुरवात फार मागें न जातां अठराव्या शतकाच्या अखेरीस करणें उचित आहे, असें आम्हांस वाटतें.

कोल्हापूर व त्याच्या आसपासचा प्रदेश यामध्यें मराठा राज्याची स्थापना थोरल्या शिवाजी महाराजांनीं इ. स. १६५९ मध्यें केली, असें म्हणतां येईल. कारण त्यासालींच त्यांनीं पन्हाळा किल्ला मोंगलापासून हस्तगत केला. पण यामुळेंही कोल्हापूरला फारसें राजकीय महत्त्व आलें नाहीं; कारण श्रीशिवछत्रपतींची राजधानी रायगडला होती. नंतर श्रीमन्महाराणी ताराबाई छत्रपति यांनीं करवीर राज्याची संस्थापना केली. तरीदेखील त्या वेळच्या समाजपरिस्थितींत किल्ल्यांना फार महत्त्व असल्यामुळें ताराराणींनींही आपली राजधानी पन्हाळ्यासच ठेविली व त्यामुळें कोल्हापूर मागेंच राहिलें. इ. स. १७८२ सालीं शिवाजी महाराजांनीं आपली राजधानी पन्हाळ्याहून कोल्हापुरास प्रथमच आणली आणि म्हणून कोल्हापूरच्या आधुनिक इतिहासाला तेथूनच सुरवात झाली, असें म्हणतां येईल.

कोल्हापूर हें राजधानीचें ठिकाण झाल्याबरोबर त्याचें महत्त्व वाढणें साहजिकच होय. त्या काळच्या पद्धतीप्रमाणें राजधानीसभोंवतीं तट असणें जरूर होतें. म्हणून प्रथम मातीचा तट बांधण्यांत आला. त्यानंतर दगडी तट बांधला गेला. राजधानी झाल्याबरोबर अनेक सरदार लोक येथें राहावयास आले. त्याबरोबरच त्यांचे नोकरचाकर व इतर आश्रित मंडळी येथें आली. तसेंच संस्थानचे अधिकारी व मानकरीही येथें राहावयास आले. अशा तऱ्हेनें कोल्हापूर हें सर्व तऱ्हेच्या

लोकांनीं गजबजून गेलें. या वाढत्या लोकसंख्येमुळें शहरांत नवीन घरें भराभर बांधलीं गेलीं. तटाच्या बाहेर जरी अनेक जागा मोकळ्या होत्या तरी सुरक्षिततेच्या दृष्टीनें प्रत्येकाची इच्छा तटाच्या आंत राहण्याची होती व त्यामुळें कोटभागांत कमालीची दाटी झाली. त्यावेळीं वाहनाचें महत्त्व नसल्यमुळें रस्त्याच्या रुंदीकडे कोणीहि लक्ष दिलें नाहीं व प्रत्येकानें सांपडेल तेथें व वाटेल तशी घरें बांधलीं. यामुळें साहजिकच रस्ते फार अरुंद व वांकडेतिकडे झाले व लवकरच लोकांच्या रहदारीची फार गैरसोय होऊं लागली. तसेंच शहराच्या आरोग्याकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं. रस्त्यांतून सर्व तऱ्हेची घाण पडून राही; ठिकठिकाणीं कचरा सांचत असे; सर्व शहरभर गारीचे शौचकूप असत व अनेक लोक रस्त्यांच्या बाजूला शौचविधि करीत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे शहरांतील सर्व भागांत स्वच्छता, प्रकाश व शुद्ध हवा यांचा फार अभाव होता व शहराचें आरोग्य फारच खालावलेल्या स्थितींत होतें.

शहराच्या या अश्लाघ्य स्थितीकडे राज्यकर्त्यांचें लक्ष वेधलें गेलें असल्यास नवल नाहीं. इ. स. १८३० सालीं शहराच्या स्वच्छतेसंबंधीं श्रीमन्महाराज शहाजी छत्रपति यांनीं एक छोटीशी आज्ञा काढली. ब्रिटिश राजवटीचें अनुकरण सुरू होण्यापूर्वीं निघालेल्या या हुजूराज्ञेला फारच मोठें ऐतिहासिक महत्त्व आहे. किंबहुना या हुजूराज्ञेनें कोल्हापुरांतील नगरपालिकेच्या स्थापनेची मुहूर्तमेढच रोवली, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. ती हुजूराज्ञा पुढें दिली आहे:—

श्री

यादी राजमंडळ कसबा करवीर येथें कोटाचें आंतील रस्ते झाडून नीट करणेची वैवाट हुजूरोन राजश्री सदाशीव रघुनाथ यासी आज्ञा होऊन त्याचा ठराव आजमास सुरू इहिदे सलासीन मयातैन व आलफ.

घर आजमासे सुमार २२००

यासी दरमहा आकारणी घरावर

१७।. प्रा उत्तम प्रतीची सुमारी ७५ दर घरास ॥। प्रमाणें एकूण रुपये

४६८= प्रा मध्यम प्रतीची सुमारी ३०० दर घरास पैसे ॥ प्रो ए. रु.

३८।॥. प्रा कनिष्ठ प्रतीची सुमारी ५०० दर घरास पैसे । प्रो ए॥ रु॥

७६८= प्रा अती कनिष्ठ प्रतीची सुमारी १३२५ दर घरास पैसे ८९ प्रो ए॥ रु॥ प्रो.

———— ————

१७८।. २२००



खर्च

१६० बदल मु॥ बारमाह.

२० कारकून आ २

१२ प्रा आ १

८ प्रा आ १

—

२०

२० लोक व जासूद आ ५ दर आ रु॥ ४ प्रो.

७५ भंगी आ १५ दर आस रु. ५

४५ केर भरणार आ १० दर आस. ४॥

————

१६०

१७॥ खेरीज मु॥ बारमहा.

१५ केर भरणेस रेडेसर यासी वैरण दर रेडेस रु॥ १॥

२ पाट्या व झाडण्या खे॥

॥ दप्तर खर्च शाई कागद रोशनाई.

————

१७॥

————

१७७॥

यासी वैवाटीची कलमें

१ सदरीं लिहिलेप्रमाणें महिनेचे महिनेस वसूल घेऊन खर्च करणें आणि हिशेब कच्चा फडास महिनेचे महिनेस फडास गुदरींत जाणें.

१ दररोज रस्ते झाडत जाणें रस्तांत लोक केर वगैरे टाकतात त्यास मनाई कोणास करूं नये.

१ वसूल घेणेस कोण्ही खलेली केलेस सिरस्तेप्रो देणेविसी सरकारांतून ताकीद केली जाईल.

१ वसूल घेणें तो ठरावाप्रमाणें घेणें जाजती कोण्हापासून घेऊं नये.

१ केर बाहीर भरून टाकणेस रेडेसर १० खे॥ व त्यास कोणते व ताटमुटसुद्धां एकंदर होईल तो उत्पन्न ऐवजीं खर्च करणें.

१ जमेंत व खर्चांत कमजास्त होईल ती समजावीत जाणें.

१ कोटाबाहीर पेठेचे थोरले रस्ते आहेत त्याचा तपशील.

१ गंगावेसीपासून श्रीचें मठापावेतो.

१ विजापूर वेसीपासून चावडीपर्यंत.

१ शनवारवेसीपासून आडवाट रस्ता शुक्रवार चावडीस जातो तेथपर्यंत व शनवार पेठेचे चावडीपर्यंत.

१ पदमान वेसीपासून मंगळवार पेठेचे सेवट पावेतो.

१ शुक्रवार पेठेपासून महाराजाचे देवालयापर्यंत सोमवार शुक्रवार शुक्रवार दोन वार आठवडा लोटून काढणें.

—

५

सदरहू उभे रस्ते पेठेचे आहेत. त्यांनीं आपले दारापुढून दररोज झाडून रस्ता स्वच्छ राखावा याजप्रो घरोघर ताकीद एकदोनवेळां करणें ताकीद जाहली असतां केर अगर घाण पडल्यास ज्याच्या दारापुढें पडेल त्याजपासून चार आणे गुनेगारी घेणें तो मजकूर सरकारांत समजावीत जाऊन आज्ञा होईल त्याजप्रमाणें करणें.

१ आपापले घरचे मोहरीचें पाणी रस्तेतून थोरली मोहरी आहे त्यांत मिलवून घ्यावी रस्तेंत——पाणी सोडू नये याजप्रो. ताकीद करून सदरहू प्रो.—— करणें.

१ श्रीचे देवालयाचे आवारांत व काशीमणीकर्णिकेंत कोण्हास शौचास जाऊं देऊं नये. रात्रौ रखवाली लोकांकडून करणें.

—

९

एकूण कलम नऊ येणेप्रमाणें ठराव छ. १ माहे जिल्काद रुजू.

मोर्तब

दुर्दैवानें या आज्ञेचा विशेष अंमल झालेला दिसत नाहीं. घरफाळा वसुलीची कल्पना हल्लीं अगदीं साधी वाटत असली तरी त्यावेळीं ती अत्यंत पुरोगामी स्वरूपाचीच होती, यांत शंका नाहीं. त्यावेळचे कागदपत्र उपलब्ध नाहींत. पण या आज्ञेंतील नवीन कल्पनांना जोराचा विरोध झाला असावा व यामुळें ती लवकरच बाजूला पडली असावी असें वाटतें.

इ. स. १८३० ते १८५४ च्या दरम्यान कोल्हापुरची स्थिति कशी होती यासंबंधीं दोन विश्वसनीय पुरावे उपलब्ध आहेत.



इ. स. १८२६ सालीं कर्नल जेम्स् वॉल्श् या नांवाचा एक लष्करी अधिकारी कोल्हापुरांत आला होता. त्यानें अनेक शहरांच्या आठवणींचें एक पुस्तक १८३० सालीं प्रसिद्ध केलें. त्यांत त्यानें १८२६ च्या कोल्हापुरचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे:—

"कोल्हापूर हें बेळगांवच्या उत्तर दिशेला सुमारें ६० मैलाच्या अंतरावर वसलें आहे. हें स्थळ पंचगंगा नदीच्या दक्षिण तीरावर सखल प्रदेशांत आहे. त्याच्या पूर्वेकडे एक खोल नाला असून पश्चिमेकडे एक नाला व एक सरोवर आहे. तसेंच दक्षिणेकडेहि एक लहानसें सरोवर आहे. अशा रीतीनें तें जवळ जवळ चहूंकडून पाण्यानें वेढिलेलें आहे. हें शहर वांकडे तिकडे व वाईट रीतीनें रचलेलें आहे. कोटाच्या सभोंवतीं एक रुंद खंदक असला तरी तो बळकट नाहीं. आंत दगडाच्या व विटाच्या इमारतीअसून त्याला सपाट छपरें आहेत. रस्ते अरुंद व चिंचोळे असून तें पाहून मला Buenos Ayres ची आठवण झाली. कोटांतील तोफखान्यापेक्षां या रस्त्यामुळें शत्रूंना अधिक धोका आहे असें मला वाटतें. राजवाडा मध्यभागीं असून चहूंकडे सर्व प्रकारची दुर्दर्शनीय घाण पसरली आहे.

"…. कोटांत चहूंकडे असलेल्या या गचाळ रस्त्यानें घोड्यांवरून जात असतां आम्हांला आमच्या घोड्यांना पुढें पाऊल टाकण्याला स्वच्छ जागा मिळणें फार कठीण गेलें. इतकें घाणेरडें दुसरें शहर पाहिलेलें मला सर्व आयुष्यांत आठवत नाहीं. यासारख्या दुसऱ्या कोणत्या शहराची मला कल्पना करवत नाहीं व त्याचें वर्णन करण्याला मी असमर्थ आहें."

त्याचप्रमाणें दुसरा पुरावा प्रसिद्ध पोलिटिकल एजंट मेजर ग्रॅहम यांचा उपलब्ध आहे. त्यांनीं १८४४ सालीं लिहिलेल्या अहवालांत कोल्हापुरचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे:—

"कोल्हापूर शहर हें आतां फारच वाढलेलें असून त्याचा आकार ४॥ मैलपेक्षांहि अधिक आहे. पण संस्थानच्या मानानें राजधानीचें ठिकाण होण्याला तें सर्वस्वीं अयोग्य आहे. तसेंच जुलमी राजाचे रहिवासी, सरदार व अधिकारी यांनीं हें शहर गजबजून गेलें आहे. त्यांतच त्यावेळच्या पद्धतीप्रमाणें सरकारी सैन्याचीहि भर पडली आहे. अशा प्रकारें संस्थानांतील १/१२ लोकसंख्या येथें तापदायक रीतीनें कोंबली गेली आहे. स्वच्छतेचे व आरोग्याचे कसलेहि नियम नसल्यामुळें येथें प्लेगचा उपद्रव होतो. तर १८४४ सालीं एका पंधरवड्यांत ८००० लोक मृत्यूला बळी पडले.

"तटाच्या आंत रस्ते करण्याच्या बाबतींत कसलेहि नियम पाळले गेलेले नाहींत. घरें विटांचीं असून त्यांना गवतीं छपरें आहेत. इमारती फार गैरसोईच्या असून रस्ते इतके अरुंद आहेत कीं तेथून एकादी बैलगाडीहि जाणें कठीण आहे.


"थोड्याच काळापूर्वी प्रत्येक दिशेला सांचलेल्या घाणीविषयीं हें शहर प्रसिद्ध होतें. शहरांत जिकडे तिकडे दुर्गंध सुटला असून तें रोग व मृत्यु यांचें जणूं कांहीं आगरच होतें."

वरील परिच्छेदांत उद्धृत केलेल्या उताऱ्यांवरून त्याकाळची कोल्हापूर शहराची स्थिति किती शोचनीय होती याची कल्पना वाचकांना येईलच. अर्थातच शहराची स्वच्छता सुधारण्यासाठीं व शहरांतील रस्ते रुंद करण्यासाठीं पुनः प्रयत्न सुरू झाले. कोल्हापुरचे तत्कालीन कर्तबगार कारभारी दाजी पंडित यांनीं १८४९ सालीं पोलिटिकल सुपरिंटेंडेंट यांच्या सूचनेवरून एक आज्ञापत्र काढलें. या आज्ञापत्रानें प्रत्येक गांवांतील लोकांवर त्यांच्या गांवांतील रस्ते स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी टाकण्यांत आली. तसेंच हें काम पाहण्यासाठीं दोन कारकून नेमण्यांत आले. शहरांतील रस्त्यांच्या सुधारणेला हें आज्ञापत्र बरेचसें कारणीभूत झालें आहे. या आज्ञापत्राप्रमाणें न्यायाधिशाच्या देखरेखीखालीं शहरांतील कांहीं रस्ते तयार केले गेले व त्यांचा खर्च सार्वजनिक देणग्यांतून केला गेला. तसेंच खासगी तारदखानें बांधण्याला उत्तेजन देण्यांत आलें व मे १८५१ च्या आज्ञापत्रानें रस्त्यावर घाण करणें हा गुन्हा आहे असें जाहीर केलें गेलें.

अशा प्रकारें कोल्हापूर शहरच्या आरोग्यसुधारणेविषयीं कांहीं तुरळक प्रयत्न झाले. पण त्यामुळें कांहीं विशेष कार्य झालें नाहीं म्हणून या कार्याकरितां स्वतंत्र अशी संस्था असल्याखेरीज तें योग्य रीतीनें होणार नाहीं असें तत्कालीन अधिकाऱ्यांना वाटूं लागलें. या विचाराला हिंदुस्थान सरकारकडून जोराचा पाठिंबा मिळाला. कारण या देशांतील मोठमोठ्या गांवांचें आरोग्य सुधारण्याच्या हेतूनें हिंदुस्थान सरकारनें इ. स. १८५० सालीं एक स्वतंत्र कायदा पास केला होता* व त्यास अनुसरून देशांतील बहुतेक सर्व मोठ्या शहरांमध्यें नगरपालिकांची स्थापना करावी अशी चळवळ हातीं घेण्यांत आली. त्याप्रमाणें जवळच साताऱ्यालाही नगरपालिका ता. १ आगस्ट १८५३ रोजीं स्थापन झाली. या चळवळीचा परिणाम कोल्हापुरावर होणें अपरिहार्य होतें. त्यावेळीं कोल्हापुरांत मेजर जॉर्ज मालकम हे पोलिटिकल एजंट होते. त्यांना कोल्हापुरांत नगरपालिका स्थापन करावी व शहरांतील आरोग्य व स्वच्छता यांची सुधारणा करावी असें वाटूं लागलें. या कार्याकरितां त्यांनीं सहा इसमांना नगरपालिकेचे सभासद म्हणून नेमण्याचें ठरविलें; यांत दोन सरकारी अधिकारी होते. एक बाळाजी विश्वनाथ या नांवाचे सदरअमीन व दुसरे विनायक रघुनाथ काळे या नांवाचे शहर मामलेदार. बिनसरकारी सभासद म्हणून हिंमतबहादर साहेब, जगद्गुरु शंकराचार्यांचे वकील, श्री. भास्करराव जोशीराव व श्री. मल्लाप्पा जंगले अशा चौघांची निवड करण्यांत आली. त्यांना विचारून व त्यांची आगाऊ संमति घेऊनच त्यांना नगरपालिकेचे सभासद करण्याचें ठरलें हें विशेष आहे. ३००० रुपयांची सरकारी मदत नगरपालिकेला ठरवून देण्यांत आली आणि नगरपालिकेच्या कामाकरितां एक कारकून व लष्करफडांतील ३४ शिपाई दिले गेले. अशा थाटांत कोल्हापूर नगरपालिकेची स्थापना ता. १२ आक्टोबर १८५४ रोजीं मेहेरबान रेसिडेंटसाहेबांच्या पुढें दिलेल्या हुकुमानें झाली:—

* Government of India Act XXVI of 1850.





**नंबर ३३० ता. १२ आक्टोबर सन १८५४**
**इसवीचा हुकूम दरबारास रावबहादूर**
**मुख्य कारभारी याजकडे गेला त्याजबद्दल.**

**३३० रावबहादूर याजकडे ऐसाजे— म्युनिसिपल कमेटीविषयीं काल विचार झाला. आतां तें काम सुरूं करणें. त्यासरामचंद्र सोमनाथ हुजूर पो कारकून मोजणींत वाकब आहेत. सबब त्यास तूर्त पाठविलें आहे. तरी त्यास तें काम सुपुर्त करून साताऱ्याचा कायदा आला त्याची नक्कल करून पाटीवर डकवून ती समोर ठेवावी व जागा आणि सिपाई नेमून पैशासाठीं पेटीही देववांवी व लिहिण्याचें सामान वगैरे जे लागेल तेंही देववावें तारीख १२ आक्टोबर सन १८५४ इसवी हे कारकून तिकडे गेल्यामुळें दरबारचा एक कारकून इकडे आला पाहिजे. सडकेचा कारकून दरबारांत आणून घ्यावा. तारीख व माहे मजकूर.**

**सही इंग्रजी मालकम् साहेबांची**

## सातारा येथील म्युनिसिपल कमेटीच्या कायद्याचा सारांश

१ म्युनिसिपल कमेटीचे सभासदांची दरमहा सभा भरण्यास एक जागा असावी.

२ पंधरा रुपयांचा चिटणीस, बारा रुपयांचा मेस्त्री, तीन रुपयापासून चार रुपयापर्यंतचे बारा शिपाई आणि तीन–तीन रुपयेप्रमाणें बारा असामी झाडणारे असे असामी ठेवणें दरएक कमिटीचे दरएक मेंबराजवळ सदरहू शिपायांपैकीं एक शिपाई असावा आणि झाडणाऱ्यानें शहरांतील निरनिराळे ठिकाणचे रस्ते साफ करून तेथील कचरा एकादे नेमले ठिकाणीं टाकावा.

३ कमेटीच्या चिटणिसानें हिशेब वगैरे कसे ठेवणें याचे नमुने तयार करणेंविषयीं मेहरबान कमिशनर साहेब बहादूर यांचें दप्तरदार यांस सांगावें आणि दरमहिन्याचे हिशेब दप्तरदार यांनीं किंवा ते नसल्यास डेप्युटी दप्तरदार यांनीं पाहत जावें.

४ म्युनिसिपल कमेटीबद्दल जो वसूल होईल तो एका पेटींत घालून ती पेटी मामलेदार कचेरींत ठेऊन तिच्या किल्ल्या म्युनिसिपालटीच्या सभासदाजवळ ठेवाव्या. ती पेटी उघडणें झाल्यास कमेटीची आज्ञा घेऊन मामलेदार किंवा त्यांचे शिरस्तेदार यांच्या समक्ष उघडावी. चालू खर्च करण्याकरितां पन्नासांपासून शंभर रुपयेपर्यंत एक दुसरे पेटींत ठेऊन व ती पेटी म्युनिसिपल हपिसांत चिटणिसाचे स्वाधीन करून ठेवावी. आणि चिटणीस आपलें काम प्रामाणिकपणें करील या विषयींचा जामीन त्याजकडून घ्यावा.



५ सर्व लोकांनीं आपापल्या घरासमोरची चार हात जागा दररोज साफ ठेवावी. नाहींतर जितके दिवस साफ केली नसेल तितके दिवस दर दिवसास एक आणाप्रमाणें म्युनिसिपालटी दंड घेईल.

६ एकादें घराजवळ कचरा किंवा दुसरी घाण असली तरी ती काढण्यास घरांत राहणाऱ्यास नोटीस किंवा सूचना दिली असतां त्यानें काढली नाहीं. त्या दर दिवसास दोन आण्यापासून पांच रुपयेपर्यंत याप्रमाणें म्युनिसिपालटी दंड घेईल.

७ कोणत्याही मनुष्यानें आपल्या घराची डागडुजी म्युनिसिपालटीची परवानगी घेतल्यावांचून करूं नये. जर तो आपल्या घरच्या पायापासून आठ फूट जागा सोडून घराची दुरुस्ती करीत असेल तर परवानगी न घेतली तर चालेल. परंतु परवानगीवांचून डागडुजी न करूं देण्याचा इतकाच हेतु आहे कीं जे रस्ते अरुंद आहेत ते रुंद करावेत आणि रुंद रस्त्यांच्या बाजू एकसारख्या कराव्या. सबब कोणी मनुष्यानें परवानगी मागितली असतां देण्यास निरर्थक विलंब लावूं नये.

८ जीं लागतील तीं हत्यारें विकत घ्यावीं आणि लोकोपयोगीं किंवा सुधारणुकीकरितां जीं कामें करावयाचीं असतील त्याचे दोन भाग ऑर्डिनरी व एक्स्ट्रॉ ऑर्डिनरी म्हणजे ऑर्डिनरी भागांत झालेली कामाची डागडुजी करणें, आणि कमेटीचा हुकूम अमलांत आणणें. कमेटीचे कोणतेही दोन सभासदांच्या आज्ञेनें चालू करावें. व एक्स्ट्रॉ ऑर्डिनरी भागांत नवीन व्हावयाचीं कामें असतील तीं समजावीं. आणि तीं सर्व सभासदांच्या संमतिवांचून चालू नयेत.

९ शहरचे पांच भाग करून एकेक भागावर एकेक कमिशनर नेमावा. म्हणजे काय काय सुधारणूक केली पाहिजे व तेथील लोकांचें काय म्हणणें आहे त्याची चौकशी करून त्या कमिशनरनें कमेटीस कळवावें.

१० कोणतें एकादें नवें काम, त्याचा नकाशा व इष्टमेट तयार करून इंजिनिअरचे सल्ल्यावांचून किंवा मंजूर झाल्यावांचून आरंभू नये.

११ कमेटीच्यानें खर्च भागेल तर उन्हाळ्यांत रस्त्यावर पाणी सिंपावें आणि रात्रीं दिवे लावावे.

**सही**

मु॥ नारो कृष्ण हुजूरकारकून

या महत्त्वाच्या हुकुमापासूनच कोल्हापूर नगरपालिकेच्या जीवनांतील पहिल्या युगाला सुरवात झाली असें म्हणावयास हरकत नाहीं.

# प्रकरण २ रें

# पहिलें युग

## ( १८५४–१८७२ )

मागील प्रकरणांत कोल्हापूर नगरपालिकेची स्थापना कशी झाली, तींत प्रारंभी कोणकोण सभासद होते यांचा सविस्तर ऊहापोह केला. नगरपालिकेची स्थापना ही कोल्हापुरच्या नागरिक जीवनांतील महत्त्वाची घटना होय. यामुळें शहराचें सौख्य, आरोग्य व सौंदर्य यांची अभिवृद्धि व्हावी अशी अपेक्षा असणें साहजिक आहे. म्हणून प्रस्तुत प्रकरणांत १८५४ ते १८७२ या काळांत कोल्हापूर नगरपालिकेची स्थिति कशा प्रकारची होती याचें समालोचन करावयाचें आहे.

प्रथमतः त्यावेळीं नगरपालिकेचीं कर्तव्यें कोणतीं होतीं याचा विचार करूं. यासंबंधी मे. पोलिटिकल एजंट यांचें ता. ३।११।१८५४ चें एक पत्र उपलब्ध आहे. या पत्रांत नगरपालिकेनें कोणती कामगिरी करावी, तिचीं कर्तव्यें कोणतीं, तिनें कोणत्या बाबतींत खबरदारी घेतली पाहिजे इत्यादि गोष्टींचें त्या काळच्या विचाराप्रमाणें स्पष्टीकरण केलें आहे. यामुळें हें पत्र फार महत्त्वाचें असून या ठिकाणीं तें समग्र उद्धृत करणें समर्पक वाटतें.

### मिउनिसिपाल कमेटी

ज्या गोष्टींपासोन लोकांचे हित होईल अशा सर्व गोष्टींविसी विच्यार करून जीं कामें अगत्याचीं दिसतील तीं करणें हें मिउनिसिपाल कमेटीचें काम होय. तीं कामें विशेषेंकरून येणेंप्रमाणें:—

### सडकेविसी

नवे रस्ते करण्याचे व जुने नीट करण्याचे व रस्त्यांतील जागा कोणी न घेणेंविसी बंदोबस्त ठेवणें व जसजशा नव्या इमारती होतील तसतसे हळूहळू रस्ते रुंद करण्याचा बंदोबस्त ठेवावा.

### गटार व स्वच्छता

तसेंच लोकांनी रस्ते व गटार साफ ठेवावे याविसी बंदोबस्त ठेवावा गटार सुधारावे व पाण्याच्या बंदोबस्ताविसी विचार करावा.

### पाणी

पाण्याचे नळ व हौदाची डागडुजी करावी व त्यांत पाणी सर्व लोकांचे उपयोगाकरितां ठेवावें आणि कोणासही उगीच खर्च करूं देऊं नये. शहरांत ज्या ठिकाणीं पाण्याचा फार खप आहे तेथें पाणी नेण्याचा बंदोबस्त ठेवावा व योग्य ठिकाणीं नवे तलाव बांधावे.

अमलसंपर्क अधिकारी
कोल्हापूर महानगरपालिका



### धेलखाने

त्याविसी स्वच्छता राहण्यासाठीं योग्य बंदोबस्त करण्याचा विचार करावा.

### पूल

याची डागडुजी व नवे करण्याची तजवीज करावी.

### नाव

नौका जाण्यायेण्याचे किनारेची जागा नीट रहावी व नाव वगैरे यांविसी विचार करावा.

कमेटीनें आम्हीं ज्या सर्व गोष्टी वर लिहिल्या त्या व त्यास ज्या योग्य वाटतील त्यांसुद्धां येक तख्ता करावा. त्यांत प्रत्येक निरनिराळें दाखवावें व प्रत्येकास खर्च किती लागेल तो दाखवावा. व पुष्कळ गोष्टींविसी त्यांणी जरी सूचना केली तरी चिंता नाहीं. कारण जितक्या पुष्कळ गोष्टी पहून येतील तितकें बरें.

हें जाहल्यावर पैसा खर्च करण्याचे सामर्थ्याचा विचार करून ज्या गोष्टीपासोन केल्यास सुख होईल अशा गोष्टींतून ज्या सर्वोत्कृष्ट दिसतील त्या ठरवाव्या.

अक्टींग पोलिटिकल सुपरिंटेंडेंटसो याची खास उमेद आहे कीं ह्या कमेटीचे मार्फतीनें सरकारनी जो ऐवज सांगसान केला आहे त्याचा योग्य रीतीनें वापर होईल व त्याचे मेहनतीनें लोकही अधिक झटतील व शहरसुधारणुकीविसी उपयोगी गोष्टी अमलांत येण्यासाठीं सरकारास मदत केली असतां त्यांत आपला फायदा आहे असें त्यास समजेल.

वर देण्याचे रीतीमध्यें फेरफार करणेंविसी कांहीं सुचविणें असल्यास त्यांणी असें दाखवावें कीं नवे फेरफारापासून सरकारास नुकसान नसोन लोकांस फायदा आहे असें.

द्रु॥ आत्माराम रघुनाथ कारकून
३ नव्हेंबर १८५४

वर उद्धृत केलेल्या पत्रांत नगरपालिकेच्या कर्तव्याविषयीं त्यावेळीं काय कल्पना होती हें प्रतिबिंबित झालें आहे. या पत्रांत नवे रस्ते करणें, जुने नीट करणें, गटारें स्वच्छ ठेवणें, हौदांची डागडुजी करणें, तारदखाने, पूल, नाव यांवर देखरेख ठेवणें इत्यादि कांहीं स्थूल व प्राथमिक स्वरूपाच्या गोष्टींचा उल्लेख केला आहे, पण शहरांतील नागरिकांचें जीवन सर्वतोपरी आरोग्यपूर्ण सुखमय असावें याचा सर्वांगीण विचार येथें आढळत नाहीं. आतां नगरपालिकेच्या कर्तव्यांत प्राथमिक व दुय्यम शिक्षण, दवाखाने, सार्वजनिक बागा, वाचनालयें, पदार्थ संग्रहालयें, सांथीच्या रोगांचा प्रतिबंध इत्यादि अनेकविध गोष्टींचा समावेश होतो, एवढेंच नव्हे तर हल्लीं नगरपालिकेचीं कर्तव्यें इतकीं विविध झालीं आहेत कीं त्यांत नागरिकांच्या जीवनाला अवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टींचा अंतर्भाव होतो असें म्हटल्यास मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं. तथापि ह्या प्रचंड

वृक्षाचा जन्म १८५४ सालीं कसल्या प्राथमिक स्थितींत झाला याची वरील पत्रावरून स्पष्ट कल्पना येईल.

मे. पोलिटिकल एजंट यांच्या वरील पत्रानंतर लवकरच नगरपालिकेच्या कार्याला सुरवात झाली. कामाच्या सोयीसाठीं शहराचे सहा विभाग करून प्रत्येक विभाग एका सभासदाकडे सोंपविण्यांत आला. प्रत्येक सभासदाच्या मदतीस एक शिपाई देण्यांत आला; आणि आपल्या भागांतील रस्ते स्वच्छ ठेवण्याची व त्यावर देखरेख करण्याची कामगिरी प्रत्येक सभासदावर सोंपविण्यांत आली. त्यांचें हें काम सुलभ करण्यासाठीं १८५५ सालीं एक आज्ञापत्र काढलें गेलें. त्या पत्राप्रमाणें कोणत्याहि प्रकारें रस्ते घाण करणाऱ्या लोकांना ५ रुपयेपर्यंत दंड करण्याचा सभासदांना अधिकार देण्यांत आला.

नगरपालिकेची कल्पना नवी असल्यामुळें कांहीं काळ या संस्थेचें कार्य समाधानकारक रीतीनें चाललें होतें. सभासद आपल्या कामासंबंधीं आस्था दाखवीत असत; ते सभेला नियमित हजर राहत; कामाकडे लक्ष देत व गांवांतून नियमितपणें फिरती करीत यामुळें शहरच्या स्वच्छतेंत बरीच सुधारणा झाली असावी असें वाटतें. कारण इ. स १८६१ सालीं मुंबई सरकारनें कोल्हापूर नगरपालिकेला पत्र लिहून नगरपालिकेचें कार्य चांगलें असल्याबद्दल समाधान व्यक्त केलें आहे. या पत्रांतील कांहीं भाग उद्धृत केला आहे:—


ता. १२ मार्च १८६१ इसवी

"कमेटीचें प्रोसिडिंगावरून ती मोठे चांगले रीतीनें चालली आहे व तेणेंकरून तेथील राहणार लोक हे लवकरच चांगले सुधारतील. त्यास फायदा होईल. यावरून या मोठ्या शहराची चांगली सुधारणूक पुढें होईल असा हनराबल गवरनर कौंसल यांस पूर्ण भरवसा आहे."

तथापि नगरपालिकेच्या कार्याचें हें प्रशंसनीय स्वरूप पुढें टिकलें नाहीं. नाविन्य व [illegible] आकर्षण लवकरच नाहींसें झालें. नगरपालिकेच्या कार्याबद्दल प्रथम प्रथम सभासदांना जी [illegible] होती ती पुढें उरली नाहीं. नगरपालिकेच्या कारभारांत जहागिरदार सरदार यांसारख्या [illegible] लोकांचा समावेश केला गेला होता, हें वर सांगितलेलेंच आहे. ह्या लोकांना [illegible] महत्त्व वाटलें नाहीं. हळूहळू त्यांनीं सभांना गैरहजर राहण्यास सुरवात [illegible] यांचे वकील अथवा कारभारी हे काम पाहूं लागले. पण वकिलांचें अथवा [illegible] वजन पडणें शक्य नव्हतें. म्हणून लवकरच नगरपालिकेच्या [illegible] झालें.

[illegible] १८६८ नंतर नगरपालिकेंत मध्यम वर्गांतील लोकांचा समावेश [illegible] प्रमाणें दरबार सर्जन यांना अध्यक्ष नेमण्यांत आले व नेहमींची [illegible] कार्यकारी मंडळ नेमण्यांत आलें. अध्यक्षांच्या सल्ल्यानेंच





सर्व महत्त्वाच्या गोष्टींचा निर्णय व्हावा, अशी पद्धति स्वीकारली गेली. पण यामुळें देखील नगरपालिकेच्या स्थितींत फारशी सुधारणा झाली, असें म्हणतां येत नाहीं. कारण १८७० सालीं सभासद नियमित हजर राहत नाहींत, आपल्या कामाकडे लक्ष देत नाहींत आणि त्यामुळें दोन सभासदांचें कार्यकारी मंडळ निवडणेंदेखील कठीण होतें अशा तक्रारी केल्या जाऊं लागल्या आणि नगरपालिकेच्या कार्याकडे लोकांचें लक्ष वेधलें जाऊन तिची कार्यक्षमता कशी वाढेल, असा प्रश्न सरकारपुढें उपस्थित झाला.

कोल्हापूर नगरपालिकेंतील सभासदांची संख्या वाढविली असतां तींत अधिक सुधारणा होईल व लोक तिच्या कारभारांत अधिक लक्ष घालूं लागतील, असें सरकारला वाटणें साहजिकच होतें. म्हणून ता. १९ जुलै १८७१ रोजीं पोलिटिकल एजंटकडून नगरपालिकेंत नवीन सभासद करून घेण्याविषयीं एक पत्र आलें. त्या पत्राप्रमाणें ११ ऑगस्ट १८७१ पासून कोल्हापूर नगरपालिकेंत तीस सभासद झाले. त्यांचीं नांवें पुढें दिलीं आहेतः—

१ मेहेरबान रावसाहेब गोपाळराव गोविंद न्यायाधीश व अध्यक्ष.
२ मे. खासगी कारभारी.
३ मे. रावबहादूर कृष्णाजी जयराम, दप्तरदार.
४ मे. विनायक रघुनाथ काळे, सदरअमीन.
५ मे. गणेश विठ्ठल मामलेदार, पेटा करवीर.
६ मे. महादेव मोरेश्वर कुंटे, हेडमास्तर, हायस्कूल.
७ मे. बाळ परशुराम पंडित, डेप्युटी इन्स्पेक्टर.
८ मे. नारायण बापुजी, दौलतीचे ओवरशिअर.
९ मे. बाबाजी बाजी, जेलर.
१० मे. नारायण लक्ष्मण, सिटी फौजदार.
११ मे. बाबाजी रामचंद्र वकील, श्रीस्वामी जगद्गुरु.
१२ मे. कृष्णराव राजोपाध्ये, दुमालदार.
१३ मे. रामचंद्रराव जोशीराव, सदर.
१४ मे. नारायणराव पाटणकर, सदर.
१५ मे. रायाजीराव सरनोबत.
१६ मे. सुलतानराव जप्तनमुलूख.
१७ मे. नारायणराव जाधव
१८ मे. रावजी दामोदर पेन्शनर.
१९ मे. रावजी प्रधान, अंबाबाई संस्थानचें व्यवस्था पाहणार.
२० मे. [illegible] गोपट, व्यापारी.



२१ मे. मल्लाप्पा जंगले, सदर.
२२ मे. रावप्पा नाईक, सदर.
२३ मे. दादा काजी वा॥ अनेने काजी.
२४ मे. बाबाजी ऊर्फ रेहिमान वा॥ मिराभाई हकीम.
२५ मे. चिंतो कृष्ण गद्रे, वकील.
२६ मे. लक्ष्मण मार्तंड कंत्राटदार.
२७ मे. कृष्णराव भिकाजी गोखले, ट्यूटर, बावडा व इचलकरंजी.
२८ मे. भिकाजी विठ्ठल चिटणीस.
२९ मे. विश्वनाथ कृष्णनाथ, हेड्क्लार्क.
३० मे. गोविंदराव सदाशिव दिवाण.

पण सभासदांची इतकी संख्या वाढवूनहि फारसा उपयोग झाला नाहीं. म्हणून या बाबतींत आणखी कोणते उपाय योजिले गेले याचा आपण चौथ्या प्रकरणांत विचार करूं.

आतां आपण नगरपालिकेच्या उत्पन्नाविषयीं व खर्चाविषयीं विचार करूं. कोल्हापूर नगरपालिकेला खर्चासाठीं दरबारकडून तीन हजार रुपयांचें उत्पन्न देण्यांत आलें होतें, हें मागील प्रकरणांत सांगितलें आहेच. तथापि नगरपालिकेचा खर्च १८५४ सालापासून तों १८७२ पर्यंत कसा झाला, हें पाहणें मोठें उद्बोधक आहे; कारण त्यावरून नगरपालिकेच्या खर्चांत कशीं स्थित्यंतरें झालीं याची कल्पना येते. नगरपालिकेच्या स्थापनेपासून तों १८६८ पर्यंत झालेल्या खर्चाचा तक्ता पुढें दिला आहेः—

| साल | खर्च |
|---|---|
| १८५४–५५ | ३०१– ०–१० |
| १८५५–५६ | १७८–१०– २ |
| १८५६–५७ | २८०– ५– ८ |
| १८५७–५८ | २८०–११– १ |
| १८५८–५९ | ७०२– ६– ७ |
| १८५९–६० | ४७३३– २– ८ |
| १८६०–६१ | ८५७४– ७– ४ |
| १८६१–६२ | ४७७७– ५– १ |
| १८६२–६३ | २४५७–१२– १ |
| १८६३–६४ | ४२०९– २– ० |
| १८६४–६५ | ३७०९– २– ० |
| १८६५–६६ | ५०७५– ४– ९ |

| साल | खर्च |
|---|---|
| १८६६–६७ | ४४८५– ५– ५ |
| १८६७–६८ | ५७२२– ७– ४ |

वरील तक्त्यावरून हें दिसून येईल कीं पहिल्या पांच वर्षांत नगरपालिकेचा फारसा खर्च झालेला नाहीं. केवळ पगारखातें आणि कागद, शाई, ब्रश व केरसुणी इत्यादि किरकोळ वस्तु खरेदी करण्यांत खर्च झाला आहे. त्यावेळीं सगळ्या नोकरांचा पगारखर्च दरमहा अवघा १५॥ रुपये होता. पण १८६० पासून खर्चाची रक्कम वाढती आहे. १८६० नंतर नगरपालिकेचा रस्त्यांची दुरुस्ती करणें, प्लेगांत औषधाची सोय करणें, सार्वजनिक कार्याला मदत करणें इत्यादि बाबतींत पुष्कळ खर्च वाढला. तसेंच नोकरवर्ग, कारकून, मजूर यांचीहि वाढ झाली. यामुळें १८६० पासून खर्चाची रक्कम वाढली व १८६७–६८ सालीं रु. ५७२२–७–४ इतकी झाली.

यावेळीं नगरपालिकेच्या कार्याचा व्याप इतका वाढला कीं दरबारनें तोडून दिलेलें ३००० रुपयांचें उत्पन्न तिच्या कार्याला अपुरें पडूं लागलें. वाढत्या लोकसंख्येच्या मानानें शहराचें आरोग्य व स्वच्छता यांची सुधारणा करण्याच्या बाबतींत अधिक पैशाची गरज पडूं लागली. म्हणून १८६९ सालीं नगरपालिकेला दरबारकडून मिळत असलेली सालीना तीन हजारांची नेमणूक बंद करण्यांत आली व त्याऐवजीं दरबारला मिळत असलेल्या उत्पन्नापैकीं कांहीं बाबींचें उत्पन्न तोडून देण्यांत आलें. या विषयींचा इ. स. १८६९ चा हुकूम पुढें दिला आहेः—

मु॥ नंबर २६०

यादी मेहेरबान रावबहादूर गणेश नारायण काळे दप्तरदार इलाखा कोल्हापूर याजकडे कर्नल जॉर्ज अलेक्झांडर अंडरसन साहेब, पोलिटिकल एजंट, कर्नाटक आणि कोल्हापूर याजकडून जाण्याची ऐसाजे.


शहर करवीर येथील म्युनिसिपल कमिटीकडे खर्चाबद्दल दौलतींतून ३००० रुपये सालीना देऊन खर्च देण्याची तजवीज होत होती. त्या.......शहराची सुधारणूक व्हावी तशी होत नाहीं आणि वरचेवर रोग उठणें होतात याजमुळें अधिकचे खर्चीस पाहिजे म्हणोन पूर्वी मरहूम—साहेब, ॲपोथेकरी इन्चार्ज सिव्हिल मेडिकल ड्यूटी व सबॉर्डिनेट मॅजिस्ट्रेट मेहेरबान न्यायाधिश यांजकडून लिहून आल्यांवरून पाहतां शहर मोठें असून त्याची दुरुस्ती होण्याची तशी अवश्य जाहली पाहिजे. व गांवांतील धर्मशाळा व तटासंबंधीं व गांवांतील नळासंबंधीं खर्च दौलतींतून इमारत कारखान्याचे मार्फत खर्च पडून दुरुस्ती होत होती. तीं सर्व कामें कोल्हापूर शहरांतील समजून म्युनिसिपल कमेटीकडे चालते सालापासून सोपवून तिकडून दुरुस्ती होण्याची ती जाहली पाहिजे. आजवर म्युनिसिपल कमेटीकडे खर्चास पैसा शहर कोल्हापूरचे बाबेची नेमून दिल्हा तो चालतें सालचें उत्पन्न



## कोल्हापुरांतील जुन्या तटाचा अवशेष



रविवार बुरुज




रविवार वेशींतील "बिंदु चौक" व आजचें सार्वजनिक सभास्थान

नगरपालिकेनें चालविलेले मुलींचे मोफत हायस्कूल.



नगरपालिकेनें बांधलेली एक शाळा इमारत.



रुईया विद्यालय, सुभाष रोड.



७१८०-१५-४

| | |
|---|---|
| ४२००- ० -० | जकात, माल मक्ता. |
| १०१०- ० -० | पानखातें, मक्ता. |
| १००५- ० -० | तंबाकू मक्ता. |
| २३६- ० -० | खारे मासे मक्ता. |
| ४८-१५-४ | शहरचे खंदकांतील उत्पन्न मक्ता. |
| ६५- ० -० | विषयुक्त पदार्थांच्या रजा चिठ्या दिल्याबद्दल. |
| ६१६- ० -० | तपकीर खातें मक्ता. |
| ७१८०-१५-४ | |

११९- ० -८ भांगअफूबद्दल करवीर पेट्यांकडील गांवगन्ना १२७९ फसली सालास एकंदर मक्ता बेरीज ८३६ जाहली आहे. त्या पो भरतीस देण्याचें तें खुलासेवार कोल्हापुरांत निराळी तजवीज भांगअफूबद्दल होण्याची म्युनिसिपल कमेटीकडून होईल.

७३००- ० -०

येणेंप्रमाणें त्र्याहत्तरशेहे रुपये उत्पन्न खर्चास नेमून दिल्हें. असो, याप्रमाणें मक्त्याप्रमाणें बेरीज ७१८०-१५-४ करवीर पेठ्यास जमाबंदींत सामील आहे ती दौलतीचे जमाबंदीस सामील न ठेवितां म्युनिसिपल कमेटीकडे खर्च लिहून त्याची वसुलाबद्दल वगैरे तजवीज तिकडून होण्याचा ठराव केला आहे. तरी मामलेदारांनीं सदरहू (७) सात कलमांच्या रकमा म्युनिसिपल कमेटीकडे दिल्याबद्दल सबब लिहून जमाबंदींतून कमी करून नगदी वहीस मक्त्याचा जमाखर्च पूर्वीं जाहला असल्यास त्याचा उलट जमाखर्च करून कमी केलें पाहिजे व म्युनिसिपल कमेटीकडे त्या बाबीचा मक्त्याप्रमाणें आकार जमा धरून येणें नांवें लिहून वसूल करून खर्च पुरविला पाहिजे. आणि भांगअफूबद्दल भरतीची रक्कम ११९-८-० देण्याची ठरविली ती चालते सालास एकंदर मक्ता गांवगन्ना सुरूं जाहला असोन जमाबंदींतून तितकी रक्कम कमी करतां येणार नाहीं.....तितकी रक्कम करवीर पेठ्याचे मामलेदार यांनीं सदरहू बाबींचा वसूल येईल त्याजप्रमाणें पक्का खर्च लिहून म्युनिसिपल कमेटीकडे घ्यावी व कमेटीकडे सदरहू रक्कम रोख जमा करून खर्चास पुरवावी. पुढील सन १२८० फसली सालचे सदरहू बाबींचें येण्याबद्दल कशी व्यवस्था करण्याची ते योग्य वाटेल त्याप्रमाणें म्युनिसिपल कमेटीनें इकडे कळवून तजवीज केली पाहिजे. म्युनिसिपल कमेटीकडे इस्टाब्लिशमेंट दरमाहे नेमण्यांत आलें तें.

२५ कारकून १
१५ कारकून १
४० शिपाई ८
दर ५ प्रमाणें
४८ भंगी ८
दर ६ प्रमाणें
८ भिस्ती १
१० मशालची २
दर ५ प्रमाणें

२० मेस्त्री १
९ नाईक १
२० कामाटी ४
दर ५ प्रमाणें
१० बंब, आग
विझवणाऱ्याकडे
शिपाई २
दर ५ प्रमाणें

२०५ रुपये.

यांप्रमाणें असल्याविषयीं कमेटीनें तजवीज केली पाहिजे. नळाचें काम खासगी कारभारी यांचेमार्फत आहे त्यास सरकार वाड्यांतील संबंध असल्यामुळें खासगी कारभारी यांचेमार्फत आहे तसें राहून त्याजला कमेटींत पंच नेमून त्यांच्या विचारानें जाहले म्हणजे हरकत पडणार नाहीं. नळासंबंधीं कारण पडेल तेव्हां वरीष्ठाचा हुकूम खासगी कारभारी यांनीं घ्यावा. म्युनिसिपल कमेटीकडून दरमाहे व सालाचे हिशेब आजवर दौलतीकडे येत होते ते पुढें बंद करून त्याचे त्यांनीं वर लिहिलें उत्पन्नाबद्दल व कमेटीकडे....वगैरे उत्पन्न येत आहे त्यासुद्धां खर्चासहीत वक्तशीर टेविले पाहिजेत. यांप्रमाणें देऊन तूर्त कशी व्यवस्था राहते तें पाहण्याचें ठरविण्यांत येऊन कळावयास लिहिलें आहे. शहर कोल्हापूर येथील अफूभांग मिळून आठ बाबींचें उत्पन्न येईल तें म्युनिसिपल कमेटीकडे पुढें येऊन शहरचे दुरुस्तीकडे वगैरे खर्च होण्याची तजवीज जाहली पाहिजे. कळावें, ता. २८ ऑगस्ट सन १८६९ इसवी.

सही इंग्रजी
नारो रघुनाथ अ. कारभारी.

१८६९ च्या या हुकुमामुळें नगरपालिकेचें जें उत्पन्न सालिना फक्त ३००० रु. होतें त्यांत किती वाढ झाली, हें पुढील तक्त्यांवरून दिसून येईल.



## जमा

| बाब | १८७०-७१ | १८७१-७२ |
|---|---|---|
| जकात .... .... .... | ४६०० | ५१०० |
| पानखोती .... .... | १३७५ | १३७६ |
| तंबाखू वसूल .... .... | ८०६ | ८१० |
| विषयुक्त पदार्थ .... .... | ६० | ७० |
| अफू व भांग खोती .... .... | ८५५ | ८१० |
| मच्छी खोती .... .... | २४० | २५७ |
| तपकीर खोती .... .... | ५१० | ३९५ |
| म्यु. पालटीचे रूळ तोडलेबद्दल दंड .... | ७६- ०- ८ | १०३-१४-० |
| केर व मैला विक्रीबद्दल .... .... | १६१- १- ८ | १८५- ५-४ |
| सरकारी तारदखान्याचें भाड्याव॥ .... | ३२४- ८- ० | ३२०- ८-० |
| दुमालदार पेटकरी यांजकडून .... | १८०- ०- ० | १८०- ०-० |
| खंदक व दुसरे जागेबद्दल भाडें .... | १३२-१५- ४ | ७३-१५-४ |
| जुने सामानविक्रीबद्दल .... .... | ६६- ६- ० | ३६-१५-६ |
| किरकोळ .... .... .... | ४१-१०- ८ | २३७- ७-५ |
| मागील सालाबद्दल वसूल .... .... | ५०७- ०-११ | ५८८- ९-५ |
| सन १२८१ फसलीचे मक्तेबाबीपैकीं .... | ३७७- ३- ० | ४९०- २-६ |
| | १०३१३- ९- ३ | ११०३४-१३-६ |

### खर्च

| बाब | १८७०–७१ | बाब | १८७१–७२ |
|---|---|---|---|
| सडका व गटार दुरुस्ती | ३८९४– ५–६ | सडका व गटार दुरुस्ती | ६५६३– ५– १ |
| धर्मशाळा, तारदखाने व तट दुरुस्ती | ७४०– २–११ | धर्मशाळा दुरुस्ती | ५०५–११– ४ |
| शहरांत दिवे लावणेंकरितां | ५८५– ८– ४ | शहरांत दिवे लावण्याकरितां | ५५३– ९–११ |
| नोकरवर्गाचा पगार | २७८९– ४– ७ | नळदुरुस्ती व सफाई | ६७– ५– ५ |
| रस्तेवर पाणी घालणेंबद्दल | ५५–११–१० | तारदखाने दुरुस्ती व शाकारणी | ३५६– ९– १ |
| किरकोळ | ३७–१०– २ | | |
| | | बंबखातें | १९०–१४– ९ |
| कंदील वगैरे शिलकी सामान खरेदी | २१८–१४– ० | कचेरी सामान खातें वगैरे | ४३४–१०– ३ |
| लोकांचें देण्याबद्दल | १२१–१४– ७ | कचेरी शाकारणी | ६०– ३– ५ |
| कमेटीच्या कामाबद्दल मक्तेवाल्यांना दिलें. | ४७५–१२– ९ | शिलकी सामान खातें | २३७– ०– ० |
| | | नोकर पगार | १०३१–१०– २ |
| | | मक्तेदार यांना | ३७७– ३– ० |
| | | कमेटीच्या कामाबद्दल | १२१– ०– ७ |
| | ८९१९– ४– ८ | | १०४९९–३– ० |

अशाप्रकारें कोल्हापूर नगरपालिकेचीं स्थित्यंतरें होत असतां १८७३ सालीं आपल्या प्रांतांतील नगरपालिकांसाठीं मुंबई सरकारनें नवीन कायदा पास केला. हा कायदा झाल्याबरोबर येथील नगरपालिकेंत सुधारणा करणें, तिची कार्यक्षमता वाढविणें व तिला प्रगतिपर वळण देणें इत्यादि गोष्टींकडे लक्ष वेधलें जाणें अपरिहार्य होतें. म्हणून कोल्हापूर नगरपालिकेची १८७२ सालानंतर कशी परिणति झाली, याचें विवेचन पुढील प्रकरणीं करूं.

# प्रकरण ३ रें

# नगरपालिकेच्या उत्पन्नाची वाढ

## (१८७३-८९)

कोल्हापूर नगरपालिकेच्या स्थापनेपासून तों १८७२ सालापर्यंत तिच्या कार्यपद्धतींत व जमाखर्चांत कशाप्रकारचीं स्थित्यंतरें होत गेलीं याचें समालोचन मागील प्रकरणांत केलें. या कालांत नगरपालिकेच्या सभासदांची संख्या वाढून तिच्या उत्पन्नांतहि थोडी वाढ झाली. १८७३ सालच्या उत्पन्नाचा तक्ता पुढें दिला आहे:—

रु. १९५० घोड्यांवरील व इतर जनावरांवरील कर.
रु. ३१८० आयात व निर्यात मालांवरील कर.
रु. २७४० गांजा, तपकीर व तंबाखू यांवरील कर.
रु. १९५० विड्याच्या पानावरील कर.
रु. ३०० खारे माशांवरील कर.
रु. ७० विषयुक्त पदार्थांवरील कर.
रु. ३७९ बाजारपेठ व नगरखंदक यांचें भाडें.
रु. १८० दुमालदारांकडून आलेली रक्कम.
रु. ४२८ इतर.

रु. ११९१८७ एकूण उत्पन्न

त्यावेळीं कोल्हापूर शहरची लोकसंख्या ४०,००० होती व एकंदर ७००० घरें होतीं. शिवाय नगरपालिकेच्या कार्याचा व्याप दिवसेंदिवस वाढत असल्यामुळें, रु. ११,१८७ चें उत्पन्न शहरसुधारणेच्या दृष्टीनें अपुरें पडूं लागलें व नगरपालिकेच्या उत्पन्नांत वाढ करणें अपरिहार्य झालें.

नगरपालिकेचें उत्पन्न त्यावेळीं कमी कां होतें याचा विचार करणें जरूर आहे. याचें पहिलें कारण म्हणजे त्यावेळीं कोल्हापूर शहरांत घरफाळा नव्हता. प्राचीन काळापासून ब्राह्मणवर्गाला घरफाळ्याची माफी होती. तसेंच सरदार, जहागीरदार इत्यादि अनेक प्रकारचे लोक या फाळ्यापासून मुक्त होते. याशिवाय शहरांतील ११ पेठांपैकीं ५ पेठा दुमालदारांच्या मालकीच्या होत्या व त्यांवर घरफाळा घेण्यास इतरांना अधिकार नव्हता. अशा परिस्थितींत घरफाळ्याची कल्पना अस्तित्वांत येऊं शकली नाहीं तर त्याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. शिवाय जरी यावेळीं जकात घेण्याची रूढी होती, तरी तीपासूनदेखील फारसें उत्पन्न होत नसे. कारण पुष्कळच वजनदार लोक जकात देत नसत. त्यावेळीं 'खांदजुपी' नांवाची एक पद्धत रूढ होती. या पद्धतीप्रमाणें एकदां कांहीं रक्कम सरकारला दिली, कीं पुढें जकातीची माफी मिळत असे. या सर्व

कारणांमुळें शेंकडा ८० लोक जकात देत नसत. तसेंच, पायखाने व पाणी यांवरील करहि पुष्कळांना माफ असें व त्यामुळेंहि नगरपालिकेचें उत्पन्न कमी होतें. सारांश, त्यावेळीं कोल्हापूर शहरांत अजमासें शेंकडा ५ लोकच कर देत असावें, असें दिसतें. इतकेंच नव्हें, तर हा कराचा बोजा बहुधा गरीब वर्गावरच पडत असे व श्रीमंत लोक कोणत्या तरी कारणानें तो चुकवीत असत, असें दिसून येतें.

अशा प्रकारें कोल्हापूर शहरांत त्यावेळीं आक्षेपार्ह हक्काची व अन्यायमूलक करवसुलीची पद्धत असल्यामुळें, त्यांत कांहींतरी सुधारणा झाली पाहिजे असें सरकारला वाटूं लागावें, हें अपरिहार्य होतें. म्हणून ता. ७ फेब्रुवारी १८७२ रोजीं मुंबई सरकारकडून त्यावेळचे कोल्हापूरचे पोलिटिकल एजंट यांना एक पत्र आलें. त्यांत "कांहीं विशिष्ट वर्गाकडे आक्षेपार्ह हक्क चालू असल्यामुळें नगरपालिकेच्या करांत अनियमितपणा आहे आणि त्याकडे लक्ष वेधलें जाणें आवश्यक आहे." असा आशय होता. या पत्रानुसार त्यावेळचे पोलिटिकल एजंट कर्नल जी. एस. ए. अंडरसन यांनीं या बाबतींत चौकशी करण्याकरितां ता. २४–२–१८७३ रोजीं एक समिति नेमिली. त्या समितींतील सद्गृहस्थांचीं नांवें पुढें दिलीं आहेत. :—

अध्यक्षः—मि. एस्. हॅमिक, ॲसिस्टंट पोलिटिकल एजंट.
सभासदः—श्री. महादेव वासुदेव बर्वे, स्टेट कारभारी.
श्री. गोपाळ गोविंद फाटक, न्यायाधीश.
श्री. विनायक रघुनाथ काळे, सदर अमीन.
श्री. गणेश विठ्ठल, मामलेदार, करवीर.

या समितीनें वरील प्रश्नाचा सांगोपांग विचार करून ता. १२ एप्रिल १८७३ रोजीं आपला अहवाल पोलिटिकल एजंटकडे सादर केला. हा अहवाल फार महत्त्वाचा असल्यामुळें तो समग्र पुढें दिला आहेः—

कोल्हापूर
ता. १२ एप्रिल १८७३.

"आपल्या ता. २४ फेब्रुवारी १८७३ च्या नं. ५७७ च्या पत्रानुसार कोल्हापूर शहरांतील करासंबंधीं जी चौकशी समिति नेमली, ती आपला पुढील अहवाल आपल्याकडे सादर करीत आहे.

कोल्हापूर नगरपालिकेची स्थापना १८५४ सालीं झाली व सार्वजनिक कामासाठीं सरकारकडून खर्चाकरितां सभासदांकडे रु. ३००० दिले जात असत. ही प्रथा १८६९ सालापर्यंत चालू होती. पण ही रक्कम फार अपुरी पडते असें शिष्टमंडळ गेल्यावर संस्थाननें वार्षिक ३००० रु. देण्याऐवजीं आपलीं कांहीं खातीं नगरपालिकेकडे तोडून दिलीं. सन १८७२–७३ सालीं या खात्यांचें पुढीलप्रमाणें उत्पन्न झालें:—



| | | |
|---|---|---|
| १ | आयात–निर्यात मालांवरील जकात | ५१३०– ०–० |
| २ | तंबाखूवरील कर | ८५– ०–० |
| ३ | तपकिरीवरील कर | ३००– ०–० |
| ४ | अफू व भांग यांवरील कर | १६१५– ०–० |
| ५ | खारे मासे यांवरील कर | ३००– ०–० |
| ६ | विड्याचीं पानें यावरील कर | १९५०– ०–० |
| ७ | विषारी पदार्थांबद्दल कर | ७०– ०–० |
| ८ | खंदकाचें भाडें | ७९–११–४ |
| ९ | गुरुवार, मंगळवार, शनवार व केसापूर या पेठेंतील दुमालदारांनीं दिलेली रक्कम | १८०– ०–० |
| १० | गुरुवार पेठेंतील कांहीं रस्त्यांवरील कर | २८–१०–५ |
| | | १०४७८– ५–९ |
| | **विशेष** | |
| ११ | दंड इ. | ४००– ०–० |
| १२ | बाजारपेठेचें भाडें | ३००– ०–० |
| | | ७००– ०–० |
| | एकूण | ११९७८– ५–९ |

यांपैकीं ९, १०, ११, १२ या बाबींचे कर पूर्वी संस्थानकडून वसूल केले जात असत. म्हणून त्याबद्दल विशेष लिहिण्याचें कारण नाहीं. खारे मासे व गरीब लोकांच्या खाद्यपदार्थांवरील कर आक्षेपार्ह आहेत. जकातीखालीं दाखविलेली रु. ५१३० ची रक्कम ही (१) शहरांत विक्रीसाठीं आलेल्या व शहरांतून बाहेर जाणाऱ्या पदार्थांवरील कर (२) व जनावरांच्या विक्रीवरील कर यांची मिळून झालेली आहे. घोडे व इतर जनावरें यांवर रुपयाला एक आणा व मेंढ्यांवर प्रत्येकीं ५ पै असा कर आहे. गाई व गाढवें यांच्या विक्रीवर कर वसूल केला जात नाहीं. हें खातें महत्त्वाचें असून मागील सालीं त्यांच्यावरील जकातीचें उत्पन्न १९५०–०–६ इतकें झालें. जनावरांवरील कर हा जरी जकातींत सामील झालेला असला तरी त्याचा जकातींत समावेश करितां येत नाहीं. म्हणून ही रक्कम वजा जातां आयात व निर्यात मालांवरील करांपासून १८७२–७३ सालीं रु. ३१८० पेक्षां अधिक रक्कम वसूल झालेली नाहीं. जकात ही कंत्राटदाराकडून वसूल केली जाते; पण त्याला नगरपालिकेला द्यावयाच्या रकमेव्यतिरिक्त जकातवसुलीला मदत करणाऱ्या

वगैरे हक्कदारांना बऱ्याच रकमा द्याव्या लागतात. अशा रीतीनें द्याव्या लागणाऱ्या रकमांची गेल्या ९ वर्षांची सरासरी रु. १२५१–४–० होती. याखेरीज कंत्राटदाराला दरवर्षी मे. विश्वासराव गायकवाड यांनाहि कांहीं रक्कम द्यावी लागे. कारण ते संस्थानचे वंशपरंपरेचे मानकरी असून, मंगळवार पेठेंतील दुमालदार या नात्याचा जकात वसूल करण्याचा आपला हक्क त्यांनीं सोडला होता. ही रक्कम उत्पन्नावर शेंकडा ७। इतकी द्यावी लागे व त्याची गेल्या ९ वर्षांची सरासरी रु. २६६–१२–० इतकी होती. तसेंच कांहीं धार्मिक बाबींसाठीं त्यांना रु. १२०–८–० इतकी देणगी द्यावी लागत असे. यावरून कंत्राटदाराला नगरपालिकेला द्याव्या लागणाऱ्या रकमेच्या एकतृतीयांश इतकी रक्कम हक्कदारांना वगैरे द्यावी लागे, हें स्पष्ट आहे. जकातींतून या रकमा रोख द्याव्या लागत असल्यामुळें जनावरांवरीलकर वजा जातां जकातीचें उत्पन्न रु. ५००० ते ६००० च्या दरम्यान आहे, असें मानण्यास हरकत नाहीं. ही रक्कम जकातीचे भारी दर पाहतां फार कमी आहे. याचें मुख्य कारण म्हणजे कोल्हापूर शहरांतील बहुसंख्य लोक अंशतः किंवा पूर्णतः जकातीपासून मुक्त आहेत. हल्लीं जकातीची माफी असणाऱ्या लोकांचे पुढीलप्रमाणें तीन वर्ग करतां येतील:—

(१) खांदजुपी देणारे सर्व लोक.
(२) सर्व सरदार, जहागीरदार व खेडेगांवांतील अधिकारी.
(३) गुरुवार व शनिवार पेठेंतील रहिवासी.

(१) खांदजुपी देणाऱ्यांत व्यापाऱ्यांचा भरणा अधिक आहे. ते ४८६ जण असून त्यांच्याकडून रु. १६३–८–० ही रक्कम दिली जाते. म्हणजे प्रत्येकाला सुमारें ६ आणे कर पडतो. ही रक्कम एका धान्याच्या गाडीवरील जकातीपेक्षांहि कमी आहे. कागदपत्रांवरून पाहतां असें दिसतें कीं, ही खांदजुपीची पद्धत ७०–८० वर्षांपासून रूढ आहे. पण त्याचा उगम कसा झाला हें सांगतां येत नाहीं. हा कर प्रत्येक पेठेंतील प्रमुख अशा मानाडी लोकांकडून वसूल होऊन तो नगरपालिकेला दिला जातो; व नगरपालिका प्रत्यक्षपणें प्रत्येक व्यक्तीबाबत लक्ष घालत नाहीं.

(२) सरदार–जहागीरदारांचीं १५३ घराणीं आहेत. त्यांचा माफीच्या हक्काच्या कारणांसह तक्ता पुढें जोडला आहे. (येथें छापिलेला नाहीं.)

(३) गुरुवार व शनवार पेठेंतील रहिवासी आपल्या पेठेंतील दुमालदारांना पैसा देतात. म्हणून त्यांना नगरपालिकेच्या करांची माफी आहे. शनवार पेठेंतील दुमालदार हे दरवर्षी रु. ६०–८–० इतकी रक्कम वसूल करतात व गुरुवार पेठेंतील दुमालदारानें १८७१–७२ सालीं आपल्या पेठेंतून बैलाचा कर म्हणून रु. ५१ जमा केले, याचें प्रत्यंतर पाहण्यासाठीं कंत्राटदाराला आठ दिवस जे प्रत्यक्ष जकात देतात व जे निरनिराळ्या कारणांसाठीं जकात देत नाहींत, अशा लोकांची यादी करण्यासाठीं सांगितले. त्याचा निकाल पुढीलप्रमाणें आहे:—



| माफीचा हक्क असलेल्या लोकांकडून वसूल व्हावयास पाहिजे असलेली रक्कम | | | प्रत्यक्ष वसूल | एकूण |
|---|---|---|---|---|
| पूर्णतः माफ | खांदजुपी | एकूण | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १५७-८-१ | १४९-६-१० | ३०६-१४-११ | ३६८-०-४ | ६७४-१५-३ |

कंत्राटदारानें आपलें असें मत दिलें आहे कीं, कोल्हापूर शहरांत शेंकडा ५ पेक्षां अधिक लोक जकात देत नाहींत. कांहीं जणांच्या मतें शेंकडा २० लोक जकात देत असावेत.

आतांपर्यंत आम्ही हल्लीं नगरपालिकेचें उत्पन्न कोणकोणत्या खात्यांतून येतें हें दाखविलें. हा प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडविण्याच्या बाबतींत दोन मोठ्या अडचणी आहेत. (१) कोल्हापुरांतील ११ पेठांपैकीं ५ पेठा दुमालदारांच्या ताब्यांत असून त्या पेठेंतील कर बसविण्याचा व वसूल करण्याचा ते संपूर्ण हक्क सांगतात. माफीचा हक्क सांगण्यांत पुष्कळजण केवळ वहिवाटीचा दाखला देतात. कांहींजण त्या काळांतील सरकारकडून जकातीबद्दल माफी मिळाल्याबद्दलचे कागदपत्र हजर करतात. त्यांतील शब्दांवरून ही माफी सर्व प्रांतांतील किरकोळ करांविषयीं असावी व कोल्हापूर शहरालाच लागू नसावी असें वाटतें.

इनाम पेठा खालीलप्रमाणें आहेत :—

पेठ मंगळवार—दत्ताजीराव गायकवाड.
पेठ शनिवार—रायाजीराव जाधव.
पेठ गुरुवार—रावजी महाराज.
पेठ केसापूर—संकेश्वरचे शंकराचार्य.
पेठ जुना बुधवार—माजी जखगिरी गोसावी.

यांपैकीं शंकराचार्य हे हक्काचे कागद दाखवूं शकतात. रावजी महाराजांनीं १८०६ च्या सनदेची प्रत दाखल केली आहे. पण मूळ सनद दाखल करीत नाहींत. दत्ताजीराव गायकवाड हे १८३६ चा आपल्या वारसा चौकशीचा व त्याच सालचा सदर पेठेवरील जप्ती उठविल्याचा हुकूम हजर करतात. रायाजीराव जाधव हे विनसहीचा १८२६ चा एक कागद दाखवितात. पण जखगिरी यांच्याबद्दल कांहीं आधार दाखविला गेलेला नाहीं. ते वारले असून त्यांच्या मिळकतीवर दोघेजण आपला हक्क सांगतात. दुमालदार हे सरकारी खजिन्याला वार्षिक देणगी देतात. व त्यांनीं १० वर्षांचा आपला अहवाल पुढीलप्रमाणें दिला आहे. :—

| एकूण वसुली | वसूल झालेली रक्कम | सरकारला दिलेली रक्कम | निव्वळ उत्पन्न |
|---|---|---|---|
| मंगळवार | १३,९०६– ८–११ | २,०९१–१०–११ | ११,८१४–१४–० |
| शनवार | १०,७९२– ०–११ | २,२१९–१४– ३ | ८,५७२– २–९ |
| गुरुवार | ६५८– ८–१० | ७९६– ८– ३ | .... |
| केसापूर | ४,३८३– ५– ९ | २,४०४–१४– ४ | १,९८८– ७–५ |
| जुना बुधवार | १,४४१– ४– ० | ५५८– ५– ० | ८८२–१५–० |
| एकूण.... | ३१,१८१–१२– ५ | ८,०७१– ४– ९ | २३,२५८– ७–१ |

नगरपालिकेला रस्तादुरुस्ती, दिवाबत्ती इत्यादि प्रत्येक महत्त्वाच्या शहराला आवश्यक असणाऱ्या गोष्टी करावयाच्या असतील तर तिचें उत्पन्न रु. २०,००० इतकें असलें पाहिजे. इतकें उत्पन्न होण्यासाठीं पुढील योजना सुचविली आहे. करांत सारखेपणा आणावयाचा झाल्यास खालसा व दुमालदारांच्या ताब्यांतील पेठा यांतील भेद नाहींसा केला पाहिजे. ही गोष्ट सरकारनें दुमालदारांचे हक्क काढून घेण्यानेंच शक्य आहे. हे हक्क प्रारंभींच अयोग्य रीतीनें दिले गेलेले असल्यामुळें तसें करणें न्याय्य आहे. कऱ्हाडचें उदाहरण पाहून व त्याचप्रमाणें दुमालदारांना त्यांच्या हक्काबद्दल मोबदला देऊन हा प्रश्न संस्थाननें सोडवावा. हल्लीं चालू असलेल्या जकातींत भाग घेण्याबद्दल उत्पन्न होणाऱ्या गुंतागुंती फार आहेत. तसेंच पुष्कळ माफींना जरी त्या साधार नसल्या तरी पुष्कळ काळ चालू असल्यामुळें एकप्रकारचें स्थैर्य आलें आहे. जनावरांवरील कर कमी करून पण कायम ठेवून हल्लीची जकातीची पद्धत नाहींशीं करणें युक्त आहे. तसेंच विक्रीच्या किंवा खासगी कामांकरितां शहरांत येणाऱ्या किंवा शहराबाहेर जाणाऱ्या जनावरांवर व वाहनांवर कर बसवावा. गाडीला ४ आणे, प्रत्येक उंटाला २ आणे, घोडा किंवा बैल यांना १ आणा, गाढवाला १ पैसा व दोन बैलांच्या गाड्यांना ८ आणे असे कर सुचविले आहेत. या करामुळें कमीतकमी ५००० रु. उत्पन्न होईल असा अंदाज आहे. हल्लीं चालू असलेल्या त्रासदायक, अयोग्य आणि पक्षपाती अशा जकातीऐवजीं हा कर फार लहान व साधा आहे. हा यांत मोठा फायदा आहे. तसेंच घरफाळा बसविणेंहि आतां अवश्यक आहे. हल्लीं सरकारी घरफाळा आहे. पण वरच्या वर्गांतील लोक तो देत नाहींत. म्हणून ज्याच्या त्याच्या उत्पन्नाप्रमाणें सर्व लोकांना घरफाळा बसविणें हें इष्ट आहे. कोल्हापुरांत ७००० घरें आहेत व ५००० घरें फाळा बसविण्याला पात्र आहेत.



इतर शहरांप्रमाणें येथेंहि घरफाळा बसविल्यास त्यापासून १०,००० रु. उत्पन्न होईल असा अंदाज आहे. तसेंच जनावरांवरील कर व तंबाकू, पानें, तपकीर, गांजा, भांग व इतर वस्तु यांवरील कर यांपासून ५००० रु. उत्पन्न होईल. अशाप्रकारें या सर्वांचे नगरपालिकेला २०,००० रु. उत्पन्न होईल आणि एवढी रक्कम कोल्हापुरांतील नगरपालिकेला आपलें कार्य करावयाचें असेल तर अवश्यक आहे. "

हॅमिक समितीचा हा अहवाल फार महत्त्वाचा आहे. त्यांत त्यावेळची कोल्हापुरची स्थिति, करवसुलीची पद्धति, कांहीं जणांकडे असलेले अन्यायमूलक हक्क व दुमालदार पद्धति या सर्वांचें स्पष्टीकरण करून नगरपालिकेच्या उत्पन्नांत कशी वाढ होईल याचे मार्गहि सुचविले आहेत. यामध्यें कोल्हापूर शहरांत इतर शहरांप्रमाणें घरफाळा बसवावा, ही प्रमुख योजना होती. हॅमिक समितीच्या सूचनांचा नगरपालिकेला विचार करणें आवश्यक होतें. त्याप्रमाणें शहरांत घरफाळा बसवावा कीं नाहीं याविषयीं नगरपालिकेच्या सभेंत चर्चा झाली. त्यावेळीं २६ सभासदांनीं अनुकूल मत दिलें, २ सभासदांनीं प्रतिकूल मत दिलें व २ सभासद तटस्थ राहिले. अशा रीतीनें घरफाळा बसवावा ही योजना सभेंत बहुमतानें मंजूर झाली. तसेंच या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं त्यावेळचे नगरपालिकेचे अध्यक्ष श्री. जी. जी. फाटक यांनीं ता. १९ एप्रिल रोजीं जो अहवाल सादर केला त्यांत घरफाळा बसविण्याला मान्यता दिली. तसेंच कोल्हापुरांतलि पांच पेठांचा प्रश्न बिकट नसून त्या पेठांतील दुमालदारांना त्यांच्या नुकसानीबद्दल मोबदला दिला असतां, ते आपल्या पेठांवरील हक्क सोडून द्यावयला तयार होतील, असें आपलें मत व्यक्त केलें आहे. सारांश, हॅमिक समितीनें सुचविलेल्या घरफाळ्याला फाटक-समितीनेंहि मान्यता दिली.

त्यानंतर पोलिटिकल एजंट कर्नल अँडरसन यांनीं मुंबई सरकारच्या सेक्रेटरीकडे आपला अहवाल ता. १९ एप्रिल १८७३ रोजीं सादर केला. त्यांत त्यांनीं घरफाळा बसविला पाहिजे या योजनेला पुष्टी दिली. घरफाळा बसवितांना १ ते १० रुपयेपर्यंत फाळा देणारीं घरें व गरीब लोकांचीं घरें असें वर्गीकरण करावें असें सुचविलें. तसेंच दुमालदारांना मोबदला देऊन त्यांचाहि प्रश्न सोडवावा, असें आपलें मत व्यक्त केलें. पोलिटिकल एजंट यांच्या अहवालाला ता. ११ जून १८७३ रोजीं मुंबई सरकारनेंहि मान्यता दिली व ता. १ सप्टेंबर १८७३ रोजीं कोल्हापूर शहरांत घरफाळ्याचा अंमल सुरू झाला.

त्यावेळीं घरफाळा बसविणें ही कल्पना अगदीं अभिनव व अपूर्व असल्यामुळें तिला विरोध होणें अपरिहार्य होतें. आतांपर्यंत अशाप्रकारचा कर देण्याची पद्धति माहीत नसल्यामुळें आपल्यावर अन्याय होत आहे, अशी लोकांची समजूत झाली. ब्राह्मणांना* प्रथमच कर देण्याची पाळी आल्यामुळें

* पूर्वीच्या काळीं मराठी राज्यांत ब्राह्मण व गांवकामगार यांना सर्वत्र घरफाळ्याची माफी असे. हें माऊंट स्टूअर्ट एल्फिन्स्टन यांच्या "Selections from the Minutes and other official writings of Mount Stuart Elphinstone" —by G. W. Forrest (1884) या पुस्तकांतील पुढील उताऱ्यावरून दिसून येईल. "Ghar-Pati or Amba-sari; a house-tax levied from all but Brahmins and village officers." पृ. २९३ (घरपट्टी किंवा अंबासारी ही ब्राह्मण व गांवकामगार यांच्या खेरीज इतर सर्वांकडून घेण्यांत येत असे.)

आपल्या हक्कावर गदा आली असें वाटलें आणि कांहींजणांना सरकारनें संस्थानांतील प्रश्नाच्या बाबतींत व्यर्थ ढवळाढवळ केली असें वाटलें. एकंदरींत या योजनेमुळें विलक्षण खळबळ उडाली. व लोकांनीं घरफाळ्याविरुद्ध अर्ज करण्याला सुरवात केली. ता. १३ डिसेंबर १८७३ रोजीं रा. आबाजी रघुनाथ फलटणकर यांचा अर्ज आणि २५८३ व ४४१० सह्यांचा असे दोन अर्ज पाठविण्यांत आले. तसेंच इतरहि अनेक व्यापारी संस्थांनीं पोलिटिकल एजंटकडे अर्ज करून याविरुद्ध तक्रार केली.

त्याचप्रमाणें नगरपालिकेकडेहि अनेक लोकांनीं या कराविरुद्ध अर्ज केले. त्या अर्जांतील मनोरंजक उतारे पुढें देत आहे:—

## व्यापाऱ्यांच्या अर्जांतील उतारा

“ हल्लीचा घरफाळा देणें हें आम्हांस लांछन आहे. आम्हांस कांहीं विशेष कारणांसाठीं सरकारास वारंवार पट्टया द्याव्या लागतात. म्हणून माफी असावी.” —ता. ८ सप्टेंबर १८७३.

## ब्राह्मण लोकांच्या अर्जांतील उतारा

“ ब्राह्मण लोकांस आजपावेतों सर्व करांची माफी असोन पूर्वींची रीत चांगली आहे, असें सर्वप्रतीचे लोक कबूल करितील. ब्राह्मण हे विशेष मान्यस्थ लोक आहेत. कमी प्रतीचे लोकांस कर द्यावा लागत असोन कांहीं लोकांस माफी आहे. व विशेष मान्यस्थ म्हणोन ब्राह्मण लोकांस माफी मिळाली पाहिजे. पूर्वींचे काळांत ब्राह्मण लोकांस जो मान मिळत असे तोंच मिळाला पाहिजे. या व्यवस्थेपासून आम्हांस सुख होईल असें म्हणणें आहे. या योजनेपासून उलटे आम्हांस दुःख होणार आहे. ” —ता. ८ सप्टेंबर १८७३.

## कोल्हापुरचे समस्त पाटील व कुलकर्णी यांच्या अर्जांतील उतारा

“ फार दिवसांपासून आपण घरें दारें करून व जमिनी करून करवीरीं राहतों. व आपणांस उत्पन्न आहे तें फार थोडें आहे व नवीन देण्यास सामर्थ्य नाहीं. पूर्वींपासून कराची माफी चालत आली तशी चालावी. ” —ता. ८ सप्टेंबर १८७३.


या उताऱ्यांत तत्कालीन लोकांची मनोवृत्ति व विचारपद्धति यांचें प्रतिबिंब पडलें आहे. असे अनेक उतारे देतां येतील पण त्यांची जरूरी नाहीं. वरील उताऱ्यावरून योग्य ती कल्पना येतेच.

अशाप्रकारें घरफाळा बसवूं नये व आपणांला तो माफ व्हावा वगैरे अर्थाच्या अर्जांवरून त्याला किती विरोध झाला असावा हें दिसून येतें. इतकेंच नव्हे, तर या योजनेचा निषेध करण्यासाठीं हजारो लोक परेड ग्राउंडवर जमले व हा फाळा रद्द न झाला तर आपण फाळा बसलेल्या घरांत पाऊल टाकणार नाहीं, असा त्यांनीं सत्याग्रह सुरू केला. बराच काळ ते जागेवरून मुळींच हलेनात ! पण मौज ही कीं, एकाएकीं पाऊस पडूं लागल्याबरोबर परेड ग्राऊंडवर जमलेला व खवळलेला प्रचंड जनसमुदाय आपआपल्या घराकडे धांवत सुटला !

सर्वसामान्य लोकांप्रमाणेंच सरदार घराण्यांतील लोकांनींहि या योजनेला विरोध केला. ता. १२ नोव्हेंबर १८७३ रोजीं श्रीनिवास पंडित ऊर्फ रावजीमहाराज यांनीं पोलिटिकल एजंटकडे



## तत्कालीन घरपट्टीच्या बिलाचा एक नमुना



आपला व सरकारचा तह झाला असून आपणाला नगरपालिकेच्या करापासून माफी मिळावी अशा आशयाचा अर्ज केला. त्या अर्जाला ११ डिसेंबर १८७३ रोजीं “ नगरपालिकेच्या करापासून रावजीमहाराजांना माफी मिळणार नाहीं. कारण त्यांनीं दाखल केलेल्या करारावरून ते ज्या शहरांत राहतात त्याबद्दलचीं कर्तव्यें करण्यापासून त्यांना मुक्तता मिळावी असें सिद्ध होत नाहीं. कोल्हापूर शहरांतील सरदार या नात्यानें सर्व समाजाला फायदेशीर असणाऱ्या योजनेविरुद्ध असंतोष न माजवितां ती स्वीकारून इतरांना तसें करण्यास उदाहरण घालून द्यावें हेंच त्यांना शोभेल ” अशा अर्थाचें उत्तर दिलें.

या सर्व खळबळ उडविणाऱ्या विरोधाचा कांहीं उपयोग होणें शक्य नव्हतें. कारण घरफाळा व इतर कर बसविणें हें न्याय्य व हितकारक असल्यामुळें २१ मार्च१८७४ रोजीं मुंबई सरकारनें पुढीलप्रमाणें जाहीर केलें:—

(१) कोल्हापुरांतील नगरपालिकेच्या या करांना विरोध होणार हें अपेक्षित होतें पण पोलिटिकल एजंट यांना पूर्ण पाठिंबा देणें हें सरकारचें कर्तव्य आहे.

(२) सर्व अर्जदारांना कळविण्यांत येतें कीं पोलिटिकल एजंट यांनीं दिलेलें स्पष्टीकरण सरकारला मान्य झालें असून झालेल्या ठरावांत बदल करण्याची जरूरी दिसत नाहीं.” यापुढें हा तीव्र विरोध लवकरच नाहींसा झाला व योजना अमलांत आली.


नगरपालिकेनें बसविलेले हे कर तत्कालीन लोकांना अन्यायमूलक व अप्रयोजक वाटले तरी त्यापासून चांगले परिणाम घडून आले. या करांमुळें नगरपालिकेच्या उत्पन्नांत कशी वाढ झाली, हें पुढील तक्त्यावरून दिसून येईल:—

| साल | नोकरवर्ग | दिवाबत्ती | पाणी पुरवठा | सफाईखाते | फायर इंजिन | दुरुस्ती | इतर | सार्वजनिक कामे | शिरगणती | लष्कर | गांवाच्या वगावरील नोकर | कोल्हापूर शहराची मोजमापणी | देवी टोचणे | व्याज | मंगळवार पेठेतील हक्कदारांना दिलेली रक्कम | राणीच्या ज्युबिली समारंभ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८७३–७४ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १८७४–७५ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १८७५–७६ | २१६२ | १८५१ | २८३ १४ | ४४६४ | २०३ | ११४५२ | १८५१ | १९७२ | ... | ... | ... | ... | ... | ७३ | ... | ... | ३३०४४ |
| १८७६–७७ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| १८७७–७८ | ६८३६ | १३०४ | ६० | ७८४५ | १८३ | ७५३६ | ६०१६ | ७१७१ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ३६१४७ |
| १८७८–७९ | ६१७८ | १७७३ | ७० | ८२१७ | १५३ | ४११८ | ५७७८ | ७१९६ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ३४२४७ |
| १८७९–८० | ६६७५ | ५०४ | १२० | ८४३० | १०७ | ६१२३ | ५२२३ | १२०८६ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ३११८८ |
| १८८०–८१ | ६१२४ | १२२५ | ६८ | १०२१ | ३१४ | ८७४३ | ११२७० | १६०२४ | १८७ | ५६८ | ३८४ | ... | ... | ... | ... | ... | ५६००१ |
| १८८१–८२ | ५८२१ | १२२२ | १२८ | १०२०७ | १५३ | १०२४४ | ४४१२ | १८५६३ | ३०४ | २३८ | १३६७ | ... | ... | ... | ... | ... | ५२७५० |
| १८८२–८३ | ५६८० | ७०० | ६२ | १०३६५ | १७१ | ५३१० | ५६७७ | २१०२१ | ४१७ | ... | ३५ | ३६७ | ... | ... | ... | ... | ४९८५५ |
| १८८३–८४ | ४६१३ | १०१९ | ६० | १०२१८ | १२६ | ६०७५ | ५०१५ | १६२६१ | ... | ... | ... | ३५० | ... | ... | ... | ... | ४३७१८ |
| १८८४–८५ | ४४३० | १२०५ | ६० | ११९०९ | ३६७ | ६६११ | ११११४ | ४९८७ | ... | ... | ... | ... | १८६ | ... | ... | ... | ४०४७१ |
| १८८५–८६ | ४६१२ | १४८८ | ६० | ११२६१ | ९० | ६०१९ | ३४७७ | १२२८० | ... | ... | ... | ३१७ | २५४ | ३१६ | ८२ | ... | ४०३५१ |
| १८८६–८७ | ४७१७ | १६३४ | ६० | १५३४३ | १४६ | ६०१९ | ४१०२ | १२४६ | ३६३ | ... | २७८ | ३८९ | ... | १०५ | ... | ५००० | ४६७८० |
| १८८७–८८ | ५१६४ | १३६६ | ६० | २०६६८ | १४१ | ६२७० | १३६५ | ७११९ | १०३३ | ... | ४२९ | ३४१ | ... | ६९ | ... | ... | ४४१०६ |
| १८८८–८९ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |

| साल | दस्तुरी | जकात | घरफाळा | बाजारभाडें | इतर | कोल्हापूर लष्कर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १८७५–७६ | ९४५० | ८२१७ | १२४८५ | २१२५ | ६७५ | .... | ३२९५२ |
| १८७६–७७ | | | | | | | |
| १८७७–७८ | १२३०७ | ७८५२ | १३४६८ | २२५५ | ४५३० | .... | ४०४१२ |
| १८७८–७९ | ११६२५ | ६९१० | १०२४७ | २२२८ | २९३० | .... | ३३९४१ |
| १८७९–८० | ११९९७ | ६८२३ | २०७५० | २९२६ | ४९३७ | .... | ४७४३३ |
| १८८०–८१ | १२३०८ | ७७७६ | १५११४ | ४१२२ | ५००१ | ७८९ | ४५११० |
| १८८१–८२ | १३९०६ | ८५४५ | १५००६ | ५७१५ | ९७५५ | ८८ | ५२६०५ |
| १८८२–८३ | १३१५७ | ६२३५ | १५०५९ | ६७६१ | ४५८१ | .... | ४५७९४ |
| १८८३–८४ | १०६९८ | ६४८२ | १५३७३ | ७५६६ | १००९७ | .... | ५०९१६ |
| १८८४–८५ | १२६०१ | ६९९७ | १५६३७ | ७३१७ | ६५७३ | .... | ५०१२५ |
| १८८५–८६ | १२२४१ | ७४३१ | १५९५१ | ७६४७ | ५७०० | .... | ४८९७० |
| १८८६–८७ | १००१० | ७३१५ | १६३३९ | ७०३० | ४६४१ | ७५ | ४५४१० |
| १८८७–८८ | ९९११ | ७४०० | १६५१३ | ७२८० | ५७७१ | ८४९ | ४७८०३ |

अशा रीतीनें नगरपालिकेच्या उत्पन्नाची वाढ झाल्यानंतर तिनें लोकोपयोगी अशीं कोणतीं कार्यें केलीं याचें विवेचन आपण पुढील प्रकरणीं करूं.

**गाडीघोडा कराचा तत्कालीन नमुना**



# प्रकरण ४ थें

# शहर सुधारणेची जोरदार मोहीम

**(१८७२–१८८९)**

मागील प्रकरणांत नगरपालिकेनें घरफाळा व इतर कर बसविल्यावर शहरांत कशी खळबळ उडाली याचें सविस्तर विवेचन केलें. तसेंच हे उपयुक्त कर बसविल्यावर नगरपालिकेच्या उत्पन्नांत कशी वाढ झाली, हेंहि आपण पाहिलें. नगरपालिकेच्या कार्याचा व्याप सारखा वाढत असल्यामुळें हे कर बसविलें जाणें अपरिहार्य होतें. या करांमुळें नगरपालिकेच्या उत्पन्नांत वाढ झाल्यानंतर तिनें लोकोपयोगीं अशीं कोणतीं कार्यें केलीं याचा आपणांला या प्रकरणांत विचार करावयाचा आहे.

प्रथमतः आपण १८५४ ते १८७२ पर्यंत कोल्हापूर शहराची स्थिति कशाप्रकारची होती याचा विचार करूं. कोल्हापूर शहरांत प्रारंभीं रस्ते सुधारण्याचें कार्य हातीं घेतलें गेलें. दाजी पंडितांनीं कोल्हापूर ही दक्षिण काशी असल्यामुळें काशीप्रमाणेंच येथें रस्ते असावेत अशा समजुतीनें फरशीचे बोळ बांधले. कोटभागांतील कांहीं टिकाणीं अजूनहि दाजी पंडितांनीं बांधलेले फरशीचे रस्ते आढळतात. रस्ता दुरुस्तीनंतर गटारें बांधण्याकडे त्यावेळीं लक्ष पुरविलेलें आढळतें. कांहीं महत्त्वाच्या रस्त्यांवर थोडीं गटारें बांधण्यांत आलीं. तसेंच लोकांच्यासाठीं कांहीं सार्वजनिक तारदखानेहि बांधले गेले. त्या तारदखान्याचा उपयोग करणाऱ्या माणसाला दरमहा १ आणा नगरपालिकेला कर द्यावा लागे. सारांश, १८५४ पासून १८७२ पर्यंत मुख्यतः रस्तादुरुस्ती, गटारें बांधणें व सार्वजनिक तारदखाने बांधणें यांकडे नगरपालिकेनें लक्ष पुरविलेलें आढळून येतें.

पण यामुळें कोल्हापूर शहराच्या आरोग्याची व स्वच्छतेची स्थिति फारशी सुधारली असें म्हणतां येणार नाहीं. कारण पुढें कोल्हापूरची लोकसंख्या वाढली व त्यामुळें शहरांत घरांची संख्याहि वाढली. लोकांची व घरांची संख्या वाढूं लागल्यामुळें जिकडेतिकडे घाण साचूं लागली; आणि आतांपर्यंत केलेले नगरसुधारणेचे प्रयत्न वाढत्या लोकसंख्येला अपुरे पडूं लागले. म्हणून त्यावेळीं कोल्हापूर शहराच्या आरोग्याची व स्वच्छतेची स्थिति समाधानकारक नसावी, हें उघड आहे. त्याकाळच्या कोल्हापूरच्या स्थितीच्या वर्णनाचे दोन पुरावे उपलब्ध आहेत. पहिला पुरावा कर्नल फेरिस यांचा आहे. १९०६ सालीं फेरिस मार्केटचें उद्घाटन त्यांच्या हस्तें झालें. त्यावेळीं त्यांनीं आपल्या भाषणांत १८७१ सालच्या स्थितीचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे:—

" १८७१ सालीं ज्यावेळीं प्रथम कोल्हापुरांत नेमणूक झाल्याचा हुकुम मला मिळाला त्यावेळीं तें स्थळ कशाविषयीं प्रसिद्ध आहे, याबद्दल मीं चौकशी केली. त्यावेळीं मला सांगण्यांत आलें कीं, कोल्हापुरची जर कशाविषयीं विशेष प्रसिद्धि असेल तर ती अनारोग्यकर स्थितीविषयीं व विविध प्रकारच्या दुर्गंधीविषयीं होय. मला ही त्या शहराची बदनामी वाटली. पण खरोखरच त्यावेळीं स्वच्छतेची कोणतीच व्यवस्था नव्हती व प्रत्येक पेठेंत असा कांहीं विशिष्ट वास होता, कीं एकाद्या आंधळ्या माणसालाहि प्रत्येक पेठ सहज रीतीनें केवळ वासावरून ओळखतां आली असती! पण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, त्यावेळच्या दुसऱ्या कोणत्याहि शहरापेक्षां कोल्हापूर हें विशेष वाईट नव्हतें. कारण त्यावेळीं आरोग्याकडे व स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिलें जात नव्हतें व हिंदुलोकांचा पुराणमताभिमान हल्लींच्या पिढीपेक्षां अधिक तीव्र होता."

दुसरा पुरावा मुंबई प्रांताचे सॅनिटरी कमिशनर डॉ. ह्यूलेट यांचा होय. त्यांनीं १८७६ सालीं कोल्हापूर शहरची तपासणी करून आपला विस्तृत अहवाल प्रसिद्ध केला. त्यांत त्यावेळच्या परिस्थितीचें सूक्ष्म वर्णन असल्यामुळें त्यांतील महत्त्वाचा भाग पुढें दिला आहे:—

## कोल्हापूर शहरांतील आरोग्यस्थितीचा
## अहवाल

(जुलै १८७६ मध्यें तपासणी केली)

कोल्हापूर हें एका देशी संस्थानच्या राजधानीचें स्थल आहे. तें उत्तरेस १६°४१ अक्षांशांत व पूर्वेस ७४°१७ रेखांशांत वसलें असून समुद्रसपाटीपासून १७९० फुटांवर वसलें आहे. तें सातान्याच्या दक्षिणेकडे ७६ मैलांवर असून बेळगांवच्या उत्तरेला ६६ मैलांवर आहे. हें प्राचीन शहर पंचगंगा नदीच्या दक्षिण तीरावर सुमारें अर्ध्या मैलावर आहे व सह्याद्रिपासून सुमारें २८ मैलांवर आहे.

२. शहरासभोंवतालची जागा मोकळी असून पावसाळ्यांत हिरव्या गवतानें आच्छादून जाते. पण हा हिरवेपणा लवकरच नाहींसा होतो व बाकी सर्व वर्षभर जिकडे तिकडे नीरस भाग दिसतो. नदीपासून जमीन हळूहळू वर चढत दक्षिणेकडील लहान टेकड्यांकडे येते. ड्रेनेजचें कार्य कोटभागापासून ३०० यार्ड असलेल्या दक्षिणेकडून पूर्वेकडे रविवार पेठेंतून जाणाऱ्या जितीनाल्याकडून होतें. मग तो आपली दिशा बदलतो. आणि सोमवार व जुना बुधवार यांच्या उत्तरेला वाहून ब्रह्मपुरीवर नदीला जाऊन मिळतो शहराजवळ नैर्ऋत्य दिशेला ५००—६०० एकर पाणी असलेला असा रंकाळ्याचा सुंदर देखावा दिसतो. पद्माळें हें तळें आग्नेय दिशेला शहरापेक्षां थोड्या उंचीवर आहे. जितीनाल्याच्या

जनसंपर्क अधिकारी
कोल्हापूर महानगरपालिका



तीरावरील आग्नेय, पूर्व व दक्षिण या दिशांकडील जमीन नांगरिली जाते. रंकाळा व नदीच्या पश्चिमेकडील जमिनी ओसाड आहेत. शहरापासून अर्ध्या मैलाच्या अंतरावर रेसिडेन्सी व लष्करी विभाग आढळतो. पंचगंगेची दरी हळूहळू तिच्या पश्चिम व उत्तर तीरावर दिसते. दहा मैलांच्या अंतरावर उंच डोंगरांची रांग आहे. त्यांपैकीं पन्हाळ्याचा किल्ला प्रमुख आहे. ज्या डोंगरावर तो बांधला आहे त्याची उंची २५०० फुटांपेक्षां अधिक आहे. त्यापेक्षां थोडया कमी उंचीचा जोतीबाचा पवित्र डोंगर आहे. तो जणूं कांहीं शंकराचें प्रतीक असून शिंदे घराण्याचें मुख्य दैवत आहे. हा डोंगर अनेक शतकांपासून लोकांना वंदनीय वाटतो.

३. ज्या खडकावर हें शहर वसलें आहे त्यांत वरच्या भागीं मुरूम आहे व त्याखालीं ३—४ फुटांवर काळा फत्तर असल्यामुळें इमारती बांधण्याचें साहित्य मोठ्या प्रमाणावर मिळतें. पण तो फोडण्यास सुरुंग घालावा लागत असल्यामुळें खासगी घरमालकांकडून त्याचा हल्लीं विशेष उपयोग केला जात नाहीं.

४. कोल्हापूरचें हवामान समशीतोष्ण आहे. डॉ. सिंक्लेअर यांनीं त्याविषयीं फार अनुकूल मत दिलें आहे. ते येथें पुष्कळ वर्षें राहिलेले होते व हवामानाचा पुढील तक्ता दिल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें:—

### वारे

| साल | ईशान्य | पूर्व | आग्नेय | दक्षिण | नैर्ऋत्य | पश्चिम | वायव्य | उत्तर | शांत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८७१ | ७२ | १० | ० | ० | ९० | ११० | ७२ | ७ | ४ | जूनपासून आक्टोबरपर्यंत नैर्ऋत्येकडील वारा अहोरात्र वाहतो. नव्हेंबर ते फेब्रुवारीपर्यंत उत्तर व पूर्व या दिशांकडून वाहतो. थंडीच्या दिवसांत नदीवर दाट धुकें असतें. मार्च, एप्रिल व मे या महिन्यांत उष्ण असे पूर्वेकडील वारे वाहतात. |
| १८७२ | ३७ | ३२ | ३० | ० | १०० | १२७ | २० | १४ | ६ | |
| १८७३ | २१ | २४ | १० | ० | १२१ | १३० | ३७ | १२ | ८ | |
| १८७४ | १२ | ८२ | ८ | ० | १३६ | ९० | १४ | १६ | ७ | |
| १८७५ | ४८ | ६२ | १० | १ | ११० | ८० | १५ | २६ | १३ | |
| सरासरी | ३८ | ४२ | ११ | ० | १११ | १०७ | ३१ | १५ | ९ | |

वार्षिक पावसाची सरासरी गेल्या ५ वर्षांत ४४'५७ इंच इतकी आहे व तो वर्षांत कसा विभागाला गेला हें पुढील तक्त्यावरून दिसून येईल.

## पर्जन्यमान

| साल | जाने-वारी | फेब्रुवारी | मार्च | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टो-बर | नोव्हेंबर | डिसेंबर | वार्षिक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | इं. सें. | इं. सें. | इं. सें. | इं. सें. | इं. सें. | इं. सें. | इं. सें. | इं. सें. | इं. सें. | इं. सें. | इं. सें. | इं. सें. | इं. सें. |
| १८७१ | . ५९ | . . | . ४ | १ १७ | २ ३२ | ८ ३४ | ११ १ | ६ ३२ | २ ४५ | ५ ११ | . ८५ | . . | ३८ ५० |
| १८७२ | . . | . . | . . | १ ४८ | २ ३५ | ८ ५२ | १२ ९८ | ३ ९४ | ४ ५१ | ३ ६४ | . ५६ | १ ५६ | ३९ ५४ |
| १८७३ | . . | . ३४ | . . | २ ९७ | ३ ६१ | २ ३ | १२ ३ | ४ ७ | २ १३ | ३ ७२ | . . | . २६ | ३१ ५४ |
| १८७४ | . . | . १४ | . . | २ ७१ | २ ९३ | १२ ६ | १६ ९६ | ६ ४४ | ७ ९२ | ८ ९० | . १५ | . १८ | ५६ ९२ |
| १८७५ | . . | . . | . ६ | . ७३ | १ ४० | ९ ६५ | २६ ९७ | ७ ६० | ७ ३४ | ४ ८३ | . ४ | . ४२ | ५५ ४ |

सर्वांत अधिक पाऊस १८७४ सालीं पडला असून तो ५६·९२ इतका नमूद आहे; व ३१·५४ इंच इतका सर्वांत कमी पाऊस १८७३ सालीं पडला.

त्याच काळांतील मासिक हवेचें प्रमाण पुढील पानावर दिलेल्या तक्त्यावरून दिसून येईल.

या तक्त्यावरून असें दिसून येईल कीं, पाऊस नेहमीं एप्रिल महिन्यांत पडतो. उन्हाळा अधिक काळ फारसा नसतो. उलट सुखदायक असे पश्चिमेचे वारे संध्याकाळीं वाहतात व रात्रीं नेहमीं गारवा असतो.

पावसाळ्यांत उष्णता कमी असते. रोजचें किमान व कमाल उष्णतामानामधील अंतरहि कमी असतें आणि हवा आनंददायक असते. थंडीच्या दिवसांत ईशान्येकडील वारे वाहतात. किमान व कमाल उष्णतामानांतील अंतर अधिक असतें. म्हणून ही हवा त्रासदायक असून या ऋतूंत यकृताचे व इतर पोटांतील विकार होण्याची भीति असते असें मानलें जातें.

५. हें शहर मुळांत कोटभागापुरतें मर्यादित होतें व त्याचा विस्तार ३० फूट उंचीच्या दगडी तटाच्या आंत मावलेला होता. तटाभोंवतीं एक खोल व रुंद खंदक आहे. शांतता प्रस्थापित झालेनंतर लोकसंख्या वाढली व तटाभोंवतीं अनेक घरें बांधलीं गेलीं. हीं इतकीं दाट आहेत कीं कोटभागाच्या आंत जाणाऱ्या दरवाजाजवळ राहिल्याखेरीज तटाची भिंत कुणालाही बाहेरून तात्काळ दिसून येणार नाहीं.



| महिने | १८७१ चें हवामान | | | | १८७२ चें हवामान | | | | १८७३ चें हवामान | | | | १८७४ चें हवामान | | | | १८७५ चें हवामान | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कमाल | किमान | सरासरी | कमाल व किमान यांतील फरक | कमाल | किमान | सरासरी | कमाल व किमान यांतील फरक | कमाल | किमान | सरासरी | कमाल व किमान यांतील फरक | कमाल | किमान | सरासरी | कमाल व किमान यांतील फरक | कमाल | किमान | सरासरी | कमाल व किमान यांतील फरक |
| जानेवारी | ८७ | ५८ | ७२ | २९ | ८५ | ५७ | ७१ | २८ | ८९ | ५० | ६९ | ३९ | ८७ | ५१ | ६९ | ३६ | ८५ | ५३ | ६९ | ३२ |
| फेब्रुवारी | ९५ | ६० | ७७ | ३५ | ९३ | ५८ | ७५ | ३५ | ९१ | ६५ | ७८ | २६ | ९६ | ५९ | ७७ | ३७ | ९४ | ५६ | ७६ | ३८ |
| मार्च | ९९ | ६० | ७९ | ३९ | १०० | ६७ | ८३ | ३३ | १०२ | ६० | ८१ | ४२ | ९८ | ६४ | ८१ | ३४ | ९९ | ६९ | ८४ | ३० |
| एप्रिल | १०० | ७० | ८५ | ३० | १०० | ७२ | ८६ | २८ | १०० | ७० | ८५ | ३० | १०६ | ६४ | ८५ | ४२ | ९९ | ७० | ८४ | २९ |
| मे | १०० | ७३ | ८६ | २७ | १०२ | ७१ | ८६ | ३१ | १०० | ७१ | ८५ | २९ | १०८ | ७० | ८९ | ३८ | ९५ | ७० | ८२ | २५ |
| जून | ९५ | ७१ | ८३ | २४ | ९९ | ७१ | ८५ | २८ | ८६ | ७१ | ७८ | १५ | ९७ | ७१ | ८४ | २६ | ९५ | ७० | ८२ | २५ |
| जुलै | ८० | ७० | ७५ | १० | ७८ | ७० | ७४ | ८ | ८५ | ७० | ७७ | १५ | ९४ | ६९ | ७६ | १५ | ८० | ७० | ७५ | १० |
| ऑगस्ट | ८१ | ६९ | ७५ | १२ | ८० | ६९ | ७४ | ११ | ८५ | ६८ | ७६ | १७ | ७७ | ६९ | ७३ | ८ | ७९ | ७० | ७४ | ९ |
| सप्टेंबर | ८२ | ६९ | ७५ | १३ | ८४ | ६९ | ७६ | १५ | ८८ | ६९ | ७८ | १९ | ८० | ७१ | ७५ | ९ | ८० | ६९ | ७४ | ११ |
| आक्टोबर | ८९ | ६५ | ७७ | २४ | ८८ | ६३ | ७५ | २५ | ९० | ५८ | ७४ | ३२ | ८४ | ६४ | ७४ | २० | ८९ | ६५ | ७७ | २४ |
| नव्हेंबर | ८८ | ६५ | ७६ | २३ | ८८ | ५७ | ७२ | ३१ | ९१ | ५७ | ७४ | -३४ | ८६ | ५४ | ७० | ३२ | ८८ | ६१ | ७४ | २७ |
| डिसेंबर | ८५ | ६० | ७२ | २५ | ८६ | ५३ | ६९ | ३३ | ८८ | ५६ | ७२ | ३० | ८५ | ५४ | ६९ | ३० | ८८ | ५५ | ७६ | ३३ |
| वर्षाचें मान | ९० | ६६ | ७८ | २४ | ९० | ६५ | ७७ | २५ | ९१ | ६४ | ७७ | २७ | ९० | ६३ | ७६ | २७ | ८९ | ६५ | ७७ | २४ |

६. शहरांतील रहिवाशांच्या विनंतीवरून १८५४ सालीं नगरपालिका स्थापन झाली व आतां १८७३ च्या डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल कायद्याप्रमाणें ती चालविली जाते. असिस्टंट पोलिटिकल एजंट मि. हॅमिक या संस्थेचे अध्यक्ष असून बुद्धिमान व प्रतिष्ठित असे सद्‌गृहस्थ तिचे सभासद आहेत. त्यांपैकीं श्री. माधव वासुदेव बर्वे, स्टेट कारभारी यांचा मी

प्रामुख्यानें उल्लेख करितों. मी एकदां या संस्थेला भेट दिल्यावेळीं ते मजबरोबर होते व त्यांनीं शहरसुधारणेच्या बाबतींत आस्थापूर्वक लक्ष पुरविल्याचें मला दिसून आलें. नगरपालिकेच्या व्यवस्थेसाठीं शहराच्या ६ पेठा केल्या असून त्यांपैकीं दोन पेठा दाट वस्तीच्या आहेत व बाकीच्या मध्यम वस्तीच्या आहेत. त्यांचा आकार ११३२ एकर २९ गुंठे इतका आहे.

७. १८७२ च्या शिरगणतीप्रमाणें कोल्हापुरची लोकसंख्या ३७६६२ इतकी आहे. त्यांपैकीं १९५६४ पुरुष असून १८०९८ स्त्रिया आहेत. स्त्रियांचें पुरुषांशीं शेंकडा ९२:९८ हें प्रमाण आहे. त्यांपैकीं—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| हिन्दू | ३३३३९ | सर्व लोकसंख्येच्या | मानानें शें. | ८८·५२ |
| मुसलमान | ३०३९ | " | " | ८·२२ |
| बुद्ध | १२०५ | " | " | ३·२० |
| ख्रिश्चन | १२ | " | " | ०·०३ |
| इतर | १२ | " | " | ०·०३ |

८. शहरांत एकंदर ७८८८ घरें असून त्यांपैकीं १२९२ वरच्या वर्गांतील लोकांची आहेत. बाकीची कमी प्रतीचीं आहेत. प्रत्येक वर्गांतील घरांत किती लोक आहेत हें नक्की सांगतां येत नाहीं. कारण ती माहिती ठेविली गेलेली नाहीं. पण एकंदर सरासरीनें प्रत्येक घरांत ४·७७ लोक रहात आहेत असें म्हणतां येईल. पुण्यांत वरच्या वर्गांतील घरांत १२·१९ लोक राहतात व कमी दर्जाच्या घरांत ७·३० लोक राहतात. मुंबईंत प्रत्येक घरांत सरासरी २०·४९ लोक राहतात. अहमदाबादेंत कोल्हापुरापेक्षांहि कमी प्रमाण आहे. तेथें वरच्या वर्गांतील लोकांच्या घरांत सरासरीनें ३·३५ व खालच्या वर्गांतील लोकांच्या घरांत ३·०१ लोक राहतात. ही माहिती उपलब्ध असावी हें चांगलें. कारण यामुळें इंजिनिअरला प्रत्येक घरांत किती लोक राहतात, किती लोकांची पाण्याची सोय करावी लागेल इत्यादि गोष्टी कळण्याला उपयोग होतो. तसेंच घराची जागा किती, प्रत्येक पेठेंत एकमजली व दुमजली घरें कितीं आहेत याविषयीं माहिती न मिळाल्यामुळें प्रत्येक जागेंत किती लोक राहतात, हें नक्की सांगतां येत नाहीं. पुढील शिरगणतीच्या वेळीं या सूचनांचा अवश्य विचार होईल अशी आशा आहे. चांगल्या प्रतीचीं घरें, दगडांचीं व विटांचीं बांधलेलीं असून कमी प्रतीचीं घरें मातीचीं आहेत. शहरांतील सर्व घरांवर नंबर आहेत पण रस्त्यांना नांवें नाहींत.

९. कोटभागांत एकंदर ८८५ तारदखाने असून इतर पेटांत २०० तारदखाने आहेत. हल्लीं ते खासगी झाडूकडून स्वच्छ केले जातात. कोटभागांतील पायखाने बहुशः घराच्या आंत बांधलेले आहेत व रस्त्यानजीक असलेल्या लहान दारांतून ते स्वच्छ केले जातात. तपासणीच्या वेळीं मला ते अत्यंत गलिच्छ स्थितींत आढळले. इतकेंच नव्हे तर त्यांची रचना सदोष असल्यानें ते पूर्णपणें कधींहि स्वच्छ केले जाणें शक्य नाहीं. तारदखाना दरवाजा-लगतच्या घराच्या कोंपऱ्यांत एकांताच्या जागीं बांधलेला आढळतो. आंत आक्षेपार्ह अशा चुन्याच्या कुड्या व कुंडी असते. ज्यांत पत्रावळ टेविली आहे अशा बांबूच्या बुट्टींत मैला सांठविला जातो. त्यांत लघवी व इतर पाणी यांचा समावेश होत नाहीं. झाडूनें नेईपर्यंत तें खालीं सांचून राहतें. दाराच्या दुसऱ्या बाजूला हातपाय धुण्यासाठीं न्हाणी असते. कोट-भागाच्या बाहेर जेथें तारदखाने नाहींत किंवा लोक सार्वजनिक तारदखान्यांत जाण्याला आळस करितात तेथें ते आपल्या घराचा आवार घाण करितात. पण तारदखाना असेल तर तेथील घाण क्वचित् लोकांकडून एखाद्या बागेसाठीं नेली जाते व बाकीच्या सर्व ठिकाणीं ती जमिनींत मुरते. सर्व घरांतून लोक एक किंवा दोन दगडावर उभे राहून स्नान करितात. तें सर्व पाणी जमिनींत कुजतें. कोटाबाहेर कांहीं ठिकाणीं–विशेषतः पश्चिम दिशेला घरांतील सपाटी रस्त्याच्या सपाटीपेक्षांहि कमी आहे. ही स्थिति अत्यंत आक्षेपार्ह आहे यांत शंका नाहीं. नगरपालिकेनें अलीकडे प्रत्येकीं १२ लोक बसूं शकतील असे ५ तारदखाने बांधले आहेत. त्याशिवाय तीन जुने व वाईट तऱ्हेचे असे सार्वजनिक पायखाने आहेत.



१०. कोल्हापुरला एखादा परका गृहस्थ प्रथमच आला तर त्याला केवळ लष्करांतीलच नव्हे तर शहरच्या सर्व भागांतील रस्त्याकडे विशेष लक्ष पुरविल्याचें आढळून येईल. नगरपालिकेनें एकंदर २५ मैलांचे रस्ते केले असून रस्त्यांच्या बाजूचीं गटारेंहि स्वच्छ राखलीं आहेत. गटारावरील छावण्याखालीं कसलीहि घाण सांचलेली नाहीं.

११. शहरांतील पुष्कळ रस्ते फरशीचे असल्यामुळें ते नेहमीं कोरडे असतात; व मोठ्या पावसानंतरहि तेथें चिखल दिसून येत नाहीं. पण घरांतील कचरा बाहेर नेण्याची कसलीहि व्यवस्था नाहीं, हें नमूद करण्याला मला खेद वाटतो. यामुळें लोकवस्तीच्या ठिकाणीं कचऱ्याचा ढीग सांचून त्याचा लोकांवर वाईट परिणाम होतो. तसेंच पुष्कळ घरें मोडकळीला आलेलीं असून त्यापासूनहि लोकांना उपद्रव होण्याचा संभव आहे. खासगी घरांतून पुष्कळ प्रकारची घाण सांचली आहे. पण एखाद्या तालुक्याच्या गांवाप्रमाणें येथील रस्ते गलिच्छ व नादुरुस्त आहेत असें दिसून येत नाहीं.

१२. सफाईखातें हें नगरपालिकेच्या चिटणीसामार्फत कार्य करितें. कचरा नेण्यासाठीं एका मुकादमाच्या हाताखालीं चौदा रस्ता झाडणारे नोकर नेमले आहेत. रस्त्यांवरील कचरा ६ गाड्यांतून नेला जातो. त्यांत प्रत्येकीं २४ घनफूट कचरा राहतो. दर दिवशीं प्रत्येक गाडी पांच फेऱ्या करिते म्हणजे ७२० घनफूट इतका कचरा बाहेर नेला जातो. शहरांतील बराचसा कचरा एके ठिकाणीं सांचविला जातो व उरलेला मैलखड्ड्यावर नेला जातो.

१३. सफाईखात्यांत १ मुकादम व ९ भंगी असून त्यांना ८ सार्वजनिक तारदखाने स्वच्छ करण्यासाठीं व मुंबईहून आणलेल्या चार गाड्या नेण्यासाठीं नेमलें आहे. शहरांतील

खासगी भंगी कोटाबाहेरील सार्वजनिक तारदखान्यांत मैला आणतात व तेथें ठेवलेल्या गाड्यांत तो सांठवितात. प्रत्येक गाडींत २०'६८ घनफूट इतका मैला राहतो व दर दिवशीं गाडीची एक फेरी होते. सगळा मैला शहराच्या दक्षिणेला एका भैलखड्ड्यावर नेला जातो व तेथें २ फूट खोल अशा ठिकाणीं सांठविला जातो. ती जागा २०० फूट लांब, १६० फू. रुंद आहे. ही जागा जळलेल्या कचऱ्याच्या राखेनें आच्छादिली जाते. या ठिकाणीं मैल्याचें खत करून वर्षाच्या शेवटीं तें शेतकऱ्यांना विकलें जातें. या ठिकाणीं सांठविलेल्या घाणींतून पाणी वाहत असून मी प्रथम गेलों त्यावेळीं तें सखल अशा जागेंत सांठविलेलें मला दिसलें.

१४. शहरांत दिव्यांची चांगली सोय आहे. १५० कंदील वार्षिक १८६० रुपयांच्या खर्चानें ठेविले आहेत व या बाबतींत सर्व दिशांना चांगली सुधारणा होत आहे हें नमूद करण्याला मला संतोष वाटतो. यावरून लोकांच्या गरजा ओळखून त्या पुरविण्याकडे लक्ष वेधलेलें दिसून येतें. वायव्य दिशेकडून शहरांत प्रथम प्रवेश करतांक्षणीं पूर्वी महारांच्या गलिच्छ झोपड्या दिसत असत. आतां त्या तेथून काढल्या आहेत व त्या ठिकाणीं एक प्रेक्षणीय टाऊनहॉल बांधला आहे. त्याच्या चहुंबाजूला सुंदर बागा कुशलतेनें तयार केल्या असून तेथें एक कांचेचें घर आहे. त्यांत उत्तर हिंदुस्थानांत कधींहि न दिसणारीं अशीं कॉलॅडिमस् (Colladimus) व इतर प्रकारचीं फुलें आहेत. शहराबाहेर घाणीनें भरलेलीं अशीं पुष्कळ सखल स्थळें मला दाखविण्यांत आलीं. तीं बुजवितां येणें शक्य असूनहि तीं तशींच ठेविलीं आहेत. पण रस्ते रुंद करण्याची पूर्ण दक्षता घेतली असून शहरांतील रहदारीला मोकळी जागा व स्वच्छ हवा मिळावी अशी योजना केलेली आहे.

१५. सार्वजनिक दवाखाना शहराच्या प्रवेशद्वारांत असून तो टाऊनहॉलपासून जवळ आहे. डॉ. सिंक्लेअर यांनी मला दवाखाना दाखविला असून तो फार स्वच्छ आहे. अशा इमारतींत जेवढी सफाई व स्वच्छता असणें शक्य आहे तेवढी येथें आढळते. आणखी एक नवीन दवाखाना करण्याचें मंजूर झालें असून त्याची योजनाहि तयार आहे हें पाहून मला आनंद वाटला. दवाखान्याच्या आवारांत स्त्रियांचा स्वतंत्र वॉर्ड आहे व इमारतीच्या दुसऱ्या जागेंत १२ जणांची सोय होईल असें एक वेड्यांचें इस्पितळ आहे. मी तुरुंगाची देखील तपासणी केली. तुरुंगांत २३७ कैदी असून त्यांपैकीं २२ स्त्रिया आहेत. तुरुंग चांगल्या तऱ्हेचा असून स्वच्छ दिसला. पण तेथील तारदखान्याची जागा अपुरी वाटली. पण तुरुंगाबाहेरील पायखान्यांत सुक्या मातीची ( dry earth ) पद्धत स्वीकारली असल्यामुळें तेथें कसलाहि दुर्गंध नव्हता. ही पद्धत येथें इतकी यशस्वी झाली आहे कीं, जर मी आंधळा असतों तर मी तारदखान्यांत आहें हें मला नक्की सांगतां आलें नसतें !

१६. शहरांतील विटा करणें, चुना करणें इत्यादि धंदे आडेपाई आहेत. पण चांभारांना शहराच्या पूर्वेला रविवार पेठेंत दुकान घालण्याची परवानगी देण्यांत आली आहे.



या ठिकाणीं गटारांची असावी तशी व्यवस्था नाहीं. पण अशीं ठिकाणें किती आहेत हें नमूद नाहीं. हें नक्की ठरवून त्यांच्या मालकांना वार्षिक परवानगी देण्याची सक्ति असावी व त्यांच्या जागा नियमितपणें तपासल्या जाव्या.

१७. नगरपालिकेच्या २ बाजारपेठा (Markets) आहेत, त्यांपैकीं मुख्य बाजारपेठ कोटभागाबाहेर शनिवार पेठेंत आहे. त्या ठिकाणीं १०० दुकानें असून तेथें धान्य, भाजी व फळेंही विकलीं जातात. माझ्या तपासणीच्या वेळीं ती बाजारपेठ गिऱ्हाइकांनीं गजबजून गेली होती. कोटभागांत कपिलतीर्थाजवळ दुसरा एक लहानसा भाजीचा बाजार भरतो. तेथें ८ दुकानें आहेत.

१८. शहरांत कसाईखाना किंवा मांसबाजार नाहीं; घराच्या मागच्या बाजूला कसाई (एकंदर ४०) हे दररोज ५० मेंढ्या कापतात व त्यांचें मांस बाजारांत न विकतां आपल्या घराच्या पुढच्या आवारांत विकीत बसतात, हें सांगण्याला मला खेद वाटतो. कसाईखान्यांतील इतर घाण नगरपालिकेच्या गाड्यांतून दूर नेली जाते असें म्हणतात.

१९. गुरेंढोरें घरींत ठेविलीं जात नाहींत. पण जनावरें ही घराच्या पुढच्या व मागच्या बाजूला एका छपराखालीं असतात. या ठिकाणची घाण काढून टाकण्याची व्यवस्था नसल्यामुळें या जागा फार गलिच्छ आहेत.

१८७२ सालच्या मोजणीच्या वेळीं जनावरांची किती संख्या होती हें पुढील तक्त्यावरून दिसून येईल:—

| हत्ती | उंट | घोडे | | | तट्टें | खेचरें | बैल | गाई | रेडे | म्हशी | गाढवें | मेंढ्या | बकरी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अरबी | ऑस्ट्रेलियन | देशी | | | | | | | | | | |
| १ | ६७ | १८ | १ | २१८ | २५५ | २ | १८७७ | १५३६ | ८१४ | २६२० | १८७ | ३११ | ३७३ | १०३६४ |

२०. कोटभागांत बऱ्याच काळापासून बांधलेलीं दगडांचीं पक्कीं गटारें पुष्कळ आहेत असें मला सांगण्यांत आलें. पण तीं कोणत्या वेळीं बांधलीं गेलीं हें नमूद नाहीं. पण तीं कधींच स्वच्छ न केल्यामुळें अनेक वर्षांची घाण तेथें सांचली आहे. तात्काळ घाण काढून तीं मोकळीं केलीं पाहिजेत. त्यांचा आकार, खोली व दिशा यांचा नकाशा काढला पाहिजे. जरी चांगल्या गटाराप्रमाणें त्यांचा उपयोग झाला नाहीं तरी पावसाळ्यांतील पाणी वाहून नेण्याला तीं पाटाप्रमाणें उपयोगी पडतील.

२१. शहरांत पुष्कळ आक्षेपार्ह तळीं आहेत. त्यांतील पाणी काढून नेण्याची किंवा तीं भरण्याची जरूरी आहे. त्यांपैकीं कपिलतीर्थ या मध्यम आकाराच्या तळ्याचा मी प्रामुख्यानें उल्लेख करितों. हें तळें चहूंकडून घरांनीं वेढलेलें असून आसपासच्या घरांतील तारदखान्याचें पाणी त्यांत मिसळतें व त्यामुळें पाणी घाण होतें. तें घाण पाणी लोकांकडून पिण्यासाठीं उपयोगांत आणलें जातें. ही पद्धति तावडतोब बंद झाली पाहिजे व हें तळें मुजविलें पाहिजे. पण आसपासची मोकळी जागा तशीच ठेवावी. कारण मध्यभागीं एक विहीर काढून त्याभोंवतीं एकादी बाग तयार करितां येईल. महारतळेंदेखील फार गलिच्छ आहे तें स्वच्छ करून नंतर कात्यायनीच्या पाण्यानें भरलें पाहिजे व सर्व प्रकारच्या घाणीपासून अलिप्त ठेविलें पाहिजे. असाच प्रकार मी कपिलतीर्थाच्या बाबतींतहि सुचवीन. कारण उन्हाळ्यांत तळीं असणें चांगलें असून त्यामुळें हवा गार राहते. पण कपिलतीर्थ हें अशा ठिकाणीं आहे कीं तें नेहमीं घाण होणारच. म्हणून वर सांगितलेलाच मार्ग स्वीकारावा असें मी सुचवितों.

२२. हिंदुलोकांचीं प्रेतें नदीवर नेऊन ब्रह्मपुरीवर जाळलीं जातात. मुसलमानांचीं प्रेतें जितीच्या ओढ्याच्या कांठावर पुरलीं जातात. अगदीं खालच्या जातींतील लोकांची स्मशानभूमि शहराच्या उत्तरेला आहे. महारवाड्याजवळ असलेली मुसलमानांची स्मशानभूमि चांगली आहे.

२३. शहराचा पाणी पुरवठा कात्यायनीच्या दरींतील तलावापासून होतो. हा तलाव शहराच्या दक्षिण दिशेला तीन मैलांवर लहान लहान टेकड्यांच्या रांगांखालीं पण शहर सपाटीपेक्षां उंच जागेवर आहे. या ठिकाणापासून पाणी शहरांत पुष्कळ वर्षांपासून आणले जातें. या तलावांतील दगडी पाट १७८९ ते १७९२ च्या दरम्यान बाबूराव केशव पंडित या गृहस्थांनीं आपले २।३ लाख रुपये खर्च करून बांधला. कात्यायनी तलावांतील पाणी नेहमींच्या हिंदुपद्धतीप्रमाणें चुन्यानें मढविलेल्या मातीच्या नळ्यांतून आणलें जातें व तें शहरांतील ३२ विहिरींना पुरविलें जातें. त्यांपैकीं ८ विहिरी महाराजांच्या वाड्यांत आहेत. ही योजना कितीहि चांगली असली तरी त्यांतील सदोष रचनेमुळें पाणीपुरवठा अपुरा पडू-नहि क्वचित् लोकांना अशुद्ध पाणी मिळें. पण हल्लींचे इंजिनिअर मेजर ड्यूकॅट यांनीं या गोष्टीचा काळजीपूर्वक विचार करून गेल्या उन्हाळ्यांत एक योजना काढली. जरी त्यांची योजना अजून अपूर्ण असली तरी पाण्याच्या दुर्भिक्षापासून त्यांनीं शहराला वांचविलें आहे व पुष्कळ लोकांनीं मला सांगितल्याप्रमाणें त्यांनीं शहरांतील रहिवाशांना जणूं कांहीं अनिर्वचनीय वरदानच दिलें आहे.

२४. मेजर ड्यूकॅट यांनीं स्वतः जागेवर मला माहिती सांगितलेली असली तरी त्यांच्या रिपोर्टावरूनच मी पुढील माहिती देत आहे. जुन्या पाटाच्या सुरवातीपासून तें डोंगरांतील त्याच्या उगमापर्यंत त्यांनीं प्रथम एक जमिनीखालून १५०० फूट लांबीचा कालवा बांधला.



नंतर जितीनाल्याला मोठें धरण बांधून पूर्वीं वायां जात असलेलें बरेंच पाणी सांठविलें. जुन्या दगडी पाटाचा शक्य तितका उपयोग करण्यांत आला; पण हा पाट फार सखल ठिकाणीं शहरांत येत होता म्हणून १०० फूट व्यासाचा व सहा फूट उंचीचा एक नवीन पाण्याचा खजिना बांधण्यांत आला आहे. त्यांत २,९४,५०० गॅलन पाणी राहूं शकतें. या खजिन्यापर्यंत १९३८ यार्ड लांबीचा नवीन पाट बांधण्यांत आला असून त्याच्याकरितां दोन ठिकाणीं कमानी बांधणेंत आल्या आहेत. पाटांत घाण सांचूं नये म्हणून विशेष दक्षता घेण्यांत आली आहे. कळंबे तलावांत बाहेर पाणी जाणेंकरितां जो टॉवर बांधला आहे त्याची उंची शहरापेक्षां १०० फूट अधिक आहे. तेथून पाणी बऱ्याच जोरानें सर्व शहरभर खेळविण्यांत आलें आहे. पाण्याची सोय इतक्या चांगल्या रीतीनें केली गेली आहे कीं कोणत्याही घरमालकाला आपल्या घरापासून १०० यार्डांच्या आंत पाणी मिळूं शकेल. लोकसंख्या वाढली तरी हा सांठा वाटेल तितका वाढवितां येईल. ज्या भागांतून या तलावांत पाणी येतें तेथें वसती नाहीं व तो इतका स्वच्छ आहे कीं कोल्हापुराइतकी पाण्याची चांगली सोय अखिल हिंदुस्थानांत इतरत्र कोठेंहि नाहीं.

२५. सार्वजनिक चाव्या अशा काळजीपूर्वक तयार केल्या आहेत कीं त्यांवर पाणी भरतांना भांडीं राहूं शकतील व स्त्रियांना देखील त्यांचें पाणी नेतां येईल, अशा या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. तसेंच खालील जागा सखल केली असल्यामुळें सांडपाणी दगडी नळ्यांतून गटारांत सोडतां येतें. हल्लींच्या हौदापेक्षां किंवा विहिरीपेक्षां ही योजना चांगली आहे. जनावरांना पाणी पिण्यासाठीं हौद तयार केले आहेत व यामुळें पुष्कळ फायदा होईल. कात्यायनीच्या पाण्याचे हल्लींचे हौद अत्यंत वाईट रीतीनें तयार केले आहेत. त्यांवर स्त्रिया भांडीं व आपले हातपाय धुतात. त्यामुळें स्वच्छ पाणी गढूळ होतें. पाटांतून वाहणाऱ्या पाण्याहून तें मला फारच वेगळें दिसलें. या योजनेला सुमारें २,२०,२७९ रु. खर्च येईल असा अंदाज आहे.

२६. पाणी पुरवठ्याचा दुसरा मार्ग रंकाळा तलाव हा आहे. पूर्वीं येथें एक दरी असून त्यामधून एक मातीचें धरण बांधलें आहे. हें तळें खालच्या भागांतील लोकांना पाण्याचा पुरवठा करितें. पण त्यांतील पाणी कात्यायनीइतकें चांगलें नाहीं. मी ज्यावेळीं तेथें गेलों त्यावेळीं अनेक स्त्रीपुरुष धुतांना व स्नान करितांना दिसले. पण या तळ्यापासून हल्लीं रोगराई उत्पन्न होईल अशी भीति वाटते. इतकेंच नव्हें तर रहिवाशांना त्यामुळें धोका आहे; व धरणांतून जें पाणी वाहतें त्यामुळें जवळच्या पेठेंतील लोकांचें आरोग्य चांगलें राहणार नाहीं. जरी तळ्यांतून पुष्कळ पाणी नदीकडे वाहतें तरी कितीतरी पाणी पुष्कळ ठिकाणीं कुजलेलें मला दिसून आलें. त्याच्या शेजारीं घरें बांधलीं असल्यामुळें त्यांतील जमिनी ओलसर व त्रासदायक रहातात. कोल्हापुरांत ही सर्वांत वाईट गोष्ट मीं पाहिली. पश्चिमेकडील स्वच्छ

वारा शहराच्या प्रवेशद्वाराशींच बिघडला जाऊं नये म्हणून तात्काळ उपाययोजना झाली पाहिजे. जर रंकाळ्याचें धरण फुटलें तर सर्व रहिवासी पाण्याखालीं बुडून जातील.

२७. कात्यायनी येथील पाणी पुरवठ्याची योजना पूर्ण झाल्यावर पद्माळा तळें रिकामें करून स्वच्छ ठेवावें व कात्यायनी तलावाचें पाणी त्यांत भरावें. हल्लीं रस्त्यावर पाणी शिंपडलें जात नाहीं. पण हीं तळीं रस्त्यांवर पाणी शिंपडण्याच्या आवश्यक कार्याला पाणी पुरवितील. रस्त्यांवर पाणी शिंपडल्यामुळें हवेंत गारवा राहतो. शहरांत २६ विहिरी असून त्यांपैकीं कांहींचें पाणी चांगलें आहे असें म्हणतात. पण मला त्यांविषयीं शंका वाटते. सुदैवानें दुसऱ्या कोणत्याहि पाण्यापेक्षां शहरचे रहिवासी हें कात्यायनी तलावाचेंच पाणी अधिक पसंत करितात.

२८. फौजदाराच्या हुकमतीखालीं जन्ममृत्यूची नोंद ठेविली जाते. या महत्त्वाच्या कार्याकडे दुर्लक्ष झालें असून ही नोंद अपूर्ण व अविश्वसनीय आहे. १८७५ सालीं ३३२ मुलें व ३०९ मुली जन्मल्या असें मला सांगण्यांत आलें. हे आंकडे एकंदर लोकसंख्येच्या मानानें १००० ला ११ असें पडतात व तें चुकीचें आहे हें उघड आहे. बहुशः निम्म्या लोकांच्या जन्माची नोंद केली जात नाहीं. तसेंच मृत्यु-संख्येची नोंदहि हास्यास्पद आहे. या बाबतींत किती गोंधळ आहे हें नगरचिटणीसांनें १८७५ सालीं मृत्यूचे वेगवेगळे आंकडे दिले या एका गोष्टीवरून दिसून येईल. त्यांच्या मतें ४०७ पुरुष व ४२२ स्त्रिया म्हणजे एकूण ८२९ लोकांची मृत्युसंख्या असावी असें पुढील तक्त्यावरून दिसून येतें:—

| कारणें | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|
| कॉलरा .... .... .... | १४ | १७ | ३१ |
| देवी .... .... .... | १६ | ३८ | ५४ |
| ताप .... .... .... | १९६ | १९० | ३८६ |
| डिसेंट्री .... .... .... | ९८ | ११८ | २१६ |
| दम्याचा विकार .... .... | ३० | १० | ४० |
| अपघात .... .... | १९ | ९ | २८ |
| इतर .... .... .... | ३४ | ४० | ७४ |
| एकूण .... | ४०७ | ४२२ | ८२९ |



२९. हें मृत्यु-संख्येचें प्रमाण १००० ला २२ असें पडत असून तें चुकीचें आहे. जन्ममृत्यूचे आंकडे जर बिनचूक नसतील तर ज्या कागदावर ते लिहिलेले असतील त्याच्या इतकीहि त्यांची किंमत नसते. म्हणून ही नोंदणीपद्धत तात्काळ बदलली पाहिजे. लोकांना त्रास न देतां जन्ममृत्यूची नोंद करणें फारसें अवघड नाहीं. पण असा पोट कायदा केला पाहिजे, कीं ज्याच्या घरांत जन्म किंवा मृत्यु झाला असेल त्यानें लगेच पोलिसाकडे बातमी कळविली पाहिजे. पोलिसानें लगेच त्या ठिकाणीं जाऊन नोंदणीसाठीं आवश्यक ती माहिती जमा करावी. मृताच्या बाबतींत ज्यानें मृत्यूची नोंद केली आहे अशा पोलिसाच्या सहीनें कागद दाखल केल्याखेरीज त्याची व्यवस्था होऊं नये, अशी आज्ञा केली पाहिजे. पोलिसानें एक वही ठेवावी व त्यांतील निम्मा कागद अंत्यव्यवस्था करणाऱ्या माणसाकडे द्यावा. हा कागद घाटावरील किंवा स्मशानावरील अधिकारी माणसाकडे द्यावा व नंतर तो रजिस्ट्रेशन ऑफिसकडे परत केला जावा. जन्ममृत्यूच्या बिनचूक नोंदणीवर समाजाचें हित अवलंबून आहे, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. येथें इतर गोष्टी इतक्या चातुर्यानें होत असतां या बाबीकडे कसें दुर्लक्ष होत आहे, याचें मला आश्चर्य वाटतें.

३०. नगरपालिकेचें वार्षिक उत्पन्न सुमारें रु. ३३,००० इतकें असून दरमाणसीं नगरपालिकेचा १४ आणे कर पडतो. हा कर इतर शहराच्या मानानें बराच कमी आहे, हें पुढील शहरांतील करांवरून दिसून येईल:—

१८७२ सालच्या शिरगणतीप्रमाणें

| | | | |
|---|---|---|---|
| मुंबई | ४–११–७ | अहमदाबाद | १–४–५ |
| पुणें | १– १–१ | सुरत | २–१–६ |
| सोलापूर | ०–१४–३ | अहमदनगर | १–१–७ |

सफाईखात्याचा प्रत्येकीं खर्च १ आणा ५ पै इतका आहे. लोकसंख्येच्या मानानें हा खर्च फार कमी आहे.

३१. असें हें कोल्हापूर शहराच्या आरोग्यस्थितीचें थोडक्यांत वर्णन आहे. पाणी पुरवठ्याची उत्कृष्ट योजना, सार्वजनिक सुंदर इमारती, गलिच्छ गांवें नाहींशीं करून व रस्ते रुंद करून लोकांचें आरोग्य व स्वच्छता यांची सुधारणा करणें. राजधानीचें ठिकाण होण्याला कोल्हापूर योग्य असावें अशी सदिच्छा बाळगणें वगैरे कार्याबद्दल अधिकारी स्तुतीला पात्र आहेत. तथापि या बाबतींत अजून पुष्कळच कार्य व्हावयाचें आहे यांत शंका नाहीं."

वरील दोन उताऱ्यांवरून त्यावेळच्या कोल्हापूरची स्थिति कशी होती याची कल्पना येईल. सुदैवानें यावेळीं कोल्हापूरला चांगले अधिकारी लाभले व त्यांच्या सदिच्छेमुळें शहराची सुधारणा करण्याकरितां अत्यंत नेटाचे प्रयत्न इ. स. १८७३ ते १८८९ च्या दरम्यान करण्यांत आले. या अधिकाऱ्यांमध्यें त्यावेळचे दिवाण रावबहादूर महादेव वासुदेव बर्वे व पोलिटिकल एजंट, यांचे

मदतनीस लेफ्टनंट ( नंतर कर्नल ) डब्ल्यू. बी. फेरिस यांचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल. रावबहादूर बर्वे यांनीं सदिच्छेनें व कळकळीनें प्रजेच्या हिताचीं अनेक कार्यें हातीं घेतलीं व नेटानें पारें पाडलीं. त्याचप्रमाणें त्यांना प्रत्येक बाबतींत अत्यंत जोराचा पाठिंबा मि. फेरिस यांनीं दिला; व म्हणूनच तीव्र विरोध असतांनाहि नगरसुधारणेचीं अनेक कार्यें यावेळीं करितां आलीं.

आतां आपण १८७३ सालानंतर नगरपालिकेच्या घटनेंत कोणते फेरफार घडून आले यांचा प्रथमतः विचार करूं. आतांपर्यंत न्यायाधीश हेच नगरपालिकेचे अध्यक्ष असत; व तिच्या सभासदांची संख्या ३० ही होती. पण सभासदांची संख्या वाढली तरी त्यामुळें नगरपालिकेच्या कार्यक्षमतेंत त्यामुळें फारशी भर पडली असें म्हणतां येत नाहीं. इतकेंच नव्हे, तर नगरपालिकेच्या हातून जीं चांगलीं कार्यें झालीं तिचें सर्व श्रेय बव्हंशीं त्यावेळचे अध्यक्ष श्री. फाटक न्यायाधीश यांच्या उद्योगतत्परतेलाच द्यावें लागेल. अशा परिस्थितींत नगरपालिकेकडून लोकहिताचीं उपयुक्त अशीं कार्यें व्हावयाचीं असतील, तर तिच्या घटनेंत फेरबदल करणें अपरिहार्य होतें. म्हणून ता. १९ ऑगस्ट १८७३ रोजीं त्यावेळचे पोलिटिकल एजंट कर्नल अँडरसन यांनीं एक हुकूम काढला. त्यांत त्यांनीं कोल्हापूर नगरपालिकेची कार्यक्षमता वाढवावयाची झाल्यास तींत प्रतिष्ठित सरकारी अधिकाऱ्यांचा समावेश केला पाहिजे असें म्हटलें व नगरपालिकेंत पुढील नेमणुका केल्याः—

१. मि. एस्. हॅमिक—ॲसिस्टंट पोलिटिकल एजंट, अध्यक्ष.
२. श्री. एम्. व्ही. बर्वे } उपाध्यक्ष.
३. श्री. जी. जी. फाटक } उपाध्यक्ष.
४. मेजर ड्यूकेंट—सन्मान्य इंजिनिअर.
५. जी. सिंक्लेअर—हेल्थ आफिसर.

नगरपालिकेंत पोलिटिकल एजंट यांनीं हा जो बदल केला त्याला मुंबई सरकारनें २३ सप्टेंबर १८७३ रोजीं मान्यता दिली.

अशारीतीनें १८७३ च्या पोलिटिकल एजंट यांच्या या हुकुमानें कोल्हापूर नगरपालिकेंत तत्कालीन वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश झाला. अशाप्रकारचा बदल होणें हें फारच आवश्यक होतें. नगरसुधारणेचें कोणतेंहि कार्य हातीं घेतलें असतां परंपराभिमानी व पुराणमतवादी समाजाकडून नेहमीं विरोध होत असतो. अशाप्रकारचा अनुभव कोल्हापूर नगरपालिकेला घरफाळा सुरू करावयाच्या वेळीं आलेला होता; आणि शहरसुधारणेचीं लोकोपयोगी कार्यें हातीं घेतल्यावर हा विरोध त्याहूनहि अधिकाधिक होत जाणार, हें उघड होतें. ह्या सर्व विरोधाला तोंड द्यावयाचें असेल तर संस्थानांतील सर्वांत श्रेष्ठ अधिकाऱ्यांना नगरपालिकेंत सभासद म्हणून नेमणें, हा एक सोपा व परिणामकारक मार्ग होता. ज्यांच्याकडे तक्रारी न्यावयाच्या तेच नगरपालिकेंत प्रमुख असल्यामुळें वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तक्रारी नेण्याला लोकांना फारसा अवकाश राहिला नाहीं, एवढेंच या घटनेंतील वैगुण्य म्हणून सांगतां येईल. पण त्यामुळें लोकहिताचीं सार्वजनिक कार्यें तडीस नेतां आलीं व त्यांतील अधिकारी



कर्तव्यदक्ष असल्यामुळें लोकांवरहि अन्याय झाला नाहीं. एकंदरींत विचार करितां असें म्हणतां येईल कीं, या घटनेंतील फरकामुळें लोकांचे अधिकार थोडे कमी झाले तरी परिणामीं त्यांचें कल्याणच झालें.

१८७३ च्या हुकुमानें नेमलेले नगरपालिकेचे अध्यक्ष मि. हॅमिक यांनीं आपलें कार्य फारच कुशलतेनें केलें. त्यांनीं सर्व पेठा नगरपालिकेच्या ताब्यांत आणल्या, घरफाळ्याच्या प्रकरणीं झालेले लोक-प्रक्षोभाचे आघात सोसले आणि शहराचें आरोग्य व स्वच्छता या बाबतींत प्रशंसनीय कार्य केलें. नगरपालिकेच्या कार्याचा दीड वर्षे अनुभव घेतल्यानंतर त्यांनीं १८७५ सालीं पोलिटिकल एजंटकडे आपला विस्तृत अहवाल सादर केला. त्यांत त्यांनीं नगरपालिकेची तत्कालीन कार्यपद्धति कशी सदोष होती, याचें मार्मिक विवेचन केलें आहे. नगरपालिकेचे सभासद सभांना नियमित हजर रहात नाहींत; आपल्यावरील जबाबदारीची त्यांना जाणीव नाहीं; त्यांच्यांत एकोपा नाहीं व सभेमध्यें शुष्क वादविवादांत ते व्यर्थ वेळ घालवितात; जनरल बॉडीनें मंजूर केलेलीं कार्यें दिरंगाईनें केलीं जातात; पैशाचा यथोचित विनियोग होत नाहीं; इत्यादि अनेक दोष त्यांनीं दाखविले आहेत. थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास नगरपालिकेची व्यवस्था अत्यंत अयशस्वी आहे असें त्यांच्या अहवालाचें सार आहे. म्हणून त्यांनीं नगरपालिकेंत सुधारणा होण्यासाठीं दोन मार्ग सुचविले. पहिला 'नगरपालिकेचा कारभार' समितीला व्यक्तिशः जबाबदार असणाऱ्या एका पगारी व्यवस्थापकाकडे ( Manager ) सोंपवावा. किंवा दुसरा मार्ग म्हणजे संस्थाननें आपल्या एका अधिकाऱ्याच्या देखरेखीखालीं नगरसुधारणेचें खातें ताब्यांत घ्यावें. या दोन मार्गांपैकीं दुसरा मार्गच अधिक श्रेयस्कर आहे, असें त्यांनीं म्हटलें आहे.

मि. हॅमिक यांच्या या सूचना अत्यंत विचारार्ह असल्यामुळें त्या मान्य होण्याला अडचण पडली नाहीं. त्यावेळचे पोलिटिकल एजंट कर्नल एफ्. श्नायडर ( F. Schneider ) यांनीं ता १८ मे १८७५ च्या आपल्या अहवालांत व्यवस्थापक समितीच्या ( Managing Committee ) ऐवजीं एका कामगाराची नेमणूक करावी असें सुचविलें. त्या कामगारानें शहरसुधारणेकडे लक्ष द्यावें, साधारण समिति ( General body ) पूर्वीसारखीच असावी व कामगारानें अंदाजपत्रक व जमाखर्च हे साधारण समितीपुढें ठेवावें असें सुचविलें. व्यवस्थापक समितीपेक्षां एक पगारी जबाबदार कामगार अधिक कार्य करूं शकेल व ही व्यवस्थाच लोकांना अधिक आवडेल, असें त्यांनीं आपलें मत व्यक्त केलें. पोलिटिकल एजंट यांच्या या सूचनेला ५ जून १८७५ रोजीं मुंबई सरकारनेंहि मान्यता दिली.

अशारीतीनें १८७५ सालीं नगरपालिकेच्या घटनेंत दुसरा महत्त्वाचा बदल होऊन कोल्हापूर नगरपालिकेंत एका पगारी कामगाराची नेमणूक झाली व व्यवस्थापक समिति रद्द झाली. त्यानंतर नगरपालिकेनें जीं कार्यें केलीं तीं अध्यक्ष व कामगार यांच्या प्रयत्नानेंच झालीं. सर्वसाधारण समितीचा बरेच वेळां सल्ला घेतला जाई. पण नगरपालिकेच्या घटनेंत अध्यक्ष व कामगार यांचेंच प्राधान्य होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. याप्रमाणें नगरपालिकेचे पहिले कामगार म्हणजे श्री. गणेश भास्कर चाफेकर हे होत.

## कोल्हापूर शहरांतील बागा



राजाराम हॉल, राजारामपुरी.






श्रीशिवाजी महाराजांचा पुतळा, शिवाजी चौक.
( श्री. भालजी पेंढारकर यांची शहराला देणगी. )



श्रीशाहू उद्यान, गंगावेस.



कुस्त्याचे मैदान, खासबाग.

थोड्याबहुत फरकानें वरील घटना १८८९ सालापर्यंत चालू होती. ता. २ मे १८८१ रोजीं त्यावेळचे पोलिटिकल एजंट यांनीं कोल्हापूर नगरपालिकेच्या घटनेंत थोडा बदल केला व सभासदांची संख्या ३५ केली. त्यांपैकीं १३ अधिकारी, ४ सरदार व १८ वकील, व्यापारी इत्यादि नागरिक असे होते. इतकेंच नव्हे, तर त्यावेळचे अध्यक्ष मि. फेरिस यांच्या शिफारसीनुसार पोलिटिकल एजंट यांनीं सभासदांनीं तिमाही सभा भरवाव्या असा हुकूम फर्माविला. तथापि सभासदांचें कार्य केवळ विचारविनिमयाचेंच होतें; आणि अध्यक्ष हेच नगरपालिकेचे कार्यकारी अधिकारी ( Executive officer ) होते.

येथपर्यंत आपण १८७३ ते १८८९ पर्यंत नगरपालिकेच्या घटनेंत कोणते फेरबदल झाले याचें विहंगमावलोकन केलें. आतां आपण या कालांत तिनें शहरसुधारणेचीं कोणतीं कार्यें केलीं, याचा थोडक्यांत विचार करूं.

या कालांत कोल्हापूर नगरपालिकेनें केलेलें अत्यंत महत्त्वाचें कार्य म्हणजे तट पाडणें, हें होय. तटाच्या आंत अत्यंत दाटी झाली हें मागें सांगितलेंच आहे. ही दाटी कमी होण्यासाठीं शहराचा विस्तार वाढविणें जरूर होतें. त्याकरितां शहरांत बाहेरची शुद्ध हवा खेळण्याकरितां तट पाडणें हें अत्यावश्यक होतें. म्हणून त्यावेळीं तट पाडण्याची योजना हातीं घेतली गेली. या योजनेंत चार मुख्य उद्देश होते:—

(१) शहरांत बाहेरची स्वच्छ हवा खेळेल अशी तरतूद करणें;

(२) रोगांचें उगमस्थान बनलेला खंदक मुजविणें.

(३) तट पाडून व खंदक मुजवून मिळालेल्या जागेंतून एक रुंद व वर्तुळाकार रस्ता आंखणें.

(४) शिल्लक राहिलेली जागा लोकांना घर बांधण्याकरितां विकणें.

या दृष्टीनें विचार करितां ही योजना अत्यंत उपयुक्त होती असेंच म्हणावें लागेल.

पण दुर्दैवानें त्यावेळीं या योजनेला फारच विरोध झाला. जुन्या परंपरेचा अभिमान बाळगणाऱ्या लोकांना—आणि त्याकाळीं यांच लोकांचें प्राधान्य होतें—तट पाडण्याची कल्पना आवडली नाहीं. त्यांच्या मतें तट पाडणें म्हणजे जुन्या ऐतिहासिक महत्त्वाच्या वस्तु नाहींसें करण्याचा गर्हणीय प्रयत्न करणें. कित्येकांनीं तर तट पाडल्यामुळें शत्रूंपासून शहराला धोका निर्माण झाला अशी ओरड सुरूं केली. अनेकांनीं पोलिटिकल एजंटकडे व हिंदुस्थान सरकारकडे अर्ज केले. या सर्वांचा परिणाम कांहीं विशेष झाला नाहीं. मात्र तटापैकीं कांहीं बुरुज व एक वेस ऐतिहासिक अवशेष म्हणून ठेवावींत असा ठराव झाला; व त्याचा परिणाम म्हणून आजहि रविवार बुरजानजीक पूर्वींचा तट कसा होता हें पहावयास मिळतें.




## कोल्हापुरांतील मंडई व बाजार





भाई माधवराव बागल मार्केट, राजारामपुरी.



गुरांचा बाजार, मंगळवार पेठ.



उत्तरेश्वराचें देवालय व मंडप.



गांधी विद्या मंदिर, वरुणतीर्थ.



पण या तत्कालीन विरोधाला आपण आज महत्त्व देण्याचें कारण नाहीं. त्यामुळें आज कोणत्याहि विचारी माणसाला कबूल करावें लागेल कीं तट पाडल्यामुळें एकंदरींत जनतेचा फायदाच झाला. किंबहुना तट म्हणजे शहरासभोंवती असलेली मध्ययुगीन शृंखला. ती कायम असेतोपर्यंत आधुनिक युगांत परिवर्तन किंवा वाढ होणें शक्य नव्हतें. म्हणून या योजनेमुळें नगरपालिकेनें शहरासभोंवतालची शृंखला तोडून टाकून शहराच्या इतिहासांत एका नवयुगाची सुरवात केली असें म्हणावें लागेल.

नगरपालिकेनें यावेळीं केलेलें दुसरें महत्त्वाचें कार्य म्हणजे शहराचें आरोग्य सुधारण्यासाटीं नानाविध प्रयत्न करणें हें होय. यांमध्यें पुढील गोष्टींचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल:—

(१) शहराच्या निरनिराळ्या भागांत जमिनीखालून वाहणारीं दगडाचीं गटारें बांधणें.
(२) सार्वजनिक तारदखान्यांची संख्या वाढविणें.
(३) मैल्याची व कचऱ्याची योग्य निर्गत करणें.

यांपैकीं पहिलें कार्य करण्याकरितां बरीच मोटी रक्कम खर्च करण्यांत आली त्यामुळें शहराचें आरोग्य सुधारण्यासाटीं त्यावेळीं जरी बराच उपयोग झाला असला तरी आजमितीस त्या खर्चाचा विशेष उपयोग नाहीं असें म्हणावें लागतें. एक तर त्यांपैकीं बहुतेक सर्व गटारें बुजून गेलीं आहेत. शिवाय त्यावेळच्या ड्रेनेजच्या कल्पना व हल्लींच्या ड्रेनेजच्या कल्पना यांत जमीनअस्मानाचें अंतर पडलें असल्यामुळें, जरी तीं गटारें असतीं तरी त्यांचा विशेष उपयोग झाला नसता. त्याचप्रमाणें त्यावेळीं सार्वजनिक पायखान्यांवर जो पैसा खर्च केला गेला त्यामध्यें देखील थोडी चूक होतीच. कारण त्यावेळीं एकाच ठिकाणीं अनेक पायखाने बांधण्यांत आले. यापेक्षां एका ठिकाणीं दोन अथवा चार पायखानेच बांधावयाचे ही कल्पना जर अंगिकारिली गेली असती, तर फार बरें झालें असतें. पण ह्या आजच्या कल्पना पुढें ठेवून त्याकालच्या कार्यावर टीका करणें सयुक्तिक होणार नाहीं. त्यावेळच्या परिस्थितीप्रमाणें व तत्कालीन विचाराप्रमाणें नगरपालिकेचें धोरण योग्यच होतें; व ज्या कार्याचा उपयोग ३०–४० वर्षें झाला, त्यावरील खर्चाचा पूर्ण मोबदला मिळाला, अशीच कल्पना करावी लागेल. या कालांतील नगरपालिकेच्या खर्चाचा तक्ता पुढें दिला आहे:—

येथपर्यंत कोल्हापूर नगरपालिकेनें १८७३ ते १८८९ या कालांत नागरिकांना उपयुक्त व उपकारक अशा कोणत्या गोष्टी केल्या यांचें विवेचन केलें. आतां आपण नगरपालिकेच्या नोकर-वर्गांत कशी वाढ झाली याचा ऊहापोह करूं. १८५४ सालीं नगरपालिकेंत १ कारकून व ३४ शिपाई एवढाच नोकरवर्ग असे; व लष्करफडांतील लोकांना वेगळ्या रीतीनें वेतन मिळत असल्या-मुळें पहिलीं पांच वर्षें नगरपालिकेच्या सर्व नोकरांचा पगार अवघा रु. १५ हा असे. पण पुढें नगरपालिकेचा व्याप वाढत चालल्यामुळें तींत नोकरवर्गाचीहि भर पडावी हें साहजिक होतें. १८६९ सालचा नोकरवर्गाचा तक्ता पुढें दिला आहे:—

| इसमांची संख्या | हुद्दा | पगार | |
|---|---|---|---|
| | | दरमहा | दरसाल |
| १ | कारकून ... ... ... | २५ | ३०० |
| १ | कारकून ... ... ... | १५ | १८० |
| ८ | शिपाई ... ... ... | ४० | ४८० |
| ८ | भंगी ... ... ... | ४८ | ५७६ |
| १ | भिस्ती ... ... ... | ८ | ९६ |
| २ | मशालजी ... ... ... | १० | १२० |
| १ | मेस्त्री ... ... ... | २० | २४० |
| १ | नाईक ... ... ... | ९ | १०८ |
| ४ | कामाठी ... ... ... | २० | २४० |
| २ | बंबाकडे शिपाई ... ... ... | १० | १२० |
| | एकूण... | २०५ | २४६० |

पण १८६९ सालापासून प्रतिवर्षी नगरपालिकेची कार्यक्षमता अधिकाधिक वाढत होती व त्याबरोबरच तींतील नोकरवर्गाच्या संख्येत कशी भर पडत होती, हें १८८९ सालच्या पुढील तक्त्यावरून दिसून येईल:—

| इसमांची संख्या | हुद्दा | पगार | |
|---|---|---|---|
| | | दरमहा | दरसाल |
| | **कामगार व ओव्हरसीअर** | | |
| १ | कामगार पगार ११५ व अलावन्स १५ मिळून | १३० | १५६० |
| १ | अवल कारकून | ३० | ३६० |
| १ | नगदी कारकून | २५ | ३०० |
| १ | घरपट्टी वगैरे किरकोळ कामगारी कारकून | २० | २४० |
| १ | नगदीकडे मदतीस कारकून | १५ | १८० |
| १ | बारनिशी कारकून | १२ | १४४ |
| १ | रिकार्ड कारकून | १० | १२० |



| इसमांची संख्या | हुद्दा | पगार | |
|---|---|---|---|
| | | दरमहा | दरसाल |
| | **सदरहू शिवाय** | | |
| १ | नाईक | ९ | १०८ |
| ३ | पाहऱ्यावर शिपाई दरमहा ६ प्रमाणें | १८ | २१६ |
| २ | कामगार यांजकडे शिपाई, दरमहा ६ प्रमाणें | १२ | १४४ |
| १ | चेअरमन यांजकडे शिपाई | ६ | ७२ |
| १ | प्रेसिडेंट यांजकडे शिपाई | ६ | ७२ |
| १ | लबेकरी | ५ | ६० |
| | **पब्लिक वर्क्स खातें** | | |
| १ | सब ओव्हरसीअर, पगार २५ व अलावन्स १० | ३५ | ४२० |
| १ | कारकून | १२ | १४४ |
| | **घरपट्टी खातें** | | |
| २ | वसुलाचे मदतीस शिपाई, दरमहा ६ प्रमाणें | १२ | १४४ |
| १ | घरपट्टी वसुलास कुलकर्णी पेठवार आहेत त्यांजब. | ५० | ६०० |
| १ | स्टोअरकीपर | १० | १२० |
| ४ | बंबाकडे शिपाई, दरमहा ६ प्रमाणें | २४ | २८८ |
| २ | हौद, नळ व चाव्या साफ करण्यास कामाठी, दरमहा ५ प्रमाणें | १० | १२० |
| | **कंदील खातें** | | |
| १ | इन्स्पेक्टर | ७ | ८४ |
| ८ | कंदील लावणोर इसम, दरमहा ६ प्रमाणें | ४८ | ५७६ |
| ४ | धर्मशाळा सफाईकडे कामाठी, दरमहा ४ प्रमाणें | १६ | १९२ |
| ० | ऑफीस सादिलवार | ४० | ४८० |
| | **मार्केट खातें** | | |
| १ | इन्स्पेक्टर | ८ | ९६ |
| १ | ग्रेनमार्केटांत कामाठी | ६ | ७२ |
| १ | कसाईखान्यांत कामाठी | ६ | ७२ |

| इसमांची संख्या | हुद्दा | पगार | |
|---|---|---|---|
| | | दरमहा | दरसाल |
| | **शहरसफाई खातें** | | |
| १ | हेल्थ ऑफिसर | १०० | १२०० |
| १ | हेल्थ इन्स्पेक्टर, पगार ४० व अलावन्स १५ मिळून | ५५ | ६६० |
| १ | हेड् इन्स्पेक्टर | १७ | २०४ |
| ३ | इन्स्पेक्टर पगार ८।९।१० प्रमाणें | २७ | ३२४ |
| १० | हद्दीवरील शिपाई, दरमहा ६ प्रमाणें | ६० | ७२० |
| १ | हेल्थ ऑफिसर यांजकडे शिपाई | ६ | ७२ |
| १ | हेल्थ ऑफिसरचे कारकून ( ऑफिसकडे ) | १२ | १४४ |
| १ | व्हॅक्सिनेटर | १५ | १८० |
| १ | कंपाउंडर | ८ | ९६ |
| १ | कामाठी, डिन्स्पेन्सरीकडे | ६ | ७२ |
| ० | डिन्स्पेसरी व हेल्थकरितां सादिलवार | ५ | ६० |
| | **रस्ते झाडणें व तारदखाने साफ करणें** | | |
| २५ | रस्ते झाडणारे दरमहा ४ प्रमाणें | १०० | १२०० |
| २४ | गटारे साफ करणारे दरमहा ५ प्रमाणें | १२० | १४४० |
| १० | कचरा नेऊन टाकण्याचे कामाकडे गाड्या, बैलजोड्या व हकणारासहित दरमहा १४ प्रमाणें | १४० | १६८० |
| १० | कचऱ्याच्या गाड्या भरणारे इसम दर ५ प्रमाणें | ५० | ६०० |
| ४० | तारदखाने साफ करण्यास भंगी, दर. १० प्रमाणें | ४०० | ४८०० |
| २० | मैला व खराब पाणी नेण्याकरितां गाड्या बैल व हकणारे सहित दरमहा २४ प्रमाणें | ४८० | ५७६० |
| ८ | तारदखान्यांतील पाणी भरणारे इसम दरमहा ६ प्रमाणें | ४८ | ५७६ |
| ५ | मैलाच्या खड्ड्याकडे भंगी, दरमहा १० प्रमाणें | ५० | ६०० |
| ८ | बिगारी भंगी, दरमहा ६ प्रमाणें | ४८ | ५७६ |
| १० | मांग, मैलखड्ड्यावर दरमहा ६ प्रमाणें | ६० | ७२० |
| १ | सुतार | १४ | १६८ |
| १ | लोहार | १४ | १६८ |
| २ | मजूर, दरमहा ६ प्रमाणें लोहार व सुतार यांचें हाताखालीं | १२ | १४४ |
| | एकूण.... | २४२९ | २९,१४८ |



येथपर्यंत १८७३ ते १८८९ या कालांत नगरपालिकेनें कोणतीं कार्यें केलीं, तिच्या नोकरवर्गांत कशी वाढ झाली याचा विचार केला. आतां आपण याच कालांत कोल्हापूर दरबारनें शहर सुधारणेचीं कोणतीं कार्यें केलीं याचा विचार करूं. कारण कोल्हापूर दरबारनें केलेलीं कार्यें नगरपालिकेच्या कार्याला पूरक व पोषक असल्यामुळें त्यांचाहि येथें विचार करणें अत्यवश्य आहे.

या कालांत दरबारनें केलेली पहिली महत्त्वाची कामगिरी म्हणजे नवीन प्रेक्षणीय इमारती बांधणें ही होय. यांपैकीं कांहीं महत्त्वाच्या इमारतींची माहिती पुढें दिली आहे:—

( १ ) **नवीन राजवाडा:**—या कालांत लोकांनीं कोटभागांतून बाहेर जावें अशी मोहीम सुरूं करावयाची होती. त्याला स्वत: महाराजांच्याकडूनच सुरवात झाली. जुन्या राजवाड्याच्या ऐवजीं नवीन राजवाडा बांधण्यांत आला. याकरितां अर्थातच रेसिडेन्सीजवळची जागा निवडली गेली. नवीन राजवाडा झाल्याबरोबर त्या सभोंवतीं जहागिरदारांचे बंगले होणें हें क्रमप्राप्तच. म्हणून या भागांत इतरहि सुंदर इमारती होऊं लागल्या.

( २ ) **शैक्षणिक इमारती:**—या कालांत राजाराम हायस्कूलकरितां [ हल्लीं कॉलेज असलेली ] सुंदर इमारत बांधली गेली [ १८६९–७४ ]. तसेंच नगर वाचन मंदिराची इमारतहि याच कालांत बांधली गेली [ १८७९–८१ ]. त्याचप्रमाणें आज शहरांत असलेल्या बहुतेक सर्व इमारती या कालांतच बांधल्या गेल्या.

( ३ ) **टाऊन हॉल:**—ही इमारत १८७२–७६ च्या दरम्यान बांधली.

( ४ ) **आल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटल:**—ही इमारत १८८१–८४ या कालांत बांधली.


या वेळीं दरबारनें केलेलें दुसरें महत्त्वाचें कार्य म्हणजे कळंबे तलाव बांधून त्याचें पाणी गांवांत आणणें ही होय. याबद्दल थोडी वर्णनात्मक माहिती डॉ. ह्यूलेट यांच्या रिपोर्टमध्यें आली आहेच. येथें प्रामुख्यानें एका गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो. ती गोष्ट म्हणजे पाणी पुरवठ्या-संबंधींचा. त्या वेळेच्या व आतांच्या कल्पना यांत पडलेलें महदंतर. कळंबे तलाव बांधतांना शहराची लोकसंख्या ४०,००० धरणेंत आली व माणशीं दररोज दहा गॅलन पाणी मिळाल्यास पुरे अशा समजुतीनें तलावाची आंखणी करण्यांत आली. पण आतां शहराची लोकसंख्या एक लक्षाहून अधिक आहे व झपाट्यानें वाढत आहे. हल्लींच्या कल्पनेप्रमाणें माणशीं दररोज ४० गॅलन पाणी मिळालें पाहिजे. या दोन स्थित्यंतरामुळें एका काळीं अखिल हिंदुस्थानांत उत्कृष्ट समजला जाणारा कळंब्याचा पाणी पुरवठा आतां अगदींच अपुरा भासत आहे.

यावेळीं दरबारकडून झालेली तिसरी महत्त्वाची कामगिरी म्हणजे रंकाळा तलाव बांधणें ( १८७७-८३ ). हा तलाव बांधण्याचा मूळ हेतु गांवांत पिण्यासाठीं पाणी पुरविणें हा होता. हा उद्देश साध्य झाला नाहीं. पण रंकाळ्यामुळें शहरांत एक निसर्गरमणीय सौंदर्यस्थान निर्माण झालें व शेंकडों एकर जमीन उंसाच्या लागवडीखालीं आणतां आली.

या कालांतील दरबारची चौथी महत्त्वाची कामगिरी म्हणजे कोंकणांत जाणारे रस्ते तयार करणें, शिवाजी पूल बांधणें व आगगाडी आणणें ही होय. या योजनांमुळें कोल्हापूरला यापूर्वी नसलेलें व्यापारी महत्त्व प्राप्त झालें. कोंकणाचें एक महत्त्वाचें प्रवेशद्वार, रस्त्यांचें केंद्र व व्यापाराचें महत्त्वाचें ठिकाण म्हणून कोल्हापूर यापुढें ओळखलें जाऊं लागलें.



रावबहादूर महादेव वासुदेव बर्वे
यांची स्वाक्षरी



एकंदरींत विचार करितां इ. स. १८७३ ते १८८९ ह्या दरम्यानचा काल कोल्हापूर शहराच्या इतिहासांत अगदीं धामधुमीचा असा होऊन गेला. किंबहुना, या कालाला शहरसुधारणेचें पहिलें युग असें म्हणतां येईल. या कालांत शहराचें मध्ययुगीन स्वरूप संपलें व आधुनिक स्वरूपाला सुरवात झाली; उत्तमोत्तम इमारती निर्माण झाल्या; रेल्वे, शिवाजी पूल, कोंकणांत जाणारे रस्ते, यांमुळें ह्या कालपर्यंत ज्या शहराला फक्त धार्मिक आणि राजकीय महत्त्व होतें त्या शहराच्या व्यापारी महत्त्वाला सुरवात झाली; आणि राजाराम हायस्कूलमुळें शहराला या वेळेपासून शैक्षणिक महत्त्वहि येऊं लागलें. या कालांत हीं जीं उत्तम कार्यें झालीं त्याचें श्रेय त्या वेळचे दूरदर्शी दिवाण रावबहादूर बर्वे व मि. हॅमिक, मि. फेरिस यांसारखे उत्साही ॲसिस्टंट पोलिटिकल एजंट यांनाच दिलें पाहिजे.

---

# प्रकरण ५ वें

# पहिली लोकनियुक्त नगरपालिका

## (१८८९–१९०४)

इ. स. १८८२ मध्यें लॉर्ड रिपन यांनीं आपला ठराव प्रसिद्ध केला व हिंदुस्थानांतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्याला मोठें उत्तेजन दिलें. त्यांच्या या इतिहासप्रसिद्ध ठरावांत जे मुख्य मुद्दे होते त्याचा गोषवारा पुढें दिला आहे:—

(१) नगरपालिकेंत बिन सरकारी सभासदांचें आधिक्य असावें.

(२) निवडणुकीची पद्धत शक्य तों अधिक प्रमाणांत प्रारंभीं मोठ्या शहरांत व नंतर लहान गांवांत अमलांत आणावी.

(३) सरकारचा स्थानिक संस्थांवरील ताबा आंतून असण्यापेक्षां बाहेरून असावा; अशा प्रकारचा ताबा प्रथमतः मित्राप्रमाणें उपदेशात्मक व सहानुभूतिपूर्ण असावा व अनिवार्य प्रसंगीं नगरपालिका बरखास्त करावी लागल्यास आगाऊ सूचना देण्यांत यावी.

(४) नगरपालिकेचा अध्यक्ष शक्य तों अधिकारी नसावा; पण जेथें अधिकारी असलेल्या अध्यक्षाची आवश्यकता असेल त्या वेळीं त्यानें मतदान करूं नये.

(५) सरकारी अधिकारी, उदाहरणार्थ डॉक्टर्स व इंजिनिअर्स, यांनीं तज्ज्ञ या नात्यानें सल्ला व सहाय्य द्यावें. नगरपालिकेचे मालक या नात्यापेक्षां नोकर या नात्यानें तिच्यावर देखरेख ठेवावी.

(६) स्थानिक संस्थांना आपल्या कारभारांत सुधारणा करण्यासाठीं अधिक उत्पन्न वाढविण्याचे योग्य ते मार्ग उपलब्ध करून द्यावेत.

(७) कामाच्या वाढीबरोबरच उत्पन्न वाढविणाऱ्या योग्य साधनांचा अवलंब करावा.

(८) स्थानिक संस्थाचें एकंदर कार्यक्षेत्र शक्य तों लहान असावें. स्थानिक संस्था असलेला प्रत्येक भाग इतका लहान असावा, कीं प्रत्येक सभासदाला त्यांतील परिस्थितीचें सम्यग् ज्ञान असून त्याबद्दल आत्मीयता वाटली पाहिजे.

या सूचनांचा पुरस्कार करितांना त्यामुळें स्थानिक संस्थांत कार्यक्षमतेच्या दृष्टीनें एक प्रकारचें वैगुण्य येईल याची लॉर्ड रिपन यांना जाणीव होती; पण स्थानिक संस्थांच्या कारभारांत जसजशी स्थानिक ज्ञानाची व आत्मीयतेची वाढ होईल तसतशी तिच्या कार्यांत अधिक सुधारणा होईल अशी त्यांची खात्री होती. विशेषतः सरकारी अधिकाऱ्यांनीं स्वतंत्र राजकीय जीवनाचा जो प्रारंभ स्थानिक संस्थांपासून होत आहे त्याची वाढ करण्याचें ध्येय पुढें ठेवावें व पूर्वी चालू असलेल्या एकतंत्री राज्यपद्धतीपेक्षां लोकशाही राज्यपद्धतीमध्येंच आपल्या सामर्थ्याचा विकास होण्याला चांगलें

क्षेत्र मिळण्याजोगें आहे याची जाणीव ठेवावी, असें रिपन साहेबांचें म्हणणें होतें. म्हणून त्यांनीं ग्वाही दिली कीं, सरकारी अधिकाऱ्यांची वृत्ति व वर्तन वर दिल्याप्रमाणें झाल्यास स्थानिक संस्थांच्या कार्यक्षमतेची अभिवृद्धि झाल्याशिवाय राहणार नाहीं.

या ठरावानंतर लवकरच सर्व हिंदुस्थानभर लोकनियुक्त संस्था स्थापन करण्याची व त्यांची वाढ करण्याची मोहीम सुरू झाली. मुंबई सरकारनें १८८४ सालीं लोकल बोर्डाकरितां एक व म्युनिसिपालिटीच्याकरितां एक असे दोन कायदे पास केले. या सर्व चळवळीचा परिणाम कोल्हापूरवर होणें साहजिक होतें; आणि म्हणून १८८६ सालीं कोल्हापूर नगरपालिकेची पुनर्घटना करण्याकरितां एक समिति नेमली गेली. त्या समितीचा अहवाल पुढें विस्तारानें दिला आहेः—

१. म्युनिसिपालिटीची स्थिति कोणत्या आधारावरून झाली आहे आणि म्युनिसिपल कमिशनरचे अधिकार कोणकोणते आहेत, ह्यासंबंधीं पूर्ण माहिती कोठेंहि दिलेली नाहीं. तथापि सध्यांची स्थिति कशी आहे हें समजण्याकरितां खालीं थोडी हकीकत दिली आहे ती येणेंप्रमाणें:—

२ कोल्हापूर शहरांत म्युनिसिपालिटी प्रथमतः सन १८५४ सालीं स्थापण्यांत आली तेव्हां शहरसफाईचे कामाकरितां ३००० रुपये वर्षाचे संस्थानांतून मिळत असत. सन १८६९ सालीं ती रक्कम परत घेऊन सरकारसाऱ्याच्या कांहीं बाबी म्युनिसिपालिटीकडे देण्यांत आल्या. ह्या बाबींचें उत्पन्न सन १८७२ सालीं ११,१७८ रुपये झालें; परंतु शहरांत सुमारें ४०,००० लोकांची संख्या असल्यामुळें ती रक्कम शहरसफाईचे कामाला पुरें होईना. याकरितां सन १८७३ सालीं म्युनिसिपालिटीची सर्व व्यवस्था बदलून उरावरचा कर, टोल, दस्तुरी, शिंगोटीचा कर हे कर बसवून म्युनिसिपालिटीचें उत्पन्न वाढविलें. पूर्वीचे कर टौनड्यूटीज व खारे माशावरील हे कर बंद केले. कमिशनर लोकांची संख्या वाढविली आणि ॲसि. पोलिटिकल एजंट यांस प्रेसिडेंट नेमण्यांत आलें. तिमाही सभा नियमानें भरत असत आणि म्युनिसिपालिटीचें काम मॅनेजिंग कमिटीचे मार्फत चालत असें. त्या दिवसापासून म्युनिसिपालिटीचें उत्पन्न हळूहळू वाढत जाऊन सांप्रत ४५,००० रुपयांवर झालें आहे. उत्पन्न कमी आहे म्हणून जी पूर्वीची तक्रार होती ती नाहींशी झाली; परंतु सन १८७५ सालीं मेहेरबान हॅमिक साहेब प्रेसिडेंट यांनीं १६ महिन्यांचा अनुभव पाहून मेहेरबान पोलिटिकल एजंट साहेब यांस असा रिपोर्ट केला कीं, कोल्हापूरसारख्या नेटिव्ह संस्थानच्या राजधानींत म्युनिसिपालिटीसारख्या व्यवस्थेस उत्तेजन देणें हें सयुक्त दिसत नसून शक्यहि नाहीं. त्यांनीं आणखी असें लिहिलें कीं, सरकारी कामदार नसणारे म्युनिसिपल कमिशनर लोक बहुधा या कामांत चित्त घालीत नाहींत आणि म्युनिसिपालिटीचें उत्पन्नाचा चांगला उपयोग करण्याचेंहि काम मॅनेजिंग कमिटीकडून चांगलें होत नाहीं, याकरितां त्यांनीं असें सुचविलें कीं, प्रेसिडेंट यांजकडे सर्व काम सोपवून मॅनेजिंग



कमिटीचें काम करण्याकरितां एका कामगाराची नेमणूक करावी असा प्रेसिडेंटचा रिपोर्ट आल्यावरून मॅनेजिंग कमिटी नाहींशी करण्यांत येऊन सर्व अधिकार प्रेसिडेंट यांस देण्यांत आले. त्यानंतर कांहीं दिवस म्युनिसिपालिटी हें नांव मात्र कायम राहिलें होतें. अशाप्रमाणें व्यवस्था चालली असतां सन १८८१ सालीं पुन्हां असें वाटलें कीं, म्युनिसिपालिटीची जनरल सभा असणें हें चांगलें आहे. याप्रमाणें केव्हां केव्हां या सभा भरत असत आणि तिमाहीचे हिशेब त्यांस वाचून दाखवीत. प्रेसिडेंट यांस योग्य वाटेल तितक्या कामांत मात्र म्युनिसिपालिटीची संमति देण्यांत येत असे. अलीकडे ४–५ वर्षांमध्यें म्युनिसिपल कमिटीच्या सभा विशेष नियमानें भरण्यांत येत आहेत आणि त्या सभेपुढें हिशेब वाचून प्रेसिडेंट व कामगार यांनीं तयार केलेलें वार्षिक बजेट याचा विचार होऊन पास होत असतें.

३. वरील हकीकतीवरून असें दिसून येईल कीं, म्युनिसिपालिटीचे व कमिशनर लोकांचे काय अधिकार आहेत तें स्पष्टपणें चांगलें समजत नाहींत. त्यांमध्यें नेहमीं फेरफार होतात. याखेरीज म्युनिसिपालिटीचे संबंधानें दुसऱ्या चमत्कारिक गोष्टी आहेत त्या कळविल्या पाहिजेत. रिजन्सि कौन्सिलचे ३ तीन मेंबर हे म्युनिसिपाल कमिशनर असोन त्यांजकडेसच कौन्सिलचे मेंबरच्या नात्यानें म्युनिसिपालिटीचें कामावर देखरेख करण्याचा व अपिलें ऐकण्याचा अधिकार आहे. चीफ रेव्हिन्यु ऑफिसर हे प्रेसिडेंट याजवरील वरिष्ठ अधिकारी समजले जातात, परंतु चीफ रेव्हिन्यु ऑफिसर हेहि म्युनिसिपल कमिशनर आहेत. चीफ रेव्हिन्यु ऑफिसर यांचा म्युनिसिपालिटीशीं काय संबंध आहे हें स्पष्टपणें कोठें दर्शविण्यांत आलें नाहीं. खालसा मुलुखांतील भागाचे कमिशनर यांचा अधिकार त्यांजकडेस आहे असें समजतात. मेहेरबान पोलिटिकल एजंटसाहेब यांनीं मेहेरबान क्याप्टन फेरिस प्रेसिडेंट यांस एका पत्रांत असें लिहिलें आहे कीं, तुम्ही आपले प्रेसिडेंटचा चार्ज ॲक्टिंग चीफ रेव्हिन्यु ऑफिसर यांजला द्यावा. याजवरून चीफ रेव्हिन्यु ऑफिसर हें नेहमीचें प्रेसिडेंट असावेत असा हेतू मेहेरबान पोलिटिकल एजंटसाहेब यांचे लिहिण्याचा दिसतो. सध्यां खरोखर म्हटलें म्हणजे ते प्रेसिडेंट यांचेवरील वरिष्ठ अधिकारी आहेत आणि म्युनिसिपाल कमिशनरहि आहेत, अशा निरनिराळ्या अधिकारांनीं काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा म्युनिसिपालिटीशीं किती व कोणता संबंध आहे हें स्पष्टपणें सांगणें सांगतां येत नाहीं.

४. प्रेसिडेंट यांचे अधिकार किती आहेत हेंहि सांगणें कठीण. सर्व म्युनिसिपालिटीचा अधिकार त्या एका ऑफिसरामध्यें आहे असें म्हटलें असतां चालेल, केव्हां केव्हां ते आपले स्वतःचे जबाबदारीवर काम करतात व केव्हां केव्हां म्युनिसिपाल कमिशनरचा विचार घेऊन करतात अशी व्यवस्था चालू आहे.

म्युनिसिपालिटीचे कामासंबंधीं कांहीं पोटनियमहि ठरण्यांत आले नाहींत. या नियमांचा एक खर्डा कांहीं दिवसांपूर्वीं तयार करण्यांत आला होता. परंतु तो खर्डा पसंत होण्याचे

बाबतींत पुढें कांहीं झालें नाहीं म्युनिसिपालिटीचें काम मे. पोलिटिकल एजंटसाहेब व कौन्सिल ऑफ रिजन्सी यांजकडून वेळोवेळीं आलेल्या हुकुमाप्रमाणें व पूर्वीच्या वहिवाटी-प्रमाणें चालतें.

५. निरनिराळ्या ऑफिसरांचे अधिकार किती आहेत व म्युन्सिपाल कमिशनरचे अधिकार किती आहेत हें स्पष्टपणें ठरविणें हें फार अवश्य दिसतें व त्याप्रमाणेंच म्युन्सिपा-लिटीची ही सुधारणा होणें अवश्य दिसतें. खालसा मुलुखांतील मोठमोठ्या शहरांचीं कामें लोकांकडेस सोपविण्यांत येत असोन कोल्हापूर शहरांत सरकारी कामदाराकडून तें काम होतें. खालसा मुलखांत जिल्ह्यांचीं जीं शहरें आहेत त्यांपेक्षां कोल्हापूर हें हुषारीमध्यें व सार्वजनिक कामांमध्यें उणें आहे असें मानण्यास कांहीं कारण नाहीं. त्या शहरांत जसा लोकांस हें काम शिकविण्याचा उद्योग चालू आहे तशी खटपट कोल्हापुरासहि सुरूं करावी असा सबकमेटीचा अभिप्राय आहे. तसा प्रयत्न कोल्हापुरास सिद्धीस जाणार नाहीं; असें मानण्यास कांहीं कारण नाहीं. म्युन्सिपालिटीसारखी व्यवस्था कोल्हापूरसारख्या शहरांत कायम जाहली म्हणजे पुढें महाराज सरकार यांचें हातांत सत्ता आल्यावर त्यांच्या अधिकारास कदाचित म्युन्सिपालिटी-पासून अडथळा उत्पन्न होईल असें मि. हॅमिक साहेब यांणीं दर्शविलें आहे. परंतु सबकमिटीचा अभिप्राय असा आहे कीं, महाराज सरकार वयांतींत येऊन जेव्हां अधिकार पाहूं लागतील तेव्हां त्यांचे विचार प्रबुद्ध व चांगले होतील; आणि म्युन्सिपालिटीसारख्या व्यवस्थेपासून काय फायदा आहे हेंहि त्यास समजेल; आणि एकंदरींत अशी व्यवस्था राज्यकारभाराला फार उत्तम आहे असें त्यास वाटण्याचा फार संभव आहे. कोल्हापूर शहरांतील लोक म्युन्सिपालिटीच्या कामामध्यें चांगलें चित्त घालीत नाहींत असेंविषयीं बऱ्याच खरमरीत शब्दांनीं मे. हॅमिकसाहेब व क्याप्टन फेरीस साहेब या उभयतांनीं आपलें मत कळविलें आहे, परंतु अलिकडेस ज्या ज्या शहरांत सुधारलेल्या म्युन्सिपाल पद्धतीची व्यवस्था सुरूं करण्यांत आली आहे त्या बहुतेक शहरांतील लोकांचे म्युन्सिपालिटीचें कामांत अशाच प्रकारचें दुर्लक्ष होतें असें दाखविण्याचा कोणी प्रयत्न केला असतां तर तसें दाखविण्यास कांहीं अडचण आली नसती; वास्तविक खरी गोष्ट म्हटली म्हणजे अशी आहे कीं; लोकांमध्यें दुर्लक्ष कांहींसें आहे हें खरें. परंतु अलिकडेस मोठ्या मोठ्या शहरांतील लोकांस आपल्या शहरचें काम पाहातां यावें म्हणून त्या प्रकारचें शिक्षण देणें हें सरकारचें कर्तव्यकर्म आहे असें सरकार समजतें आणि त्याप्रमाणें कोल्हापुरांसहि व्यवस्था असावी असा सबूकमेटीचा अभिप्राय आहे.

६. म्युन्सिपालटीकडून काम जसें लौकर व्हावें तसें होत नाहीं, कारण व्यवस्थापक मंडळीचे सभासद आपसामध्यें वादविवाद करण्यांत फार वेळ घालवितात अशाहि प्रकारचा दोष म्युन्सिपालटीकडे आणतात; परंतु ज्या गोष्टीमध्यें लोकांच्या इच्छा काय आहेत हे समजणें महत्त्वाचें आहे त्या गोष्टींत वादविवाद फार होऊन कामास केव्हां केव्हां अडथळा



जरी जाहला तरी तें मोठें नुकसानीचें काम आहे असें समजतां येत नाहीं. लोकांकडे व्यवस्था ठेविली म्हणजे असा प्रकार कांहीं अंशीं व्हावयाचाच आणि जोंपर्यंत लोकांस आपल्या कामाची चांगली संवय लागली नाहीं तोंपर्यंत असे प्रकार घडून येतील परंतु त्यांकडे विशेष लक्ष देणें उपयोगीं नाहीं.

७. सन १८७३ सालीं जेव्हां सरकारनीं ठराव करून म्युन्सिपालिटीची व्यवस्था सुधारली तेव्हां त्या ठरावांत असें स्पष्ट लिहिलें आहे कीं, ह्यापुढें शहरसंबंधीं कामें शहरच्या लोकांनीं पाहण्याची. संस्थानानें पाहण्याचीं नाहींत. ह्या म्हणण्याप्रमाणें पूर्ण व्यवस्था करण्यांत यावी. असा सबूकमेटीचा अभिप्राय आहे. खालसा मुलखांत लोक आपले वतीचे मेंबरांची निवड करून त्यांचे मार्फत म्युन्सिपालिटीचीं कामें चालतात. तसाच प्रकार कोल्हापूर शहरांतहि चालावा असें योग्य दिसतें. प्रथमतः अशी व्यवस्था सुरूं केली म्हणजे कांहीं हरकती उत्पन्न होतील. लोक कामांत जितकें चित्त घालावें तितकें एकाएकीं घालणार नाहींत व आपण लोकांचे वतीचें मेंबर आहोंत यासंबंधानें आपणांवर जोखीम आहे याचीहि बरोबर कल्पना त्यांस लौकर व्हावयाची नाहीं. परंतु नामदार पीलसाहेब यांणीं कायदे-कौन्सिलांत असें म्हणून दाखविलें आहे कीं, “ शहरांतील कमेटीच्या लोकांस काम शिकविणें यामध्यें बराच वेळ जातो व पैशाचा खर्च होतो परंतु ही मोठी गैरसोय आहे असें समजणें योग्य नाहीं. व लोकांमध्यें कांहीं प्रकारची सुधारणा झाल्यावर ही हरकत काढणें हें रास्त नाहीं, हें विचारी कामगारांच्या सहजीं लक्षांत येईल. शिकविण्याचें काम जरी कंटाळा आणणारें आहे तरी तें मनापासून व वेळ खर्चून करण्यास आपण मागेंपुढें पहाणें हें चांगलें नाहीं. ” नामदारसाहेबांच्या ह्या शब्दाकडे लक्ष देऊन कोल्हापूर संस्थाननें व्यवस्था केली असतां ज्याप्रमाणें दुसरे शहरांत त्या व्यवस्थेनें काम असें चांगलें चाललें आहे तसें कोल्हापूर शहरांतहि चालेल असा भरवसा आहे.

८. सांप्रत म्युन्सिपालिटीकडे हलक्या प्रतीचे ( म्हणजे प्राथमिक ) शिक्षण व पोलिसचा बंदोबस्त हीं कामें देऊं नयेत असा सब-कमेटीचा अभिप्राय आहे. तसें नवीन कर बसविण्याचा किंवा चालू असल्यांपैकीं एखादा कर कमी करण्याचा म्युन्सिपालिटीस अधिकार नसावा; तथापि म्युन्सिपालिटीनें वेळोवेळीं नवीन कर कोणते बसविण्यासारखे आहेत यासंबंधीं आपले विचार सरकारास कळवावें. म्युन्सिपाल कामासंबंधीं कोणत्याहि प्रकारचा नवीन कर म्युन्सिपाल कमिशनरांच्या संमतीशिवाय कोल्हापूर शहरांत बसला जाऊं नये.

९. म्युन्सिपालटीच्या व्यवस्थेमध्यें जे फेरफार व्हावयाचे ते सन १८८४ चा आक्ट नंबर २ व सन १८७३ चा आक्ट नंबर ६ यांस बहुधा अनुसरून असावें. या शहराच्या पूर्वापार आलेल्या चालीस जेथें बाध येईल तेथें मात्र सदरहू आक्टास सोडून नियम करण्यांत आल्यास हरकत नाहीं.

१०. म्युन्सिपालिटीचे व्यवस्थेमध्यें जे मुख्य फेरफार करण्याचे आहेत ते खालीं लिहिलेप्रमाणें:—

(१) कोल्हापुरच्या म्युन्सिपालिटीचे मेंबर ३० असतील. त्यांजवर प्रेसिडेंट. हा कोल्हापूर शहरांतून नेमला जाईल.

(२) शहरांतील लोक आपले वतीचे लोकांची निवड करतील अशा मेंबरांची संख्या १५ पेक्षां अधिक नसून १० पेक्षां कमी असावयाची नाहीं.

(३) बाकीचे मेंबर कोल्हापूर सरकारांतून नेमिले जातील रिजन्सि कौन्सिलांतील कोणताहि मेंबर म्युन्सिपल कमिशनर होऊं शकणार नाहीं.

(४) निवडलेल्या मेंबरांपैकीं कांहीं मेंबर सरदार, वकील व पेन्शनर आणि ग्रॅज्युयट यांजकडून निवडले जातील.

(५) बाकी निवडण्याचे, मेंबर जितके राहातील तितके शहराचे भाग करण्यांत येऊन प्रत्येक भागानें व सदरहू ४ कलमांत दर्शविलेल्या प्रत्येक भागांतील लोकांनीं दोन दोन मेंबरांची निवड करावी. त्या निवडलेल्या मेंबरांतून कोणताहि एक मेंबर कोल्हापूर सरकार पसंत करील. अमूक मेंबरांस पसंत केलें नाहीं याचें कारण कोल्हापूर सरकार देणार नाहीं.

(६) म्युनिसिपालिटीचें चाढ़ं काम मॅनेजिंग कमिटीच्या मार्फत करण्यांत येईल. ह्या मॅनेजिंग कमिटीची नेमणूक जनरल कमिटीनें करण्याची व चेअरमन कोणास नेमण्याचें कामीं शिफारस जनरल कमेटीनें करावी. कोल्हापूर सरकार वाटेल त्या गृहस्थाची त्या कामावर नेमणूक करील.

प्रेसिडेंट किंवा चेअरमन यांचे जागेवर कौन्सिल ऑफ रिजन्सी यांचे मेंबरांपैकीं कोणत्याहि मेंबराची नेमणूक करण्यांत येणार नाहीं.

(७) म्युनिसिपालिटीचे सर्व कामांची जबाबदारी प्रेसिडेंट यांजवर राहील व सर्व पत्रव्यवहार त्यांचें नांवानें चालेल. मॅनेजिंग कमेटीवर त्यांचा अधिकार राहील. परंतु सदरीं आक्टांत जो अधिकार त्यांस दिल्हा आहे त्यापेक्षां अधिक अधिकार त्यास मिळावयाचा नाहीं.

(८) खालसा मुलखांत भागाचे कमिशनर यांजकडेस म्युन्सिपालिटीचे संबंधानें विशेष अधिकार देखरेख करण्याचे व एखादा विशेष हुकूम देण्याचे आहेत ते अधिकार कौन्सिल ऑफ रीजन्सीपैकीं एका मेंबरास दिले जातील. या मेंबराचे हुकुमावर म्युन्सिपाल कमिशनरांस जेव्हां जेव्हां वाटेल तेव्हां तेव्हां कौन्सिलांत अपिल करण्यास अधिकार आहे आणि तो मेंबर जेव्हां म्युन्सिपाल कमिटीच्या ठरावावर विरुद्ध हुकूम देईल तेव्हां त्यांणीं लागलीच त्या बाबतींत रिजन्सि कौन्सिलकडे रिपोर्ट केला पाहिजे. रिजन्सि कौन्सिलांतून जो शेवटचा निकाल होईल तो कायमचा हुकूम समजण्याचा.



(९) कामाची व्यवस्था, पोटनियम आणि दुसऱ्या किरकोळ गोष्टी ह्या बहुतेक सदरीं लिहिल्या २ दोन अन्वयें ठरविल्या जातील.

(१०) म्युन्सिपालिटीमध्यें कांहीं फेरफार करण्याचा किंवा दुसऱ्या कोणत्याहि प्रकारची व्यवस्था करण्याचा कोल्हापूर सरकारास जेव्हां योग्य वाटेल तेव्हां अधिकार आहे.

हा अहवाल विचारांत घेऊन त्या वेळच्या रीजन्सी कौन्सीलनें इ. स. १८८९ सालीं 'कोल्हापूर म्युनिसिपल रूल्स' नांवाचे नियम केले. त्या नियमांप्रमाणें कोल्हापूर नगरपालिकेची घटना पुढें दिल्याप्रमाणें ठरली गेली:—

(१) कोल्हापूर नगरपलिकेच्या सभासदांत दोन वर्ग करण्यांत आले; हुद्याच्या नात्यानें काम करणारे व इतर.

(२) हुद्याच्या नात्यानें काम करणारे सभासद पुढें दिल्याप्रमाणें नऊ होते:—

(१) दरबारनें नेमलेला अध्यक्ष (२) प्रांत ऑफिसर (३) मामलेदार (४) शहर फौजदार (५) दप्तरदार (६) एक्झिक्युटिव्ह इंजिनियर (७) दरबार सर्जन (८) चीफ पोलिस ऑफिसर (९) डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर.

या नियमांखालीं वेळोवेळीं ज्या सद्गृहस्थांची नगराध्यक्ष या नात्यानें नेमणूक करण्यांत आली त्यांचीं नांवें पुढें दिलीं आहेत:—

| अ. नं. | अध्यक्षांचें नांव | मुदत |
|---|---|---|
| १. | रा. सा. गोविंद बापूजी देवल | १८८९–९२. |
| २. | रा. सा. के. जी. नातू | १८९२ (एप्रिल) ते १८९४ (जानेवारी). |
| ३. | रा. सा. गणेश पांडुरंग ठकार, दप्तरदार. | १८९४ (जानेवारी) ते १५ जानेवारी १८९६ |
| ४. | रा. सा. त्रिंबक मोरेश्वर मराठे | १८९६–१८९८ |
| ५. | रा. सा. दप्तरदार (हुद्याचे नात्यानें) | १८९८–१९०१ |
| ६. | रा. सा. नारायण शिवराम बापट, मुन्सफ, कोर्ट करवीर. | १९०१–१९०४ |

(३) इतर सर्व सभासदांची नेमणूक दरबारकडून केली जाईल व अशा सभासदांची संख्या हुद्याच्या नात्यानें काम करणाऱ्या सभासदांच्या संख्येच्या दुपटीपेक्षां कमी असूं नये असा नियम करण्यांत आला.

या नियमांन्वयें १८८९ ते १९०४ या कालांत कोल्हापूर नगरपालिकेंत जे बिनसरकारी सभासद नेमण्यांत आले त्यांचीं नांवें पुढें दिलीं आहेत:—

## १८८९–९२

(१) श्रीशंकराचार्य पंडितराव (२) प्रो. शिवराम बापूजी परांजपे (३) रा. रा. लक्ष्मण रामचंद्र गोळवलकर (४) रा. रा. विश्वनाथ कृष्णनाथ धुरंधर (५) रा. रा. यशवंत गंगाधर अभ्यंकर (६) रा. रा. बाळाजी प्रभाकर मोडक (७) रा. रा. मोरो पांडुरंग गद्रे (८) रा. रा. महादजी गणेश करमरकर (९) रा. रा. रघुनाथ जेठमल मारवाडी (१०) रा. रा. सुबराव काशिबा चव्हाण (११) रा. रा. चुडाप्पा आदाप्पा जिरगे (१२) रा. रा. अंताजी विष्णु ताम्हनकर (१३) रा. रा. सावंता बिन साताप्पा कोष्टी (१४) रा. रा. दादासाहेब काजी (१५) रा. रा. दत्तो सखाराम सोनटक्के, वकील (१६) रा. रा. रामचंद्र सखाराम मिरजकर (१७) रा. रा. विष्णु कृष्ण राशिंगकर, वकील (१८) रा. रा. फिदाहुसेन अल्लीभाई बोहरी.

## १८९२–१८९५

(१) रा. रा. सखाराम आत्माराम भुसारी (२) मे. आप्पासाहेब राजोपाध्ये (३) रा. रा. कृष्णाजी रामचंद्र आगाशे (४) रा. रा. कांताचार्य पंडितराव (५) रा. रा. महमद अल्ली बोहरी (६) रा. रा. रामचंद्र वामन मसूरकर (७) रा. रा. पांडोबा सखाराम मुळे (८) रा. रा. नारायणराव जोशीराव (९) रा. रा. वामन रघुनाथ म्हैसकर (१०) रा. रा. रामचंद्र रघुनाथ शिरगांवकर (११) रा. रा. गोविंद कृष्ण सोहनी (१२) रा. रा. रामचंद्र विश्वनाथ धुरंधर (१२) प्रो. रघुनाथ नारायण आपटे (१४) प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर (१५) रा. रा. गुंडो नारायण मुजुमदार (१६) रा. रा. त्रिंबक रामचंद्र लुकतुके (१७) रा. रा. गणेश बळवंत जोशी (१८) रा. रा. रामचंद्र नृसिंह विभुते.

## १८९५–१८९८

(१) रा. रा. पांडुरंग केशव ओव्हरसिअर (२) बळवंत मल्हार मुजुमदार (३) रा. रा. त्र्यंबक गंगाधर नातु, असिस्टंट मास्तर (४) रा. रा. बाळाजी हरी कुलकर्णी (५) रा. रा. नारायण विसाजी रानडे (६) रा. रा. लक्ष्मण रावजी दिगवडेकर (७) रा. रा. रावसाहेब कृष्णाजी भिकाजी गोखले (८) रा. रा. हरि शिवराम बापट (९) रा. रा. बळवंत मार्तंड कोडोलीकर (१०) रा. रा. गणेश विश्राम बायंगणकर (११) रा. रा. वामन रावजी देशपांडे, असिस्टंट मास्तर (१२) रा. रा. महमदशेट मुल्लाशेट मोमिन (१३) प्रो. निजाम उद्दीन (१४) रा. रा. चुडाप्पा आदाप्पा जिरगे (१५) रा. रा. केदार पंतोजी दुकानदार (१६) रा. रा. जेठमल मुरलीधर मारवाडी (१७) मे. मल्हारराव बापूसाहेब गाईकवाड (१८) रा. रा. बाळासाहेब जाधव.

## १८९८–१९०१

(१) रा. रा. नारायण विसाजी रानडे, वकील (२) रा. रा. नारायण सदाशिव दिवाण (३) रा. रा. हरि भिकाजी करमरकर (४) रा. रा. रावजी रघुनाथ शिरगांवकर (५) रा. रा. दत्तो दामोदर सोनटक्के, वकील (६) रा. रा. खंडेराव गोपाळ बागल (७) रा. रा. हरि शिवराम बापट (८) रा. रा. रावसाहेब रामचंद्र मोरेश्वर बापट (९) रा. रा. सखाराम बाजी कुलकर्णी (१०) रा. रा. बी. आय्. खतीब (११) रा. रा. दत्तो शिवराम घाटगे (१२) रा. रा. आत्माराम शास्त्री पित्रे (१३) रा. रा. दत्ताजीराव इंगळे (१४) रा. रा. दत्तात्रय नीलकंठ सबनीस (१५) रा. रा. नरहरराव जाधव (१६) रा. रा. बहिरामजी रुस्तुमजी (१७) रा. रा. नारायण केशव दातार (१८) रा. रा. बळवंतराव वैद्य.



## १९०१–१९०४

(१) प्रो. बाळाजी प्रभाकर मोडक (२) प्रो. कृष्णाजी नारायण पाटणकर (३) प्रो. बळवंत नाना चिवटे (४) रा. रा. माधवराव देवल (५) रा. रा. महादेव गणेश डोंगरे (६) रा. रा. विष्णु कृष्ण राशिंगकर, वकील (७) रा. रा. रामचंद्र नारायण गोखले (८) रा. रा. रामचंद्र मोरेश्वर आपटे (९) रा. रा. दत्तो सखाराम सोनटक्के (१०) रा. रा. सखाराम बाजी कुलकर्णी (११) रा. रा. रामकृष्ण बाबूराव मिरजकर (१२) रा. रा. बाळासाहेब जाधव हवालदार (१३) रा. रा. नारायण सदाशिव बापट (१४) रा. रा. बाळासाहेब बापट (१५) रा. रा. आत्माराम गोपाळ परांडेकर (१६) रा. रा. पांडुरंग केशव (१७) रा. रा. सर्जेराव पोतनीस (१८) रा. रा. हसन वल्लद रहिमान.

[ ४ ] त्याचप्रमाणें नगरपालिकेच्या कामकाजासंबंधीं बरेचसे नियम करण्यांत आले; व उरलेल्या बाबतींत दरबारच्या मंजुरीनें पोट कायदे करण्याचा नगरपालिकेस अधिकार देण्यांत आला. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आधुनिक पद्धतीनें नगरपालिकेच्या कार्यास येथूनच सुरवात झाली असें म्हणतां येईल.

या वेळेची नगरपालिकेची घटना लोकशाहीच्या तत्वाप्रमाणें पहातां बरीच असमाधानकारक होती, हें वरील विवेचनावरून दिसून येईल. नगरपालिकेंत असलेल्या २७ सभासदांमध्यें एकहि सभासद लोकांकडून निवडला जात नसे. सभासदांना अध्यक्ष निवडण्याचा अधिकार नव्हता. नगरपालिकेचे अधिकारहि हल्लींप्रमाणें विशाल झाले नव्हते. या पूर्वीची नगरपालिका व आतांची नगरपालिका यांमध्यें फक्त एकच फरक झाला व तो म्हणजे असिस्टंट पोलिटिकल एजंट वगैरे मोठ्या अधिकाऱ्यांना नगरपालिकेंत स्थान दिलें गेलें नाहीं हा होय.

नगरपालिकेच्या कामासंबंधीं विस्तृत नियम १८८९ सालीं केले गेले हें वर सांगितलेंच आहे. या कायद्यान्वयें जरूर असलेले सर्व पोटकायदे तयार करून दरबार मंजुरीनें १८९२ सालीं प्रसिद्ध करण्यांत आले व या नव्या जमान्याप्रमाणें लवकरच राज्यकारभार सुरूं झाला.

१८८९ ते १९०४ या पंधरा वर्षांच्या काळांत नगरपालिकेचा खर्च कसा होता हें पुढें दिलेल्या तक्त्यावरून दिसून येईल:—

## खर्च (१८८९–१९००)

| साल | नोकरवर्ग | दिवाबत्ती | पाणी पुरवठा | सफाई खातें | फायर इंजिन्स | दुरुस्ती | सार्वजनिक कामें | हक्कदारांना दिलेल्या रक्कमा | देवी टोंचणें | लष्करांतील सफाई खातें | कोल्हापूर शहर पाहणी | डेट्स व डिपॉझिट्स | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८८९–९० | ५२५१ | २०९३ | ६० | २११७५ | ५५८ | ६६९३ | ७९५२ | ८७ | ३७३ | १०१४ | १०६ | १५६४ | ६४८ | ४७५७३ |
| १८९०–९१ | ५१११ | २२५२ | ६० | २३३८१ | ३९७ | ९५३४ | ७०८० | ... | ३११ | ... | १० | २२८८६ | २६८७ | ७२४१८ |
| १८९१–९२ | ४९२९ | १६३७ | १०० | २२३८१ | ६९६ | ६०५६ | १२०१० | ... | ३७८ | ... | ३०१ | २१८८१ | ३०३२ | ७३४०१ |
| १८९२–९३ | ५३६० | २२५६ | १२२ | २११५४ | ९३३ | ६८२६ | १२२१५ | ... | २७९ | ... | १८० | १५१२ | ५८९४ | ५६७३० |
| १८९३–९४ | ५०६२ | २५१० | १२० | २०९१५ | ९४६ | ६६४० | १९०२२ | ... | ३७४ | ... | ४०४ | २३३० | २१०२६ | ६०४२७ |
| १८९४–९५ | ५२६१ | २३२४ | १२० | २१४६१ | ५३० | ५६४६ | ८१३४ | ... | ८१७ | ... | २२५ | ३४२३ | ३२९६ | ५०७३९ |
| १८९५–९६ | ६०६० | ३०७४ | ११९ | २४३०५ | ३०९ | ७८२० | ३५८५ | ... | ५२९ | ... | १९५ | ३१६३ | १८७८ | ५१०३६ |
| १८९६–९७ | ७१६७ | ३१७४ | १२० | २४६१३ | २६९ | १०८९९ | ८३९६ | ... | ५२९ | ... | १८० | ३७४९ | ४२९१ | ६४११७ |
| १८९७–९८ | ८९०६ | ३२८९ | १२० | २५५९९ | १८५६ | १०२६६ | २००५६ | ... | ४९२ | ... | १८० | ४२१६ | १८२२२ | ९३२०२ |
| १८९८–९९ | ५९०७ | ४१३८ | १२० | २५१८२ | १०५४ | ११८५९ | ११५३९ | ... | ४५९ | ... | १८० | ५२१८ | १२३८६ | ७८०४२ |
| १८९९–१९०० | ६७६९ | २०९४ | ११५ | २४९४० | ७७८ | ५५११ | ११०१ | ... | २१५ | ... | १८० | ५०८३ | ७८६२ | ५४६४८ |

याच कालांत नगरपालिकेचे उत्पन्न किती होतें याचा तपशील पुढें दिला आहे:—

**जमा ( १८८९ ते १९०० )**

| साल | दस्तुरी | जकात | घरपट्टी | बाजार भाडें | डेट्स व डिपॉझिट्स | लष्करांतील सफाई खातें | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८८९–९० | १०७७५ | ६९७१ | १७४१७ | ६३३१ | ४०२१ | ४३१ | ६२०८ | ५१८८४ |
| १८९०–९१ | १००२५ | ७६७७ | १७३१६ | ६७४४ | १९०१ | १८३७ | ७३४१ | ५२८४१ |
| १८९१–९२ | ११८९२ | ७८६६ | १७२०९ | ७५४० | २०७३० | ... | ७७७१ | ७३००७ |
| १८९२–९३ | १११२३ | ७२३३ | १७३७३ | ७६०५ | २१८२८ | ... | ९२९० | ७४४५२ |
| १८९३–९४ | ११५२७ | ६९४३ | १८०६४ | ९९२८ | २१८८ | ... | १००७६ | ५८०२६ |
| १८९४–९५ | ११३५० | ५८३१ | १९०४१ | ९५०५ | ३५७५ | ... | ७१९५ | ५६४९६ |
| १८९५–९६ | ११७९५ | ५९५७ | १८८४७ | १०३२५ | ४०१३ | ... | १२११६ | ६४०९९ |
| १८९६–९७ | ११५९० | ६७३८ | २०४०३ | ९३९८ | ३८५४ | ... | ८४७२ | ५९५०३ |
| १८९७–९८ | ११५०० | ५३८९ | १९३४२ | ९३८५ | ५४१६ | ... | १८५१७ | ७३१५२ |
| १८९८–९९ | १२९९५ | ६२६४ | २१०६८ | ९७०१ | ४५५७ | ... | १८५१७ | ७११०२ |
| ९९–१९०० | ६७९८ | ३५५७ | १०६३२ | ८२०६ | ५६५४ | ... | ९३०४ | ४४१५१ |



इ. स. १९०० ते १९०४ या कालांत नगरपालिकेचे उत्पन्न व खर्च किती होता याची माहिती खालीं दिली आहे:—

| साल | उत्पन्न | खर्च | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | दिवाबत्ती व सफाई | नोकरवर्ग | सार्वजनिक कामें | इतर | एकूण |
| १९००–०१ | ६९२१० | २९४१९ | ९३६२ | ११३७९ | ९१०० | ५९२६० |
| १९०१–०२ | ६०१९७ | ४६८१ | ६४८६ | १२०२ | ४५३९८ | ५७७५७ |
| १९०२–०३ | ५२२४३ | २५८३९ | ५५०१ | २४३५ | १७३२७ | ५११०२ |
| १९०३–०४ | ६२५७९ | ३६५७४ | ५८६० | ६३९३ | ७२४९ | ५६०७६ |

वरील तक्त्यावरून एक दोन गोष्टी प्रामुख्यानें नजरेला येतील. पहिली गोष्ट म्हणजे १८७२ ते १८८९ च्या कालांत ज्या धडाडीनें कार्य केलें गेलें ती धडाडी या कालांत दिसत नाहीं. उदाहरणार्थ, १८७२ सालीं नगरपालिकेचें उत्पन्न जेमतेम रु. १२,००० होतें; तेंच १८८९ सालीं जवळ जवळ रु. ५०,००० झालें. पण पुढल्या १५ वर्षांत फक्त १०–१२ हजारांचीच वाढ झाली ! दुसरी गोष्ट म्हणजे या कालांत शहरसुधारणेसंबंधीं विशेष महत्त्वाच्या योजना हातीं घेतल्या गेल्या नाहींत. या कालांतील संस्मरणीय कार्य म्हणजे एकच कपिलतीर्थ मुजविणें; आणि त्याबद्दलच येथें कांहीं माहिती मी सांगणार आहें.

कोल्हापूर हें एक तलावांचें गांव आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यावेळीं कोल्हापुरांत पुढें दिल्याप्रमाणें तळीं होतीं:—

१. रंकाळें, २. पद्माळें, ३. सिदाळें, ४. पेटाळें, ५. वरुणतीर्थ, ६. साकोली, ७. कुंभार तलाव, ८. कपिलतीर्थ, ९. खंबाळें, १०. महार तलाव, ११. रावणेश्वर.

यांपैकीं रंकाळें व पद्माळें हीं तळीं मुजविण्याचा प्रश्न नव्हता; कारण तीं गांवाबाहेर होतीं व त्यांचा बागायत जमिनींना उपयोग होत असे. पण बाकीचीं सर्व तळीं केव्हां ना केव्हां तरी मुजविणेंच भाग होतें व या शहरसुधारणेच्या महत्त्वाच्या अंगाला कपिलतीर्थ मुजविण्यापासूनच सुरवात झाली असें म्हणतां येईल.

कपिलतीर्थ हा तलाव शहराच्या अगदीं मध्यभागीं असून त्यामध्यें शेजारच्या घरांतील मोऱ्यांचें व संडासांचें पाणी झिरपून मिळत असल्यामुळें फार गलिच्छ झाला होता. पुष्कळजण या तलावाचें

पाणी पीत असत व त्यामुळें हा तलाव म्हणजे सार्वजनिक आरोग्यावरील एक मोठी आपत्ती होती, असेंच म्हणावें लागेल.

हा तलाव वरील सर्व कारणांसाठीं मुजवावा अशी सूचना डॉ. ह्यूलेट यांनीं इ. स. १८७६ मध्यें केली होती, हें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. त्यानंतर अदमासें एक तपभर हें कार्य तसेंच पडून राहिलें व इ. स. १८८९ सालीं नगरपालिकेंत तें तळें मुजवून टाकण्याचा ठराव प्रथम आला. पण त्याला फार खर्च येईल म्हणून त्यावेळीं खर्चाच्या भीतीनें तो ठराव मागें पडला. पुन्हां १८९५ सालीं "कपिलतीर्थ हें शहराच्या मध्यभागीं असून त्याचें पाणी घाण झालें आहे व तें तीर्थ लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीनें मुजविणें योग्य आहे" असा ठराव पास झाला आणि तें तीर्थ मुजविण्याची नगरपालिकेनें तजवीज करावी असें ठरलें. तीर्थ मुजविणेचा खर्च सुमारें रु. १६१९९–१२–६ येईल व नजीकचा रस्ता करणेंबद्दल रु. ६००० लागतील असा नगरपालिकेनें अंदाज केला होता. अशा रीतीनें ता. २४–२–१८९५ च्या सभेंत कपिलतीर्थ हें तळें मुजविण्याचा ठराव मान्य झाला.

तळें मुजविण्याचा ठराव पास झाल्यानंतर त्याला लोकांकडून विरोध होणार ही गोष्ट उघड होती. कारण शहरसुधारणेची कोणतीहि गोष्ट करीत असतां पुराणमताभिमानी लोकांकडून तीव्र विरोध होतो, हा अनुभव कोल्हापूर नगरपालिकेला कांहीं नवीन नव्हता. कपिलतीर्थ मुजविण्याला नगरपालिकेनें सुरवात करितांच त्याला मनाई करावी अशा आशयाचा शहरांतील समस्त ब्रह्मवृंदांनीं श्रीमन्महाराज यांच्याकडे अर्ज केला. त्यांत त्यांनीं कपिलतीर्थ हें मोठें महत्त्वाचें तीर्थ असून करवीर महात्म्यांत त्याचें वर्णन केलें आहे. कपिलाषष्ठीला २५००० लोक तेथें स्नानास जातात; हें तीर्थ मुजविल्यामुळें हिंदूलोकांचें मनास मोठा धक्का बसणार आहे; आपलीं घरें रस्त्यांवर यावीं व आपणांला गाड्यांतून फिरतां यावें म्हणून सभासदांनीं हा खटाटोप चालविला आहे वगैरे विधानें करून तें मुजवूं नये अशी विनंति केली होती.

पण या अर्जापेक्षां वे. शा. सं. वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांनीं श्रीमन्महाराज सरकार यांच्याकडे ता. १६।१।९५ रोजीं जें एक पत्र पाठविलें होतें तें मनोरंजक आहे. त्या पत्रांत तें तळें कां मुजवूं नये याविषयीं मोठा मजेदार युक्तिवाद केला होता. त्या पत्रावरून तत्कालीन धर्माभिमानी लोकांची मनोवृत्ति कशा प्रकारची होती याची पूर्ण कल्पना येईल. म्हणून तें पत्र पुढें समग्र उद्धृत करीत आहे:—

श्री करवीर

ता. १६ । १ । ९५

श्री प्रभू शाहू महाराज छत्रपती करवीर सरकार—

श्रीमन्महाराज यांणीं धर्मशील ब्राह्मणांचें सर्व प्रकारें संरक्षण करावें हेंच राजदेहाचें व राज्याचें मुख्य हितसाधन आहे. विनंतीकडे सदय लक्ष असावें.



हें क्षेत्र श्री काशीहून यवाधिक असें करवीर महात्म्यांत आहे असें जाणून आजवर धर्मपरायण महाराज यांणीं देव, तीर्थें व ब्राह्मण यांचें धर्मसंरक्षण केलें. अलीकडे थोडे कालांत धर्माविरुद्ध वर्तन करणारे लोकांनीं इंद्रकुंड व कपिलतीर्थ मुजविणेंविशीं यत्न करून इंद्रकुंड मुजविलें. कपिलतीर्थाबद्दल वरचेवर अर्ज चालले आहेत. तथापि आमचें सांगणें सफल होणेंचा पूर्ण अधिकार श्रीमन्महाराज यांस आहे. या दोन तीर्थांबद्दल दुराग्रह करणारे लोकांपैकीं पुढारी गणपतराव व चाफेकर गेलें तरी त्यांनीं केलेले स्थिर राहूं नये. कर्ता येविशी पूर्वीं चाललें काम समक्ष पाहणें होवूनहि तीं तीर्थें पूर्वींप्रमाणें ठेवणें फार श्रेयस्कर होईल. श्रीमान् बाबासाहेब महाराज यांणीं करवीर महात्म श्रवण करून हें कपिलतीर्थ दुरुस्त ठेवणेंकरितां बराच खर्च करून गाळ काढला व शिपाई ठेऊन दुरुस्त ठेवणेचे हुकूमहि दिलें त्याप्रमाणें हल्लींहि हुकूम होऊन दुरुस्ती व्हावी. अशी विनंति आहे. अवलोकन होऊन ब्राह्मण धर्मसंरक्षणाचें श्रेयस्करत्व लक्षांत घेऊन आज्ञा होईल हा आशीर्वाद.

शुभचिंतक
वासुदेवशास्त्री धर्माधिकारी
श्रीक्षेत्र करवीर

अशा रीतीनें त्यावेळच्या धर्माभिमानी लोकांनीं कितीहि विरोध केला तरी कपिलतीर्थ मुजविणें हें लोकहिताच्या व आरोग्याच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक होतें. म्हणून तें तळें मुजविण्याचें कार्य नगरपालिकेनें हातीं घेतलें व विरोधास न जुमानतां पार पाडलें, ही फार स्पृहणीय गोष्ट आहे.

त्यानंतर १८९८ ते १९०४ या प्लेगच्या कालांत नगरपालिकेनें केलेल्या कार्याचा अवश्य उल्लेख केला पाहिजे. सन १८९८ चा प्लेग हा फार भयंकर असून त्याची झळ महाराष्ट्रांतील सर्व शहरांना लागली. या ५–६ वर्षांत प्लेगच्या साथीमुळें हजारों लोक मृत्युमुखीं पडले व लोकांची फार दैना उडाली. कोल्हापूर शहरांतहि १८९८ सालीं प्लेगला सुरवात झाली म्हणून ३ आक्टोबर १८९८ रोजीं नगरपालिकेनें "गांवांत प्लेग असल्यामुळें परगांवांतून जे लोक येथें येतात त्याबद्दल बंदोबस्त केला पाहिजे. यासाठीं शहराचे वार्ड्स पाडावे व बाहेरून लोक येतात त्याला आळा घालण्यासाठीं लोकांनीं मदत करावी." असा ठराव केला. तसेंच घरांत कोण नवा मनुष्य येतो त्याची सकाळीं, संध्याकाळीं व रात्रीं तपासणी व्हावी व बिगरदाखल्याच्या माणसाला ऑब्झर्व्हेशन कँपमध्यें ठेवावें. या कामीं सभ्य लोक व सरकारी अधिकारी यांची मदत मिळावी अशी नगरपालिकेनें याचना केली. या प्लेगच्या काळांत नगरपालिकेनें प्लेगप्रतिबंधक उपाय योजण्याचें पुष्कळ कार्य केलें. १९०० सालीं प्लेग खात्यास रु. २००० जादा मंजूर केले. तसेंच लोकांना गांवाबाहेर छपरें बांधण्यासाठींहि मदत केली. १९०२ सालीं नगरपालिकेनें प्लेगप्रतिबंधक उपायासंबंधीं एकंदर रु. ५००० मंजूर केलें आणि लोकांना औषधोपचार करण्यासाठीं डॉक्टर्स व नर्सिस यांच्या नेमणुका केल्या. शहरांतील साप्ताहिक मृत्यूंची काळजीपूर्वक नोंद करण्याकरितां व त्यांच्या मृत्यूच्या कारणांविषयीं बारकाईनें चौकशी करण्याकरितां शहराचे चार वॉर्ड्स पाडून प्रत्येक वॉर्डांत एक इन्स्पेक्टर

व चार शिपाई यांची नेमणूक केली. लोकांकडून या कामींहि जुन्या समजुतीमुळें विरोध झाला. प्लेगमध्यें इंग्रजी औषधांचा उपयोग करणें हेंहि कित्येकांना अप्रशस्त वाटलें. तथापि नगरपालिकेनें १८९८ ते १९०४ या काळांत प्लेगप्रतिबंधक उपाय योजण्याचें, रोग्यांना इस्पितळांत औषधोपचार करण्याचें व प्लेग हटविण्याचें प्रशंसनीय कार्य केलें यांत शंका नाहीं.

या काळांत नगरपालिकेनें लहानसहान कां होईना पण अनेक उपयुक्त कार्यें केलीं व त्यांचा उल्लेख येथें करणें अवश्य आहे. यावेळीं नगरपालिकेनें रस्ते रुंद करण्याकडे व दिव्यांची वाढ करण्याकडे लक्ष पुरविलें; गंगावेश येथील खंदकांत नवीन गटारें बांधलीं; कांहीं नवे रस्ते तयार केले; शहरांत सार्वजनिक तारदखाने बांधले व घरांवर नंबर घातले.

तथापि १८८९ ते १९०४ या सालांत कोल्हापूर नगरपालिकेंत अव्यवस्था, गोंधळ व अप्रामाणिकपणा यांचीहि बरीच वाढ झाली होती, असें दिसून येतें. नगरपालिकेचा कारभार कांहीं विशिष्ट व्यक्तींच्या हातांत गेल्यामुळें तींत कंपूशाही माजली व पैशाच्या बाबतींत अफरातफर होऊं लागली. अशाप्रकारचा गोंधळ चालला असल्यामुळें १८९३ सालीं सरसुभे यांनीं नगरपालिकेच्या अध्यक्षाकडे नगरपालिकेच्या बाबतींत आपला अभिप्राय कळविला. त्यानंतर नगरपालिकेनें चौघांची एक समिति नेमिली व सरसुभे यांच्या मताविषयीं आपलें मत कळविलें. सरसुभे व नगरपालिकेची समिति यांच्या अहवालावरून त्यावेळीं नगरपालिकेच्या कारभारांत कसा गोंधळ माजला होता याची कल्पना येते. म्हणूच त्यांचा सारांश पुढें देत आहे:—

ऑडिट जावक नं. ५०

### रा. रा. प्रेसिडेंट म्यु. क. कोल्हापूर यांसी—
### सरसुभे इलाखा करवीर यांजकडून

(१) दप्तराची तपासणी करतां त्यांत घरपट्टी, खुल्या जागेचें भाडें, भंगीपट्टी वगैरे वसुलाची तजवीज नीटप्रकारें चाललेली आहे असें दिसून येत नाहीं. मागील वर्षाची बाकी ओढत येऊन सुटीनें जमाखर्च केला असें नजरेस आलें. याप्रमाणें नगदीचें काम फार अव्यवस्थितपणें चाललें असल्याचें नजरेस येतें.

(२) जमाबंदीचें काम पाहतां दाखलेबुक मुळींच ठेवलेलें नाहीं. आढाव्याचें काम पुरें झालेलें नाहीं. याप्रमाणें जमाबंदीसंबंधानें अगदीं गैरव्यवस्था असल्याचें नजरेस आलें.

(३) रेकॉर्डसंबंधानें पाहतां दोनतीन सालचे फेरिस्त अद्यापि लागलेले नसून ज्या कामाची पूर्तता व्हावयाची अशींहि कामें निकालांत ठेवलेलीं आहेत. अशाप्रकारें कामगार यांनीं खुद्द आपले अधिकारांत गैरशिस्तरीतीनें बरींच कामें निकालांत ठेविलीं आहेत. याप्रमाणें रेकॉर्डाचीहि गैरव्यवस्था आहे.

(४) जबाबी दप्तर, मॅनेजिंग कमिटीचें प्रोसिडिंग बुक वगैरे संबंधाची वहिवाट कशी ठेविली तें पाहतां त्यांतहि गैरव्यवस्था आहे असें दिसून आलें.



(५) जनरल कमिटीचें प्रोसिडिंग बुक पहातां कामासंबंधीं हकीकत कमिशनर लोकांस कामगार यांनीं मनास वाटेल तशी समजावून देऊन ठराव झालेले आहेत असें नजरेस आलें आहे.

(६) खर्चाच्या बाबतींत नीट व्यवस्था नाहीं. शहरसफाईकडे लक्ष पुरविलेलें दिसत नाहीं. कमिटीच्या पैशाचा खर्च मनमानेल त्याप्रमाणें अव्यवस्थितरीतीनें कमिटीच्या फायद्याविरुद्ध झालेला आहे.

(७) कमिटीचें काम सार्वजनिक संस्था सबब सर्वांनीं झटून व उडी घालून करणेंचें असतां त्याविषयीं लोक शिथिल दिसतात. कमिटीचें चाललेलें काम हलगर्जीपणानें व मनमानेल तसें चाललेलें दिसतें.

(८) स्पेशल जनरल कमिटी भरून ज्या गैरशिस्त कामाबद्दल विचार व्हावा म्हणून सदरीं नमूद केलें आहे तीं कामें खालीं लिहिल्याप्रमाणें आहेतः—

(१) चुन्याचा दर २० रु. प्रमाणें असतां २२ रु. दरानें माजी मक्तेदाराकडून घेतल्यामुळें कमिटीचें नुकसान झालें आहे.

(२) कंदील आणविण्याच्या बाबतींत अशीच फसवाफसवी केली आहे. कामगार यांनीं चेअरमन यांजवर विश्वासाची भुरळ घालून त्यांस फसविलें. हवातसा ठराव लिहून युक्तिप्रयुक्तीनें चेअरमन यांची सही घेत असावेत.

(३) भुजंगा बिन आप्पा जाधव सरनाईक यांचे जागेबद्दल सिटी सर्व्हेच्या नकाशांत बिगरहुकूम गैरशिस्तीनें दुरुस्ती केलें प्रकरणीं सिटी सर्व्हेंत मालकाची जागा असतां सरकारी ठरली आहे. अशीं पुष्कळ उदाहरणें झालीं आहेत.

(४) सिव्हिलस्टेशनचे संबंधानें कमिटीकडे आलेली रक्कम कांहीं अमानत जमा असून कांहीं रक्कम कामगार यांनीं अधिकारांत खास जमा केली आहे.

(५) कबुलायती अपुऱ्या ५६ दाखल आहेत. त्या पुऱ्या झालेल्या नाहींत. त्यांमुळें कुणांकडे किती येणेंचा आहे हें समजण्यास मार्ग नाहीं.

(६) अंबू पानारीण हिच्या जागेसंबंधीं फसवाफसवी झाली आहे.

(७) ससे यांच्या घराचें प्रकरण बुरूडगल्लींतील रस्ता रुंद केला त्यांत ससे यांचें घर घेतलें. मालकी दोन अर्जदारांची आहे कीं नाहीं याचा मुळींच विचार केला नाहीं.

(८) नगारखान्यापासून शनिवार पुलापर्यंत काळी खडी घालून रस्ता तयार करण्याचें काम कमिटीची मंजुरी घेतल्याशिवाय सुरूं केलें.

(९) रामा बिन लिंबारी फिरगे यास कमिटीकडील गटाराचे दगडांबद्दल मक्ता दिला. त्याकामीं कराराच्या बाहेर जास्त पैसे दिल्याबद्दल मक्तेदाराची कबुली आहे.

(१०) कमिटी कामगार यांनीं तांगा बाळगला असून ते फक्त ८४ आणे हशील भरतात तांग्याचें हशील ८८ आणे आहे. यामुळें कमिटीचें १०२ रुपये नुकसान झालें.

(११) कमिटीकडील नोकर लोकांस देण्याकरितां खरेदी झालेल्या घोंगड्यांपैकीं ३ गहाळ झालीं. यामुळें घोंगड्याची व्यवस्था नीट झालेली नाहीं.

(१२) बकरीच्या कराबद्दल रु. १८२–११–१० नुकसान पतकरून पूर्वीचें मक्तेदारास अधिकारनात्यानें मक्ता दिला आहे.

(१३) बायलॉजमध्यें कायम व हंगामी मिळून जास्त नोकर ठेवले आहेत.

(१४) कामगार यांचें वर्तन कमिटीच्या लोकांशीं व कमिशनर वगैरे लोकांबरोबर चांगलें नसतें.

(१५) तारदखान्याच्या कराबद्दलच्या जमाखर्चांत अव्यवस्था आहे.

(१६) कंदिलाच्या तेलखर्चांतहि अंदाधुंदी आहे. तेलाच्या लिलावासंबंधानें अव्यवस्था आढळते.

(१७) हेल्थ इन्स्पेक्टर डिसोझा यांजवर लाच खाल्ल्याबद्दल फिर्याद आहे. कामगाराचें वर्तनहि संशयास्पद वाटतें.

या गोष्टींचा विचार करणेंपूर्वी मि. चाफेकर कामगार, डिसोझा व पूर्वीचा स्टोअरकीपर सासने यांच्या वर्तनाबद्दल शंका वाटते.

| **विनायक रवळनाथ** | **नागेश पांडुरंग भिडे** | **आर. के. वैद्य.** |
| --- | --- | --- |
| अॅ. सरसुभे | चिटणीस | सरसुभे |

१८९३ सालच्या वरील ऑडिटवरून त्यावेळीं कोल्हापूर नगरपालिकेंत कशी अंदाधुंदी व अव्यवस्था होती याची कल्पना येईल. याविषयीं दरबारनें चौकशी समिति नेमली. पण नगरपालिकेकडून वेळेवर उत्तरें येईनाशीं झालीं व नगरपालिकेंतील गोंधळ तसाच चालू राहिला. म्हणून पुढें १८९९ सालीं दुसरें ऑडिट काढण्यांत आलें. पण त्याचाहि फारसा उपयोग झाला नाहीं. म्हणून १९०४ सालीं नगरपालिकेच्या सभासदांची मुदत संपली असतां नवे सभासद नेमणेंचे रहित केलें व नगरपालिकेचे सर्व अधिकार श्री. बी. व्ही. जाधव यांना देण्यांत आले. त्यांनीं केलेल्या कार्याचा आढावा पुढील प्रकरणांत घेऊं.


# प्रकरण ६ वें

# सर्वाधिकाऱ्यांचा काल

( १९०४–१९२० )

मागील प्रकरणांत इ. स. १८८९ ते १९०४ या कालांत कोल्हापूर नगरपालिकेची कशा प्रकारची स्थिति होती, याचें सविस्तर विवेचन केलें. नगरपालिकेंत फार अव्यवस्था माजल्यामुळें, नगरपालिकेच्या स्थितींत सुधारणा व्हावी व तिचा कारभार अधिक लोकोपयोगी व्हावा या सद्हेतूनेंच दरबारनें श्री. भास्करराव जाधव यांना सर्वाधिकारी नेमले होते हें उघड आहे. १९०४ सालापासून तों १९१८ पर्यंत श्री. भास्करराव जाधव हे सर्वाधिकारी होते. पुढें १९१९ सालीं मे. बाळासाहेब गायकवाड व १९२० सालीं प्रो. कुंजीलाल दिलवाली हे सर्वाधिकारी झाले. म्हणून १९०४ ते १९२० या सोळा वर्षांच्या कालाला 'सर्वाधिकाऱ्यांचा काल' असें म्हणतां येईल. प्रस्तुत प्रकरणांत या कालांत नगरपालिकेची स्थिति कशी होती याचें विवेचन करावयाचें आहे.

**कोल्हापूर नगरीचे ख्यातनाम सेवक**



**श्री. भास्करराव विठोजीराव जाधव**

कोल्हापूर नगरपालिका बरखास्त करून तिचा सर्व कारभार श्री. भास्करराव जाधव यांजकडे देण्यांत आल्यानंतर, याबद्दल खळबळ उडणें अपरिहार्य होतें. त्यावेळीं नगरपालिकेंत ब्राह्मणसमाजाचें प्राधान्य होतें. कारण त्या वेळीं ब्राह्मण हेच बव्हंशीं सुशिक्षित असल्यामुळें, नगरपालिकेसारख्या सार्वजनिक कार्यांत त्यांचेंच प्राबल्य असल्यास त्यांत नवल नाहीं. यामुळें नगरपालिका बरखास्त करून तिचा अधिकार एका मराठा जातींतील पदवीधराकडे दिला, ही गोष्ट तत्कालीन ब्राह्मण समाजाला अपमानास्पद वाटली व केवळ जातीच्या अभिमानामुळें प्रेरित होऊन त्यांनीं या घटनेविरुद्ध खळबळ उडविण्याला प्रारंभ केला. त्यांनीं अनेक सभा भरविल्या व दरबारकडे अर्ज व शिष्टमंडळें पाठविलीं. पण हा जातीय अभिमानानें प्रेरित होऊन झालेला विरोध फार काळ टिकणें शक्य नव्हतें. श्री. भास्करराव जाधव यांनीं अविश्रांत परिश्रमानें व असामान्य कर्तव्यतत्परतेनें नगरपालिकेंत इतकें स्पृहणीय स्थित्यंतर घडवून आणलें कीं, त्यांच्या नेमणुकीविरुद्ध पुढें कुणालाही आक्षेप घेण्याला जागा राहिली नाहीं. इतकेंच नव्हें तर दरबारनें घडवून आणलेली घटनाच इष्ट आहे, असें सर्वांना लवकरच वाटूं लागलें व या नेमणुकीबद्दलचा विरोध हळूंहळूं कमी होत गेला.

श्री. भास्करराव जाधव यांनीं नगरपालिकेचा कारभार हातीं घेतल्यानंतर त्यांनीं तिच्या व्यवस्थेंत सुधारणा व्हावी याविषयीं कोणते प्रयत्न केले याचा आपण आतां विचार करूं. प्रारंभीं त्यांनीं नगरपालिकेच्या अंतर्गत व्यवस्थेकडे लक्ष पुरविलें व पुढीलप्रमाणें त्यांत सुधारणा केल्याः—

१. पूर्वीं नगरपालिकेंत रक्कम वसूल झाल्याची स्वतंत्र पावती देण्याची चाल नव्हती. बिलाच्या मागच्या बाजूलाच ती वसूल झाल्याचें लिहिलें जात असे. यामुळें कसा गोंधळ झाला याचें विवेचन मागील प्रकरणांत आलें आहेच. म्हणून श्री. भास्करराव जाधव यांनीं ही पद्धत मोडून रक्कम वसूल झाल्याबद्दल नगरपालिकेच्या शिक्क्याची स्वतंत्र पावती देण्याची प्रथा पाडली.

२. त्याचप्रमाणें श्री. भास्करराव जाधव यांनीं जमाखर्चाच्या पद्धतींत सुधारणा केली. त्यांनीं नगरपालिकेचा कारभार हातीं घेण्यापूर्वीं जमाखर्चाची कसलीच व्यवस्था नसे व जमाखर्चाची पद्धत व्यवस्थित नसल्यामुळें नगरपालिकेचें फार नुकसान होत असे. दररोज झालेल्या जमाखर्चाची कीर्दींत नोंद करून त्याचा मासिक व त्रैमासिक आढावा काढण्यांत पूर्वीं फार हयगय झाली होती. म्हणून त्यांनीं जमाखर्चाच्या पद्धतींत अशी सुधारणा केली कीं, मासिक, त्रैमासिक व वार्षिक जमाखर्च ४८ तासांत कुणालाहि उपलब्ध होऊं शकेल.

३. वसूलबाकी वर्षाच्या शेवटीं तयार करावयाची असते. पण त्याचे कागदपत्र नियमितपणें केले जात नव्हते. या बाबतींत दोन वर्षांचें काम शिल्लक होतें. हें काम करण्यासाठीं त्यांनीं स्वतंत्र कारकून नेमले. तसेंच कर व वसुली यांविषयींची माहिती नगरपालिकेंत केव्हांहि व कुणालाहि मिळण्याची व्यवस्था केली.

४. घरफाळा, तारदखान्याची पट्टी व इतर बाबतींतील कर यांची थकबाकी फार राहिली होती. ही बाकी वसूल करण्याची पद्धतीहि कशी सदोष होती, याचें दिग्दर्शन मागील प्रकरणीं केलें आहेच. म्हणून ती पद्धत सुधारून वसूल करण्याचे त्यांनीं प्रयत्न केले. या प्रयत्नांमुळें नगरपालिकेच्या उत्पन्नांत चांगली भर पडली.

५. लोकांचे अर्ज, तक्रारी व इतर प्रकारचीं शिल्लक राहिलेलीं कामें तत्परतेनें निकालांत काढलीं.

नगरपालिकेचे कागदपत्र ( Records ) त्यांनीं व्यवस्थितपणें लाविले. पूर्वीं कागदपत्र अनुक्रमानें लाविले नव्हते व कागदपत्र लावण्याची पद्धत केवळ दरबारच्या अशुद्ध अनुकरणाची असे. ही पद्धत नगरपालिकेच्या कामाला केव्हांहि इष्ट नव्हती. म्हणून त्यांनीं पांच वर्षांतील कागदपत्र अनुक्रमानें लाविले व बी वर्गांतील दहा वर्षांच्या कागदपत्रांचा नाश केला. ब्रिटिश हिंदुस्थानांतील इतर नगरपालिकेंत ज्याप्रमाणें रेकॉर्डची व्यवस्था असे त्याप्रमाणेंच व्यवस्था त्यांनीं कोल्हापूर नगरपालिकेंत ठेविली. तसेंच या कागदपत्रांच्या आधारें त्यांनीं इ. स. १८५४ पासून तों १९०६ पर्यंतचा कोल्हापूर नगरपालिकेचा सुसंगत असा इतिहासहि लिहिला. मागील प्रकरणांतून आम्हीं जो



विस्तारानें इतिहास दिला आहे तो लिहितेवेळीं वरील इतिहासाचा आम्हांस फार उपयोग झाला, असें येथें कृतज्ञतापूर्वक नमूद करणें अवश्य आहे.

श्री. भास्करराव जाधव यांची कामाची पद्धत प्रशंसनीय होती. ते दररोज सकाळीं घोड्यावरून गांवांत फिरत असत व कोठें कांहीं दोष आढळल्यास ते तात्काळ दूर करण्याची दक्षता घेत असत. तसेंच त्यांनीं शहरसुधारणेचा एक कार्यक्रम पुढें ठेविला व तदनुरोधानें कार्य करण्याला प्रारंभ केला. तो त्यांचा कार्यक्रम त्यांच्याच शब्दांत पुढें देणें योग्य आहे.

"या अवस्थेंत पुढील काळांत कोल्हापूर शहराच्या गरजा काय होतील हें सांगणें अशक्य आहे. शहर व नगरपालिका यांची चांगल्याप्रकारें प्रगति होत आहे. व्यापाराची वाढ होत आहे. जीवनांतील राहणीचा दर्जा वाढला आहे. शहरांतील शिक्षणांत अपेक्षेइतकी नसली तरी पुष्कळ वाढ झाली आहे. यामुळें नवीन गरजा वाढत आहेत व त्या पुरविण्याची अवश्यकता भासत आहे म्हणून सर्व काळांत उपयुक्त ठरेल अशा सुधारणेची योजना तयार करणें अशक्य आहे. तथापि माझ्या मतें आजच्या आवश्यक गरजा पुढीलप्रमाणें आहेतः—

(१) आरोग्याची सुधारणा. (२) नगररचनेंतील सौंदर्याची वाढ व सुधारणा. (३) सार्वजनिक सुखसोयी.

पहिल्या भागांत ड्रेनेजचा प्रामुख्यानें अंतर्भाव होतो. शहराचा पाणीपुरवठा फार मोठा असून त्यापैकीं पुष्कळच पाणी वाया जातें. कारण थोडें पाणी गटारांतून बाहेर नेलें जातें व बाकीचें जमिनींत मुरतें. त्यामुळें जमीन नेहमीं ओलसर राहते. म्हणून गटारें तयार करण्याचें काम तावडतोब हातीं घेतलें पाहिजे.

ज्यांची वागणूक गलिच्छ आहे व ज्यांचे धंदे उपद्रवकारक आहेत अशा रहिवाशांची शहराच्या मध्यभागीं असलेली मोठी लोकसंख्या हा दुसरा महत्त्वाचा प्रश्न आहे. भावी काळांत शहरविस्तार जेथें होणार नाहीं अशा भागांत ही लोकवस्ती नेली पाहिजे.

विशेषतः शहरांतील कोटभाग फार दाट वस्तीचा आहे. १९०१ सालच्या शिरगणतीच्या अहवालावरून या भागांतील लोकसंख्या क्षेत्राच्या मानानें फारच मोठी आहे असें दिसून येतें. ही दाट वस्ती कमी करून गांवाबाहेर असलेल्या विस्तृत माळावर घरें बांधण्याविषयीं लोकांचीं मनें वळविल्याखेरीज शहरांतील आरोग्याच्या स्थितींत विशेष सुधारणा होणार नाहीं. शहराबाहेरील माळ व कांहीं शेतीची जमीन या कामासाठीं मिळविली पाहिजे व तेथें घरें बांधण्याविषयीं लोकांचीं मनें प्रवृत्त केलीं पाहिजेत. शाहूपुरींतील नवा भाग झपाट्यानें नवीन घरांनीं भरून जात आहे. पण त्या ठिकाणीं केवळ २०० घरांनाच जागा आहे म्हणून निदान ५००० घरांना पुरेल इतकी जागा मिळविल्याखेरीज शहराच्या गरजा भागणार नाहींत. रस्ते फार अरुंद आहेत. यामुळें उजेड व स्वच्छ हवा भरपूर नाहीं ते रस्ते रुंद केले पाहिजेत. या योजनेनें शहराचें आरोग्य व सुख यांत भरच पडेल.

इमारतीबद्दल पोटकायदे करण्याची जरूरी पूर्वीच्या काळीं भासली नाहीं. साधारणतः लोकांना उजेड व मोकळी हवा यांचें महत्त्व समजत नाहीं व पुष्कळ घरें आरोग्याला आवश्यक असलेल्या या दोन महत्त्वाच्या बाबतींत सदोष आहेत. अशा घरांतच जनावरें कोंबलेलीं असतात. त्यांच्या शेणमुताची घाण दूर नेण्याकडे चांगलें लक्ष पुरविलेलें नाहीं. यामुळें घरांत अधिक अस्वच्छता माजते. यापुढें ही पद्धत क्षम्य मानतां कामा नये. मुंबईंतील नियमाप्रमाणें प्रत्येक घरमालकानें खोली बांधतांना त्याला उजेडासाठीं व स्वच्छ हवेसाठीं दरवाजे किंवा खिडक्या ठेविल्या पाहिजेत व खोलीच्या एकचतुर्थांशापेक्षां कमी नाहीं इतका दरवाजाचा भाग असला पाहिजे म्हणून वैद्यकीय किंवा इंजिनिअर खात्यानें प्रत्येक घराला कमींतकमी आवश्यक असणारी मोकळी हवा, उजेड व गुरांची घाण नाहींशी करणें याविषयींचे नियम तयार केले पाहिजेत. हे नियम पूर्णपणें अमलांत आणल्याखेरीज नवीन घरें बांधण्याला परवानगी देऊं नये व हल्लीं असलेल्या घरांत सूर्यप्रकाश–मोकळी हवा–ही मिळण्यासाठीं खिडक्या पाडण्याचे उपाय योजिले पाहिजेत.

कोल्हापुरांत वरील गरजा भागविणारें समाधानकारक घर क्वचितच आढळतें. हजारों घरांत प्रकाश व हवा यांची कसलीहि सोय नसलेल्या एक किंवा एकाहून अधिक खोल्या असतात.

या योजनांची डॉ. ह्यूलेट यांनीं सुमारें ३० वर्षांपूर्वीं शिफारस केली होती. प्लेग सुरूं होण्यापूर्वीं शहराची मृत्युसंख्या प्रत्येक हजारीं २८·३ इतकी होती. ती आतां ४६ झाली आहे. प्लेग हा जवळ जवळ कायमचा रहिवासी झाला आहे व शहराचें आरोग्य सुधारण्याचे उपाय जर कडकपणें अमलांत आणले नाहींत तर मृत्यूचें हें मोठें प्रमाण तसेंच राहण्याचा किंवा वाढण्याचाहि संभव आहे.

सार्वजनिक सुखसोयीसाठीं सार्वजनिक तारदखान्यांची संख्या वाढविणें, रस्ते रुंद करणें, रस्त्यांवरून जाणाऱ्या लोकांसाठीं पायवाटा ( Foot-path ) बांधणें आणि करमणूक व व्यायाम यांसाठीं मोकळ्या जागा निवडणें, या बाबींची आवश्यकता आहे.

सारांशः—

१. चांगल्या पद्धतीवर ड्रेनेजचें काम पूर्ण करावें.
२. गलिच्छ वस्ती व उपद्रवकारक उद्योग शहराबाहेर न्यावेत.
३. शहराबाहेर लोकांना नवीन घरें बांधण्याला उत्तेजन देऊन गांवांतील दाट वस्ती कमी करावी.
४. लोकांना आपल्या घरांत प्रकाश व मोकळी हवा यांची गरज आहे. यांकडे त्यांचें अधिक लक्ष वेधलें जावें व यासाठीं इमारती बांधण्याचे पोटनियम तयार करून त्यांची अंमलबजावणी करावी. ”



नगररचनेच्या व लोकांच्या सुखसोयीच्या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त असा हा कार्यक्रम आपल्यापुढें ठेवून तो तडीला नेण्याच्या बाबतींत श्री. भास्करराव जाधव यांनीं अतोनात श्रम घेतले.

श्री. भास्करराव जाधव यांच्या कारकीर्दींत पुढीलप्रमाणें महत्त्वाच्या गोष्टी झाल्याः—

१. **फेरिस मार्केट :** पूर्वीं निरनिराळ्या पेठेंत वेगवेगळ्या दिवशीं बाजार भरत असत. त्यांत व्यापाऱ्याची फार गैरसोय होत असे. कारण त्यांना आपला माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं वारंवार न्यावा लागे. त्यामुळें येथें एका कायमच्या बाजाराची व्यवस्था होणें हें फारच आवश्यक होतें. कर्नल फेरिस यांच्या कारकीर्दींत भाजीचें व धान्याचें पहिलें मार्केट तयार केलें गेलें. त्यामुळें लोकांची फार सोय झाली. पण पुढें लोकसंख्येंत व व्यापारांत वाढ झाल्यामुळें इतर अनेक बाजारांची जरूर वाटूं लागली व ही गरज कांहींशी भागविण्याच्या दृष्टीनें शनिवार पेठेंत एक नवीन इमारत बांधण्याची कल्पना सुचली. तिला ‘ फेरिस मार्केट ’ हेंच नांव देण्यांत आलें. या प्रेक्षणीय इमारतीनें नागरिकांच्या सोयींत व नगराच्या सौंदर्यांत चांगली भर घातली. कर्नल फेरिस यांनीं नगरपालिकेची प्रशंसनीय प्रगति घडवून आणल्यामुळें त्यांचें एकादें स्मारक नगरपालिकेनें करणें हें उचितच होतें. या ‘ फेरिस मार्केटचा ’ उद्घाटनसमारंभ १९०६ सालीं कर्नल फेरिस यांच्याच हस्तें करण्यांत आला. त्या प्रसंगीं कर्नल फेरिस म्हणालेः—

“ I appreciate very keenly, Mr. Jadhavrao, the kind expressions that have fallen from you concerning my former connection with the Kolhapur Municipality and the initiatory reforms that I was enabled to carry out. A good deal of water has flowed under the Panchganga bridge since then and it is a sincere pleasure to me to spend the evening of my official days amid the same scenes that witnessed my maiden efforts at administration, and to know that my work has lasted and still commands appreciation.

“ When, in 1871, I found myself in orders to come to Kolhapur, I naturally enquired if the place was celebrated for anything, and was told that it was celebrated for its insanitary condition and for the variety and assortment of smells it provided. This, I think, was somewhat of a libel. There were certainly no sanitary arrangements and each “Peth” had its own peculiar odour which would have enabled a blind man to locate himself with facility, but it was no worse than other large towns in those days when hygiene was not accounted of much consideration and when the conservatism of Indians of the methods and customs of their fathers was more deeply implanted than it is in the present generation. It was very difficult to move forward in the direction of reform, obstruction and objection met one at every turn. The demolition of the Fort-walls and filling up of the postilential moat has been justified by

subsequent experience, and yet I seem to remember that in Rambhat Kadekar' case, in 1881, it was counted as a grievous sin against me for which the scheme of the conspirators for removing me from this earthly scene was considered a righteous measure, while the Government of India was memorialised against my vandalism in destroying relics of antiquity and exposing His Highness the Maharaja's capital town to the mercy of his enemies. The prosecution of reforms involved the expenditure of money, and the inhabitants of Kolhapur were no exception to the ordinary run of mankind in objecting to be taxed. I remember that the imposition of a house-tax was very much resented indeed, and I have a lively recollection of a vast crowd, numbering many hundreds, if not thousands, of dissentients assembled on the maidan known as the general parade ground, and refusing to return to their burdened domiciles. The arguments of an April storm proved stronger than any could urge, and the house tax came to be accepted as a necessary evil which, after all, brought some compensation. Mr. Jadhavrao has said that the foundation of Municipal finance was laid at that time, and has eulogized the period of Municipal Government from 1869 to 1882. I am afraid I must admit that the form of Government was a benevolent despotism, for the actions of the President were quite untrammelled. It was, however, the only possible form then for ensuring progress, but it could never have succeeded without the goodwill of the people. During my term of presidency, I learnt more of the law-abiding character of Indians, their power of cheerfulness under what seemed to them adverse circumstances and their reliance on the good faith of a man, once they were satisfied that his best endeavours were being given to the serving of their interests, than many a man learns in a lifetime, and I have an abiding sense of gratitude to the people of Kolhapur and a feeling of good-fellowship towards all Indians, for their sakes, ever since. You will understand, therefore, what sincere pleasure it affords me to be here today to per-




Col. W. B. Ferris



form the ceremony of opening these beautiful markets which, through the kindness of His Highness and the Municipality, and with the permission of Government, are named after me.

" My time here is short and the sun of my official career is nearing the western horizon, but in the retreat of my old age, many thousand miles from here, it will be happiness to remember that each Sunday will bring crowds to these markets among whom, in the generations to come, will be found possibly many who will ask, " who was Ferris and why were the Markets named after him " to be told that he was a past and gone Political Agent, who, although possessing like all human beings many faults, yet loved Maharastra and its people and tried his best to do his duty towards them.

With Your Highness' permission I will now declare the 'Ferris Markets' open. "



या भाषणाचें मराठी भाषांतर पुढीलप्रमाणें आहे:—

"कोल्हापूर नगरपालिकेशीं माझा पूर्वीं आलेला संबंध व त्यावेळीं माझ्या हातून झालेल्या प्राथमिक सुधारणा यांबद्दल श्री. जाधवराव, आपण काढलेल्या गौरवोद्गारांबद्दल मी कृतज्ञ आहें. त्या घटनांना आतां बराच कालावधि झालेला आहे. माझे सुरवातीचे कारभारविषयक प्रयत्न त्यांनीं आस्थेनें पाहिले, त्यांच्या संगतींत माझ्या कारकीर्दीचे अखेरचे दिवस व्यतीत करतांना मला संतोष वाटतो, माझें कार्य आतांपर्यंत टिकलें आहे व अद्यापहि त्याचें कौतुक होत आहे हें पाहूनहि मला समाधान वाटते..

" १८७१ सालीं ज्यावेळीं प्रथम कोल्हापुरांत नेमणूक झाल्याचा हुकूम मला मिळाला त्यावेळीं तें स्थळ कशाविषयीं प्रसिद्ध आहे याबद्दल मी चौकशी केली. त्यावेळीं मला सांगण्यांत आलें कीं कोल्हापूरची जर कशाविषयीं विशेष प्रसिद्धि असेल तर ती अनारोग्यकर स्थितीविषयीं व विविध प्रकारच्या दुर्गंधीविषयीं होय. मला ही त्या शहराची बदनामी वाटली. पण खरोखरच त्यावेळीं स्वच्छतेची कोणतीच व्यवस्था नव्हती व प्रत्येक पेठेंत असा कांहीं विशिष्ट वास होता कीं एकाद्या अंधळ्या माणसालाहि प्रत्येक पेठ सहज रीतीनें केवळ वासावरून ओळखतां आली असती. पण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं त्यावेळच्या दुसऱ्या

कोणत्याहि शहरांपेक्षां कोल्हापूर हें विशेष वाईट नव्हतें. कारण त्यावेळीं आरोग्याकड व स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिलें जात नव्हतें व हिंदुलोकांचा पुराणमताभिमान हल्लींच्या पिढी-पेक्षां अधिक तीव्र होता. त्यामुळें, सुधारणेच्या मार्गानें प्रगति करणें अतिशय कठिण होतें; सुधारणेच्या कामीं वारंवार विरोध व अडथळे येत. कोटभागाच्या भिंती पाडणें व रोगप्रसारक खंदक मुजविणें हीं शहराच्या हिताच्या दृष्टीनें चांगलीं कामें होतीं हें काळानेंच सिद्ध केलें आहे; आणि तरीहि, इ. स. १८८१ मध्यें रामभट कडेकर सारख्यांनीं हा माझा भयंकर अपराध मानला व माझा काटा काढण्याचा प्रयत्न म्हणजे सत्कृत्यच आहे असें मानलें. हिन्द सरकारकडे माझ्याविरुद्ध असे अर्ज करण्यांत आले कीं मी, प्राचीन अवशेष नष्ट करीत आहे व छत्रपतींच्या राजधानीचें कोटभागानें होणारें संरक्षण काढून घेऊन शत्रूचा मार्ग सुलभ करीत आहे. सुधारणा घडवून आणण्यासाठीं पैशाची गरज होती व करास विरोध करण्याच्या मानवाच्या नेहमींच्या प्रवृत्तीप्रमाणें कोल्हापूरच्या नागरिकांनींहि नगरपालिकेच्या करास कडवा विरोध केला. मला असें पक्कें स्मरतें, कीं जनरल परेड ग्राऊंडवर शेंकडों लोक जमले; ज्या आपल्या घरांवर घरपट्टी आकारण्यांत आली आहे त्या घरांत आपण परत जाण्यास त्यांनीं नकार दिला. पण वादळी वाऱ्यांपासून संरक्षण घेण्यासाठीं म्हणून त्यांना अखेर आपल्या घरीं परतावेंच लागलें आणि माझ्या युक्तिवादापेक्षां या कारणाचाच त्यांच्या मनावर अधिक परिणाम झाला! अखेर, नाइलाज म्हणून त्यांनीं घरपट्टीस मान्यता दिली. अर्थातच या घरपट्टीचे फायदेहि बरेच झाले. नगरपालिकेच्या आर्थिक व्यवहाराचा पाया त्या कालांत घातला गेला असें श्री. भास्करराव जाधव यांनीं सांगितलें आहे व इ. स. १८६९ ते १८८२ या कालांत नगरपालिकेनें केलेल्या सुधारणांचा गौरव केला आहे. पण त्या वेळचा कारभार जनहितेच्छु स्वायत्त राजाचा असल्यासारखा होता. कारण नगरपालिकेच्या अध्यक्षांच्या कारभारांत कोणी ढवळाढवळ करीत नसे. खात्रीपूर्वक प्रगति होण्यासाठीं तीच पद्धति उत्तम होती. पण जनतेच्या सदिच्छेशिवाय ती यशस्वी होणें शक्य नव्हतें. भारतीयांची कायद्यांबद्दलची आस्था; संकटसमयींहि प्रफुल्ल मनानें काम करण्याची वृत्ति आणि जनहितासाठीं झटणाऱ्या माणसाबद्दलचा आत्मविश्वास यांची मला त्या काळांत फारच चांगली माहिती झाली. हा अनुभव फार थोड्यांनाच येत असेल व मला तो आला त्याबद्दल मी कोल्हापूरच्या जनतेचा ऋणी आहें. इतकेंच नव्हे, तर त्यांच्यामुळें सर्वच भारतीयांबद्दल त्यावेळेपासून माझ्या मनांत सुहृद्-भाव निर्माण झाला आहे. म्हणून मार्केटच्या या सुंदर इमारतीचें उद्घाटन करतांना मला मनःपूर्वक आनंद होत आहे. छत्रपतींच्या व नगरपालिकेच्या कृपेनें व सरकारच्या परवानगीनें या मार्केटला माझें नांव देण्यांत आलें आहे.

"आतां माझ्या कारकीर्दीची अखेर आली आहे. पण माझ्या निवृत्तीच्या काळांत मला एवढें समाधान खचितच होईल, कीं इंग्लंडपासून हजारों मैल दूर असलेल्या या ठिकाणीं दर रविवारीं शेंकडों लोक बाजारासाठीं गर्दी करतील. यानंतर पिढ्यान्‌पिढ्या हा उपक्रम चालू राहील व अनेक वर्षांनंतर लोक विचारतील कीं हे 'फेरिस' कोण होते व त्यांचें नांव या मार्केटला कां देण्यांत आलें? त्यांना हेंच सांगा, कीं फेरिस हे एक माजी पोलिटिकल एजंट होते; त्यांच्या अंगीं मानवास सुलभ असणारे दोष होते हें खरें, पण महाराष्ट्र आणि महाराष्ट्रीय जनतेवर त्यांचें प्रेम होतें व त्यांच्यासाठीं आपलें कर्तव्य बजावण्याचे फेरिस यांनीं आटोकाट प्रयत्न केले.

"छत्रपति महाराजांच्या परवानगीनें मी आतां 'फेरिस मार्केट'चें उद्घाटन झाल्याचें जाहीर करतों."



(२) **भंग्यांचा संपः**—श्री. भास्करराव जाधव यांच्या कारकीर्दींत दुसऱ्या एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे. ती म्हणजे भंग्यांचा संप होय. पूर्वीं भंग्यांवर कसलेंहि नियंत्रण नव्हतें. त्यांना वाटेल तेव्हां व मनाला येईल तसें काम करण्याची मुभा असे म्हणून त्यांनीं भंग्यांचें काम व्यवस्थित व्हावें असे नियम केले. अशा प्रकारची कडक शिस्त त्यांना पूर्वीं माहीत नसल्या-मुळें भंग्यांत असंतोष उत्पन्न झाला व पगार कमी व काम जास्त या सबबीवर त्यांनीं १९०५ सालीं संप पुकारला. पण श्री. भास्करराव जाधव यांनीं मुंबईहून नवीन भंगी आणवून तात्काळ तो संप मोडला. यामुळें नगरपालिकेच्या नोकरवर्गावर त्यांचा वचक बसला.

(३) **प्लेगच्या कालांतील सोयीः**—श्री. भास्करराव जाधव यांनीं प्लेगच्या दिवसांत फार मोठी कामगिरी केली. १९०४–५ सालीं प्लेगच्या साथीमुळें दररोज अनेक लोक मृत्युमुखीं पडत. त्यामुळें गोरगरीब लोकांना प्रेतें जाळण्याची मोठी पंचाईत पडे. त्यांतच लांकडें विकणाऱ्या व्यापाऱ्यांनीं लांकडाचा दर भरमसाट वाढविला. त्यामुळें लांकडें विकत घेऊन प्रेतें जाळणें हें पुष्कळ लोकांना कठीण जाई व गरीब लोक एक खड्डा खणून त्यांत प्रेतें पुरत असत. म्हणून श्री. भास्करराव जाधव यांनीं लांकडाचे दर निश्चित केले व गरिबांना प्रेतें जाळण्याची व्यवस्था सुलभ केली. तसेंच स्मशानाकडे जाण्याचा रस्ता अगदीं वाईट होता. त्यामुळें लोकांची फार गैरसोय होई. म्हणून त्यांनीं तो रस्ता चांगला करून घेतला. सारांश, श्री. भास्करराव जाधव यांनीं प्लेगच्या काळांत भूतदयात्मक बुद्धीनें बहुमोल कामगिरी करून लोकांचा दुवा घेतला.

त्याचप्रमाणें, त्या काळीं पावसाळ्यांत प्रेतें जाळण्याची फार गैर व्यवस्था होती. गांवांतून लांकडें नेऊन स्मशानांत प्रेतें जाळण्याची प्रथा होती. यामुळें लोकांना किती त्रास होत असेल याची कल्पनाच करावी. म्हणून श्री. भास्करराव जाधव यांनीं स्मशानांतच ठराविक दरानें लांकडें मिळण्याची सोय केली व प्रेतें जाळण्यासाठीं व लोकांना उभे राहण्यासाठीं स्मशानांत दोन शेड्स बांधल्या. यामुळे लोकांची फार सोय झाली. फारच थोड्या शहरांना स्मशानाची चांगली व्यवस्था असते. कोल्हापुरांत स्मशानाची जी अत्युत्तम व्यवस्था आहे तिचें श्रेय श्री. भास्करराव जाधव यांनाच दिले पाहिजे.

**(४) अर्बन बँक :** श्री. भास्करराव जाधव यांच्या कारकीर्दीतील आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे 'अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी' या संस्थेची स्थापना ही होय. इ. स. १९११-१२ साली महाराष्ट्रांत सार्वत्रिक बँका बुडण्याची जणूं कांहीं एक साथच आली होती. त्यामुळे लोकांचा बँकेवरचा विश्वास उडत चालला होता. तथापि लोकांना कर्ज मिळण्याच्या बाबतीत एकाद्या बँकेची गरज होतीच. म्हणून श्री. भास्करराव जाधव यांनी बँक असे न म्हणतां 'अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी' असें नांव देऊन १९१३ साली ही संस्था स्थापन केली. या सोसायटीला प्रारंभी नगरपालिकेनें रु. १००० व्याजी दिले व तिची कचेरी प्रथम नगरपालिकेच्या इमारतींत होती. त्या सोसायटींत प्रथमतः नगरपालिकेच्या नोकरांचेंच प्राबल्य होतें. पुढें पुढें या सोसायटीचें महत्त्व फार वाढलें. म्हणून श्री. भास्करराव जाधव यांच्या कारकीर्दींत स्थापन झालेल्या कोल्हापुरांतील या पहिल्या सोसायटीचा गौरवानें उल्लेख केला पाहिजे.

वरील चार कार्यांप्रमाणेंच त्यांच्या कारकीर्दींत घडून आलेल्या शाहूपुरीच्या वसाहतीच्या भरभराटीकडे अंगुलीनिर्देश करावा लागेल. याचवेळीं दरबारनें शहरसुधारणेसाठीं केलेली महत्त्वाची गोष्ट म्हणजे शाहूपुरी वसाहत. ही वसाहत जरी १८९६ मध्यें काढिली गेली तरी श्री. भास्कररावांच्या वेळेपर्यंत तिच्याकडे कुणी फारसें लक्ष दिलें नव्हतें. श्री. भास्करराव यांच्या मनांत शहरांतील दाटी कमी करून बाहेर वसाहत वाढविणेंचें होतें हें वर सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें त्यांनीं शाहूपुरी वसाहत वाढविण्यासाठीं बरेच प्रयत्न केले व त्यांना यश येऊन इ. स. १९२० पर्यंत ह्या वसाहतीची फारच वाढ झाली.

येथवर केलेल्या विवेचनावरून श्री. भास्करराव जाधव यांची चौदा वर्षांची कारकीर्द म्हणजे नगरपालिकेच्या इतिहासांतील दुसरें सुवर्णयुग आहे असें म्हणतां येईल. कोल्हापूर शहरांत रावबहादुर महादेवराव बर्वे यांच्यानंतर इतकें स्तुत्य कार्य कोणी केलेलें नव्हतें. म्हणून श्री. भास्करराव जाधव यांना कोल्हापूरचे दुसरे शिल्पकार ( The second Builder of Kolhapur ) असें म्हणतां येईल व त्यांच्या महत्कार्याबद्दल कोल्हापुरची जनता त्यांची सदैव ऋणी राहील.

येथपर्यंत श्री. भास्करराव जाधव यांच्या कारकीर्दींत कोणतीं कार्ये झालीं याचा ऊहापोह केला. आतां १९०४-१९२० या कालांत नगरपालिकेच्या उत्पन्नांत व खर्चांत कशी वाढ झाली हें पुढील तक्त्यावरून दिसून येईल :—



## उत्पन्न

| साल | जमा | करवसुली | पाणीपट्टी |
|---|---|---|---|
| १९०४-०५ | ८९०८० | ... | ... |
| १९०५-०६ | १११९१२ | ४१८८९ | ... |
| १९०६-०७ | ९६९०९ | ४७५०९ | ... |
| १९०७-०८ | ६७५२३ | ४००५८ | ... |
| १९०८-०९ | ८४७६७ | ४६९५६ | ... |
| १९०९-१० | ९९४०० | ६०५५२ | ८८४२ |
| १९१०-११ | ९८७२० | ५३८१४ | ८६३९ |
| १९११-१२ | १११३५० | ६१७७९ | १०७९० |
| १९१२-१३ | ११२३० | ६३८९८ | १२१०४ |
| १९१३-१४ | २००४९० | ५१६८४ | १२७३६ |
| १९१४-१५ | १४५५८२ | ६९३६० | १५०३३ |
| १९१५-१६ | १६७७६३ | ६७३५३ | १४९६० |
| १९१६-१७ | १९४८८७ | ... | १५८५८१ |

## खर्च

| साल | नोकरवर्ग | दिवाबत्ती व सफाई | सार्वजनिक कामें | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १९०४-०५ | ९७९४ | ३१६९१ | १६२९८ | १९२१६ | ७६९१९ |
| १९०५-०६ | ८२१५ | ३४९११ | १०३२४ | १३५११ | ७७०४१ |
| १९०६-०७ | ० | २४०० | ,२२०४ | ० | ८०९७४ |
| १९०७-०८ | ० | ३१७७ | ३५०१ | ० | ५१६११ |
| १९०८-०९ | ० | ३७७४ | १३८७९ | ० | ५९३६९ |
| १९०९-१० | ० | ३४०२ | ४४६७ | ० | ८४२५६ |
| १९१०-११ | ० | ३४३४ | ३६८८ | ० | ८०३८८ |
| १९११-१२ | ० | ३७२९ | ५८५३ | ० | ९८९२९ |
| १९१२-१३ | ० | ४६६७ | १५६२२ | ० | ९३१६५ |
| १९१३-१४ | ० | ४९४४ | २२५५७ | ० | १७६०१९ |
| १९१४-१५ | ० | ४३४३ | ... | ० | १४५८२२ |
| १९१५-१६ | ० | ५४५२ | ४५८१ | ० | १४५६२४ |
| १९१६-१७ | ० | ६०६३ | ... | ० | १३४९९७ |

जमा

| साल | परवाना | दस्तुरी | पाणी पट्टी | इतर कर | विषारी पदार्थ कर | इमारती-वरील कर | जमीन विक्री बद्दल | खत विक्री | दंड | व्याज | डेट्स व डिपॉझिट्स् | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९१७–१८ | २२०४८ | १२५६६ | १६३९१ | १५५३२ | २५ | २७२८० | ३७४१ | ११४५३ | ४२ | १३५८ | १९०६८ | २८०७ | १४३७१७ |
| १९१८–१९ | २३१८३ | ९०९२ | १५५६६ | १७४४७ | २५ | २७९६२ | २९५२ | ८९६७ | ४१ | ४६५३ | ४४८८८ | ५५८७ | १६०३०० |
| १९१९–२० | २२८५५ | १३४४१ | २९०४३ | १८३१३ | २५ | ५३७२७ | १२०० | ९३६१ | १३ | ५९१३ | ५७५४१ | १२४६ | २१२६७७ |

खर्च

| साल | नोकरवर्ग | दिवाबत्ती | सफाई | सार्वजनिक कामें | शिक्षण | डेट्स व डिपॉझिट्स | पाणी खर्च | ड्रेनेज | महागाई भत्ता | दवाखान्यांना मदत | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९१७–१८ | ९४८९ | ६६६६ | ३४२४५ | १९२१५ | १०३७९ | २१३७७ | ११४७६ | ३४६ | ३९६१ | २००० | ३८७ | ११८९३८ |
| १९१८–१९ | ११९५४ | ८०२४ | ३४१५८ | १२४१४ | १४३७९ | ६६३४९ | १३३९५ | ४३८ | ६०९८ | २००० | ४८९ | १८५२१६ |
| १९१९–२० | १२४१३ | ७४६४ | ३८९४७ | ११८१९ | १०२०० | ५५३६९ | ३४९०१ | ३७८ | ४७१० | ८००० | १०९३ | १६५१०८ |

१९०४–१९२० या सालांतील जमाखर्चाचे आंकडे जसे उपलब्ध झाले तसे येथें दिले आहेत.



श्री. भास्करराव जाधव यांच्यानंतर १९१९ साली मे. बाळासाहेब गायकवाड व १९२० साली प्रो. कुंजीलाल दिलवाली एम्. ए. हे नगरपालिकेचे सर्वाधिकारी झाले. त्यांनी श्री. भास्करराव जाधव यांचेच काम पुढे चालू ठेविलें. त्यांची मुदतहि एका वर्षाचीच असल्यामुळें त्यांना अधिक कांहीं करणें शक्य नव्हतें. यामुळें या दोघांच्या कारकीर्दीत विशेष उल्लेखनीय असें कांहीं घडलें नाहीं. इ. स. १९०४ पासून १९२० पर्यंत नगरपालिकेचा कारभार एका व्यक्तीच्या ठिकाणीं केंद्रीभूत झाला होता. १९२१ साली कोल्हापूर नगरपालिकेतील एकतंत्री स्वरूप बदलून इतर शहरांप्रमाणें तिच्यांत लोकनियुक्त सभासद नेमावेत असें दरबारला वाटलें आणि नगरपालिकेचा असलेला सर्वाधिकाऱ्यांचा काल संपून तिला लोकानुवर्ती स्वरूप प्राप्त झालें. या नवीन स्वरूपाखाली तिचा कसा विकास होत गेला, याचें विवेचन पुढील प्रकरणीं करूं.

# प्रकरण ७ वें

# दुसरी लोकनियुक्त नगरपालिका

## ( १९२१–१९४१ )

कोल्हापूर नगरपालिकेची इ. स. १९०४ ते १९२० पर्यंत सर्वाधिकाऱ्यांच्या काळांत कशी प्रगति होत गेली, याचें सविस्तर विवेचन मागील प्रकरणांत केलें. प्रस्तुत प्रकरणांत इ. स. १९२१ ते १९४१ या काळांत नगरपालिकेची कशी स्थिति होती याचें समालोचन करावयाचें आहे.

इ. स. १९२० सालीं कोल्हापूर नगरपालिकेंत सुधारणा व्हावी व निवडणुकीचें तत्त्व अमलांत आणावें म्हणून **श्री शाहू छत्रपति महाराज** यांनी एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यांतील महत्त्वाचा भाग पुढें दिला आहे:—

"कोल्हापूर सिटी म्युनिसिपालिटीची स्थिति असमाधानकारक असल्याचें हुजूर नजरेस आल्यावरून ती सुधारणेबद्दल सदर म्युनिसिपालिटीस वेळोवेळीं सूचना करण्यांत आल्या होत्या. परंतु त्या सूचनांचा इष्ट परिणाम दिसून येईना. परिस्थित्यनुसार ज्या ज्या सार्वजनिक सोयीकडे विशेष लक्ष पुरविणें जरूर होतें तशा गोष्टींकडे म्युनिसिपालिटीकडून लक्ष पुरविलें गेलें नाहीं. यामुळें नाइलाजास्तव कोल्हापूर सिटी म्युनिसिपालिटी फेरहुकूम होईपर्यंत सस्पेंड करून तिचें काम एका स्वतंत्र अंमलदाराकडे सोंपविणें भाग झालें. त्यानंतर म्युनिसिपालिटीची स्थिति सुधारणेसाठीं हुजुरून वेळोवेळीं मदत देण्यांत आली. याशिवाय तिची सांपत्तिक स्थिति सुधारण्यासाठीं वॉटरवर्कसहि तिच्या स्वाधीन करण्यांत आले. अशा स्थितींत यापुढें स्वतंत्र अंमलदारामार्फत म्युनिसिपालिटीची व्यवस्था चालू ठेवणेंची आवश्यकता दिसत नाहीं.

२. म्युनिसिपालिटी सस्पेंड केल्यापासून अलीकडे लोकस्थिति बरीच पालटली आहे. स्त्रीशिक्षणाचा प्रसार अधिक होत असून लोकांत सार्वजनिक हिताकरितां झीज सोसण्याची प्रवृत्ती व कळकळ दिसून येत असल्याचें निरनिराळ्या समाजांकडून बोर्डिंगें स्थापन झाली आहेत त्यांवरून व नवीन शाळा स्थापन झाल्या आहेत त्यांवरून व साथीच्या रोगांच्या व अन्य प्रसंगीं स्वयंसेनिकांकडून वगैरे लोकांस व सरकारास जी मदत झाली आहे त्यावरून दिसून येतें. अशा परिस्थितींत म्युनिसिपालिटीची केवळ पूर्वस्थिती कायम केल्यानें लोकांच्या वाढत्या आकांक्षा तृप्त होतील असें वाटत नसून बदललेल्या परिस्थितीचा पूर्ण फायदा न घेणें, हें प्रगतीच्या धोरणाशीं विसंगत होईल. देशाची खरी सामाजिक सुधारणा होणेस मागसलेल्या जातींना सार्वजनिक समान हक्क देणें जितकें अवश्य व जरूरीचें आहे तितकेंच किंबहुना त्याहून अधिक रीतीनें सर्व जातींच्या स्त्रियांना समान हक्क देऊन त्यांजकडून हळी



होत असलेल्या प्रगतीपर प्रयत्नांस उत्तेजन देणें जरूर आहे. यासाठीं यतें म्युनिसिपालिटी बहुतांशीं लोकनियुक्त सभासदांची होईल. व तींत सर्व जातींच्या स्त्रीपुरुषांस समान हक्कानें पुढें येऊन सार्वजनिक काम करण्यास पूर्ण अवकाश मिळेल व म्युनिसिपालिटीचें काम अधिक जोमानें चालून आपल्या कर्तबगारीनें आपण अधिक हक्क भोगण्यास लायक आहों, असें हुजूर निदर्शनास आणण्याला लोकांना संधि मिळेल अशी म्युनिसिपालिटीची रचना करावी असें हुजूरचें मनांत बरेच दिवस घाटत आहे.

३. म्युनिसिपल कर वगैरे भरणाऱ्यांच्या अनेक जाती असून त्यांपैकीं बऱ्याच जाती अल्पसंख्यांक असल्यानें जातवार प्रतिनिधी निवडून देण्याचें कामीं कांहीं अडचणी उद्भवतात. परंतु अगदीं अल्प कर देणाऱ्यांचाहि मतदार लोकांत समावेश होईल अशी योजना ठरवून, समान प्रगतीच्या जातींचे स्थूलमानानें निरनिराळे संघ बनविल्यास अशा प्रकारच्या अडचणी बऱ्याच दूर होतील असें वाटतें. सबब पुढें दिलेप्रमाणें नवीन योजना मंजूर करण्यांत येत आहे.

१. कोल्हापूर म्युनिसिपालिटींत अध्यक्षसुद्धां पूर्वी २७ कमिशनर्स होते, त्यांऐवजी यापुढें ४७ राहतील.

२. हुद्याचे नात्यानें पेठ्याचे मामलेदार, स्टेट ए. इंजिनियर, दरबार सर्जन व दप्तरदार यांस पूर्ववत् कायम ठेविलें आहे.

३. वरील ४७ कमिशनरखेरीज करवीर सरकार नेमील त्यांनींच पहिलीं तीन वर्षें पूर्ववत् म्युनिसिपल रूलींस अनुसरून अध्यक्षाचे सर्व अधिकार चालविणेंचे आहेत. या मुदतीनंतर निवडून आलेल्या कमिशनर लोकांनीं आपल्यांपैकींच बहुमतानें एक अध्यक्ष निवडणेंचा असून त्यास सरकारची मंजुरी मिळाली म्हणजे ती निवडणूक कायम समजावी.

म्युनिसिपल रूलींतील कलम १८ यांत व पुढील नियम ५१ पो. कलम ३ व ६ यांत सांगितलेल्या लायकीस पात्र राहून,

अ. जो कोणी मनुष्य मग ती स्त्री असो अगर पुरुष असो करवीर सिटी म्युनिसिपालिटींतील दरसाल एक रुपयाहून कमी नाहीं इतकी कराची रक्कम ( आक्ट्राय किंवा टोलशिवाय करून ) भरीत असेल अगर,

ब. म्युनिसिपल हद्दींत जो एक रुपयाहून कमी आकाराची नाहीं इतक्या आकाराच्या रयतावा जमिनीचा (१) खातेदार अगर मालक (२) इनाम जमिनीचा नांवचाला अगर हिस्सेदार अगर (३) देवस्थान जमिनीचा वहिवाटदार अगर त्यांतील हिस्सेदार असेल तो

म्युनिसिपालिटींत कमिशनर म्हणून निवडणुकींत उमेदवार होण्यास लायख समजला जाईल. तसेच—

१. जो कोणताही ऑनररी मॅजिस्ट्रेट अथवा,

२. कोणत्याहि युनिव्हर्सिटीचा जो कोणताहि ग्रॅज्युएट अगर जो कोणताही लायसेनसियट असेल अथवा,

३. हुजूरून सर्व कोर्टांत वकिली करण्याची सनद ज्यास मिळाली असेल तो कोणताहि प्लीडर अगर बॅरिस्टर अथवा,

४. जो कोणताहि असेसर असेल अथवा,

५. जो कोणताहि ब्रिटिश सरकारकडून अगर करवीर सरकारकडून किताब मिळालेला अगर केसर-इ-हिंद पदक धारण करणारा असेल. अथवा,

६. जो कोणताहि ब्रिटिश सरकारचा अगर करवीर सरकारचा अगर इंडियन कंपनीचे ॲक्टाखाली रजिस्टर झालेल्या कंपनीचा अगर रजिस्टर झालेल्या कोणत्याहि सोसायटीचा दरमहा रु. १५ पगार मिळणारा नोकर असेल अथवा,

७. जो कोणताहि एखाद्या कॉलेजांतील अगर शाळेंतील १५ रुपयांहून कमी पगार नाहीं असा शिक्षक असेल अथवा,

८. जो ब्रिटिश सरकारकडून अगर करवीर दरबारकडून अगर एखाद्या सार्वजनिक रजिस्टर झालेल्या कंपनीकडून दरमहा १५ रुपयांपेक्षां कमी नाहीं इतकी पेन्शन भोगत असेल अथवा,

९. जो करवीर सरकारांत एज्युकेशनल सेस भरीत असेल, तो कमिशनरचे निवडणुकींत उमेदवार होण्यास लायक समजला जाईल.

१०. मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं निवडणुकीच्या कारणासाठीं मत देणाऱ्यांची यादी ज्या तारखेस तयार करावयाची त्या तारखेच्या लगत आधीच्या चार महिन्या पेक्षां कमी नाहीं इतक्या मुदतींत तो म्युनिसिपल हद्दींत रहात असला पाहिजे व मतदार असला पाहिजे. म्युनिसिपल कर भरणाऱ्यास ही अट लागू समजणेंची नाहीं.



## परिशिष्ट

कोणकोणत्या जातीचे कसकसे संघ बनविले आहेत व त्यांनी किती कमिशनर्स निवडून देणेचे त्याबद्दल.

| संघ नंबर | जातींचीं नांवें | कमिशनर्स किती निवडून देणेंचे |
|---|---|---|
| १ | ब्राह्मण, सारस्वत .... .... .... .... .... | २ |
| २ | प्रभु .... .... .... .... .... | १ |
| ३ | शेणवी .... .... .... .... .... | १ |
| ४ | ख्रिश्चन .... .... .... .... .... | १ |
| ५ | मराठे, क्षत्रिय मराठे, रजपूत, कुणबी .... .... | १४ |
| ६ | जैन, कासार, गुजर, मारवाडी ... .... | २+१ |
| ७ | लिंगायत, वाणी, जंगम, तेली .... .... | १ |
| ८ | शिंपी .... .... .... .... .... | १ |
| ९ | सुतार, कुंभार .... .... .... .... .... | १ |
| १० | मुसलमान, भोरी .... .... .... .... .... | ४ |
| ११ | साळी, कोष्टी, लोहार, आहिर, आतार, ओतारी, बिसाटी .... .... | १ |
| १२ | माळी, भंडारी, जिनगर, तांबट, न्हावी, परीट, बुरूड, गवळी, धनगर, हणबर, सणगर, रंगारी, कलाल, पानारी, खाटीक. .... .... | २ |
| १३ | वडर, कोरवी, भोई, लोणारी, घडशी, पाथरवट, गवंडी, गोंधळी, जोशी, गोसावी, गुरव, राऊळ, डवरी, कोष्टी, इतर .... .... | १ |
| १४ | महार, चांभार, ढोर .... .... .... .... | १ |
| १५ | बेरड, वाजंत्री, कोल्हाटी, रामोशी, इतर .... .... .... | १ |
| १६ | भंगी .... .... .... .... .... .... | १ |
| १७ | कोमटी, परदेशी, पांचाळ, सोनार, भाटे, पार्शी .... .... | २ |
| १८ | रजिस्टर कंपन्या : ( पेढी, को. आ. सोसायटीज, कंपनी, मंडळी, मनुष्य-समूह, इमारतीचे अगर गहाणाचे ट्रस्टीज ) .... .... | १ |
| १९ | आर्यसमाजिस्ट .... .... .... .... .... | १ |
| २० | एज्युकेशनल बॉडीज .... .... .... .... | १ |
| २१ | मांग .... .... .... .... .... .... | १ |
| २२ | चांभार .... .... .... .... .... | १ |
| २३ | ढोर .... .... .... .... .... .... | १ |
| २४ | थिऑसॉफिकल सोसायटी .... .... .... .... | १ |

या जाहीरनाम्यांतील नियमांनुसार इ. स. १९२१ सालीं कोल्हापूर नगरपालिकेंत पुढील सभासद निवडून आले:—

## १९२१ ते १९२४

१ प्रो. कुंजीलाल दिलवाली, प्रेसिडेंट २ मे. दरबारसर्जनसाहेब बहाद्दूर, स्टेट करवीर ३ मे. रा. सा. ए. इंजिनिअर, स्टेट करवीर ४ रा. सा. दप्तरदार, इ. करवीर ५ रा. सा. मामलेदार पेटा करवीर.

## बिनसरकारी सभासद

१ रामचंद्र खंडेराव पारसनीस २ बाळकृष्ण रघुनाथ तेंडोलकर ३ दावीदराव बेकर ४ नारायणराव बाबाजीराव सावंत ५ कृष्णराव केदारराव चव्हाण ६ खंडेराव गोपाळराव बागल ७ बळवंत कृष्ण पिसाळ ८ ज्ञानोबा रामजी घाटगे ९ रामचंद्र ईश्वरराव गायकवाड १० आण्णाप्पा यशवंत लिंबेकर ११ भुजबळी भाऊ बहिरशेट १२ मारुती सदोबा सांगावकर १३ बाळा कृष्णा कुंभार १४ अबदुलरहिमान महमद अकीवटे १५ करिम सगुभाई कांडेकरी १६ अबदुलरहिमान आबा हुसेन १७ युसफअली महमदअली भोरी १८ दत्तो बाबाजी करजकर १९ आण्णा बाबाजी प्रसादे २० भीमा इराप्पा कलघटकी २१ सुभाना बाळा पंडित २२ गणपत बापूजी पवार २३ धोंडदेव रामचंद्र व्हटकर २४ दत्तात्रय संतराम पवार २५ जनार्दन लक्ष्मण कळंबेकर २६ तुकाराम रामचंद्र सरनाईक २७ रामचंद्र बळवंत मंडलीक २८ यशवंत कृष्ण दिलवर २९ चंद्रोबा गोविंदराव नरके ३० बळवंत महादबा बोंद्रे ३१ केशवराव हरि मिरजकर ३२ राजाराम बाळाराम परदेशी ३३ के. एस. हाजेला. ३४ यशवंतराव केळवकर ३५ तुकाराम आपाजी गणेशाचार्य वकील ३६ वासुदेव दत्तात्रय तोफखाने ३७ रघुनाथ वामन बापट ३८ बाबूराव यादव ३९ उबाळे वकील ४० बाळासाहेब घोरपडे ४१ विनायक गणेश पेंढारकर ४२ गणेश बाळकृष्ण गोकाककर ४३ लक्ष्मण बजापा मुदगल ४४ गजानन मारुती कोमटी ४५ मारुती लक्ष्मण बेरड ४६ देवकृष्ण मुरलीधर मारवाडी.

अशा रीतीनें नगरपालिका लोकनियुक्त झाली. या वेळचे अध्यक्ष मे. कासमअली हकीम यांनीं नगरपालिकेच्या कार्याकरितां बरेच परिश्रम घेतले. पण त्यांना आपल्या उत्तम कल्पना कृतींत आणणें शक्य झालें नाहीं. याचें पहिलें कारण म्हणजे अध्यक्षांना स्वतःचे असे अधिकार फार थोडे होते. दुसरें कारण असें कीं, सभासदांची संख्या वाजवीपेक्षां जास्त वाढविण्यांत आली व त्यामुळें नगरपालिकेंत एकसूत्रीपणा राहिला नाहीं. सभासद हे व्यक्तिशः चांगले होते व त्यांचे हेतूहि चांगले होते. पण कोणतेंहि भरीव कार्य होण्याला एकादा पक्ष स्थापून व कार्यक्रम पुढें ठेवून संघटितपणें कार्य करावें लागतें. पण यावेळीं अशा प्रकारचा कोणताच कार्यक्रम नसल्यामुळें व एकसूत्रीपणाच्या अभावामुळें नगरपालिकेच्या हातून लोकोपयोगीं कांहीं कार्य होण्याऐवजीं उलट



तींत अधिकच गोंधळ माजून राहिला. म्हणून १९२४ सालीं दरबारला नगरपालिका बरखास्त करणें भाग पडलें.

पुढें श्री. आण्णा बाबाजी लठ्ठे हे कोल्हापूरचे दिवाण झाल्यावर त्यांनीं इ. स. १९२५ सालीं नगरपालिकेचें पुनरुज्जीवन केलें व ब्रिटिश हिंदुस्थानांतील Bombay District Municipal Act 1901 हा वेळोवेळीं केलेल्या दुरुस्त्यासह येथें लागू केला. यालाच **कोल्हापूर स्टेट म्युनिसिपल ॲक्ट १९२५** असें म्हणतात.

या कायद्यान्वयें करवीर नगरपालिकेंत पुढील बदल घडून आले :—


(१) कोल्हापूर नगरपालिकेंत एकंदर ४० सभासद रहावयाचे असून त्यांपैकीं २० सरकारनियुक्त व २० लोकनियुक्त असावेत असें ठरविण्यांत आलें.

(२) लोकनियुक्त सभासदांपैकीं २ सभासद अस्पृश्य वर्गाच्या मतदारांनीं आपल्यापैकीं निवडावयाचे होते.

(३) नगरपालिकेचे सभासद निवडण्याचा हक्क म्युनिसिपल डिस्ट्रिक्टमध्यें राहणाऱ्या व आक्ट्रॉयखेरीज दरसाल रु. २ अगर त्यांहून अधिक कर नगरपालिकेस देणाऱ्यास प्राप्त झाला.

(४) नगरपालिकेचा अध्यक्ष निवडण्याचा अधिकार नागरिकांना प्राप्त झाला.

(५) १९२० सालच्या कायद्यानें जातवार मतदारसंघ बनविले गेले होते. पण या कायद्यानें जातवार मतदारसंघाऐवजीं हरिजनाखेरीज सर्व जातीधर्मांचे एकत्र संघ स्थापन झाले.



श्री. आण्णासाहेब बाबाजी लठ्ठे

(६) दस्तुरीऐवजीं ऑक्ट्रॉय कर बसविण्यांत आला व यामुळें नगरपालिकेच्या उत्पन्नाची वाढ झाली.

अशा रीतीनें पुनर्घटित नगरपालिकेचे जे सभासद निवडून आले त्यांचीं नांवें पुढें दिलीं आहेत:—

## १९२६–१९२९

## लोकनियुक्त सभासद

(१) चंद्रोबा गोविंदराव नरके (२) कृष्णराव दाजीराव माने (३) सीताराम कोंडो राजुरीकर (४) केशव हरी मिरजकर (५) रामचंद्र बळवंत मंडलीक (६) आण्णाप्पा यशवंत

लिंबेकर (७) मुजवल्ली भाऊ भैरवशेट (८) अबदुलरहिम महमद पटवेगार (९) बाळकृष्ण रघुनाथ तेंडोलकर (१०) बाबूराव नारायण रुईकर (११) महालिंगाप्पा सिद्दाप्पा तोडकर (१२) वि. सं. माने (१३) खंडेराव गोपाळराव बागल (१४) भाऊ भीमगौंडा पाटील (१५) कृष्णाजी आबाजी पाटील (१६) बापू राघोबा रोटे (१७) बळवंत कृष्ण विसाळ (१८) बाजीराव बळवंत गोरे (१९) दत्तू आबाजी पवार (२०) कोंडदेव महादेव शिंदे.

## सरकारनियुक्त सभासद

(१) रा. ब. धनवडे, एम. बी. बी. एस. (२) रा. सा. बी. पी. जगताप, एल. सी. ई. (३) रा. सा. डी. बी. माळी, बी. ए., एलएल. बी. (४) रा. सा. डी. एस. भोसले, बी. ए., एलएल. बी. (५) हकीम कासमअल्ली, बी. ए. (६) मिस् सोनूबाई चव्हाण (७) सौ. बाळकृष्ण (८) श्री. आर. आर. शिरगांवकर (९) श्री. राजाराम आर. शिरगांवकर, बी. ए., एलएल. बी. (१०) श्री. एम. डी. श्रेष्ठी, बी. ए., एलएल. बी. (११) श्री. सोळांकूरकर, बी. ए., एलएल. बी. (१२) प्रो. ए. सी. बोस, एम. ए. (१३) श्री. इब्राहिम हसनअल्ली (१४) मे. बाळासाहेब आनंदराव महागांवकर (१५) श्री. सुब्रह्मण्य अय्यर (१६) श्री. बाबूराव एच. यादव (१७) श्री. पांडुरंग शिवराम उपळेकर (१८) श्री. बाबूराव के. बोडके (१९) श्री. डी. एस. जाधव, बी. ए. (२०) श्री. माधव सी. गोंडे बी. ए.

ता. २८ जानेवारी १९२६ रोजीं या पुनर्घटित करवीर नगरपालिकेचा उद्घाटन समारंभ श्रीमत् छत्रपति राजाराम महाराज यांच्या हस्तें करण्यांत आला. त्यावेळीं त्यांनीं कोल्हापूर नगरपालिकेच्या प्राचीन व त्यावेळच्या स्थितीचें थोडक्यांत सिंहावलोकन करून उपयुक्त सूचनाही केल्या. श्रीमन्महाराज सरकार यांचें हें भाषण फार मननीय व महत्त्वाचें असल्यामुळें तें समग्र पुढें देणें योग्य वाटतें:—

" नगरपालिकेचे अध्यक्ष, सभासद व इतर सभ्य स्त्रीपुरुषहो,

नवीन नियमानें स्थापन झालेल्या आपल्या नगरपालिकेच्या उद्घाटन–प्रसंगीं भाग घेण्यांत मला फार आनंद वाटतो. खरोखर आपली नगरपालिका ही जुनी संस्था असून तिचा थोडा विस्कळीत इतिहास आहे. आतां ती नवीन क्षेत्रांत पदार्पण करीत आहे. आपल्या संस्थेचें प्राचीन काळीं जर सुसंगत स्वरूप असतें तर मी आज आपणांला बोलावलें नसतें. आपल्या संस्थेची घटना आतां पूर्णपणें बदलली आहे व आतां तुम्ही स्नेहभाव व सार्वजनिक सेवा या बुद्धीनें आपल्या कर्तव्याला प्रवृत्त झाला आहां. म्हणून मी या प्रसंगीं आपल्या संस्थेच्या भावी काळाविषयीं कांहीं महत्त्वाचें विचार सांगून नवीन घटना करण्यांत कोणतीं ध्येयें मी पुढें ठेविलीं होतीं याचें विवेचन करणें मला योग्य वाटतें. प्रारंभीं मी तुमचे अध्यक्ष श्री. श्रेष्ठी यांचें अभिनंदन करितों. त्यांना नागरिकांकडून नगरपालिकेचा पहिला बिनसरकारी अध्यक्ष होण्याचा बहुमान लाभलेला आहे. श्री. श्रेष्ठी, मला



अशी खात्री आहे कीं आपण आपल्या या जागेचा अभिमान बाळगाल. माझ्या राजधानीच्या नगरपालिकेचे पहिले बिनसरकारी अध्यक्ष म्हणून मी आपलें स्वागत करितों व आपल्या कार्यांत सुयश चिंतितों. आपली कारकीर्द ही मानास्पद ठरून ही जागा प्रमुख नागरिकांना अभिलषणीय वाटेल व माझ्या संस्थानांतील या नगरपालिकेच्या भावी अध्यक्षांना मार्गदर्शक ठरेल अशी मला आशा वाटते. तसेंच मी प्रत्येक लोकनियुक्त सभासदाचें अभिनंदन करितों व त्यांना सुयश चिंतितों.

नगरपालिकेचे सभासद हो, ज्यावेळीं मी तुमच्या संस्थेचीं किती स्थित्यंतरें झालीं याचा विचार करूं लागलों त्यावेळीं आपले अधिकार वाढवितांना, आपला अध्यक्ष निवडण्याचा अधिकार देतांना व तुमच्याजवळ अधिक उत्पन्न हवाली करितांना मी एक प्रयोगच करीत आहे असें मला वाटतें. हा प्रयोग यशस्वी ठरेल अशी मला खात्री वाटते. लोकनियुक्त व सरकारनियुक्त सभासदांचें प्रमाण मी अजून ठरविलें नाहीं. पण पुढील अनुभवांवरून सरकारनियुक्त सभासदांचें प्रमाण कमी होईल अशी मला आशा आहे. कोल्हापुरच्या नागरिकांनीं निवडणूक लढविल्याबद्दल मी जरी त्यांचें अभिनंदन करितों तरी त्यांनीं मतदानाच्या बाबतींत जितका उत्साह दाखवायला हवा होता तितका दाखविला नाहीं याकडे मी दुर्लक्ष करीत नाहीं. अशा प्रकारची ही पहिली निवडणूक आहे व पुढील निवडणुकींत लोकांकडून नागरिकत्वाची जबाबदारी अधिक चांगल्याप्रकारें पार पाडली जाईल अशी मला आशा आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कर्तव्याविषयीं जागरूक राहण्याची मी आपणांला व कोल्हापुरच्या नागरिकांना विनंति करितों. नगरपालिकेनें सोडवावयाचे प्रश्न इतके विविध व गुंतागुंतीचे आहेत कीं त्याविषयीं सभासदांच्या ठिकाणीं व सर्व जातींतील नागरिकांच्या ठिकाणीं फार वरच्या दर्जाच्या गुणांची जरूरी आहे. हे गुण संपादन केल्याखेरीज मागील काळाप्रमाणेंच भावी काळांतील प्रगतीला व्यत्यय येईल असें मला वाटतें. आपणांला हें स्मरतच असेल कीं तुमच्या नगरपालिकेच्या अयशस्वितेचीं तीन कारणें आहेत. (१) नगरपालिकेचे अंतिम पालक या नात्यानें नागरिकांची सहानुभूतिशून्य व तटस्थ वृत्ति. (२) सभासदांच्या चुकीच्या समजुती. त्यांना असें वाटत असें कीं आपण आपल्याखेरीज दुसऱ्या कोणालाहि जबाबदार नाहीं. व सार्वजनिक चळवळ प्रत्यक्ष कार्यापेक्षां पोकळ बडबड व वादविवाद यांतच आहे. (३) तिसरें कारण असें कीं नगरपालिकेंतील सभासदांत सहकार्य व सहिष्णुता यांचा अभाव होता. या तीन कारणांमुळें नगरपालिकेची प्रगति होऊं शकली नाहीं. भावी काळांत इतिहासाची जर पुनरावृत्ति झाली तर मी तुमचे अधिकार वाढविण्याचा प्रयत्न करीन.

सभ्य स्त्रीपुरुषहो, आणखी एका गोष्टीचा मी उल्लेख करितों. आपण हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, स्थानिक स्वराज्य म्हणजे केवळ अधिकाराचा उपभोग घेणें व कर्तव्याची कांहीं जाणीव नसणें असें नव्हें. भूतकाळांत ज्या गोष्टी घडून आल्या त्यांवरून आपणांला दिसून

येईल कीं तुम्हीं मोठी संधि गमावली. माझ्या दरबारनें कोल्हापुरांतील लोकांना घरांसाठीं अधिक जागा पुरविण्याची सोय केली असतां नगरपालिकेकडून शहरांतील जुन्या भागांतील दाट वस्ती कमी करण्याचा कांहीं प्रयत्न झाला नाहीं. या बाबतींत पन्नास वर्षांपूर्वीचें कोल्हापूर व आजचें कोल्हापूर यांत फारसा फरक दिसणार नाहीं. आतांपर्यंत कळंब्याचें तळें कितीतरी पाणी पुरविण्याला समर्थ असतां त्यांचे नाले सुधारण्याचे फारच थोडे प्रयत्न झाले. ड्रेनेजकडे पूर्ण दुर्लक्ष झालें व अरुंद बोळ व रस्ते रुंद करण्याचें काम पद्धतशीर झालें नाहीं. तसेंच उत्पन्नाकडेहि विशेष लक्ष दिलें गेलें नाहीं. तुमच्याकडून नगरपालिकेची तीस हजारांपेक्षांहि अधिक बाकी वसूल व्हावयाची आहे असें समजतें. अद्यावत शहरतपासणी करणें हें महत्त्वाचें काम कितीतरी वर्षांत झालेलें नाहीं, घरफाळ्याचें काम हलगर्जीपणें झाल्यामुळें नगरपालिकेनें आपला न्याय्य उत्पन्नाचा पुष्कळ भाग गमावला आहे. प्रत्येक ठिकाणीं नगरपालिकेच्या उत्पन्नाचा योग्य मार्ग आक्ट्राय कर हा समजला जात असतां येथें तुम्ही केवळ दस्तुरीवर समाधान मानत होता ही मोठी आश्चर्यकारक गोष्ट आहे. एका गवताच्या गाडीला जितकी दस्तुरी तितकीच एका सोन्याच्या गाडीलाहि द्यावी लागते. यावरून दस्तुरीची पद्धत सदोष आहे असें मला वाटतें. सगळीकडे आक्ट्रायचें उत्पन्न हें नगरपालिकेच्या उत्पन्नाचा न्याय्य मार्ग असें मानलें जातें. म्हणून येथेंहि दस्तुरीऐवजीं आक्ट्राय कर नुकताच सुरू केला. पण यामुळें कांहीं ठिकाणीं असंतोष निर्माण झाला याचें मला आश्चर्य वाटलें. नगरसुधारणा ही उत्पन्नाच्या वाढीवर अवलंबून आहे. व ही वाढ योग्य रीतीनें केली नाहीं तर शहरांतील लोकांच्या गरजा पुरविणें कठीण जाईल. मी तुमच्याकडे स्वतंत्र असें सार्वजनिक कार्याचें खातें सोंपविलें आहे. शाहूपुरी व शहर यांतील भागांत नगरवाढ करण्याच्या योजनांना मी मान्यता दिली असून अधिक पाण्याचा पुरवठा करण्याचे उपायहि मी अमलांत आणणार आहे. या सर्व योजनांना आर्थिक सुधारणेची आवश्यकता आहे. हें तुम्हांला एकदां पटल्यास मी नुकत्याच सुरू केलेल्या आक्ट्राय कराचें आपण स्वागतच कराल अशी मला खात्री वाटतें. या सर्व कारणांमुळेंच कांहीं विशिष्टप्रकारच्या सार्वजनिक कामाच्या योजनांना मान्यता देण्याचा अधिकार मजकडे ठेवला आहे. त्यापैकीं वर सांगितल्याखेरीज मेरीवेदर मार्केटचा मी उल्लेख करितों.

सभ्य स्त्रीपुरुषहो, अशा प्रकारचे दोष दाखवितांना मी चिकित्सक वृत्ति धारण केली असली तरी त्यांत आपली नगरपालिका अधिक कार्यक्षम बनावी हाच माझा हेतु आहे. भावी कालांतील तुमचें कार्य व तुम्ही मिळविणारे यश केवळ शहरालाच नव्हे तर एकंदर संस्थानला देखील महत्त्वाचें वाटेल. कारण यावरच आज तुम्हांला दिलेलें स्थानिक स्वराज्याचे हक्क कोल्हापुराबाहेरील माझ्या लोकांना देण्याबद्दल मला विश्वास वाटेल. याच ठिकाणीं माझ्या संस्थानांतील इतर नगरपालिकांची पुर्नघटना करण्यांत यावी असें मी सुचवितों. व या बाबतींत आपण त्यांना मार्गदर्शन कराल अशी मला खात्री वाटतें. जर आपली पात्रता माझ्या



प्रत्ययाला आली तर मी शहरांतील प्राथमिक शिक्षणाचें खातेंहि लवकरच तुमच्याकडे सोपविण्याची माझी इच्छा आहे. कालच मी म्हटल्याप्रमाणें माझ्या प्रजेवर माझा फार विश्वास आहे व आपल्या निरपेक्ष सार्वजनिक कार्यामुळें तो अधिकच वाढेल अशी मला खात्री वाटते.

हें भाषण संपविण्यापूर्वी जें नवीन तळें तयार होत आहे त्याला माझें नांव दिल्याबद्दल मी नगरपालिकेच्या सभासदांचे आभार मानतों. ही गोष्ट आपली मजवरील निष्ठा व्यक्त करिते व याबद्दल मला कृतज्ञता वाटते.

सभ्य स्त्रीपुरुष हो, मी पुन्हां एकदां या प्रसंगीं आपलें अभिनंदन करितों. माझ्या प्रामाणिक सदिच्छेप्रमाणें आपण कार्याला सुरवात करावयाला हरकत नाहीं. हल्लींच्या घटनेप्रमाणें तुम्हांस सुशिक्षित व सार्वजनिक कार्याची आवड असणारे स्त्री पुरुष लाभले आहेत व अशा सभासदांमुळें ही नगरपालिका मला व माझ्या प्रजेला अभिमानास्पद वाटेल अशी मला खात्री वाटते. तुमच्या कार्यांत मी पूर्ण सुयश चिंतितों व आपणांला मोठी जबाबदारी स्वीकारण्याची विनंति करितों."

श्रीमन्महाराज सरकार यांच्या या प्रोत्साहक भाषणानें नगरपालिकेच्या कार्याला प्रारंभ झाला. १९३२ सालीं पुन्हां नगरपालिकेच्या घटनेंत थोडासा बदल झाला. आजवर नगरपालिकेंत २० लोकनियुक्त व २० सरकारनियुक्त असे एकंदर ४० सभासद होते. पण १९३२ सालीं नगरपालिकेच्या विनंतीवरून लोकनियुक्त सभासदांची संख्या पांचांनीं वाढविली. म्हणजे नगरपालिकेंत लोकनियुक्त २५ व सरकारनियुक्त १५ असे ४० सभासद झाले. तसेंच मतदानाचा हक्क विस्तृत करून दरसाल ८ आणे घरफाळा देणाऱ्यास मतदानाचा हक्क देण्यांत आला.

इ. स. १९२९ ते १९४१ या कालांतील नगरपालिकेंतील सभासदांचीं नांवें पुढें दिलीं आहेत:—

## १९२९–३२

## लोकनियुक्त सभासद

(१) मि. यशवंतराव गोविंद पिंपळगांवकर, बी. ए., एलएल. बी. (२) मि. हणमंत कृष्णाजी साळोखे (३) मि. पुरुषोत्तम विष्णु काळे (४) मि. विनायक बळवंत महेकर बी. ए., एलएल. बी. (५) मि. दत्तात्रय कलावंत कोडोलीकर (६) डॉ. कृष्णराव केदारराव चव्हाण (७) डॉ. नारायणराव आनंदराव पोवार (८) डॉ. अबदुलरहिम महमद पटवेगार (९) मि. बापूराव तुकाराम देवरुखकर, बी. ए., एलएल. बी. (१०) मि. विष्णु चिंतामण गुणे, बी. ए. (११) डॉ. गणेश राजाराम कामत (१२) मि. अनंत भास्कर आळतेकर, बी. ए., एलएल. बी. (१३) मि. आण्णाराव आप्पाजी मुळे (१४) मि. देवेंद्र आप्पया मंगाज (१५) मि. तात्या बाबाजी सावंत (१६) मि. बापू दादा मंडपे (१७) मि. महादेव दत्तात्रय जोशी, बी. ए. (१८) मि. बाबूराव नामदेव ओंकार (१९) मि. कृष्णा परसू पोळ (२०) मे. सखाराम पांडुरंग सावंत, एम. ए., एलएल. बी.

## सरकारनियुक्त सभासद

(२१) रा. सा. शामराव संताजीराव भोसले, बी. ए., एल्एल् बी. (२२) डॉ. अनंत जखगोंडा पाटील, एम्. बी. बी. एस्. (२३) रा. सा. दत्तो दामोदर सोनटक्के, बी. ए., एल्एल्. बी. (२४) रा. सा. महमदुल्लाखान सादुल्लाखान हकीम (२५) मे. बाळासाहेब आनंदराव महागांवकर (२६) श्री. महादेव दुंडाप्पा श्रेष्ठी, बी. ए., एल्एल्. बी. (२७) डॉ. अप्पा महाराज पंडित, एम्. बी. बी. एस्. (२८) मे. विश्वनाथ संताजीराव घोरपडे (२९) मे. शंकरराव गोपाळराव दाभोळकर, बी. ए., एल्एल्. बी. (३०) मिस्. सोनुबाई श्रीधर चव्हाण (३१) सौ. बाळकृष्ण (३२) मे. सुबराव बसवंतराव गायकवाड (३३) प्रो. ए. सी. बोस, एम्. ए. (३४) प्रो. रामचंद्र काशीनाथ शिरोडकर, बी. एस्सी. (३५) मे. वसंत खंडेराव बागल, बी. ए., एल्एल्. बी. (३६) रा. सा. पांडुरंग बळवंत पाटील, बी. ए., एल्एल्. बी. (३७) श्री. सखाराम गोविंद विरकूड, बी. ए. (३८) श्री. गोपाळ कृष्णराव सरनोबत (३९) मि. जोहारअल्ली समसुद्दीन (४०) श्री. दत्तात्रय रामचंद्र मेहेंदळे.

## १९३२–१९३५

## लोकनियुक्त सभासद

(१) श्री. सदाशिव बळवंत कुलकर्णी (२) श्री. हणमंत कृष्ण साळोखे (३) गणपतराव लक्ष्मणराव साळोखे (४) श्री. रामचंद्र अनंत उमराणीकर (५) श्री. आण्णा यशवंत लिंबेकर (६) श्री. पुरुषोत्तम विष्णु काळे (७) श्री. विनायक बळवंत महेकर, बी. ए., एलएल. बी. (८) श्री. जनार्दन विष्णु वाळिंबे (९) श्री. बाबूराव नारायण रुईकर (१०) अबदुल रहिमान पटवेगार (११) श्री. अनंत गणेश जामसांडेकर (१२) श्री. अबदुलरहिम महमदसो आकिवाटे (१३) श्री. वसंतराव खंडेराव बागल, बी. ए., एलएल. बी. (१४) श्री. विश्वनाथ तुकाराम पाटील, बी. ए., एलएल. बी. (१५) श्रीपाद बळवंत हावळ, बी. ए., एलएल. बी. (१६) श्री. दादासाहेब व्यंकटराव सूर्यवंशी (१७) श्री. विष्णु चिंतामण गुणे (१८) श्री. जिन्नापा रामचंद्र मंडपे (१९) श्री. देवेंद्र आप्पया मंगाज (२०) श्री. गंगाराम सिदापा चौगुले (२१) श्री. देवगोंडा भीमगोंडा पाटील (२२) श्री. तुकाराम आपाजी गणेशाचार्य (२३) श्री. दत्तोबा आपाजी पोवार (२४) श्री. सखाराम पांडुरंग सावंत, एम. ए., एलएल. बी. (२५) शांतिनाथ तवनापा पाटणे

## सरकारनियुक्त सभासद

(१) प्रो. एन्. जी. शिन्दे, एम्. ए. (२) श्री. व्ही. एन्. घोरपडे (३) मिस् सोनुबाई चव्हाण (४) प्रो. ए. सी. बोस, एम्. ए. (५) रा. सा. एस्. एस्. फातरफेकर, बी. ए., एल्एल्. बी. (६) रा. सा. पी. बी. पाटील, बी. ए. एल्एल्. बी. (७) श्री. जी. एस्. दाभोळकर, बी. ए. एल्एल्. बी. (८) श्री. डी. व्ही. राशिंगकर (९) श्री. कृष्णाजी अबाजी पाटील (१०) श्री. हरी विठ्ठल शेवडे (११) श्री. जोहरअल्ली समसुद्दीन शेठ (१२) श्री. डॉ. एस्. व्ही.



काटे (१३) श्री. नारायण आनंदराव पवार (१४) श्री. तात्या बाबाजी सावंत (१५) श्री. डी. बी. पाटील.

## १९३५–३८

## लोकनियुक्त सभासद

१ मे. व्ही. टी. पाटील, बी. ए. एलएल. बी. २ मि. वामन दत्तात्रय अडके, बी. ए., एलएल. बी. ३ मि. सदाशिव बळवंत कुलकर्णी ४ मि. श्रीपतराव लक्ष्मणराव शिंदे ५ मि. गणपतराव लक्ष्मणराव साळोखे ६ मि. एस. आर. खोत, बी. ए., एलएल. बी. ७ मि. दादासाहेब रामचंद्रराव मोहिते बी. ए., एलएल. बी. ८ मि. एस. व्ही. किंकर ९ मि. अण्णापा यशवंत लिंबेकर १० मि. श्रीपाद तुकाराम वणकुद्रे ११ मि. शंकर बळवंत प्रभावळे १२ मि. बाबूराव नारायण रुईकर १३ मि. अनंत गणेश जामसांडेकर १४ मि. नरहर विष्णु जोशी, बी. ए., एल्एल्. बी. १५ मि. अनंत चिंतामण पंडित १६ मि. वसंतराव खंडेराव बागल, बी. ए., एलएल. बी. १७ मि. श्रीपाद बळवंत हावळ बी. ए. एलएल. बी. १८ मि. दादासाहेब व्यंकटराव सूर्यवंशी १९ मि. गंगाराम सिद्दापा चौगुले २० जयवंत रामचंद्र डुणुंग २१ मि. देवेंद्र अप्पया मंगाज २२ जिनाप्पा रामचंद्र मंडपे २३ मि. गणपत बापूजी पवार २४ मि. कृष्णाजी रामचंद्र व्हटकर २५ मि. शांतिनाथ तवनाप्पा पाटणे.

## सरकारनियुक्त सभासद

१ डॉ. एस. व्ही. शहा, बी. एससी., पीएच्. डी. २ प्रो. एन्. जी. शिंदे, एम्. ए., एलएल. बी. ३ मे. व्ही. जी. शिरगुरकर, बी. ए., एलएल. बी. ४ मि. बी. आर. कोल्हटकर, एम. ए., टी. डी. ५ मिस्. सोनूबाई चव्हाण, जी. ए. ६ डॉ. वाय. बी. डफळे, एम. बी. बी. एस. ७ मे. यशवंतराव घोरपडे मदभावीकर ८ मे. हिरोजीराव पाटणकर ९ मे. दौलतराव वाय. भोसले १० डॉ. मिस. इडीथ डिसील्व्हा, एल. सी. पी. एस. ११ मि. डी. एस. माने १२ मि. डी. व्ही. राशिंगकर १३ मि. एस. ए. जमादार, बी. ए., एलएल बी. १४ मि. डी. एस. दळवी १५ मि. एल. पी. वालावलकर, बी. एससी.

## १९३८–४१

## लोकनियुक्त सभासद

१ मे. शंकर गोपाळ दाभोळकर, बी. ए., एल्एल्. बी. २ मि. सदाशिव बळवंत कुलकर्णी ३ मि. वामन दत्तात्रय अडके, बी. ए., एलएल. बी. ४ मि. भानुदास तुकाराम सरनाईक ५ मि. बाबूराव आप्पाजी सासने ६ मि. शामराव गणपतराव मंडलीक, बी. ए., एलएल. बी. ७ मि. गोविंद दाजी पाटील, बी. ए., एलएल. बी. ८ मि. सीताराम व्यंकटेश किंकर

९ मि. शिवराम रामचंद्र खोत, बी. ए., एलएल. बी. १० मि. दत्ताजीराव संतरामराव माने ११ मि. शिवपाद विरुपाक्ष नष्टे १२ मि. युसफखान हैदरखान पठाण, बी. ए., एलएल. बी. १३ मि. श्रीपाद तुकाराम वणकुद्रे १४ मि. विश्वनाथ तुकाराम पाटील, बी. ए., एलएल. बी. १५ मि. श्रीपाद बळवंत हावळ, बी. ए., एलएल. बी. १६ मि. अनंत महादेव कुरणे १७ मि. वसंतराव खंडेराव बागल, बी. ए., एलएल. बी. १८ मि. अनंत चिंतामण पंडित १९ मि. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले २० मि. महादेव बाळाप्पा चौगुले २१ मि. देवेंद्र अपय्या मंगाज २२ प्रो. का. रा. आपटे, बी. ए., एलएल. बी. २३ मि. तुकाराम आपाजी गणेशाचार्य २४ मि. विष्णू गुंडोजी पोळ २५ मि. अनंत गणेश जामसांडेकर.

## सरकारनियुक्त सभासद

१ डॉ. ए. सी. बोस, एम्. ए., पीएच्. डी. २ प्रि. एम्. आर. देसाई, बी. ए., एम. एड्. ३ मि. डी. डी. बेकर ४ मे. शिवाजीराव नारायणराव तिरवडेकर ५ मि. वासुदेव लक्ष्मण काळे, बी. ए. ६ मि. दत्तात्रय गोपाळ पोवार, बी. एससी. ७ मि. महादेव ईश्वरराव खांडेकर ८ मे. बाळासाहेब आनंदराव महागांवकर ९ मे. दौलतराव यशवंतराव भोसले १० मे. हिरोजीराव हणमंतराव पाटणकर ११ मि. महमदकासम बालेखान शेख, बी. ए. एलएल. बी १२ मि. कृष्णराव बळवंतराव देसाई १३ मि. बाळासाहेब आमगोंडा पाटील १४ मि. एस. बी. पाटील, बी. ए., १५ मि. डी. बी. महाडीक, बी. एससी., एलएल. बी. (मि. पाटील यांनीं राजिनामा दिलेनें ता. ९।१०।३८ पासून नेमणूक) १५ मि. पी. ए. राणे, बी. ए.

इ. स. १९२१ ते १९४१ या काळांत करवीर नगरपालिकेचे अध्यक्ष पुढीलप्रमाणें होतेः—

प्रो. कुंजीलाल दिलवाली [ १९२१–२२ ] श्री. कासमअल्ली हकीम [ १९२२–२४ ]
श्री. एम. डी. श्रेष्ठी [ १९२६–२९ ] श्री. एस. पी. सावंत [ १९२९–३३ च्या जूनपर्यंत ]
श्री. व्ही. टी. पाटील [ १९३३–३९ ] श्री. दाभोळकर एस. जी. [ १९३९–४१ ]

आतां आपण इ. स. १९२१ ते १९४१ या काळांत नगरपालिकेनें कोणतीं कार्यें केलीं याचा विचार करूं. या काळांत नगरपालिकेनें पुढील कार्यें केलीं:—

१. गंगावेशीजवळ कुंभारतळें होतें. त्याचें पाणी फार गलिच्छ असून आसपासच्या लोकांना आरोग्याच्या दृष्टीनें उपद्रवकारक होतें म्हणून तें तळें मुजवून तेथें एक शोभिवंत बाग करण्यांत आली ( इ. स. १९३६–३९ ). या अत्युत्कृष्ट कामगारीबद्दल करवीरची जनता तत्कालीन अध्यक्ष श्री. व्ही. टी. पाटील यांची सदैव ऋणी राहील.

२. इ. स. १९३१–३२ सालच्या प्लेगच्या साथींत नगरपालिकेनें पुष्कळ लोकांना मोफत इनॉक्युलेशन केलें व प्लेगप्रतिबंधक उपाय योजिले.

३. अनेक अरुंद रस्ते रुंद करून कांहीं डांबरी केले.

इ. स. १९२१ ते १९४१ या कालांतील नगरपालिकेच्या जमाखर्चाचा तक्ता पुढें दिला आहेः—



| साल | घरपट्टी | दस्तुरी | पाणी पट्टी | इतर कर | विषारी पदार्थ कर | इमारतींचें भाडें | जागा विक्री उत्पन्न | खत विक्री | दंड | व्याज | डेट्स व डिपॉझिट्स | इतर | खाराळा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९२१–२२ | २७९०२ | २१८८२ | ३२१४६ | १७६५५ | ३५ | ४०५९९ | २५१७ | ११४६३ | २४ | ४९९४ | ३४३८५ | २०२५ | ... | १९५६२७ |
| १९२२–२३ | २२७६२ | ... | ११७६५ | १६७७९ | ४० | ४६३१९ | २२२६ | १९५५६ | ४० | ३९६१ | ३३९३२ | २६४४ | ... | १५१०२४ |
| १९२३–२४ | २३१८३ | ६९१० | ... | १६४३० | ३० | ४०९१३ | १७६४ | ११०८४ | ८७ | ५६०६ | २३४११ | ६८७० | ... | १३६२८८ |
| १९२४–२५ | २८०६० | २०७१० | ... | १८२७० | ३० | ३७९१६ | १६९७ | १६८७ | ४५ | ८८९२ | ३२३२६ | ८१३४ | ... | १७२९४७ |
| १९२५–२६ | २०५०६ | १५८३४ | ... | २०५५० | ३५ | ४३६३९ | ३७५ | ८६८८ | ८६ | ५५९ | ५८६२५ | ६३७० | ... | १७५२६७ |
| १९२६–२७ | २६१५५ | ६१३८८ | ... | २६८९० | २५ | ३४८०४ | १०५५ | ६२८८ | १८८ | ४८१९ | ३०१७३ | ८८५० | १००५१० | ३०११४५ |
| १९२७–२८ | ३३४९४ | ९२३७७ ऑक्ट्राय | ... ... | २७१३३ | ३० | ३३७९५ | ४७७७ | ८७२३ | ४६१ | ४००० | ९५८७४ | १२६४४ | ९२१९ } १२००० | ३३११४४ |

| साल | म्यु. बाबींचा कर | म्यु. मिळकतीपासून उत्पन्न | स्पेशल ॲक्टान्वयें वसूल | किरकोळ | ग्रॅंट्स व कॉंट्रिब्यूशन्स | कर्ज | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९२८–२९ | १७१५६३ | ५१५९६ | ... | ९२०९ | ... | २७००० | २५९३६८ |
| १९२९–३० | १६५४७८ | ४४९६० | ... | ८८१५ | ... | १८३२४ | २३७५७७ |

| साल | घरपट्टी | ऑक्ट्राय | इतर कर | विषारी पदार्थ कर | जागा विक्री | म्यु. इमारतींचें भाडें | खत-विक्री | दंड | व्याज | तसलमात | इतर | मार्केट फंड | जनावर विक्रीवरील कर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९३०–३१ | ५५०२९ | ८५३५६ | ४८०९० | २५ | ... | ३५९९९ | ५२५१ | ६१ | ४६३ | १०९९३३ | ९४६९ | ... | ९१६७ | ३५८८५२ |
| १९३१–३२ | ५८५१८ | ८६०१६ | ४७९३१ | २५ | ... | ३३०३८ | ८३४० | १२५ | ४४४ | ७४०३१ | ९५७१ | २०२४ | ५७४३ | ३२५८०६ |

| साल | नगरपालिकेचे कर व भाडें | नगरपालिकेच्या मालमत्तेचें उत्पन्न | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|
| १९३२–३३ | १९५१४९ | ४६७७० | ... | २४१९१९ |
| १९३३–३४ | २२११६२ | ४८३४४ | ... | २६९५६ |
| १९३४–३५ | २१०५४१ | ५१९५८ | ... | २६२४९९ |
| १९३५–३६ | २६६०३४ | ४७३६९ | ... | ३१३४०४३ |
| १९३६–३७ | २७२३५१ | ५११२८ | ... | ३२३४७९ |
| १९३७–३८ | २९९११७ | ४८३३१ | ... | ३४७४४८ |
| १९३८–३९ | २६९३२८ | ... | ४८५५३ | ३१७८८१ |
| १९३९–४० | २८०६८० | ४५५७२ | ९५५४ | ३३५८०६ |
| १९४०–४१ | २११५८९ | ३७४३० | १०१९५ | ३३९२१४ |

| साल | नोकर वर्ग | दिवाबत्ती | सफाई | सार्वजनिक कामें | शिक्षण | डेट्स व डिपॉझिट्स | पाणी खर्च | ड्रेनेज | महागाई भत्ता | क्षयीरोग्यांना मदत | इतर | खाराळा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९२१–२२ | १०७६० | १९४६५ | ४५७०५ | १९८३४ | ५६१ | २८६६४ | २७११६ | १६२४ | ... | ४००० | ३२७९ | ... | १६१०१२ |
| १९२२–२३ | १०२१३ | २०७४६ | ४९३२३ | २४७९६ | २०४२१ | ३८३०१ | ... | ६२९४ | ... | २००० | ५८५९ | ... | १७४९५३ |
| १९२३–२४ | १२२५२ | २०८१३ | ५२८३५ | ६७३९७ | १०३६१ | २७८१४ | ... | ३४६७ | ... | ... | १०१६७ | ... | २०५११५ |
| १९२४–२५ | ११४२० | २१२२६ | ५५१४३ | २९६५ | १०३६१ | ५६९२९ | ... | ... | ... | ... | ६०२७ | ... | १६४०७१ |
| १९२५–२६ | १८४२३ | २००८३ | ४८८७० | २४६३४ | १०३६१ | ३४४३१ | ... | ... | ... | ... | ६१७१ | ... | १६२७७३ |
| १९२६–२७ | १४६६८ | २५४३५ | ४८१७२ | ३५१७५ | १३५६१ | ७४४९६ | ... | ... | ... | ... | ३०७१८ | ६१६६६ | ३०३८९१ |
| १९२७–२८ | १८३६५ | ४०७५२ | ५८५९७ | १३२९२६ | ४३७५ | ५५६७५ | ... | ... | ... | ... | १००५९ | ४८०५५ | ३६८८०४ |

| | जनरल ॲडमिनिस्ट्रेशन व कर वसुली | लोक-संरक्षण | व्याज | आरोग्य व कामें | अमानत | विद्या-खातें | कॉंट्रिब्युशन्स | किरकोळ व सूट | शहरवाढ व सुधारणा | टर्मिनल टॅक्स व नोकर पगार | तसलमात | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १०२८–२९ | १८०१५ | ३६१८६ | ७२० | ९५३६५ | २४३३० | १७५६५ | ... | ४७०७ | ६३३३४ | ३२०३ | ५४३६३ | ३१७७७८ |
| १९२९–३० | २२८५८ | १४६९४ | २९६० | ११५०२७ | १८४४६ | १८४२८ | ... | ५५८२ | ४३३६८ | २८५० | ४५५६२ | २८९७७५ |

| | नोकर वर्ग | दिवाबत्ती | सफाई | सार्वजनिक कामें | शिक्षण | तसलमात | इतर | शहरवाढ व सुधारणा | व्याज | कोल्हापूर दरबारचें देणें | ट्राफिक ड्युटी पोलिस चार्जीस | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९३०–३१ | २४४०५ | ५२२४३ | ६९९१९ | ५४०९० | १४०२५ | ५६५९५ | १३७३४ | ४५९६० | ३४६८ | ५००० | ५००० | ३४४४३९ |
| १९३१–३२ | ६२२०३ | ३८४९० | ६८२७८ | ३९८८९ | १४१९७ | ७०८८९ | १२३९० | ५०१५२ | ३४३९ | ५००० | ५००० | ३२७९२७ |

| | जनरल ॲड्मिनिस्ट्रेशन पेन्शन व ग्रॅच्युइटीज् | लोक-संरक्षण | आरोग्य व सार्वजनिक कामें | सार्वजनिक कामें | दिवाणी फौजदारी कामांचा खर्च | इतर | सार्वजनिक संस्था | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९३२–३३ | १८५२५ | ४३३२८ | ८८४७३ | ३७७४८ | २७१४ | ४०५९७ | १४१२५ | २४५५१० |
| १९३३–३४ | १६७८६ | ५०५५० | ८१७४२ | ५००६३ | ... | ४३९३६ | १४१२५ | २५७२०२ |
| १९३४–३५ | १९३९० | ४१९४३ | ९३५७४ | ४२४२८ | ... | ५०२४७ | १३९०० | २६१४८२ |
| १९३५–३६ | ३३५७४ | ४३१२० | ९२३६० | ३६०४९ | ... | ५९७३५ | १४९२५ | २९९७६४ |
| १९३६–३७ | ३७५७९ | ४८६६४ | १०३१०५ | ४०३६१ | ... | ७१४९९ | १४९२५ | ३१६१३३ |
| १९३७–३८ | २८८५० | ४२१६९ | १०२५३३ | ५६३०४ | ... | ४२३७९ | १४९२५ | २८७१६० |
| १९३८–३९ | ३६४०३ | ५२०२८ | १०८३१० | ८२४८५ | ... | २१९२९ | १४९५५ | ३१६०८० |
| १९३९–४० | ३१०२७ | ३६९७५ | ११२५२९ | ६७४३५ | ... | ४२७६६ | १५९७६ | ३०६६४८ |
| १९४०–४१ | ३३२२५ | ४५८०९ | १२०४३१ | ७७३६१ | ... | २३४६१ | १६९२५ | ३२७०५२ |



नगरपालिकेच्या कामगिरीबरोबरच दरबारनें केलेल्या कामगिरीचाहि येथें उल्लेख केला पाहिजे. कारण दरबारच्या या कामगिरीमुळें नगरसौंदर्यांत स्पृहणीय भर पडली. श्री. लठ्ठे हे दिवाण झाल्यावर त्यांनीं नगरसुधारणेचीं अनेक कामें हातीं घेऊन तीं कुशलतेनें पार पाडलीं. तदनंतर तेंच उदार धोरण रावबहाद्दूर दादासाहेब सुर्वे यांनींहि चालू ठेविलें व त्यामुळें शहरसुधारणेच्या दृष्टीनें बरीच भरीव कामगिरी झाली. या कालांत नगरसौंदर्याच्या दृष्टीनें उपयुक्त अशीं पुढील कार्यं घडून आलीं:—

१. **आयर्विन म्यूझियम**:—१९२६ सालीं कोल्हापूर येथें शेतकरी प्रदर्शन भरलें होतें व त्याच वेळीं आयर्विन म्यूझियम ही सुंदर इमारत बांधली गेली.

२. **कै० छत्रपति श्री शाहू महाराजांचा पुतळा**:—इ. स. १९२७ सालीं श्रीमन्महाराज शाहू छत्रपति यांचा भव्य पुतळा उभारण्यांत आला.

३. **छत्रपति प्रिन्स शिवाजी महाराज यांचा पुतळा**:—या कालांतच प्रिन्स शिवाजी यांचा अश्वारूढ पुतळा बसविण्यांत आला.

४. **खाराळा** व **शाहूपुरी** या भागांत नवीन वस्ती वाढविण्यांत आली. [१९२७–२८]

५. **लेस्ली वुइल्सन पूल**:—१९२७ सालीं लेस्ली वुइल्सन हा पूल बांधण्यांत आला. यामुळें शाहूपुरी व शहर यांतील रहदारीला पुष्कळ मदत झाली.

६. **श्री. लक्ष्मीबाई महाराणीसाहेब यांचा पुतळा**:—इ. स. १९२९ सालीं श्री. महाराणी लक्ष्मीबाईसाहेब यांचा पुतळा बसविण्यांत आला.

७. **शालिनी पॅलेस**:—या कालांतच रंकाळ्याच्या तीरावर शालिनी पॅलेस हा भव्य प्रासाद बांधण्यांत आला.

८. त्याचप्रमाणें गुजरी, भाऊसिंगजी रोड, सर विल्सन रोड वगैरे कांहीं रस्ते रुंद करणेंत आले.

९. लक्ष्मीपुरी, राजारामपुरी, साइक्स ॲव्हेन्यू व ताराबाई पार्क वगैरे वसाहती निर्माण झाल्या, व शहराची अभूतपूर्व वाढ झाली.

येथपर्यंत इ. स. १९२१ ते १९४१ या कालांत कोल्हापूर नगरपालिकेची स्थिति कशी होती याचा ऊहापोह केला. या कालांत विशेष महत्त्वाचें उल्लेखनीय असें फारसें घडून आलें नाहीं. नगरपालिकेचें नेहमीचेंच काम संथपणें चाललें होतें. या संथ प्रवाहाला १९४१ त ‘स्थानिक–स्वराज–संघ’ स्थापन झाल्यामुळें व त्या संस्थेच्या मार्फत नगरपालिकेच्या निवडणुकी लढविण्यांत आल्यामुळें पहिला धक्का बसला. म्हणून त्या बाबतींतील सर्व हकीकत पुढील प्रकरणीं निवेदन करूं.

# प्रकरण ८ वें

# क्रांतिकाळ

## ( १९४१–१९४८ )

इ. स. १९४१ ते १९४४ हीं चार वर्षे नगरपालिकेच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखीं होतील. या काळांत नगरपालिकेंत जे बदल झाले, नागरिकांमध्यें जी जागृति झाली व शहर सुधारणेच्या दृष्टीनें जें भरीव कार्य झालें, तितकें एवढ्याच मुदतीच्या दुसऱ्या कोणत्याहि काळांत झालेलें नाहीं. म्हणून या चार वर्षांतील घडामोडींचा फार सखोल अभ्यास करणें जरूर आहे.

ता. ८ मार्च १९४१ रोजीं नगरपालिकेची त्रैवार्षिक निवडणूक होणार होती. अत्यंत पद्धतशीर रीतीनें या निवडणुकी लढवावयाच्या, नगरपालिकेंत बहुमत मिळवावयाचें व मोठ्या प्रमाणावर शहराची सुधारणा करावयाची, या हेतूनें **स्थानिक स्वराज्य संघ** नांवाची संस्था स्थापिली गेली. तिच्या तर्फे श्री. माधवराव बागल, शेठ गोविंदराव लक्ष्मणराव कोरगांवकर व श्री. रत्नाप्पा भरमाप्पा कुंभार या तिघांचें एक नियंत्रण मंडळ स्थापलें गेलें. या संघाचें उद्दिष्ट कोणतें व कार्यक्रम काय होता, हें त्यांच्या शब्दांतच सांगणें बरें.

### संघाची भूमिका

करवीर नागरिकांची, कसलाहि भेदाभेद न मानतां, निरपेक्ष सेवा करणें, हें या संघाचें ध्येय आहे. संघाचा इतर कोणत्याहि राजकीय संस्थेशीं संबंध नाहीं. दरबारनें स्थानिक स्वराज्याचे जेवढे हक्क जनतेच्या हवालीं केले आहेत, त्यांचा पुरेपूर उपयोग करून घेणें, हें या संघास आपलें कर्तव्य वाटतें. स्वराज्याचा कारभार चालवण्याचें शिक्षण स्थानिक स्वराज्यांतून सहजच मिळणार आहे. यासाठीं म्युनिसिपालिट्या, ग्रामपंचायती, इलाखा पंचायत वगैरे स्थानिक स्वराज्य संस्था लोकांना ज्यास्तींतज्यास्त उपयोगी होतील अशा प्रकारें वापरल्या गेल्या पाहिजेत. पण व्यक्तिनिष्ठ, फुटकळ, विस्कळित गटांच्या हातून किंवा एकांडे शिलेदारांचे हातून हें होणें शक्य नाहीं, ही अनुभवानें सिद्ध झालेली गोष्ट आहे. लोकहिताचा कार्यक्रम निश्चित करून आणि त्याप्रमाणें काम करण्यासाठीं आपखुषीनें स्वतःस प्रतिज्ञेवर बांधून घेऊन जे लोकसेवक निःस्वार्थीपणानें व संघटितपणें काम करण्याची हमी देतील, त्यांचेच हातून हें काम होऊं शकेल. त्यांच्या मागें सगळा संघ उभा असतो. संघाच्या मागें संघाला निवडून आणणारी जनता उभी असते. म्युनिसिपालिटींत किंवा म्युनिसिपालिटीबाहेर त्यांना लोकांचा पाठिंबा असतो. यामुळें लोकांच्या हिताचा—सत्याचा—कायदेशीर मार्ग ते केव्हांहि टाकीत नाहींत. ते जनतेचे खरे हितचिंतकच राहतील. म्हणून संघाला आत्मविश्वास वाटतो कीं, संघाकडून हें काम होऊं शकेल.



## भाई माधवरावजी बागल



भाई माधवरावजी बागल हे कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेनें नगरपालिकेच्या निवडणुका लढविण्यासाठीं नेमलेल्या पहिल्या नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष होते (१९४१–४३). त्यावेळीं प्रजापरिषदेनें स्थापिलेल्या स्थानिक स्वराज्य संघानें २५ पैकीं २२ जागा जिंकल्या होत्या. नंतर १९४५ सालीं पुनः नगरपालिकेच्या निवडणुका झाल्या, त्यावेळीं ३० पैकीं २८ जागा प्रजापरिषदेनें जिंकल्या. त्यानंतर १९४२ व १९५२ सालीं पुनः भाई माधवरावजीच नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष होते व त्यावेळीं अनुक्रमें ४० पैकीं ३७ व ४४ पैकीं २२ जागा त्यांच्या नेतृत्वाखालील पक्षानें मिळविल्या. अशा रीतीनें भाई माधवरावजींचा नगरपालिकेच्या कारभाराशीं एक तपाहून अधिक काळाचा संबंध आहे. त्यांच्याच प्रयत्नामुळें नगरपालिकेच्या कामगारांना अनेक सवलती मिळाल्या आहेत. त्यांनीं केलेल्या कोल्हापूर संस्थानच्या व शहराच्या अतुल सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याच्या हेतूनें राजारामपुरींतील भव्य मंडईला त्यांचें नांव देण्यांत आलें आहे.

आणि याचसाठीं कोल्हापूर शहर म्युनिसिपालिटीची येती निवडणूक संघातर्फे लढविण्यांत येत आहे.

## करवीर नगरीचा स्थानिक कारभार

शहरांतील जनता व म्युनिसिपालिटीचे सभासद अशा दोघांसहि म्युनिसिपालिटीच्या कारभाराबद्दल आजपर्यंत असावी तितकी आस्था दिसून आली नाहीं, असें मोठ्या खेदानें कबूल करावें लागतें. कोल्हापूर हें पुण्यश्लोक छत्रपति श्री. शिवाजी महाराज यांच्याबद्दलच्या पवित्र आठवणी अंतःकरणांत उत्पन्न करणारें असें एक इतिहासप्रसिद्ध शहर आहे, तसेंच तें एक व्यापारी, शैक्षणिक, औद्योगिक व कलेचें केंद्र होत आहे. शहराचा विस्तार सारखा वाढत आहे. लोकवस्ती एक लाखापर्यंत आली आहे. अशा करवीर नगरीच्या स्थानिक स्वराज्याचा कारभार आदर्शभूत व्हावा, कोल्हापूर म्युनिसिपालिटीबद्दल नागरिकांना आपलेपणा व जिव्हाळा वाटेल अशीं कामें तिच्या हातून व्हावींत, कोल्हापुरांत रोगराई उत्पन्न होऊं नये, हरिजन वाड्यापासून तों ताराबाई पार्कपर्यंत शहरांतील सर्व विभागांत स्वच्छता, मुबलक पाणी-पुरवठा, प्रकाशाची सोय, उत्तम रस्ते वगैरे सोयी असाव्यात, असें कोणास वाटणार नाहीं? पण संघटनेशिवाय हें व्यर्थ आहे. ही उणीव भरून काढण्याचा इरादा आहे.

## जागे व्हा, हक्क समजून घ्या.

कोल्हापूर म्युनिसिपालिटीचें वार्षिक उत्पन्न ३॥ ते ४ लाख रुपयांचें आहे. तीन वर्षांत १०-१२ लाख रुपयांची उलाढाल व्हावयाची असून हा आपल्या एवढ्या मोठ्या सार्वजनिक पैशाचा कारभार कोणाच्या हातीं द्यावयाचा, तें जनतेनें मनाशीं ठरविलें पाहिजे. मत देतांना आपण टाकणारी प्रत्येक फुली म्हणजे १२ लाख रुपयांच्या उलाढालीचे सूत्रधार ठरवण्याचा प्रश्न आहे, हें लोकांनीं समजून घ्यावें. तीन वर्षांत दर डोईस सरासरीनें १४ रुपयांचा म्युनिसिपल कराचा बोजा बसतो. या कराचा उपयोग कसा होतो, तें डोळे उघडून लोकांनीं पहायला शिकलें पाहिजे. म्युनिसिपालिटीचे १२,००० मतदार आणि मतदार नसणारी अन्य जनता या सर्वांनीं आपल्या म्युनिसिपल हक्कांविषयीं आणि अधिकारांविषयीं जागरूक राहावें, असें सांगणें मुख्यतः या संघाचें काम आहे.

## कामाच्या पद्धतीचा ठोकळ आराखडा

"करवीर स्थानिक-स्वराज्य संघ," ही एक लोकांसाठीं झटणारी, त्यांचे हक्क रक्षण करणारी, त्यांच्या हक्कांसाठीं भांडणारी, अधिक हक्क मिळवून देणारी, संस्था राहील. संघातर्फे निवडून येणारे म्युनिसिपालिटीचे कौन्सिलर्स हे स्वार्थ, भीड, दडपण अशा गोष्टींना बळी पडणार नाहींत. त्यांच्यावर संघाची नजर रोखलेली असेल, त्यांच्या पाठीमागें संघाची म्हणजे जनतेची शक्ति उभी असेल, म्युनिसिपालिटीच्या सभासदांनीं व नोकरवर्गानें लोकांचे म्युनिसिपल हक्कांचें रक्षण करावें, लोकांशीं सेवाधर्माच्या भावनेनें वागावें, असें संघाचें धोरण राहील. संघाच्या

मध्यवर्ति व वॉर्डवार कचेऱ्यांमार्फत सभासदांवर लोकांचें नियंत्रण राहून अडीअडचणींची आणि तक्रारींची लवकर दाद लागण्यास सोपें होईल. संघातर्फेचे म्युनिसिपल कौन्सिलर्स हे शहराच्या कोनाकोपऱ्यापर्यंत वारंवार फिरून, तसेंच वेगवेगळ्या भागांतील रहिवाशांना एकत्र जमवून लोकांच्या सोयी-गैरसोयी पाहतील.

## सवंग-सुकाळ वचनें नाहींत.

मतें मिळविण्याकरितां कांहीं लोकांना अगर गटांना राजी राखण्याचे उद्देशानें सवंग-सुकाळ वचनें देणें, संघास समूहतः तसेंच संघातर्फेच्या उमेदवारांना व्यक्तिशः इष्ट वाटत नाहीं. सामान्यपणें कोणत्या गोष्टी करणें संघाला योग्य व जरुरीचें वाटतें त्या पुढें दिल्या आहेत. लोकहितांचीं कामें करण्याचें सामर्थ्य म्युनिसिपालिटीस येण्यासाठीं काय होणें आवश्यक आहे, तेंहि पुढें नमूद केलें आहे. आमच्या मार्गांतील त्या महत्त्वाच्या अडचणी होत. जनता जागृत झाल्यास त्या अडचणी दूर करतां येतील, अशी उमेद वाटते. लोकांचें सहकार्य आणि दरबारची सहानुभूतिपूर्ण मदत मिळवून जो कार्यक्रम अमलांत आणणें योग्य वाटतें, त्यांपैकीं कांहीं गोष्टी येथें देत आहोंत.

## योजलेल्या कार्यक्रमाचें सर्वसाधारण स्वरूप.

**घटनात्मक—**

१. स्थानिक स्वराज्यांत खऱ्या लोकशाहीचा संचार होण्यासाठीं सर्व सभासद लोकनियुक्त असावेत, म्युनिसिपालिटींतील हल्लींची नॉमिनेशन पद्धत खालसांतल्याप्रमाणें बंद होणें अत्यावश्यक आहे.

२. सामान्यतः दोन लाखापुढील उत्पन्नाच्या म्युनिसिपालिट्यांचा कारभार 'म्युनिसिपल बरोज ॲक्ट' प्रमाणें चालणें अत्यंत जरुरीचें असतें. 'डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल ॲक्ट' प्रमाणें कोल्हापूर म्युनिसिपालिटीचा कारभार चालत असून कामें रेंगाळत पडण्याचें तें एक महत्त्वाचें कारण होय, म्हणून येथें 'म्युनिसिपल बरोज ॲक्ट' लागू केला जावा.

३. नागरिकांच्या सुखसोयी वाढवण्यासाठीं म्युनिसिपालिटीचें उत्पन्न वाढलें पाहिजे, गरीब जनतेवर कर न वाढतां उत्पन्न वाढण्यासारखें आहे. दारूची भट्टी, शुगर मिल, शाहू मिल यांचे बाबतींत ऑक्ट्राय कराचें उत्पन्न मिळणें वाजवी आहे. एवढ्या मोठ्या बाजारपेठेचें ऑक्ट्राय कराचें उत्पन्न फक्त दीड लाख रुपये असून करवाढ न करतां तें वाढवतां येण्यासारखें आहे. तसेंच व्हील टॅक्स, पेट्रोल-फंड, करमणुकीवरील कर, म्युनिसिपल हद्दींतील जागांच्या विक्रीचें उत्पन्न म्युनिसिपालिटीस मिळणें वाजवी आहे.

४. शहरांतील प्राथमिक शिक्षणाबाबत दरबारकडून योग्य ग्रँट मिळून तें खातें म्युनिसिपालिटीकडे चालवण्यास मिळावें. तोंपर्यंत म्युनिसिपालिटीस सालीना तेरा हजार रुपये दरबारकडे भरावे लागतात ते लागू नयेत.



५. पाणीपुरवठा ही नागरिकांच्या जीवनास सर्वांत जरुरीची बाब असून, ती म्युनिसिपालिटीच्या संपूर्ण अखत्यारांतील असणें वाजवी आहे. गंजल्यामुळें नळ जागजागीं फुटून पाण्यांत अपायकारक द्रव्यें विरून लोकांच्या आरोग्यावर घातुक परिणाम होतो. नळ बदलून घेतले पाहिजेत. लोकांच्या स्वास्थ्यासाठीं व सोयीसाठीं नळखातें व पाणीपुरवठ्याची व्यवस्था सर्व शिलकेसह म्युनिसिपालिटीस परत मिळणें जरूर आहे.

६. प्रकाशपुरवठ्याची सध्यांची योजना दुसऱ्या कोणत्याहि म्युनिसिपालिटीपेक्षां अत्यंत महाग व डोईजड आहे. सबंध उत्पन्नाच्या एकदशांशापेक्षां जास्ती खर्च यावरच होत आहे. ही परिस्थिति सुधारून फायद्याची योजना अमलांत येणें जरूर आहे.

७. शहरालगत नवी वसाहत करण्याच्या बाबतींत म्युनिसिपालिटीस अधिकार असावा. तसें नसल्यानें वसाहत अगदीं गैरशिस्तपणें वसली जाऊन तिची व्यवस्था नीट ठेवणें अवघड जातें. ऑक्ट्राय करांतून वसाहतीसाठीं म्युनिसिपालिटी दरसाल **वीस हजार रुपये ग्रँट देत असून,** वसाहतीपासून म्युनिसिपालिटीस उत्पन्न मात्र कांहींच येत नाहीं. वसाहत खातें सर्वस्वीं म्युनिसिपालिटीकडे असावें.

८. म्युनिसिपल हद्दींतील दारूचे गुत्ते, अबकारी दुकानें, रेस-बेटिंग ऑफिसें यांजवर नियंत्रणाचे अधिकार म्युनिसिपालिटीस असावेत. नागरिकांच्या स्वास्थ्याच्या दृष्टीनें त्यांच्या संख्येचे व उघडी राहाण्याच्या वेळेचें नियमन करणें, विशिष्ट लोकवस्तींत तीं ठेवणें अगर न ठेवणें अशा स्वरूपाचा हा अधिकार असावा.

**कारभारविषयक—**

१. म्युनिसिपालिटींतील नोकरवर्गाची कार्यक्षमता वाढवणें आणि पद्धतशीर स्केल लागू करणें, या बाबत योजना ठरवली जाईल.

२. कांहीं जबाबदार धनिक लोकांकडे फाळ्याची बाकी बरीच येणें असून सध्यां थकबाकी एक लाख रुपयांवर गेली आहे. अशी वसूल होण्याजोगी बाकी सत्वर वसूल करून यापुढें थकबाकी राहणार नाहीं, अशी दक्षता घेतली जाईल.

३. घरफाळ्याची आकारणी बरीच सदोष झाली आहे. अशी तक्रार सार्वत्रिक आहे. आकारणी समाधानकारक करून निःपक्षपाती धोरण ठेवलें जाईल. हॉटेल्स व पानविडीचीं दुकानें यांच्यावरहि कर आकारणीबाबत अन्याय झाला असून, रस्त्याची जी वर्गवारी या कारणासाठीं केली, ती सदोष आहे अशीहि जोराची तक्रार ऐकूं येते. हा अन्याय दूर केला जाईल.

**शहरसुधारणाविषयक—**

१. शहरांतील बाजूच्या व गरीब लोकांच्या वस्तींत साफसफाई, ड्रेनेज, दिवाबत्ती, रस्ते, या बाबतींत नीट व्यवस्था ठेविली जाईल.

२. म्युनिसिपालिटीच्या हरिजन नोकरवर्गासाठीं राहण्यास पद्धतशीर व्यवस्था आणि पाणीपुरवठा करण्याकडे विशेष लक्ष दिलें जाईल.

३. रविवारीं भरणाऱ्या बाजाराची जागेच्या अभावीं होणारी सध्यांची कुचंबणा नाहींशी केली जाईल.

४. शहरांतील घाण तळीं जरूर तर कांहीं बुजवून बाकीचीं स्वच्छ राखण्यांत येतील. ठिकठिकाणीं मोकळ्या जागीं मुलांसाठीं बगीचे व खेळण्याच्या जागा करण्यांत येतील.

५. म्हशी पिळण्याच्या सार्वजनिक जागा अत्यंत गलिच्छ असून, उन्हाळ्या–पावसाळ्यांत धुळीचे लोट व चिखलाची खिरडी यांमुळें आरोग्यास विघातक होतात. त्या जागीं पक्की फरशी घालून, गोठे करण्यांत येतील.

६. प्रसूति–गृहाची सोय करून तें गरिबांसाठीं मोफत चालवलें जाईल व तसेंच शिशुसंगोपनाबाबत व्यवस्था केली जाईल.

७. मोटार–स्टँडचें आवार सीमेंट काँक्रीटचें करण्यांत येऊन तेथें वेटिंग रूम करून मोटार–स्टेशनचें स्वरूप देण्यांत येईल.

८. ड्रेनेजची व ठिकठिकाणीं मुतऱ्या व संडास योग्य प्रमाणांत बांधण्याची योजना ठरवून क्रमाक्रमानें पुरी केली जाईल. बाजूच्या पेठांतील रस्ते व बोळ सीमेंटचे करण्याची ६ वर्षांची योजना निश्चित केली जाईल.

**शैक्षणिक—**

१. आरोग्य, रोगप्रतिबंध, शहराची सुधारणा, स्वच्छता यांसंबंधीं लोकांत आस्था उत्पन्न करण्यासाठीं कार्यक्रम ठरवून निश्चित योजना आंखली जाईल.

२. व्यायामविषयक शास्त्रोक्त शिक्षण देणाऱ्या आखाड्यांना व देशी खेळांच्या सामने-संस्थांना सहाय्य केलें जाईल.

३. निरनिराळ्या विभागांत रात्र–शाळा काढून प्रौढशिक्षणास चालना देऊन मोफत वाचनालयें काढण्यास उत्तेजन दिलें जाईल.

४. जागोजाग रेडिओ बसवून लोक–शिक्षण देण्याचा उपक्रम केला जाईल.

५. म्युनिसिपल कारभाराची लोकांना माहिती पुरविण्यासाठीं म्युनिसिपल गॅझेट काढण्यांत येईल.

**मताधिकारांचें पावित्र्य ओळखा व संघाच्या उमेदवारांनाच मतें द्या.**

सामान्यतः निदर्शनास येणाऱ्या कांहीं बाबींचा वर उल्लेख करण्यांत आला आहे. अर्थात् एवढ्यानेंच संपलें असें नाहीं. या गोष्टी घडवून आणण्याच्या मार्गांतील अडचणी व आमचें मर्यादित सामर्थ्य यांची संघास जाणीव आहेच. ४० सभासदांपैकीं १५ सभासद दरबारनें नेमून पाठवावयाचे असून फक्त २५ सभासद लोकांनीं निवडावयाचे आहेत. निश्चित कार्य होण्यास म्युनिसिपालिटींत जें बहुमत असावें लागतें तें होण्यास ही अडचण आहे.



यामुळें तर मतदारांवर संघाच्या सर्व उमेदवारांना निवडून आणण्याची जास्तच जबाबदारी पडते.

मतदार बंधूंनीं आपलें मत हा एक जनताजनार्दनाचा पवित्र ठेवा आहे, हें लक्षांत ठेवावें. एखादा माणूस अगोदर भेटला, त्याच्याशीं आणाभाका झाल्या एवढ्याच कारणासाठीं जनतेचें नुकसान करण्यास आगांतुक गोष्टींचा विचारहि मनास शिवूं देऊं नये. मतदानाच्या हक्काचें महत्त्व नीट ओळखावें आणि येत्या ता. ८ मार्च १९४१ रोजीं होणाऱ्या म्युनिसिपालिटीच्या निवडणुकींत संघाच्याच सर्व उमेदवारांना निवडून आणावें आणि संघाकडून, सेवा करून घ्यावी. सेवा करावी अशी आमची इच्छा आहे. नागरिकांच्या सहकार्यानेंच हा आमचा हेतू तडीस जाणार आहे. तरी संघाच्याच उमेदवारांना मतें द्या. त्यांना निवडून आणा आणि संघाकडून सेवा करून घ्या, एवढीच आमची नम्रतापूर्वक विनंति आहे.

अशा रीतीनें एक संघटित प्रयत्न करून नगरपालिकेची निवडणूक लढविण्याचा हा पहिलाच प्रसंग होय व त्या दृष्टीनें निवडणुकींना कायमचें ऐतिहासिक महत्त्व आहे. करवीर जनतेनें देखील स्थानिक स्वराज्य संघाच्या उमेदवारांना फार चांगला पाठिंबा दिला व एकंदरींत निवडावयाच्या २५ जागांपैकीं २२ जागा संघाच्या उमेदवारांनीं जिंकल्या. हरिजनांच्या दोन जागा व ग्रॅज्युएट्स वॉर्डाची एक जागा अशा तीन जागा मात्र संघाला मिळवितां आल्या नाहींत.

अशा रीतीनें जी नगरपालिका १९४१ सालीं अधिकारारूढ झाली, तिच्यामध्यें पुढें दिलेले ४० सभासद होते. यांपैकीं पहिले २२ सभासद स्थानिक स्वराज्य संघाचे आहेत:—

१ श्री. वसंतराव खंडेराव बागल, बी. ए. एलएल. बी. २ श्री. बाळकृष्ण रघुनाथ तेंडुलकर ३ श्री. सदाशिव बळवंत कुलकर्णी ४ श्री. बाबूराव आप्पाजी सासने ५ श्री. कृष्णाजी आप्पाजी पोतनीस ६ श्री. ज्ञानोबा जोतीबा सासने ७ श्री. गोविंद शिवराम उपळेकर ८ श्री. रामराव गणपतराव कदम ९ श्री. महादेव दुंडाप्पा श्रेष्ठी, बी. ए., एलएल. बी. १० श्री. दत्तात्रय मारुतीराव साळोखे ११ श्री. बाबूराव नारायणराव रुईकर १२ श्री. गोपाल तुकाराम वणकुद्रे १३ श्री. दिनकरराव रावजी शिंदे १४ श्री. नरहर विष्णू जोशी, बी. ए., एलएल. बी. १५ श्री. आदिनाथ सखाराम जिरगे १६ श्री. सर्वोत्तम जनार्दन शेणोलीकर १७ श्री. पुंडलीक रामचंद्र मंडलीक १८ श्री. महादेव बाळाप्पा चौगुले १९ श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले २० श्री. शंकर गणपत चव्हाण २१ श्री. देवेंद्र आप्प्या मंगाज २२ श्री. प्रेमचंद विठ्ठलचंद शाह २३ श्री. शंकर गोपाळ दाभोळकर, बी. ए., एलएल. बी. ॲडव्होकेट [ ओ. एस. ] २४ श्री. परशराम नाना कांबळे २५ श्री. दत्तू आप्पाजी पोवार.

## सरकारनियुक्त सभासद ( ऑफिशिअल्स )

२६ प्रो. आर. जी. पाटील, एम. ए. डिप. जिऑग्रफी २७ प्रो. ई. डी. बेकर २८ प्रो. एस. जी. पाटील, बी. एजी. २९ प्रो. एन. जी. शिंदे, एम. ए., एलएल. बी. ३० श्री. एम. आर. देसाई, बी. ए., एम. एड. ३१ श्री. कर्नल के. एस. खानविलकर ३२ श्री. मिस. डॉ. जनाबाई चव्हाण, एम. बी. बी. एस.

## ( नॉन आफिशिअल्स )

३३ श्री. डी. वाय. भोसले ३४ श्री. डॉ. जी. बी. शिंदे, एल. सी. पी. एस., एम. एम. डिप. ३५ श्री. हाजी मिरासा फरिदुद्दीनसा मणेर ३६ श्री. डी. एस. माने ३७ श्री. महमदफारुख बालेखान शेख, बी. ए. एलएल. बी. ३८ श्री. आर. बी. जाधव (दासराम) ३९ श्री. एम. बी. नागेशकर, बी. ए. ४० श्री. बाळासाहेब आ. पाटील

ह्या पक्षाचे दोन अध्यक्ष निवडले गेले:—

१. श्री. वसंतराव बागल ( १९४१–४२ ) २. श्री. म. दुं. श्रेष्ठी ( १९४२–४३ )

अधिकारारूढ झालेल्या या नवीन पक्षानें कार्याला मोठ्या उत्साहानें सुरवात केली आणि अत्यंत अल्पावधींत पुढील गोष्टी केल्या:—

(१) नगरपालिकेची सुधारणा कशी करावी याबद्दल तपशीलवार अहवाल तयार करण्यासाठीं श्री. बी आर. तेंडोलकर, वकील, यांच्या अध्यक्षतेखालीं एक स्वतंत्र समिति ( Reforms Enquiry Committee ) नेमिली. या समितीमध्यें श्री. तेंडोलकर, श्री. म. दुं. श्रेष्ठी, श्री. बाबूराव रुईकर, श्री. मामासाहेब मिणचेकर, श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, श्री. नरहर विष्णु उर्फ बाबूराव जोशी व श्री. जी. ए. चित्रे ( विजापूर नगरपालिकेचे सेवानिवृत्त मुख्याधिकारी ) हे सभासद होते. या समितीनें नगरपालिकेच्या सर्व कार्याचा व परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यक असलेल्या सुधारणांचा एक तपशीलवार अहवाल तयार केला. त्यांत सुचविलेल्या बऱ्याच गोष्टींचा स्थानिक स्वराज्य संघाच्या जाहीरनाम्यांत उल्लेख आलेला असल्यामुळें त्यांची येथें पुनरुक्ति करण्याची जरूरी नाहीं. परंतु या अहवालांत प्रथमतःच मांडल्या गेलेल्या योजनांपैकीं कांहीं महत्त्वाच्या गोष्टी येथें नमूद करणें अवश्य आहे. त्यामध्यें पुढील सात बाबींचा निर्देश करतां येईल:—

(१) नगरपालिकेचे मुख्याधिकारी, इंजिनियर, व आरोग्याधिकारी यांना दरबारकडून नेमले जाते. ही पद्धत सदोष असल्यामुळें बंद करण्यांत यावी व या बाबतींतले सर्व अधिकार नगरपालिकेला मिळावेत. (२) घर बांधणें अथवा दुरुस्त करणें यासाठीं जे नकाशे अर्जाबरोबर हजर करावे लागतात ते करून देणारा तज्ज्ञ वर्ग कोल्हापुरांत नसल्यामुळें नागरिकांना अनेक अडचणी सोसाव्या लागतात. यासाठीं असे नकाशे फी घेऊन नगरपालिकेकडूनच तयार करून देण्यांत यावेत. (३) नगरपालिकेचें जुनें रेकॉर्ड सुव्यवस्थितपणें लावून घेण्यांत यावें. (४) नगरपालिकेच्या कचेरीची अपुरी इमारत पुरी करण्यांत यावी. (५) नगरपालिकेच्या वतीने एक बालविकास मंदिर



( Montessory School ) काढण्यांत यावें व तें चालविणाऱ्या संस्थेस राजाराम हॉलची जागा व आर्थिक मदत द्यावी. (६) शहराकरितां खुल्या गटारांची योजना तयार करून ती तावडतोब हातीं घ्यावी. (७) नगरपालिकेचें उत्पन्न वाढविण्याकरितां ऑक्ट्रायच्या प्रचलित रिवाजपटांत दुरुस्ती करावी; शिंगोटी कर वाढवावा; मोटर व्हील टॅक्समध्यें नगरपालिकेला योग्य हिस्सा मिळावा अशी दरबारकडे मागणी करावी; करमणूक कर बसवावा; लग्न कर बसवावा; कोंडवाडा दरबारकडून सध्यां चालविला जातो त्याची मागणी नगरपालिकेकडून केली जावी; खुली जागा विक्रीची रक्कम दरबारकडे जमा होते ती नगरपालिकेला मिळावी; खासगी अगर दरबारच्या इमारतीवर घरफाळा मिळत नाहीं तो मिळावा; आणि शाहू मिल, दारुभट्टी, खासगी खातें वगैरेंना जी ऑक्ट्राय कराची माफी आहे ती रद्द होण्याबद्दल मागणी करण्यांत यावी. या सात महत्त्वाच्या योजनेखेरीज नगरपालिकेच्या कारभारासंबंधीं प्रत्येक लहानसहान बाबींचा देखील अत्यंत सूक्ष्मपणें अभ्यास करून अनेक उपयुक्त सूचना या अहवालांत करण्यांत आल्या होत्या. थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, नगरपालिकेमध्यें १९४१ ते १९४७ पर्यंत जे सुधारणेचे कार्यक्रम हातीं घेतले गेले त्या सर्वांचें बीजारोपण या अहवालांत केलें गेलें होतें.

ह्या सुंदर अहवालाप्रमाणें जें कार्य व्हावयास पाहिजे होतें तें मात्र झालें नाहीं व स्थानिक स्वराज्य संघ अधिकारावर असतांना अहवालांत नमूद असलेल्या अनेक कल्पनांपैकीं फारच थोड्या प्रत्यक्ष अंमलांत येऊं शकल्या. याचीं कारणें अनेक आहेत. एक तर हा संघ फारच थोडा वेळ अधिकारांत होता. दुसरें कारण म्हणजे हा संघ कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेचें अधिष्ठान अप्रत्यक्षपणें मानीत असल्यामुळें आणि प्रजापरिषद व दरबार यांमध्यें राजकीय बाबतींत तेढ असल्यामुळें या पक्षाला दरबारचें जितकें सहाय्य मिळावें तितकें मिळालें नाहीं. तिसरें आणि सर्वांत महत्त्वाचें कारण म्हणजे १९४२ सालीं हिंदुस्थानांत स्वातंत्र्याचा लढा सुरू झाल्याबरोबर तत्सम लढा कोल्हापुरांतहि सुरू झाला व संघाचे प्रमुख कार्यकर्ते कारागृहांत डांबले गेले. या व इतर कारणांमुळें या पक्षानें तयार केलेल्या योजना त्याला अंमलांत आणतां आल्या नाहींत. पण त्याबरोबर हेंहि कबूल करणें भाग आहे कीं, त्या योजनांचा पुढील कार्यकर्त्यांना फारच उपयोग झाला व त्यांची छाप नगरपालिकेच्या इतिहासावर कायमपणें पडून राहिली आहे.

(२) संघानें थकबाकीच्या वसुलीसाठीं जोरदार प्रयत्न केला व दीड लाखावर थकबाकी वसूल केली.

(३) ऑक्ट्राय कमिटी व तिचे उत्साही चेअरमन श्री. एन. व्ही. जोशी, वकील, यांनीं ऑक्ट्राय खात्याचे नवीन नियम फारच परिश्रमपूर्वक तयार केले.

(४) नगरपालिकेनें प्राथमिक शिक्षणाची मागणी केली होती. ती दरबारनें मान्य करून शहरांतील सर्व प्राथमिक शिक्षणाचा ताबा नगरपालिकेकडे ता. २४।९।१९४२ रोजीं दिला.

(५) नगरपालिकेचें जुनें रेकॉर्ड लावणेचें काम बऱ्याच अंशीं पुरें करण्यांत आलें.

स्थानिक स्वराज्य संघाच्या सभासदांनीं ता. २९।१।४३ रोजीं राजीनामे दिले व त्या जागीं नवीन निवडणुकी व्हाव्या लागल्या. इतर कांहीं अडचणीमुळें नगरपालिकेचें कार्य नीटपणें चालेनासें झालें. हा प्रकार थोड्या फार अंशानें ता. २३ जून १९४३ पर्यंत चालू होता. मध्यंतरीं ता. २५।३।४३ पासून ते ता. २३।६।४३ पर्यंत श्री. मामासाहेब मिणचेकर यांनीं व्हाईस प्रेसिडेंट या नात्यानें चांगलें कार्य केलें. पण पूर्ण अधिकाराच्या व पुरेशा नोकरवर्गाच्या अभावीं फार प्रगति करतां आली नाहीं.

स्थानिक स्वराज्य संघाच्या सभासदांनीं राजीनामे दिल्यामुळें मोकळ्या झालेल्या जागा भरल्या-नंतर जी जनरल बॉडी अस्तित्वांत आली, त्यामध्यें पुढील सभासद होते :—

## सरकारनियुक्त

१　मे. दत्ताजीराव संतरामराव माने ( प्रेसिडेंट )

## लोकनियुक्त

२　मे. शंकरराव बळवंतराव प्रभावळे ( व्हा. प्रेसिडेंट )

## सरकारनियुक्त ( ऑफिशिअल्स )

३　प्रो. आर. जी. पाटील, एम. ए., डिप. जिऑग्रफी.　४ मिसेस् गंगूताई कोकीळ, बी. ए., बी. टी.　५ मि. एस. जी. पाटील, बी. एजी.　६ प्रो. एन. जी. शिंदे, एम. ए. एलएल. बी.　७ राव. एम. आर. देसाई, बी. ए., एम. एड. ( लीड्स ), एलएल. बी.　८ कर्नल के. एस. खानविलकर.　९ डॉ. मिसेस् लीलाताई घोरात, M. B. B. S.

## सरकारनियुक्त ( नॉन ऑफिशिअल्स )

१० मे. डी. राव. भोसले, इनामदार, मिणचें ११ डॉ. जी. बी. शिंदे, एल. सी. पी. एस., एल. एम. एस., डिप. व्हिएन्ना.　१२ मि. हाजी मिरासाहेब फरिदुद्दीनसाहेब मणेर　१३ मि. आर. वी. जाधव　१४ मिसेस् निर्मलाबाई डी. यादव　१५ मे. ए. आर. कदम, भोगेराव　१६ शेठ शेळाजी म्हस्काजी.

## लोकनियुक्त

१७ मि. विजयसिंह कृष्णराव हळदे　१८ मि. बाबूराव परशराम फडनारे　१९ मि. रंगनाथ कृष्ण जोशी　२० मि. बापूसाहेब बळवंतराव साळोखे　२१ मि. श्रीपाळ तुकाराम वणकुद्रे　२२ मि. नारायण शांताराम रेडीज　२३ मि. पांडुरंग नारायण कादेकर　२४ आनंदराव शंकरराव जगताप　२५ मि. बाबूराव नारायण हर्डीकर　२६ मि. मारुतराव रामचंद्र कोतमिरे　२७ मि. बाजीनाथ बाळशेठ कोरडे　२८ मि. रघुनाथ वासुदेव हेर्लेकर　२९ शेख अजीजसाहेब दाऊदसाहेब डंगरी　३० मि. अण्णाप्पा बाबाजी पाडळकर　३१ अनंत रघुनाथ बापट, एल. सी. पी. एस.　३२ मि. ज्ञानदेव संतराम खडिकर, बी. ए. एलएल. बी.



३३ मि. महादेव बाळाप्पा चौगुले　३४ मि. गंगाराम सिद्धाप्पा चौगुले　३५ मि. भिमराव आण्णा आवटी-पाटील ३६ मि. देवेंद्र अप्पा मंगाज ३७ मि. परशराम नाना कांबळे ३८ मि. महादेव लक्ष्मण सोनवणे, मर्चंट्स असोसिएशन ३९ मि. पंडितराव गोविंदराव शिंदे ४० मि. शंकर आत्माराम कवटेकर, बी. ए., एलएल. बी.

श्री. दत्ताजीराव माने यांच्या अध्यक्षतेखालीं जो पक्ष अधिकारारूढ झाला त्यांच्या काम कर-ण्याच्या पद्धतींत कांहीं देण्यासारख्या गोष्टी होत्या. उदाहरणार्थ, त्यांची एकजूट. सार्वजनिक काम करीत असतांना प्रसंगविशेषीं आपले वैयक्तिक विचार बाजूला ठेवून पक्षप्रेमानें कांहीं गोष्टींना संमति देण्याची सभासदांनीं तयारी दाखवावी लागते; व अशी भूमिका घेतल्याखेरीज कोणताहि कार्यक्रम तडीस जाऊं शकत नाहीं. ही एकी या पक्षांत फार मोठ्या प्रमाणांत होती. त्याचप्रमाणें या पक्षांत नसलेल्या सभासदांनीसुद्धां फारच चांगलें धोरण स्वीकारलें व चांगल्या प्रकारें होणाऱ्या प्रत्येक कार्याला पाठिंबा दिला. यामुळें या काळांत सर्व नगरपालिका एकदिलानें व एकजोमानें कार्य करीत होती. अशी परिस्थिति इतर इतर वेळीं अगर शहरीं क्वचित् पहावयास मिळते आणि या एकोप्यांतच या काळांतील यशाची गुरुकिल्ली आहे.

या काळांत लक्षांत ठेवण्यासारखी दुसरी गोष्ट म्हणजे सभासदांनीं आपआपल्यांत कामें वांटून घेतलीं व तीं जबाबदारीनें पार पाडिलीं ही होय. नगरपालिकेचा कारभार इतका सर्वव्यापी आहे कीं, कोणाहि एकट्या माणसाच्या हातून तो पुरा होणार नाहीं. याकरितां प्रत्येक कार्यकर्त्यानें एक एक काम वांटून घ्यावयाचें व तें मनोभावानें करावयाचें, अशी पद्धत रूढ करणें भाग आहे. तीच पद्धत यावेळीं अनुसरिली गेली. नगरपालिकेंतील प्रत्येक सभासदानें कोणत्या ना कोणत्या कार्याची जबाबदारी स्वीकारली व ती पार पाडली, असें म्हणतां येईल. ही काम करण्याची सुटसुटीत पद्धत व एकमेकांतील विश्वास या फारच महत्त्वाच्या गोष्टी आहेत.

येथें आणखी एका घटनेचा उल्लेख करावा लागेल. नगरपालिकेच्या कारभाराची सुधारणा करावी व शहर सुधारणेचा मोठा कार्यक्रम हातीं घ्यावा या हेतूनें श्री. दत्ताजीराव माने यांनीं श्री. जे. पी. नाईक यांचें सहाय्य मिळविलें. श्री. नाईक हे त्यावेळीं रीजन्सी कौन्सिलचे एक मुख्य चिटणीस होते व त्यामुळें त्यांना दरबारचा पाठिंबा होता. एवढेंच नव्हे तर त्यांच्यावर सर्व मंत्र्यांचा वैयक्तिक विश्वासहि होता. शिवाय श्री. नाईक यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्याची चांगली माहिती होती व नगररचनाशास्त्राचा अभ्यासहि त्यांनीं सखोल केला होता. श्री. नाईक यांनीं म्युनिसिपालिटीच्या पूर्वेतिहासाचा अभ्यास केला, तिच्या कारभाराची व शहराच्या सद्यःस्थितीची तपशीलवार पाहणी केली व या अनुभवांतून नगरपालिका आणि शहर यांची सुधारणा करण्याचा एक वास्तववादी आराखडा तयार केला. आपल्या या कल्पना त्यांनीं नगरपालिकेला पटवून दिल्या, त्याला दरबारची मान्यता मिळविली व प्रसिद्धी पत्रकें, व्याख्यानें आणि पुस्तकें यांच्या द्वारें सर्व-साधारण नागरिकांमध्येंहि त्या कल्पनांचा प्रसार केला. या त्यांच्या सर्वांचें सहकार्य चांगल्या कार्या-साठीं मिळविण्याच्या वैयक्तिक शैलीमुळें बऱ्याच योजना हातीं घेणें नगरपालिकेला शक्य झालें.

या कालांत लक्षांत ठेवण्यासारखी तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे नगरपालिकेला दरबारकडून मिळालेला पाठिंबा व सहाय्य. या मदतीच्या अभावामुळेंच स्थानिक स्वराज्य संघाला फारसें कार्य करतां आलें नाहीं, हें मागेंच सांगितलें आहे. हें सहाय्य मिळालें नसतें तर या पक्षालाही फारसें कार्य दाखवितां आलें नसतें. पण श्री. दत्ताजीराव माने यांच्या प्रयत्नामुळें व व्यक्तिमत्त्वामुळें तें दरबारचा पाठिंबा मिळवूं शकले व त्यामुळें शहरसुधारणेची एक सर्वंकष व जोरदार मोहीम त्यांनीं अंगिकारिली व बऱ्याच अंशानें तडीसही नेली.

**श्रीमन्महाराणी ताराबाईसाहेब छत्रपति** यांचा आशीर्वाद, रीजन्सी कौन्सिलचें पूर्ण सहाय्य, पंतप्रधान पेरी यांनीं घातलेले विशेष लक्ष, तत्कालीन मंत्री व श्री. दत्ताजीरावांचे वैयक्तिक स्नेही श्री. केळवकर यांची मदत, श्री. जे. पी. नाईक यांचें मार्गदर्शन व कार्य पार पाडण्याची धडाडी, नगरपालिकेंतील सभासदांचा संपूर्ण व जोरदार पाठिंबा आणि नागरिकांचें सहकार्य, या सर्व महान् बलांचा श्री. दत्ताजीराव माने यांना लाभ झाल्यामुळें त्यांची अध्यक्ष या नात्यानें झालेली कारकीर्द फारच संस्मरणीय झाली आहे, यांत शंका नाहीं. या वेळीं ज्या अनेक सुधारणा झाल्या त्यांपैकीं मुख्य मुख्य गोष्टींचा उल्लेख पुढें केला आहे:—

**(१) कायदे कानूः**—या वेळीं पुढें दिलेले कायदे व कानू करण्यांत आले:—

(अ) कोल्हापूर म्युनिसिपल बरोज ॲक्ट (The Kolhapur Municipal Borough's Act 1944). हा कायदा म्हणजे काळे कमिटीनें केलेल्या अनेक शिफारसींप्रमाणें बदललेला 'बॉंबे म्युनिसिपल बरोज ॲक्ट, १९२५ (The Bombay Municipal Borough's Act, 1925), हा होय. हा कायदा अंमलांत आणला गेला.

(आ) कोल्हापूर लोकल फंड ऑडिट ॲक्ट, १९४४ (The Kolhapur Local Fund Audit Act, 1944) हा कायदा बॉंबे लोकल फंड ऑडिट ॲक्ट, १९३० (The Bombay Local Fund Audit Act, 1930) यावरून थोड्याफार फरकानें तयार करण्यांत आला व संस्थानला लागू केला गेला.

(इ) कोल्हापूर टाऊन प्लॅनिंग ॲक्ट १९४४ (The Kolhapur Town-Planning Act, 1944) लागू करण्यांत आला. हा कायदा म्हणजे थोडासा बदल करून अंमलांत आणलेला बॉंबे टाऊन प्लॅनिंग ॲक्ट १९१५ (The Bombay Town-Planning Act, 1915) हा होय.

(ई) कोल्हापूर लोकल ऑथॉरिटीज् लोन्स ॲक्ट, १९४४ (The Kolhapur Local Authorities Loans Act, 1944) लागू केला गेला. हा कायदा इंडियन लोकल ऑथॉरिटीज् लोन्स ॲक्ट १९१४ (The Indian Local Authorities Loans Act, 1914) या कायद्यावर आधारलेला आहे.



(उ) वर जे कायदे सांगितले म्हणजे लोकल फंड ऑडिट ॲक्ट, १९४४, कोल्हापूर लोकल ऑथॉरिटीज् लोन्स ॲक्ट १९४४, कोल्हापूर टाऊन प्लॅनिंग ॲक्ट, १९४४ या खालील नियम करण्यांत आले व तेही लागूं करण्यांत आले.

या सर्व कायदे-कानूंमुळें कोल्हापूर नगरपालिकेला शहरसुधारणेच्या कार्याकरितां जरूर ते अधिकार प्राप्त झाले व नगरपालिकेचा कारभार जास्त कार्यक्षम होण्यास मदत झाली.

(२) **नोकरवर्गः**—या कालांत नोकरवर्गाची संपूर्ण पुनर्घटना करण्यांत आली. प्रत्येक खात्याची छाननी करण्यांत येऊन जेथें जादा नोकर होते तेथून ते कमी करण्यांत आलें; जेथें कमी होते तेथें जागा वाढविल्या गेल्या; दरबारनें आपल्या नोकरांना लागूं केलेलें पगाराचें मान नगरपालिकेच्या नोकरानांहि लागूं करण्यांत आलें. या पुनर्घटनेमुळें खर्चांत थोडी वाढ झाली तरी त्या मानानें कार्यक्षमतेंत फारच भर पडली.

(३) **उत्पन्नाची वाढः**—या कालांत झालेली तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे नगरपालिकेच्या उत्पन्नाची वाढ ही होय. ही वाढ मुख्यतः पुढील कारणांनीं घडून आलीः—

(अ) कोल्हापूर हद्दींतील कोंडवाड्याची व्यवस्था कोल्हापूर नगरपालिकेकडे सोंपविण्यांत आली.

(आ) कोल्हापूर नगरपालिकेच्या हद्दींत वसूल होणारा सर्व लोकल फंड नगरपालिकेस देण्यांत आला.

(इ) कोल्हापूर नगरपालिकेच्या हद्दींत वसूल होणाऱ्या बिनशेतकी साऱ्यापैकीं ५० टक्के रक्कम नगरपालिकेस देण्यांत आली.

(ई) जहागिरीसह सर्व संस्थानांत जो इन्कमटॅक्स व सुपरटॅक्स वसूल होतो त्यांपैकीं रुपयास एक आणा याप्रमाणें रक्कम नगरपालिकेस देण्यांत आली.

(उ) जकातीचे बदललेले नियम अंमलांत आणले गेले व दरबारनें श्री शाहू छत्रपति मिलसकरितां आयात होणाऱ्या मालावर जकात देणेचें कबूल केलें.

(ऊ) मोटारीवरील कराचा हिस्सा लोकसंख्येच्या प्रमाणांत नगरपालिकेला देण्यांत आला.

(ए) घरफाळ्याची उजळणी करण्याचें कार्य सुरूं झालें; व दरबारनें सरकारी इमारतीवरील घरफाळा देण्याचें कबूल केलें.

(ऐ) शिंगोटी कराच्या नियमांत दुरुस्ती करण्यांत आली.

(ओ) नाटकें, सिनेमा, सर्कस, तमाशे इत्यादिकांवर कर नव्हता तो नवीन बसविण्यांत आला.

(औ) दरबारनें नगरपालिकेस ठराविक वार्षिक मदत ( Contract grants ) देणेंचे कबूल केलें.

(क) करांची वसुली सक्तीनें व वक्तशीर व्हावी अशा रीतीनें वसुली खात्याची पुनर्घटना करण्यांत आली.

(४) **प्राथमिक शाळा इमारतींची योजनाः**—कोल्हापूर शहरांतील सर्व प्राथमिक शाळांना इमारती व क्रीडांगणें यांची सोय करून देण्याकरितां एक सर्वंकष योजना आंखली गेली. या योजनेप्रमाणें शहरांत ठिकठिकाणीं ४० शाळा इमारती व क्रीडांगणें होणार होतीं व ती योजना पुरी करण्यास दहा लाख रुपये खर्च करावा लागेल असा अंदाज करण्यांत आला होता. या योजनेची तपशीलवार माहिती प्राथमिक शिक्षणाचा इतिहास सांगतांना परिशिष्ट १ मध्यें दिली आहे.

(५) **शहरसुधारणेची योजनाः**—या कालांत नगरपालिकेनें हातीं घेतलेलें दुसरें महत्त्वाचें कार्य म्हणजे शहरसुधारणेची योजना ही होय. ह्या योजनेमध्यें अनेक भागांत अत्यंत आवश्यक असलेले भंगी-बोळ तयार करण्यांत आले. ठिकठिकाणीं असलेल्या व रोगांचें आणि घाणीचें आगर बनलेल्या सार्वजनिक धड्या काढून टाकून त्याऐवजीं प्रत्येक योग्य ठिकाणीं दोन सार्वजनिक शौचकूप बांधले गेले. अरुंद बोळ नाहींसे करून त्या ठिकाणीं रुंद रस्ते करण्यांत आले. (विशेषतः श्री महालक्ष्मीच्या देवालयाच्या दक्षिण व पश्चिम दरवाज्यासमोर व कपिलतीर्थ भागांत या दृष्टीनें विशेष कार्य करण्यांत आलें.) आणि ठिकठिकाणच्या खाणी, डबकीं बुजविण्याची योजना हातीं देण्यांत आली.

(६) **बालोद्यानांची योजनाः**— लहान मुलांना ठिकठिकाणीं खेळण्याकरितां बालोद्यानें निर्माण करावींत या हेतूनें एक व्यापक योजना आंखली गेली. या योजनेप्रमाणें प्रत्येक वॉर्डांत दोन अशीं दहा बालोद्यानें तयार करावयाचीं होतीं व त्याकरितां अदमासें ५०,००० रुपये खर्च येईल, असा अंदाज केला गेला होता. त्यांपैकीं 'पद्माराजे पार्क' हें सुंदर उद्यान तयार करण्यांत आलें.

(७) **नगरपालिकेच्या कचेरींतील सुधारणाः**—नगरपालिकेच्या कचेरींत व कामाच्या पद्धतीत अनेक महत्त्वाचे फेरफार करण्यांत आले. त्यांपैकीं कांहीं महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख पुढें करण्यांत आला आहेः—

(१) नगदी खात्याच्या पुनर्घटनेकरितां व्यापक नियम ( Account Code ) तयार करण्यांत आले व त्यांचा अंमलहि सुरू केला गेला.

(२) जुने कागदपत्र व्यवस्थेशीरपणें लावण्यांत आले.

(३) प्रत्येक खात्याच्या कचेरीकरितां शक्य तितकी प्रशस्त जागा मिळविण्यांत आली.

(४) जुनीं शिल्लकीं कामें निकालीं आणण्यांत आलीं व यापुढें कामाचा उरक वेळोवेळीं होईल, अशी पद्धत सुरू करण्यांत आली.



(५) नगरपालिकेच्या स्थावर मिळकतींचें रजिस्टर नव्हतें, तें तयार करण्यांत आलें वगैरे.

(८) **श्री. भास्करराव जाधव वाचनालयः**—नगरपालिकेचे सुपरिंटेंडेंट या नात्यानें श्री. भास्करराव जाधव यांनीं कोल्हापूरच्या नागरिकांची जी बहुमोल सेवा केली, तिचें स्मरण म्हणून नगरपालिकेनें श्री. भास्करराव जाधव वाचनालय नांवाची संस्था सुरू केली. या वाचनालयांत नगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, आणि हिंदुस्थानचे राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक वगैरे प्रश्न या विषयांवरील पुस्तकें ठेवण्यांत येऊन तीं नागरिकांना मोफत वाचावयास दिलीं जात. या वाचनालयाचा भाग म्हणून एक व्याख्यानमालाही सुरू करण्यांत आली व तीमधून विद्वान् कार्यकर्त्यांचीं व्याख्यानें करविलीं जातात.

(९) **नवीन दवाखानाः**— कोल्हापूर शहरांतील लोकांना अगदीं कमी खर्चांत औषधोपचारांची सोय व्हावी म्हणून नगरपालिकेनें डी वॉर्डांत एक नवीन दवाखाना सुरू केला व त्यांत फक्त एक आणा दैनिक फी घेऊन औषध देण्याची सोय केली.

वर दिलेल्या वर्णनावरून या कालांत किती महत्त्वाचें कार्य झालें याची नीट कल्पना येईल; व या कालाला क्रांतिकाल कां म्हटलें हें समजेल. सुदैवाची गोष्ट ही कीं, या वेळेला नगरपालिकेकडून हें महत्त्वाचें कार्य होत असतां दरबारकडूनहि शहरसुधारणेच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाच्या अशा दोन योजना सुरू केल्या गेल्या. त्यांपैकीं पहिली योजना म्हणजे शहराचा पाणी पुरवठा वाढविण्याची व शुद्ध करण्याची. यावेळीं शहराला पाण्याचा पुरवठा मुख्यतः कळंबे तलावापासून होत असे. हा पुरवठा अपुरा तर होताच, पण त्यामध्यें आणखीही दोन मोठे दोष होते. एक तर या तलावाचें पाणी एका दगडी काळव्यांतून शहरामध्यें आणलें गेलें असल्यामुळें त्यांतून पुष्कळ पाणी झिरपून जात असे. शिवाय हें पाणी शुद्ध करण्याची सोय कांहींच नव्हती. म्हणून दरबारनें कळंब्याचें पाणी आणण्याकरितां सिमेंटचे नळ घातले व पाणी फिल्टर करून शुद्ध करण्याची सोय केली. नंतर या पुरवठ्याचा अपुरेपणा भरून काढण्यासाठीं चंबुखडीवर रु. ३० लाख खर्चून पाणी पुरवठ्याची एक स्वतंत्र योजना हातीं घेतली. या प्रयत्नामुळें शहराच्या पाणी पुरवठ्याचा प्रश्न जवळजवळ सोडविला गेला. दरबारनें हातीं घेतलेली दुसरी योजना म्हणजे शहरवाढ. या योजनेचा तपशीलवार आराखडा तृतीय खंडांत देण्यांत येईल. म्हणून या योजनेमध्यें मोठ्या उद्योगधंद्याकरितां वेगळी जागा ठेवणें; लहानसहान उद्योगधंदे एकत्रित करून स्वतंत्र जागेवर नेणें; नवीन घरें बांधण्यासाठीं वसाहती स्थापणें; शिक्षणसंस्थांना जागा देणें, इत्यादि कार्यक्रम होते, एवढेंच येथें सांगितलें तरी पुरें आहे. दरबारनें हातीं घेतलेल्या या योजनांमुळें दुधांत साखर पडल्यासारखें होऊन नगरपालिकेनें हातीं घेतलेल्या शहरसुधारणेच्या मोहिमेला अधिकच उठाव मिळाला, हें सांगण्याची जरूर नाहीं.

कोल्हापूर नगरपालिकेस नवीन कायदा ता. १२ आक्टोबर १९४४ रोजीं लागू केला, हें वर सांगितलेंच आहे. या नवीन कायद्याखालीं निवडणुका होऊन ता. २३ जून १९४५ रोजीं नवीन जनरल बॉडी अस्तित्वांत आली. त्यामध्यें पुढें दिलेले सभासद होतेः—

१ मे. रा. तु. बगाडे २ सौ. इंदिराबाई गोविंद देशपांडे ३ मे. आ. शं. जगताप ४ मे. स. ब. कुलकर्णी (दुधगांवकर वैद्य) ५ मे. बा. आ. सासने ६ मे. ना. ह. साळोखे ७ सौ. उषादेवी मा. गायकवाड ८ मे. द. ह. शेळके बी. ए. ९ मे. ना. तु. सरनाईक १० सौ. रजनी अ. वालावलकर ११ मे. रा. ना. राजाज्ञा १२ मे. द. मा. साळोखे १३ मे. अ. म. पटवेगार १४ मे. बा. र. तेंडोलकर १५ मे. ह. क. शेख १६ मे. शं. खं. डिगे, बी. ए., बी. टी. १७ मे. दि. रा. शिंदे १८ मे. श्री. तु. वणकुद्रे १९ मे. ज्ञा. सं. खांडेकर, बी. ए., एलएल. बी. २० मे. रा. भ. भुसारी २१ मे. या. दा. डंगरी, डी.सी.ई. २२ मे. न. वि. जोशी, बी. ए., एलएल. बी. २३ मे. ग. ह. पाटील २४ मे. व. द. पोवार २५ मे. वि. ग. बेनाडीकर २६ मे. कृ. ल. मोरे, बी. ए., एलएल. बी. एम. एल. ए. २७ मे. वि. के. देसाई २८ मे. द. चं. नरके २९ मे. वा. चु. श्री-श्रीमाळ (ता. ३१।१०।४५ पासून राजीनामा). त्यांचे जागीं मे. ज्ञा. जो. सासने ३० मे. शां. त. पाटणे.

## सरकारनियुक्त

३१ श्री. रा. ल. पाटील ३२ श्री. कृ. रा. जाधव ३३ श्री. ह. या. शेख ३४ श्री. धों. गो. सोहनी बी. एससी. बी. ई. ए. एम. आय. ई. श्री. हिं. ना. घाटगे ३५ श्री. सिद्रामय्या गदगय्या स्वामी बी. ए. ३६ श्री. डॉ. गोविंदराव बाबाजीराव शिंदे, एल. सी. पी. एस. एल. एम. श्री. शं. ब. प्रभावळे ३७ श्री. डॉ. सौ. अहिल्याबाओी शंकरराव दाभोळकर ३८ श्री. सौ. निर्मलाबाओी दि. यादव ३९ श्री. रं. कृ. साळोखे ४० श्री. मिस् सोनीताओी डांगे बी. एससी. ४१ श्री. एस. आर. जाधव

## पोटनिवडणुकींत आलेले

(मे. डिगे व वि. के. देसाई यांचे सभासदत्व रद्द झालेमुळें)

१ श्री. विष्णु गुंडोजी पोळ २ श्री. दा. म. चौगुले.

(मे. पटवेगार वारल्यामुळें व मे. खांडेकर व सरनाईक मंत्री झाल्यामुळें) ३ मे. बा. अ. जमादार ४ मे. दि. रा. काशीद ५ मे. वा. व. हिरवडेकर.

या कालांत श्री. रा. तु. बगाडे हे १९४५ ते ४७ पर्यंत व त्यानंतर श्री. बा. र. तेंडोलकर हे १९४७ ते ४८ पर्यंत नगराध्यक्ष होते.

या कालांतही अनेक महत्त्वाचीं कार्यें हातीं घेऊन पार पाडलीं गेलीं. त्यांपैकीं कांहीं महत्त्वाच्या गोष्टींचा तपशील पुढें दिला आहे:—

(१) **शहरसुधारणा:**—श्री. दत्ताजीराव माने यांच्या वेळीं हातीं घेतलेलें शहर सुधारणेचें काम यावेळीं तसेंच जोमानें पुढें चालू ठेवलें गेलें. यावेळीं हातीं घेतलेल्या व पुऱ्या केलेल्या



योजनेमध्यें **सुभाष रोड** योजनेला फारच मोठें महत्त्व द्यावें लागेल. या रस्त्यामुळें मंगळवार ते लक्ष्मीपुरी या भागाचा फार निकटचा संबंध जोडला गेला. तसेंच नगरपालिकेची हद्दही बऱ्याच मोठ्या प्रमाणावर १९४६ मध्यें वाढविली गेली; रंकाळा विभागांतील शेतकरी वर्गाकरितां नगरपालिकेनें फुलेवाडी योजना हातीं घेतली व अंमलांतही आणिली, वरुणतीर्थ कोरडें करून त्या आसपास प्लॉट विक्री वगैरे करण्याची योजना केली; महाद्वार रस्ता पुढें वाढवून जवळ जवळ पाण्याच्या खजिन्यापर्यंत नेला; गुरांच्या बाजारासाठीं एक नवीन जागा निवडून तेथील खांचखळगे भरून काढले व तेथें झाडें लावलीं; गवत मंडई स्वतंत्र जागेंत नेण्यासाठीं एक योजना तयार करून हातीं घेतली; आणि ए वार्डांतील खरी विभाग अवश्य ती पाडापाड करून सुधारला.

(२) **कायदेकानू:**—या कालांत कोल्हापूर म्युनिसिपल बरोज ॲक्टाखालीं जरूर ते सर्व बायलॉज करून अंमलांत आणले गेले. ऑक्ट्रायचा रिवाजपट दुरुस्त करून उत्पन्नांत वाढ केली; गुमास्ता कायद्याचा अंमल ता. १।१२।४६ पासून केला गेला; झाडूवाले नोकरांना प्रॉ. फंड, ग्रॅच्युइटि व रजा वगैरेसंबंधीं नियम करून तें अंमलांत आणले; विवाह नोंदीचा कर बसविला गेला; खासगी संडासांचे करांत वाढ केली गेली; पाळीव कुत्र्यांवर कर बसविला गेला; आणि मटन मार्केटसंबंधीं कायदे करून ते अंमलांत आणले गेले.

(३) **सामाजिक व आर्थिक पहाणी:—** कोल्हापूर शहराची सामाजिक व आर्थिक पहाणी करण्यासाठीं एक योजना तयार केली गेली व तें काम गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स व एकॉनॉमिक्स, पुणें, यांचेकडे सोंपविलें गेलें. य कामाची सुरवात १९४५ सालीं झाली. तें काम आतां पूर्ण झालें असून त्याचा एक उत्कृष्ट अहवाल तीन खंडांत प्रसिद्धही झाला आहे.

(४) **नोकरवर्ग व कारभार:**—नोकरवर्गाच्या मागण्यांचा विचार होऊन त्यांपैकीं बऱ्याच मान्य केल्या गेल्या व त्यामुळें नोकरवर्गांना मिळणाऱ्या सवलतींत वाढ केली गेली. तसेंच कारभारांत काटकसर व्हावी आणि सुव्यवस्था निर्माण व्हावी यासाठीं "ब्युरो" पद्धत चालू केली. तिचा कामाच्या दृष्टीनें फारच उपयोग होत आहे.

(५) **व्याख्यानमाला:**—या कालामध्यें 'भास्करराव जाधव वाचनालया'तर्फें (१) दे. भ. बापूसाहेब गुप्ते, (२) आमदार तुळशीदास जाधव, (३) श्री. र. के. खाडीलकर, (४) प्रो. देशपांडे (५) प्रिं. बॅ. खर्डेकर (६) मे. भगत, (७) आचार्य भागवत (८) सौ. कुलसुम बियाणी व (९) श्री. एस. के. कानिटकर, या प्रसिद्ध व विद्वान व्यक्तींची व्याख्याने केलीं गेलीं.

इ. स. १९४१ ते १९४९ या महत्त्वाच्या क्रांतिकालांत नगरपालिकेचें उत्पन्न कसें वाढलें व तिचा खर्च मुख्यतः कोणकोणत्या बाबींवर झाला, तें पुढें दिलेल्या तक्त्यावरून कळून येईल:—

जमा

| बाब | १९४१–४२ | १९४२–४३ | १९४३–४४ | १९४४–४५ | १९४५–४६ | १९४६–४७ | १९४७–४८ | १९४८–४९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **म्युनिसिपल कर** | | | | | | | | |
| ऑक्ट्राय कर | १७१९४९ | १६६६३९ | ११८३१७ | ३३६९७४ | ३१०६५२ | ५०३४७२ | ८५०८८९ | ११०७११ |
| घरपट्टी, तारवखाना, जनरल सें. सेस | ९६०८१ | १७२८७५ | ११८७५९ | २३६३८५ | २०५१०५ | २१०९७९ | २२८११९ | २४४५५५ |
| इतर कर | ५०३५ | ५७०० | १३३६७ | २७७५६ | ११७०६ | ४३२६१ | १२११५ | ३१०२५ |
| विशिष्ट कायद्यान्वये येणारी जमा | ... | २८ | ८४ | ५०७ | १६८ | ३७ | १६९० | १६०० |
| लोकल फंड सेस | ... | ... | ... | ... | ... | ... | २११ | ५०० |
| इलक्शन्टॅक्स व सुपरटॅक्स पैकी क. ८१ प्रमाणे मिळणारी रक्कम | ... | ... | ... | ५०००० | १९६५ | ... | ... | ... |
| नॉन अग्रिकल्चर सेस | ... | ... | ... | ... | ४७४४ | ... | १७०३ | ... |
| म्यु. च्या मिळकतीपासून व कराव्यतिरिक्त येणारे उत्पन्न | ५३२६५ | ६०८८३ | ७००७२ | १०५०१७ | ९१७५१ | १०५९२२ | १२२६९३ | १६०७५१ |
| देणग्या व वर्गणी | ... | ७१२७ | ९५३४४ | ८७३४१ | ६५०३२ | २६८१४ | ३३३०१७ | ६५८२३ |
| किरकोळ | १२६४३ | ३०३३८ | २८५५२ | ५०७३० | ४०००९ | ३१३७१ | ५७४१९ | ६१४०० |
| असाधारण व कर्ज | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| नागरिकांचे खाजगी काम केलेबद्दल | ... | ... | ... | ३१२९ | २९ | २८ | ... | २४४ |
| बेवारस दहन दफन केलेबद्दल | ... | ... | ... | २५५ | २५५ | ८४० | ९६० | २४१५ |
| पंचगंगा स्मशान | ७८७९ | १२६८३ | ५५०७६ | २१७५६ | १८५७८ | १७३४८ | २०५३१ | १३३६० |
| कर्ज | ... | ... | ... | १७५००० | २३५००० | ... | ... | ... |
| प्लेग हॉस्पिटलबद्दल ग्रँट | ... | ... | ... | ... | ... | ५००१५ | ... | ... |
| शहर सुधारणा खाते | ... | ... | ९२१६६ | ५०००० | ... | ५३८०६ | ... | ... |
| श्रीमद्राणी ताराबाई शाळा इमारत फंड | ... | ... | ... | १५७१५ | १०००० | ५१ | ४००० | ५०२५ |
| बेळबाग व इतर ठिकाणचे ब्लॉक विक्री | ... | ... | ... | ४८८९३ | १३४०२६ | ११४२६८ | ९५५११ | ६१६०४ |
| निशाण तोरणी माळे | ... | ... | ... | ६७ | ४१ | ५१ | ... | ... |
| ताराबाई रोड | ... | ... | ४८०५ | १७५ | ४८० | ३८८ | ... | ... |
| नळ कामगारीकडून येणारी जमा | ... | ... | ... | ७१ | ... | ... | ... | ... |
| बालोद्यान | ... | ... | ४६२५ | ... | ... | ... | ... | ... |
| रॉकेल विक्री | ९५ | ३२ | ७५ | ... | ... | ... | ... | ... |
| सिमेंट विक्री | ... | ... | ... | ... | ... | ४६९० | ३६५ | ... |
| | ३४६९४७ | ४५६३०५ | ७०१३२२ | १२११४५१ | १२००३८१ | ११६३३४२ | १७२९२२१ | १५७९८२१ |



| बाब | १९४१–४२ | १९४२–४३ | १९४३–४४ | १९४४–४५ | १९४५–४६ | १९४६–४७ | १९४७–४८ | १९४८–४९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जनरल ॲडमिनिस्ट्रेशन व वसुली खाते | ३८०२१ | ४७५६६ | ८९८०२ | २४६११ | २८७९० | ५३५२१ | ६३५५९ | ६६६२३ |
| जकात खाते | २११०४ | २३७१७ | ३०२२७ | ४३६५५ | ३८०८६ | ६६७६३ | ८१५०३ | १०१८०० |
| घरपट्टी व इतर कर वसुली | ... | ... | ... | २५६०६ | ३३४१८ | ११३६४ | ३४५१३ | ४०६१७ |
| पेन्शन ग्रॅच्युटी व प्रॉ. फंड | ९४१ | २१२६ | २१२६ | २५५१ | १९८६ | २५०९ | २७७८ | २१४३१ |
| गुमास्ता कायद्यान्वये नोकर पगार खर्च | ... | ... | ... | ... | ... | १२७६ | १८२९ | १५११ |
| सार्वजनिक सुरक्षितता | ३५३५२ | २४८४७ | ४५६४२ | ३३३३७ | ३२१५० | २३४६० | ४११२२ | ५९६४० |
| सार्वजनिक आरोग्य व सुखसोई | ११००४६ | ११५३६१ | १३८२३५ | ३१६१३ | २५२५४ | ३९७२१ | ३५४९३ | ३८८२५ |
| जनरल कॉन्झरव्हन्सी | ... | ... | ... | ७७२७९ | ७८८०९ | १३२२४० | १८७९६० | १७९८७७ |
| स्पेशल कॉन्झरव्हन्सी | ... | ... | ... | ९६६५९ | ८०८३५ | १५५८६४ | १६३१४९ | २०९२४६ |
| गटार | ... | ... | ... | २१५५८ | ८०१२ | ११३४५ | २३०९१ | ११६३१ |
| होमीओपॅथिक दवाखाना | ... | ... | ... | ५०२० | ४८६३ | ४६०६ | ६७३० | ७११२ |
| ॲलोपॅथिक दवाखाना | ... | ... | ... | ६९४८ | ४८८२ | ६४०८ | ५६८१ | ७९०६ |
| अहिल्याबाई दवाखाना | ... | ... | ... | ... | ... | ३४२७ | ५३८४ | ४८१३ |
| सांथीचे रोग | ... | ... | ... | ११०३८ | ६५०५२ | २२२१७ | ११७६९ | १०७१४ |
| मार्केटस् | ... | ... | ... | १४८६ | १५६१ | २६५० | ३७०० | ४६३९ |
| पाणी पुरवठा | ... | ... | ... | २७८ | २५१ | ७९२ | ३७८० | ४५५ |
| धर्मशाळा | ... | ... | ... | ३०६ | २६३ | ५४७ | ६२१ | ६१३ |
| सार्वजनिक बागा | ... | ... | ... | ६९२९ | ९४७७ | १३६७२ | १६८०२ | १८७८९ |
| पब्लिक वर्क्स | ५९६१५ | ३६२३४ | ३४८११२ | १७०२९ | १९२१८ | २७२४९ | २६१५६ | २९९९९ |
| इमारत बांधणी व दुरुस्ती | ... | ... | ... | ३२७४ | ४००५ | ४४६८ | ६२८१ | २०९०५ |
| रस्ते | ... | ... | ... | १८०७१७ | ८७६६२ | ८५३३५ | १२४९५१ | १५०१३५ |
| स्टीम रोलर वर्कशॉप | ... | ... | ... | ४२६४ | ५०४६ | ६९५५ | ६०४१ | ७३७२ |
| कोंडवाडा | ... | ... | ... | ... | ... | ... | ८५५ | ३६२ |
| सार्वजनिक शिक्षण | १५४२५ | ४६९२३ | १४४८११ | ३१५८६४ | २३४७६१ | ११२५७५ | ३८६४९६ | २१६३९५ |
| इतर किरकोळ | २९०९ | २९७२ | ३४३५ | ३५४७८ | ३३४८६ | २८४६९ | ३४६२८ | ३३७४१ |
| असाधारण व कर्ज | ... | ... | ... | ८४ | ४३२२६ | ४५६७३ | ४६४२४ | ४३३२५ |
| शहर सुधारणा खाते | ... | ... | ... | ३०८०९१ | ५००४७६ | २३०३२४ | २२६०३१ | २१०८६३ |
| पाणीपट्टी | ... | ... | ... | ... | ३०४६९ | २८१५९ | ... | ... |
| व्हॅक्सिनेशन | ... | ... | ... | ७१९ | ... | ... | ... | ... |
| ऑक्ट्राय रिफंड | ... | ... | ... | ३३४९ | ... | ... | ... | ... |
| एकूण खर्च | २८३५१३ | ३३९७५६ | ८०४५१६ | १२६३५९६ | १३३७६८८ | १२१९७११ | १५४६५१८ | १५९५२२ |

१९४८ सालीं पुन: त्रैवार्षिक निवडणुका झाल्या व नवीन जनरल कमिटी अस्तित्वांत आली. त्यामध्यें पुढें दिलेले सभासद होते:—

१ मे. डी. वाय. भोसले ऊर्फ मामासाहेब मिणचेकर (अध्यक्ष) २ मे. य. ना. देशपांडे (उपाध्यक्ष) ३ मे. आनंदराव शंकरराव जगताप ४ मे. माधवराव हिंदुराव जाधव ५ मे. सौ. मंगल नारायण साळोखे ६ मे. व्ही. जी. सरनाईक ७ मे. पांडुरंग बापूजी साळोखे ८ मे. कृष्णाजी गोविंद यादव ९ मे. बाबूराव परशराम फडतारे १० मे. दत्तोबा हरी शेळके ११ मे. ज्ञानदेव सुबराव चव्हाण १२ मे. सौ. वीणादेवी शंकर ताटे १३ मे. हरुण करीमसाहेब शेख १४ मे. दत्तात्रय मारुती साळोखे १५ आण्णाप्पा आप्पाण्णा शिराळे १६ शंकरराव गणपतराव कदम १७ मे. बालेचंद बुराणुद्दीन मणेर १८ मे. भैरनाथ बाळशेट कोरडे १९ मे. धनपाल बाबाजी बागी २० मे. माधवराव श्रीपतराव भोसले २१ मे. शंकरराव बळवंतराव प्रभावळे २२ मे. बादशहा अमीनसाहेब जमादार २३ मे. अनंतराव रंगाप्पा वडगांवकर २४ मे. बळवंतराव धोंडदेव शिंगे २५ मे. गोविंद यशवंत गुणे २६ मे. यामीनसाहेब दाउदसाहेब डंगरी २७ मे. बापूसाहेब विठ्ठल काशीद २८ मे. श्रीपतराव गणपतराव जाधव २९ मे. रंगराव कृष्णराव साळोखे ३० मे. गणपत हरी पाटील ३१ मे. विश्वासराव दत्तोबा मिसाळ ३२ मे. सौ. विमलाबाई वसंतराव बागल ३३ मे. शंकरराव विठ्ठलराव लिंग्रस ३४ मे. बाबूराव गोपाळराव पेंढारकर ३५ मे. आनंदराव रामचंद्र सोनवणे ३६ मे. कृष्णाजी लक्ष्मण मोरे ३७ मे. नारायण गोपाळ निगूडकर ३८ मे. गजानन दत्तात्रय घाटगे ३९ मे. वसंतराव दत्तात्रय पोवार ४० मे. दादोबा मल्लाप्पा चौगले

या निवडणुका श्री. माधवरावजी बागल यांच्या नेतृत्वाखाली प्रजा म्युनिसिपल पक्षानें लढविल्या व एकंदर ४० पैकीं ३७ जागा जिंकल्या. या सभासदांच्या हातीं ता. १६ जुलै १९४८ रोजीं नगरपालिकेचीं सूत्रें आलीं. या बॉडीच्या कामाला सुरवात होते न होते इतक्यांतच कोल्हापूर संस्थान विलीन करण्यांत आलें. या महत्त्वाच्या घटनेमुळें कोल्हापूर नगरपालिकेवर काय परिणाम झाले व तिचें कार्य कोणत्या पद्धतीनें पुढें चालूं राहिलें, याचा विचार पुढील प्रकरणांत करूं.

जनसंपर्क अधिकारी
कोल्हापूर महानगरपालिका

# कोल्हापूर नगरपालिकेचे अध्यक्ष
## सन १९२१–५४



मे. कुंजिलाल रूरमल दिलवाली, एम्. ए.
सन १९२१–२२

प्रो. कुंजिलाल दिलवाली हे मूळ अमृतसरचे राहणारे. येथील राजाराम कॉलेजांत पर्शियन भाषेचे प्रोफेसर म्हणून त्यांनीं पंचवीस वर्षे काम केलें. सन १९२० सालीं मे. बाळासाहेब गायकवाड यांच्यानंतर ते नगरपालिकेचे सर्वाधिकारी झाले. सन १९२० सालीं नगरपालिकेंत सुधारणा व्हावी व निवडणुकीचें तत्त्व अंमलांत यावें म्हणून श्रीमंत शाहू छत्रपति महाराज यांनीं एक जाहिरनामा प्रसिद्ध करून नगरपालिका लोकनियुक्त केली. त्या जाहिरनाम्याअन्वयें पहिलीं तीन वर्षे अध्यक्ष हे सरकारनियुक्त होते. या लोकमतानुवर्ति नव्या नगरपालिकेंत प्रो. दिलवाली या सर्वाधिकाऱ्याचीच प्रेसिडेंट म्हणून नेमणूक झाली. लोकनियुक्त नगरपालिकेची सुरवात या दृष्टीनें एक वर्षाच्या अमदानींत त्यांना विशेष कार्य करतां आलें नाहीं. तरी पण त्यांनीं मोठ्या आस्थेवाईकपणानें काम केलें. गांवांत नियमितपणें स्वतः फिरून कामावर देखरेख ठेवत. नागरिकांच्या तक्रारींची तात्काळ दाद घेत. व वेळप्रसंगीं छत्रपति महाराजांना समक्ष भेटून महत्त्वाच्या कामावर दरबारचे हुकूम मिळवीत असत.



मे. कासमअली बा. हकीम, बी. ए.
सन १९२२–२५

प्रो. दिलवाली यांच्यानंतर मे. कासमअली यांची प्रेसिडेंट म्हणून सरकारनें नेमणूक केली. पहिल्या लोकनियुक्त नगरपालिकेंत एकूण ४७ सभासद होते. शिवाय अध्यक्षांना स्वतःचे असे अधिकार फार थोडे होते. या दोन्ही कारणांमुळें नगरपालिकेच्या कारभारांत एकसूत्रीपणा राहिला नाहीं. व्यक्तिशः सभासद चांगले व हेतूही चांगला असतांना प्रेसिडेंटना आपल्या उत्तम कल्पना कृतींत आणणें शक्य झालें नाहीं. शहरांतील रस्ते रुंद करणें व भंगी बोळ आंखण्याची कल्पना छत्रपति महाराजांच्यापुढें मांडून त्यास त्यांनीं मान्यता मिळविली होती. पण त्या कामास प्रारंभ होऊं शकला नाहीं. कारण अशा नवीन धाडसाच्या कामास संघटित प्रयत्नाची गरज असते; आणि याच गोष्टीचा त्या काळीं प्रामुख्यानें अभाव होता. आपल्या तीन वर्षांच्या कारकीर्दींत नगरपालिकेच्या चालू कामांत शिस्त लावण्याचा प्रयत्न त्यांनीं आपल्यापरीनें केल्याचें दिसून येतें.



मे. महादेव दुंडाप्पा श्रेष्ठी,
बी. ए., एल्एल्. बी.
सन १९२६-२९, १९४२-४१

सन १९२५ सालीं कोल्हापूर नगरपालिकेचे पुनरुज्जीवन करून तिला कोल्हापूर स्टेट म्युनिसिपल ॲक्ट लागू केला. त्या अन्वयें अस्तित्वांत आलेल्या नगरपालिकेचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष म्हणून श्री. श्रेष्ठी यांची निवड झाली. त्यांच्या कारकीर्दीत सध्यांची नगरपालिकेची अर्धी इमारत बांधली गेली. देशांतील इतर भागांत भूकंप, महापूर अशा आपत्तींना तोंड देणाऱ्या बांधवांना मदत करण्यासाठीं सार्वजनिक फंड उभारण्याची कल्पना प्रथम श्रेष्ठी यांनींच काढली. स्थानिक स्वराज्य संघ सत्तारूढ असतांना पुन्हां सन १९४२ सालीं श्री. श्रेष्ठी यांची अध्यक्षपदीं निवड झाली. यांच्याच कारकीर्दींत रिफॉर्म इन्कायरी कमिटीचा सर्वंकष अहवाल तयार झाला. पुढें घडून आलेल्या सर्व नगरसुधारणेचा पाया म्हणजे हा अहवालच होय. सन १९४२ च्या चळवळींत श्री. श्रेष्ठी यांना स्थानबद्ध केले असतांना नगरपालिकेचे कागदपत्र सहीसाठीं जेलमध्यें पाठविले जात होते. विलीनीकरणानंतर सरकारनें नियुक्त केलेल्या डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाचे अध्यक्ष म्हणून त्यांची कामगिरी स्पृहणीय आहे.



मे. सखाराम पांडुरंग सावंत,
एम्. ए. एल्एल्. बी.
सन १९२९-३३

मे. सखाराम पांडुरंग सावंत ही मोठी कर्तबगार व्यक्ति होती. नगरपालिकेंत काम करणारा नोकरवर्ग बराच जुना होता. त्यामुळें कामांत शिथिलता आलेली होती. त्यांचा विचार करून मे. सावंत यांनीं वयस्क व पेन्शनींत गेलेल्या पण अनेक वेळां मुदतवाढ दिलेल्या नोकरांना कामावरून कमी केले. त्याबद्दलचा नोकरांतील असंतोष प्रकट झाला. परंतु संस्थेची कार्यक्षमता निश्चितपणें वाढली. नगरपालिकेंत चालू कायद्यावर बायलॉज नव्हते. त्यामुळें दैनंदिन कामांत अडचणी निर्माण होत होत्या. म्हणून त्याही तयार करण्याचा प्रयत्न केला. मे. सावंत यांना दलित वर्गाबद्दल फार मोठी सहानुभूति होती. दक्षिण महाराष्ट्र हरिजन संघासाठीं त्यांनीं फंडही जमा करून पाठविला. सन १९३० व १९३२ या दोन सालीं कोल्हापूर शहरांत प्लेगनें कहर केला. त्यावेळीं मे. सावंत यांनीं प्रत्येक घरोघरीं जाऊन घरें डिसइन्फेक्ट करण्याबद्दल व इतर आवश्यक दक्षता घेण्याबद्दल सूचना केल्या. ते येथील साईक्स लॉ कॉलेजमध्यें लेक्चरर म्हणून वर्गावर काम करीत असतांनाच अपघातानें त्यांना मृत्यु आला.





मे. विश्वनाथ तुकाराम पाटील,
बी. ए. एल्एल्. बी.
सन १९३३-३८

मे. व्ही. टी. पाटील हे कोल्हापूर जिल्ह्यांतील एक प्रमुख पुढारी आहेत. प्रिन्स शिवाजी एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक व मान्यवर अध्यक्ष या नात्यानें कोल्हापूरच्या बहुजनसमाजास प्राथमिक व दुय्यम शिक्षणाची अल्पखर्चांत सोय केली आहे. गारगोटींचे मौनी विद्यापीठाचे मे. व्ही. टी. पाटील हे प्रवर्तक व अध्यक्ष आहेत. आज ते कॉंग्रेसचे एम. एल. ए. व जिल्हा विकास मंडळाचे उपाध्यक्ष आहेत. इलाखा पंचायतीच्या शिक्षण मंडळाचे चेअरमन व नंतर इलाखा पंचायतीचे अध्यक्ष म्हणून काम करीत असतांना देवळे, विहिरी, शाळा, जोडरस्ते असे विधायक काम केलें आहे. आरोग्यसप्ताह साजरा करण्याची अभिनव कल्पना यांच्याच अंमदानींत सुरूं झाली. कुंभारतळें बुजवून त्या ठिकाणीं शाहू उद्यान तयार केलें. जोशी-वाडा भागांत पहिल्यानेंच अंडरग्राऊंड ड्रेनेजची योजना सुचवून तिचा अंमल केला. टर्मिनल टॅक्स बंद करून ऑक्ट्रॉय सुरूं केल्यामुळें नगरपालिकेच्या उत्पन्नांत भर पडली. डि. म्यु. ॲक्टखालीं रूल्स व बायलॉज करून कामांत एकसूत्रीपणा निर्माण केला.



मे. शंकरराव गोपाळराव दाभोळकर,
बी. ए. एल्एल्. बी., ॲडव्होकेट.
सन १९३८-४१

मे. शं. गो. दाभोळकर, सध्यांचे शहाजी लॉ कॉलेजचे प्रिन्सिपॉल व महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी बोर्डाचे अध्यक्ष, सहकारी क्षेत्रांतील मुरब्बी कार्यकर्ते आहेत. कांहीं काळ ते रोटरी क्लबचे प्रादेशिक गव्हर्नर होते. १९४९ सालीं न्यूयॉर्क येथें भरलेल्या "रोटरी आंतरराष्ट्रीय परिषदेस" हजर होते. नगरपालिकेवर यांच्यांच कारकीर्दींत भगवा झेंडा उभारला गेला. सहकारी तत्त्वावर नगरपालिकेंतील भंगी, झाडूवाले यांच्यासाठीं "वाल्मिकी भिशी" चालू केली व पठाणांच्या कर्जापासून दलितवर्गीय नोकरांची मुक्तता केली. रस्त्यांच्या डांबरीकरणाची मोहीम चालू झाली व कॉलरा, टायफॉईड वगैरे सांथीच्या वेळीं शहरांत येणारा भाजीपाला वगैरे जंतुनाशक द्रव्यानें धुवून विकण्याची प्रथा यांनींच प्रथम सुरूं केली. नगरपालिकेच्या अध्यक्षपदावर असतांना मुंबई येथें भरलेल्या बॉम्बे प्रेसिडेन्सी लोकल सेल्फ-गव्हर्मेंट इन्स्टिट्यूटच्या परिषदेचे चेअरमन होण्याचा मान त्यांना मिळाला.



मे. वसंतराव खंडेराव बागल,
बी. ए. एलएल्. बी.
सन १९४१–४२


सन १९४१ साळची नगरपालिकेची निवडणूक स्थानिक स्वराज्य संघानें जिंकून आपलें बहुमत प्रस्थापित केल्यावर पहिल्या वर्षी अध्यक्षपदावर मे. बागल यांची निवड झाली. मे. बागल हे क्रिमिनल साईडचे एक प्रख्यात वकील असून हिंदी, मराठी व इंग्रजी या तीनही भाषेंतील त्यांचें वक्तृत्व वाखाणण्यासारखें आहे. कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेचे प्रमुख कार्यकर्ते असल्यामुळें सन १९४७च्या कोल्हापूर संस्थानच्या पहिल्या मंत्रीमंडळांत ते चीफ मिनिस्टर होते. वरुणतीर्थ येथील महात्माजींचा भव्य पुतळा यांच्याच कार्याध्यक्षतेखालीं बसविला गेला आहे. स्थानिक स्वराज्य संघानें निवडणुकीसाठीं जी कार्यक्रम पत्रिका जाहीर केली होती; त्याप्रमाणें प्रत्यक्ष कामाची आंखणी व कांहीं गोष्टींची सुरवात आणि सुधारणा यांच्याच अमदानींत चालू झाल्या. किंबहुना नगरपालिकेच्या कार्यपद्धतींत पुनर्घटना करण्याची महत्वांची कामगिरी पार पाडण्या प्रयत्न केला आहे. हल्लींचे उपराष्ट्राध्यक्ष सर्वपल्ली राधाकृष्णन यांनीं यांच्याच अमदानींत नगरपालिकेस भेट दिली. लॉ कॉलेजांतही ते दोन वर्षे प्रोफेसर होते.



मे. दत्ताजीराव संताजीराव माने
सन १९४३–४५

कोल्हापूरचे क्रांतिकारक नगराध्यक्ष या सार्थ नांवानें यांचा उल्लेख केला जातो. नगरपालिकेचे आमूलाग्र स्वरूप बदलून सर्व नागरिकांचें लक्ष वेधून देण्याइतकीं महत्वाचीं कामें यांच्या कारकीर्दींत झालीं आहेत. विशेषतः श्रीमन्महाराणी छत्रपति ताराबाईसाहेब यांचा आशीर्वाद, रीजन्सी कौन्सिलचें पूर्ण साहाय्य, पंतप्रधान पेरी यांची मदत, सर्व सभासदांचा संपूर्ण विश्वास व पाठिंबा, नागरिकांचें सहकार्य आणि वैयक्तिक श्री. माने यांची लोकप्रियता व लोकसंग्रह यांमुळें यांची कारकीर्द स्पृहणीय झाली आहे. यांच्या कारकीर्दींत बरेच नवीन कायदेकानू तयार झाले. उत्तरनवाढीचे नवनवीन मार्ग अवलंबण्यांत आले कोल्हापूर शहरांत प्राथमिक शाळेच्या झालेल्या सर्व नवीन इमारती यांच्याच कारकीर्दींत झाल्या आहेत. त्यासाठीं एक योजना तयार करण्यांत आली व जनतेचें सहकार्य मिळविलें. भा. जा. वाचनालय, नवीन दवाखाने आदि अनेक नव्या सुधारणांची भर पडली. दरबारनें शहरसुधारणा योजना, पाण्याची योजना वगैरे श्री. माने यांच्याच प्रयत्नानें जाहीर केल्या.





मे. राजाराम तुकाराम बगाडे,
बी. ए. एलएल्. बी.
सन १९४५–४७

मे. रा. तु. बगाडे हे कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेचे जुने कार्यकर्ते आणि आज कॉंग्रेसचे एम. एल. ए. आहेत. तसेंच ते जिल्हा कॉंग्रेस कमेटीचे खजिनदार आहेत. १९४२ च्या चळवळींत त्यांना दोन वेळां तुरुंगवासही भोगावा लागला आहे. नगरपालिकेंत ते प्रजापक्षाचे उमेदवार म्हणून निवडून आले. नेहमींच्या चालू कामांत नियमितपणें लक्ष घालून जनतेस सत्वर दाद मिळण्याबद्दल दक्षता घेतली. त्यांच्या वेळीं महार-भंगी या नोकरवर्गानें संप केला म्हणून त्यावेळीं एक महत्वाचा करार झाला आहे. त्या करारान्वयें महार-भंगी यांची नोकरी कायम होऊन रजा, प्रॉव्हिडंट फंड वगैरे सवलती नोकरवर्गास मिळाल्या. प्लेगाच्या सांथींत शालिनी पॅलेसमध्यें प्लेग हॉस्पिटल चालू केलें. कोल्हापूर संस्थान दुष्काळ निवारण संस्था स्थापन करून त्यावेळच्या रायबाग कटकोळ येथील दुष्काळ पीडितांना हजारों रुपयांचें साहाय्य केलें, प्राथमिक शिक्षकांचा पगार वाढविला. चंबुखडीची पाणीपुरवठ्याची योजना मंजुर झाली. नगरपालिकेंत ब्यूरो ऑफिस चालू केलें.



मे. बाळकृष्ण रघुनाथ तेंडोलकर
सन १९४७–४८


श्री. तेंडोलकर हे प्रजापरिषदेचे आघाडीचे कार्यकर्ते व निष्णात कायदेपंडित आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळांत सरकारविरोधी खटल्याचीं बहुतेक सर्व कामें यांनींच चालविलीं आहेत. सन १९४२ च्या चळवळींत सर्व क्रांतिकारकांना कायदेशीर मदत मिळावी म्हणून Legal Aid Committee स्थापन करण्यांत त्यांचा प्रामुख्यानें भाग होता. जिल्ह्यांतील प्रथम श्रेणीचे पुढारी स्थानबद्ध व भूमिगत असतांना स्थानिक चळवळीचीं सर्व सूत्रें यांच्याच हातीं होतीं. हैद्राबाद पोलीस कारवाईसाठीं कोल्हापुराहून राजाराम रायफलचे सैनिक जातांना ता. २८।५।४८ रोजीं यांनींच सलामी घेऊन निशाण दिलें. महात्माजींच्या वधानंतर कोल्हापुरांत जी जाळपोळ झाली, त्यावेळीं नगराध्यक्ष या नात्यानें त्यांनीं सर्वत्र फिरून नागरिकांना दिलासा दिला. हिंदुस्थान सरकारच्या संस्थानी खात्याचे चिटणीस श्री. व्ही. पी. मेनन यांनीं कोल्हापुरास भेट दिल्यावेळीं प्रेसिडेंट या नात्यानें श्री. तेंडूलकर यांची मुलाखत झाली, या प्रकरणांतून पक्षांत दुफळी माजली. त्यामुळें अधिक महत्त्वाच्या कामास चालना मिळाली नाहीं.



मे. डी. वाय्. भोसले

सन १९४८–४९

श्री. मामासाहेब मिणचेकर यांनीं १३ वर्षें नगरपालिकेची सेवा केलेली आहे. शहरस्वच्छता हा त्यांच्या आवडीचा छंद आहे. म्हणून नेहमीं इतर कोणत्याही कमिटीपेक्षां सॅनिटरी कमिटीवर काम करणें त्यांना अधिक पसंत पडत असे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सभासदांनीं राजिनामे दिल्यावर जानेवारी ते जून १९४३ या काळांत व्हा. प्रेसिडेंट म्हणून त्यांनी चांगलें कार्य केलें आहे. १९४८ सालीं त्यांची अध्यक्ष-पदावर निवड झाली. ऑक्ट्रॉय चेअरमन असतांना नाकीं सुधारलीं व नोकरांच्या सुखसोई वाढवून उत्पन्नांतही वाढ केली. श्री. मिणचेकर यांची अध्यक्षीय कारकीर्द म्हणजे संक्रमणाचा काळ होय. कारण विलीनीकरणां-नंतर सर्व कायदेकानू बदलले. त्यामुळें नवीन कामाच्या आंखणीपेक्षां चालू घडी कौशल्यानें नीट बसविण्याकडेच अध्यक्षांचा वेळ गेला. नियंत्रणकाळांत नगरपालिकेनें श्री. मामासाहेब यांच्या नेतृत्वाखालीं स्वस्त धान्याची दुकानें काढून धान्यपुरवठा केला. कोल्हापूर संस्थान विधिमंडळाचे सदस्य म्हणून त्यांची कामगिरी चांगली झालेली आहे.




मे. य. ना. देशपांडे, बी. ए. एल्एल्. बी.

सन १९४९–५०

मे. य. ना. देशपांडे हे कोल्हापूर संस्थान प्रजा-परिषदेचें आरंभापासूनचे कार्यकर्ते असून कांहीं काळ सरचिटणीस म्हणून काम पाहात होते. सन १९४९ सालीं ते अध्यक्ष होण्यापूर्वीं नगरपालिकेचे उपाध्यक्ष होते आणि कोल्हापूर संस्थानच्या विलीनीकरण विरोधा-बद्दलचा ठराव त्यांच्याच अध्यक्षतेखालीं भरलेल्या सभेनें पास केला. "कोल्हापूर संस्थान विलीन करूं नये; करावयाचें झाल्यास तें प्रजेचें सार्वमत घेऊन करावें. किंबहुना संयुक्त महाराष्ट्र होईपर्यंत विलीनीकरण नको." या स्वरूपाचा ठराव विलीनीकरणाच्या एकच दिवस अगोदर झाल्यामुळें मोठी खळबळ उडाली; व त्या-बद्दल पुढें श्री. य. ना. देशपांडे यांना स्थानबद्धही व्हावें लागलें. हे शांत स्वभावाचे व प्रसिद्धीविन्मुख गृहस्थ आहेत. त्यांच्या कारकीर्दींत डांबरी रस्त्यांच्या कामास विशेष चालना मिळाली. शिवराज विद्यालय पुरें झालें. वॉर्डवारीनें मटनशॉपस्‌ची व्यवस्था केली. पब्लिक वर्क्स खात्याच्या कुलीवर्गाबद्दल महत्त्वाचा करार झाला. त्यामुळें कुलीवर्गांना नोकरीची शाश्वती मिळाली आणि भंगी, झाडूवाले यांना घरभाडें मिळालें.






मे. दत्तात्रय मारुती साळोखे

सन १९५०–५१


श्री. द. मा. साळोखे हे चौदा वर्षें नगरपालि-केच्या कारभारांत भाग घेत आहेत. प्रजापरिषदेचे निष्ठावंत कार्यकर्ते असल्यामुळें आदेशाप्रमाणें सन १९४२ च्या चळवळींत नगरपालिकेच्या सभासदत्वाचा राजिनामा दिला. त्यानंतर पुन्हां १९४५ पासून ते सभासद आहेत. नगरपालिकेमध्यें स्टँडिंग कमेटीचे चेअरमन, व्हाईस प्रेसिडेंट व प्रेसिडेंट म्हणून काम केलें. शिवाय कोल्हापूर मार्केट कमेटीचे चेअरमन म्हणूनही त्यांची निवड झाली होती. त्यांच्या अध्यक्षीय अमदानींत राजारामपुरींतील भाई माधवराव बागल मार्केट, सावित्रीबाई फुले सूतिका-गृहाची सुरवात, शाहू महाराज, महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यांची प्रतिष्ठापना, उपनगरांची सुधारणा वगैरे महत्त्वाच्या गोष्टी झालेल्या आहेत. हरिजन वसाहतींतील पाण्याच्या हौदाचें कामही पुरें झालें. रविवार पेठ शिक्षण मंडळाच्या हुईया विद्यालयाच्या कार्यांत साळोखे मोठ्या आस्थेनें भाग घेतात. कोल्हापुरांतील अनेक सार्वजनिक संस्थांशीं त्यांचा संबंध आलेला आहे. आज नगरपालिकेंत सत्तारूढ असलेल्या पुरोगामी जनता आघाडीचे ते पक्षप्रमुख आहेत.



मे. आनंदराव रामचंद्र सोनावणे,
बी. ए. एल्एल्. बी.


सन १९५१–५२

मे. आनंदराव रामचंद्र सोनवणे हे कोल्हापूर नगरपालिकेचे पहिले हरिजन पदवीधर अध्यक्ष होत. श्री. सोनवणे हे अध्यक्ष होण्यापूर्वीं नगरपालिकेंत सत्तारूढ असलेल्या प्रजापक्षाचे नेते होते. श्री. सोनवणे हे अत्यंत मोकळ्या अंतःकरणाचे व विश्वासू आहेत. अध्यक्षपदावर असतांनाच सरकारी नोकरी त्यांनीं स्वीकारली व अध्यक्षीयपदाचा राजिनामा दिला. त्यानंतर रिझर्व्ह बँकेमार्फत निघालेल्या वर्गांत त्यांना ट्रेनिंग देऊन त्यांची सहकारी खात्यांत नेमणूक केलेली आहे. आज ते रत्नागिरी जिल्ह्याचे असिस्टंट रजिस्ट्रार ऑफ को–ऑप. सोसायटीज या जागेवर काम करीत आहेत. प्रौढ मतदानाचा कायदा यांच्याच अमदानींत मंजूर होऊन वॉर्ड व विभागाची रचना बदलली गेली. निवडणुकीचे १० चे ११ विभाग होऊन सभासद संख्या वाढली. सावित्रीबाई फुले सूतिकागृह सुरूं झालें. वड्डवाडी येथें नवा दवाखाना चालू केला. हरिजन वसाहती व सभोंवतालच्या नगरपालिकेच्या हद्दींतील कदमवाडी, जाधववाडी, टेंबलाईवाडी वगैरे भागांच्या विकासाबद्दल यांनीं जोरदार प्रयत्न केले आहेत.



मे. भाऊसाहेब सावबा पाटील
सन १९५२–५३

मे. भाऊसाहेब पाटील हे प्रथम शाहीर म्हणून जनतेच्या समोर आले. ते श्रीशिवछत्रपतींचे कट्टे भक्त आहेत. मुंबई सरकारनें शिवजयंतीची सुट्टी नाकारतांना तत्कालीन मुख्य मंत्र्यांनीं जें विधान केलें, त्यावर श्री. भाऊसाहेबांनीं जळजळीत टीका करून सरकारचा कडक भाषेंत निषेध केला, व त्याचा परिणाम म्हणून त्यांना आठ महिने तुरुंगवास भोगावा लागला. शिवाजी पेठेंतील श्री बलभीम को-ऑप. बँक लि., मराठा को-ऑप. बँक लि., या संस्थेंत केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे. ते श्रीशाहू शिक्षण प्रसारक मंडळाचे चेअरमन म्हणून काम करीत असतात. शेतकरी कामगार पक्षाच्या शहर शाखेचे चिटणीस व श्रीशाहू सत्यशोधक समाजाचे सेक्रेटरी म्हणूनही काम केलें आहे. १९५२ सालीं श्री. भाऊसाहेब यांची अध्यक्षपदावर निवड झाली. एक वर्षाच्या कारकीर्दींत टेंबलाईवाडी येथें पाण्याची सोय केली. बावड्यास पाण्याचा नवीन हौद बांधला. नगरपालिकेच्या पश्चिमेकडील नवीन अर्ध्या इमारतीची पायाभरणी यांच्याच हस्तें झाली. डी वॉर्डांतील गवत मंडई सुस्थितींत आणली.



मे. दत्तात्रय हरिबा शेळके,
बी. ए. एल्एल्. बी., ॲडव्होकेट.
सन १९५३–५४

मे. शेळके हे क्रिमिनल साईडचे निष्णात वकील आहेत. प्रौढ मतदानपद्धतीनें झालेल्या निवडणुकींत पुरोगामी जनता आघाडी पक्ष बहुमतांत आला आणि सन १९५३ सालीं यांची अध्यक्षपदावर निवड झाली. या वर्षांचें वैशिष्ट्य म्हणजे सर्व पोटसमित्या विरोधी गटाच्या असतांनाही सर्वांशीं सहकार्यानें वागून स्पृहणीय काम केलें. यांच्याच कारकीर्दींत ड्रेनेज योजनेस प्रथम-मंजुरी मिळाली. नवीन पद्धतीचे ॲक्वाप्रिव्हि संडास बांधले गेले. राजारामपुरींत आयुर्वेद दवाखाना सुरूं झाला. गेलीं दहा वर्षें ते नगरपालिकेचे सभासद आहेत. आर्यसमाजाचे उपाध्यक्ष, शिक्षण समितीचे चेअरमन व हिंदी विद्यालयाचे प्रबंधक अशा अनेक विविध संस्थांशीं त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. म्यु. बरोच्या स्कूल बोर्डाचे चेअरमन म्हणूनही त्यांची निवड झालेली होती. त्यामुदतींत प्राथमिक शाळेसाठीं बऱ्याच नवीन इमारती तयार झाल्या. त्यांच्या मनमिळाऊ स्वभावामुळें सार्वजनिक कामांत त्यांचा लोकसंग्रह मोठा आहे.

# प्रकरण ९ वें

# विलीनीकरणानंतर

## ( १९४९–१९५४ )

ता. १ मार्च १९४९ रोजीं कोल्हापूर संस्थान मुंबई इलाख्यांत विलीन झालें. या घटनेमुळें नगरपालिकेच्या कारभारावर फार दूरगामी परिणाम होणें हें अपरिहार्य होतें. म्हणून नगरपालिकेला गेल्या चारपांच वर्षांत कोणत्या अडचणींतून मार्ग काढावा लागला, याची नीट कल्पना येण्यासाठीं या परिणामांची थोडी तपशीलवार माहिती सांगणें जरूर आहे.

२. **विलीनीकरणाचे परिणामः**—विलीनीकरणामुळें पूर्वींचे कोल्हापूर संस्थानांतील कायदे व कानू रद्द होऊन मुंबई राज्यांत प्रचलित असलेले नगरपालिकांचे सर्व कायदे व कानू या नगरपालिकेस लागूं झाले. विशेषतः पूर्वींचा The Kolhapur Municipal Boroughs Act, 1944 हा रद्द होऊन त्याऐवजीं The Bombay Municipal Boroughs Act, 1925 हा लागूं झाला ( ता. २५ जुलै १९४९ ). त्यामुळें पूर्वींचे सर्व कानू व पोट कायदे ( Rules & By-Laws ) हे कायद्याच्या दृष्टीनें निरुपयोगी ठरले. त्याऐवजीं नवीन कानू व पोट कायदे इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषांमध्यें तयार करून देण्याची जबाबदारी उत्पन्न झाली. हें काम अद्याप चालूं आहे व सर्व नवीन कानू व पोट कायदे अंमलांत येण्यास अजून एखादें वर्ष सहज लागेल. त्याचप्रमाणें प्राथमिक शिक्षणासाठीं कोल्हापूर दरबारनें पास केलेला The City of Kolhapur Primary Education Act, 1942, हा रद्द होऊन त्याऐवजीं The Bombay Primary Education Act, 1947 हा लागूं झाला. त्यामुळें पूर्वींची "शिक्षण समिति" रद्द होऊन त्याबद्दल नवीन "स्कूल बोर्ड" स्थापन झालें.

कायद्यांतील या मोठ्या व दूरगामी बदलामुळें कांहीं फायदे झाले, हें नमूद केलें पाहिजे. चीफ ऑफिसरला नेमण्याचा अधिकार नगरपालिकेला असावा, असें नगरपालिकेचें १९४१ पासून मागणें असूनही त्याला दरबारनें मान्यता दिली नव्हती. पण आतां तो हक्क अपोआपच नगरपालिकेला मिळाला. त्याचप्रमाणें मुंबई राज्यांतील इतर नगरपालिकांप्रमाणें सर्व नोकरांच्या महागाई भत्यावर ५० टक्के, म्युनिसिपल हद्दींतील बिनशेती साऱ्यापैकीं ७५ टक्के, सदर हद्दींतील जमीन महसुलापैकीं १५ टक्के तसेंच सदर हद्दींतील लोकल फंड वगैरे ग्रँट्स या नगरपालिकेलाहि मिळूं लागल्या. यांपैकीं कांहीं ग्रँट्स प्रत्यक्ष आज मिळत आहेत व कांहीं मिळण्याबद्दलचें काम चालूं आहे. पण

एकंदरींत पहातां आतां नगरपालिकेला सरकारकडून बरेंच अर्थसाहाय्य * मिळूं लागलें व मिळणार यांत शंका नाहीं; पण या फायद्याबरोबरच बरेच तोटेंही झाले हें नमूद केलें पाहिजे. पूर्वी कोल्हापूर सरकार, हायकोर्ट, वगैरे जवळ असल्यामुळें कामांचा निकाल बऱ्याच झट्दिशीं होत असे. त्या मानानें सध्यां थोडा विलंब लागतो किंवा तितक्या सौकर्यानें कामें होत नाहींत. पूर्वी संस्थानांतील ही सर्वांत मोठी नगरपालिका असल्यामुळें तिला विशेष सवलती मिळत असत; त्या साहजिकच आतां मिळणें शक्य नाहीं. तसेंच आतां कांहीं नवीन बाबींवर सरकारी मदत मिळत असली, तरी पूर्वी दरबारकडून मिळत असलेल्या शहरसुधारणा वगैरे मदती व व्हील टॅक्स वगैरेसारख्या रकमा बंद झाल्या; तसेंच देवी टोंचणें वगैरेसाठीं आतां पूर्वी नसलेली आर्थिक जबाबदारी नगरपालिकेवर पडूं लागली आहे; आणि एकंदरींत पाहतां सद्यःस्थितीमध्यें विलीनीकरणानंतर नगरपालिकेचा आर्थिक फायदा झाला कीं तोटा झाला, हें सांगणेंच कठीण आहे.

अर्थात् या विषयाची चर्चा करून उपयोग नाहीं. संस्थानांचें विलीनीकरण ही एक देशव्यापी व एकंदरींत देशहिताची चळवळ होती, म्हणून तिच्यापासून झालेले सर्व फायदे व तोटे प्रत्येक संस्थेनें खुल्या दिलानें स्वीकारलेच पाहिजेत व त्याप्रमाणें या नगरपालिकेनेंहि त्यांचा स्वीकार केला आहे. मात्र या नवीन परिस्थितीशीं जुळवून घ्यायला थोडा वेळ लागला व त्रास पडला, आणि त्यामुळें कांहीं कालपर्यंत कामाचें पाऊल सावकाश पडत होतें, ही गोष्ट येथें नमूद करणें अवश्य आहे.

३. **निवडणुकी:**- संस्थानचें विलीनीकरण झालें त्यावेळीं जी जनरल कमिटी अस्तित्वांत होती तिच्या सभासदांचीं नांवें गेल्या प्रकरणांत दिलीं आहेतच. तिचे पहिले अध्यक्ष श्री. **डी. वाय. भोसले ऊर्फ मामासाहेब मिणचेकर** हे होते (१९४८--४९). त्यानंतर श्री. **य. ना. देशपांडे,** बी. ए. एलएल. बी. हे अध्यक्ष झाले (१९४९-५०). त्यानंतर श्री. **द. मा. साळोखे** (१९५०-५१) व श्री. **ए. आर. सोनवणे** बी. ए. एलएल. बी. (१९५१-५२) हे अध्यक्ष होते.

* गेल्या पांच वर्षांत या नगरपालिकेला पुढीलप्रमाणें सरकारी ग्रँट मिळाली आहे:—

| अ. नं. | बाब | १९४९-५० | १९५०-५१ | १९५१-५२ | १९५२-५३ | १९५३-५४ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महागाई भत्ता ग्रँट | २,०२,११२ | २,००,६४७ | २,२५,७१४ | २,३३,१५४ | १,१७,८२४ |
| २ | लॅन्ड रेव्हिन्यू ,, | ७,०७२ | ३,०२६ | — | १४,९६८ | १,५०३ |
| ३ | नॉन. अग्रि. ,, | ८,०९६ | ८,२४२ | ८,२९७ | ८,३५० | ४,११५ |
| ४ | गुमास्ता ,, | — | — | १,६४२ | १०३ | १२५ |
| ५ | म्यु. पल ॲक्टा. दंड | — | — | — | — | १५,७८३ |
| ६ | वाहानें पासींग ग्रँट | — | — | — | — | २०९१ |
| | | २,१७,२८० | २,११,९१५ | २,३५,६५३ | २,५६,५७५ | १,४१,४४१ |



इ. स. १९५२ सालीं प्रौढ मतदान पद्धतीनें नगरपालिकेची पहिली निवडणूक झाली. त्यासाठीं मुंबई सरकारनें शहराचे अकरा विभाग पाडून सभासदांची संख्या ४० ऐवजीं ४४ केली. त्यांपैकीं ३ हरिजन व ४ स्त्रिया अशा राखीव जागा आहेत. या निवडणुकींत यशस्वी झालेल्या उमेदवारांचीं नांवें (हीच सर्वसाधारण सभा आज अस्तित्वांत आहे) पुढें दिलीं आहेत:—

१ मे. श्री. शं. बोंद्रे, २ मे. भा. सा. पाटील, ३ मे. मा. भा. भालेकर, ४ मे. कु. अंबुजा गो. सोनटक्के, एम. ए., ५ मे. मा. बा. साळोखे, ६ मे. द. रा. बुवा, ७ मे. बी डी. मगदूम (यांचे जागीं ६-११-५२ पासून पुढें), मे. रं. ज्ञा. पाटील, ८ मे. भा. तु. सरनाईक, ९ मे. द. ह. शेळके, बी. ए. एलएल. बी. १० मे. के. ब. जगदाळे, ११ मे. द. बा. पाटील, १२ मे. बा. स. मुटकेकर, १३ मे. दि. ह. चव्हाण, १४ नि. द. निकम, एम. एससी. १५ मे. ज. द. भोसले, १६ मे. सौ. विमलाबाई भि. करमरकर, जी. ए., १७ मे. शं. द. माने १८ मे. बा. बु. मणेर, १९ मे. ग. ना. चोडणकर, २० मे. आ. शं. जगताप, २१ मे. पां. वि. पोवार, २२ मे. स. आ. जानवेकर, २३ मे. शं. ख. डिगे, बी. ए., बी. टी.; २४ मे. द. मा. साळोखे, २५ मे. सौ. विमलाबाई व. बागल, २६ मे. या. दा. डंगरी, डी. सी. ई.; २७ मे. पां. ह. हळदकर, २८ गो. य. गुणे, डी. सी. ई. २९ मे. य. भा. पाटील ३० मे. बी. बी. पाटील, बी. एससी. (ऑन.), ३१ मे. रं. कृ. साळुंखे, ३२ मे. व्ही. डी. मिसाळ ३३ मे. स. मा. घाटगे, बी. ई; ए. एम. आय. ई.; ३४ मे. त्रि. भा. पाटील, ३५ मे. बा. व. लोंढे, ३६ मे. के. न. घाटगे, (मातंगगुरु) ३६ मे. दा. म. चौगुले, ३८ मे. ध. आ. लिगाडे, ३९ मे. श्री. ति. चव्हाण, ४० मे. आर. बी. पाटील, ४१ मे. बा. पां. चव्हाण, ४२ मे. एच. ए. शेख, ४३ मे. ब. धों. शिंगे, ४४ मे. सौ. मालती पंडीत नाझरे, (ता. २१-९-५३ पर्यंत) ऐवजीं मे. सौ. इंदूबाई म. नलवडे, (ता. ९-११-५३ पासून)

ही निवडणूक पुरोगामी जनता आघाडीनें लढविली व एकंदर ४४ पैकीं २२ जागा मिळविल्या. या निवडणुकींत लोकशाही आघाडीनें १६ व स्वतंत्रांनीं ६ जागा मिळविल्या. स्वतंत्र-पैकीं २ सभासदांनीं पुरोगामी जनता आघाडीशीं सहकार्य केलें व जनता आघाडी एप्रिल १९५२ मध्यें अधिकारारूढ झाली. या बॉडीचे पहिले अध्यक्ष श्री. भाऊसाहेब सावबा पाटील हे निवडून आले (१९५२-५३). त्यानंतर पुढील वर्षीं जनता आघाडीचे नेतृत्व शे. का. पक्षानें केलें व शे. का. म्युनिसिपल पक्षानें नगराध्यक्षांची निवडणूक जिंकून श्री. दत्ताजीराव शेळके, बी. ए., एलएल. बी. नगराध्यक्ष झाले (१९५३-५४). चालू वर्षीं झालेल्या निवडणुकींत श्री. बाबूराव सटवाजीराव मुटकेकर, बी. ए. एलएल. बी. अध्यक्षपदीं निवडून आले (१९५४).

(४) **सुधारणा:**—या पांच वर्षांच्या कालांत नगरपालिकेनें अनेक कार्यें हातीं घेऊन तडीस नेलीं आहेत. त्यांपैकीं मुख्य कांहीं कामांचा उल्लेख पुढें दिला आहे:—

**(१) नोकरवर्गः**—पूर्वी कोल्हापूर दरबार आपल्या नोकरांना जो पगार देत असे तोच पगार स्वतःच्या नोकरांना द्यावयाचा, असें नगरपालिकेचें धोरण होतें. त्यास अनुसरून विलीनीकरण झाल्यावर मुंबई सरकार आपल्या नोकरांना जें पगार-स्केल देत आहे, तेंच पगार-स्केल नगरपालिकेनेंही आपल्या नोकरांना लागू केलें व त्यासाठीं दरसाल रु. ६०,००० चा बोजा स्वीकारला. त्याचप्रमाणें झाडूवाले, भंगी व फायर ब्रिगेड या खात्यांतील नोकरांना घरभाडें देण्याचा ठराव केला. यासाठीं सालीना अदमासें रु. १२००० खर्च येतो; तसेंच पब्लिक वर्क्स खात्यांतील रोज मजूर, सुतार, गवंडी, गाडीवान वगैरे हंगामी नोकरांना कायम नोकरांच्या प्रॉ. फंड, रजा, वगैरे सर्व सवलती दिल्या आणि नोकरवर्गाच्या सोसायटीला सवलतीच्या भाड्यानें जागा देणें व अल्प व्याजानें कांहीं कालापर्यंत ठेव देणें, रक्कम वसुलीला जरूर ती सर्व मदत करणें, त्यांच्या जिमखान्याला सालीना रु. १००० चें सहाय्य करणें; इत्यादि मार्गांनीं नोकरवर्गाचें हित साधण्यासाठीं प्रयत्न करण्यांत आला. शिवाय नगरपालिकेंतील खालच्या कामगारांना पूर्वी साप्ताहिक सुटी मिळत नसे. त्यांना या कालांत आठवड्यास एक दिवस सुटी देण्याचें ठरविलें गेलें.

**(२) ऑफिस इमारतः**—सध्यां नगरपालिकेची कचेरी जेथें आहे ती गांधी मार्केटची इमारत इ. स. १९२८–२९ सालीं अर्धीच बांधण्यांत आली होती; म्हणजे तिच्या चार बाजूंपैकीं पूर्व व दक्षिण बाजू मात्र बांधल्या गेल्या होत्या. हल्लीं नगरपालिकेनें उत्तर बाजू पूर्ण केली आहे व पश्चिम बाजूकडील पहिला मजला पुरा केला आहे. लवकरच ही बाजूहि पूर्ण करण्यांत यावयाची आहे. या सर्व योजनेस जवळ जवळ रु. ३½ लाख खर्च येणार असून त्यामुळें नगरपालिकेच्या सर्व कचेऱ्यांची उत्तम सोय होणार आहे.

**(३) मार्केट्सः**—लोकांना मार्केटची सोय करण्यासाठीं या कालांत फारच स्पृहणीय कामगिरी करण्यांत आली आहे. राजारामपुरी विभागांत मार्केटची सोय नव्हती. म्हणून तेथें रु. ७५,००० खर्चून नगरपालिकेनें मार्केटची इमारत बांधली. या इमारतीला कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेचे कार्याध्यक्ष व कोल्हापुरांतील स्वातंत्र्य लढ्याचे नेते श्री. माधवरावजी बागल यांचें नांव देण्यांत आलें आहे. हत्तीमहालजवळील मध्यवर्ती मटन मार्केट रु. ३०,००० खर्चून वाढविलें; आणि प्रत्येक वॉर्डामध्यें एक अशीं आधुनिक पद्धतीचीं सहा मटन दुकानें बांधलीं ( खर्च प्रत्येकीं रु. ६००० ). कपिलतीर्थ मार्केट दुरुस्त केलें. गवत मंडई अदमासें ३० हजार रुपये खर्चून तयार केलेल्या नवीन जागेंत नेण्यांत आली. गुरांच्या बाजाराचें नवीन जागेंत उद्‌घाटन केलें व चिंबे, जळाऊ लाकूड वगैरे सामानाच्या बाजाराची पाण्याच्या खजिन्याजवळ स्वतंत्र व उत्तम सोय करण्यांत आली. शुक्रवार धर्मशाळेंलगतचे मार्केटकरितां फरशी वगैरे करून सोयी केल्या. सदर बाजारमध्यें रु. १३००० खर्च करून आधुनिक पद्धतीचा कसाईखाना बांधला. एकंदरींत पाहतां या पांच वर्षांत मार्केटसाठीं जेवढी तरतूद केली गेली तेवढी या पूर्वीच्या बऱ्याच वर्षांत केली गेली नव्हती, असें म्हटल्यास तें चूक होणार नाहीं.



**(४) डांबरी रस्तेः**—कोल्हापूर शहरांत डांबरी रस्ते प्रथमच इ. स. १९३८–३९ च्या सुमारास दरबारनें केले. पण अशा डांबरी रस्त्यांची संख्या फारच थोडी होती. त्यानंतर पुढील १०।१२ वर्षांत डांबरी रस्ते झालेच नव्हते व त्यामुळें नागरिकांना फार त्रास होत असे. म्हणून या कालांत डांबरी रस्त्यांची योजना फार मोठ्या प्रमाणावर हातीं घेण्यांत आली. या कार्याला १९५० पासून सुरवात झाली व आतांपर्यंत एकूण अकरा मैल लांबीचे डांबरी रस्ते रु. ८,५५,८८१ खर्चून करण्यांत आले आहेत. या नगरपालिकेची ही फारच मोठी कार्यसिद्धि आहे.

**(५) गटारेंः**—गटारांची सुधारणा करण्यासाठीं एक योजना तयार करून हातीं घेण्यांत आली आहे व त्याप्रमाणें काम चालू आहे. गेल्या पांच वर्षांत एकूण चार मैल तीन फर्लांग लांबीचीं गटारें बांधण्यांत आलीं असून त्यावर रु. १,५३,७६७ खर्च झाला आहे.

**(६) मुताऱ्या व संडासः**—सार्वजनिक घट्ट्या पूर्वी जुन्या पद्धतीच्या होत्या. त्या सुधारण्यासाठीं ओव्हरहेड टँक बांधणें; छप्पर घालणें; चावी घेणें; इत्यादि कार्यक्रम हातीं घेऊन पार पाडले गेले. त्याचप्रमाणें १४ ठिकाणीं भंग्याची जरूर न लागणारे ॲक्वा प्रिव्हि ( Aqua privy ) संडास बांधले आहेत. तसेंच जुन्या मुताऱ्या सुधारून अनेक ठिकाणीं नवीन बांधण्यांत आल्या.

**(७) दिवाबत्तीः**—अनेक ठिकाणीं नवीन दिवे देण्यांत आले व बऱ्याच जागीं दिव्यांची शक्ति वाढविण्यांत आली. याविषयीं झालेल्या कार्याची कल्पना पुढील आंकड्यांवरून येईलः—

| | १९४८–४९ | १९५३–५४ |
|---|---|---|
| दिव्यांची संख्या | १,०३२ | १,६२५ |
| खर्च | ५९,६४० | ७१,९१५ |

**(८) सार्वजनिक बागाः**—सर्व सार्वजनिक बागांची सुधारणा करून तेथें मुलांच्या खेळण्याची व जरूर तेथें रेडिओ लावून नागरिकांचें मनोरंजन करण्याची सोय केली गेली. ताराबाई विद्यालयाजवळ एक नवीन बाग करण्यांत आली आहे व तिथें मुलांना खेळण्याची सोय केली आहे.

**(९) शाळा इमारतीः**—बेलबाग वसाहतींतील " शिवराय विद्यालय " ची इमारत पुरी करण्यांत आली ( खर्च रु. २७,००० ); तसेंच शुक्रवारांतील मुलाची शाळा नं. ३ ही इमारत दुमजली केली गेली ( खर्च रु. ५,००० ).

**(१०) दवाखानेः**—लक्ष्मीपुरींत नगरपालिकेतर्फे सौ. सावित्रीबाई फुले सूतिकागृह १९५१-५२ सालीं सुरू करण्यांत आलें. शुक्रवार पेठेंतील दवाखान्यासाठीं इमारतीची सोय करण्यांत आली. तसेंच राजारामपुरींत महात्मा जोतिराव फुले या नांवानें एक नवीन दवाखाना सुरू करण्यांत आला व त्यास इमारतीची सोय केली गेली.

**(११) ताराबाई रोडः**—ताराबाई रोडची महत्त्वाची योजना अपुरी राहिली होती. ती घरें हटवून पुरी केली. हा सर्व रस्ता डांबरी केला व त्याच्या बाजूनें फूटपाथ बांधून झाडें लावलीं.

**(१२) सुभाष स्टोअरः** — नगरपालिकेला एका मध्यवर्ती स्टोअरची फार जरूर होती. म्हणून सुभाष स्टोअर बांधण्यांत आलें. तेथें मोटार गॅरेज, वर्कशॉप, सीमेंट, लोखंड, वगैरे साहित्य ठेवण्याचीं कोठारें, पेट्रोल पंप, टेलिफोन, फायरब्रिगेड स्टेशन, इत्यादि सोयी करण्यांत आल्या आहेत. यामुळें नगरपालिकेचा कारभार कार्यक्षम व काटकसरीचा करण्यास फारच मदत झाली आहे.

**(१३) मेकॅनायझेशनः**—पूर्वी कचरा व मैला यांची वाहतूक करण्यासाठीं रेड्याच्या गाड्या असत. त्या बंद करून आतां बंद टँकच्या ट्रक्स ठेवण्यांत आल्या आहेत. यामुळें कामाचा उरक चांगला वाढला आहे.

**(१४) सार्वजनिक चाव्याः**—गरीब वस्तींत लोकांना पाणी मिळण्याची सोय व्हावी म्हणून नगरपालिकेनें स्वतःच्या खर्चानें शहराच्या निरनिराळ्या भागांत २८ ठिकाणीं सार्वजनिक चाव्या व हौद दिले आहेत. यासाठीं सध्यां नगरपालिका रु. १५००० खर्च करते.

**(१५) ऑक्ट्रॉय नाकीं:**—रेसकोर्स, निगवें, टेंबलाई व शिरोली येथें आधुनिक पद्धतीचीं ऑक्ट्रॉय नाकीं बांधण्यांत आलीं आहेत. महत्त्वाच्या नाक्यांवर टेलिफोन व प्रत्येक नाक्यावर विजेच्या दिव्याची सोय केली आहे.

**(१६) ड्रेनेजः**—शहरांतील अंडरग्राऊंड ड्रेनेजची योजना हातीं घेण्याच्या उद्देशानें प्राथमिक तयारी पूर्ण करण्यांत आली आहे. या योजनेला ६७ लाख रुपये खर्च येणार असून त्याचें तपशीलवार एस्टिमेट करण्याचें काम चालू झालें आहे.

**(१७) फायर ब्रिगेडः**—फायर ब्रिगेडसाठीं फायर सुपरिंटेंडेंटची नवीन जागा निर्माण केली गेली आणि तीन मोटारी, एक ट्रेलर पंप व इतर सर्व साहित्य नवीन खरेदी केलें आहे. या शाखेची कार्यक्षमता सध्यां फारच उत्तम दर्जाची आहे, असें अभिमानानें सांगतां येईल.

**(१८) पुतळेः**—नगरपालिकेच्या कक्षेत व ताब्यांत असलेल्या अनेक पुतळ्यांनीं शहराच्या सौंदर्यांत भर पडली असून नागरिकांपुढें थोर व्यक्तींचे आदर्श ठेवण्यांत आलेले आहेत. या पुतळ्यांत छ. शिवाजी महाराज, म. गांधी, छ. शाहू महाराज, म. फुले, डॉ. आंबेडकर, कलातपस्वी आबालाल रहिमान, आईसाहेब महाराज (लक्ष्मीबाई महाराणीसाहेब) यांचे पुतळे आहेत. यांपैकीं म. गांधींचा वरुणतीर्थ मैदानावरील पुतळा सर्वांत मोठा असून एवढा मोठा त्यांचा पुतळा भारतांत इतरत्र नाहीं. पुतळ्याची उंची ११ फूट आहे व त्यासाठीं १ लक्ष रु. खर्च करण्यांत आले आहेत. प्रजापरिषदेचे कार्याध्यक्ष श्री. माधवरावजी बागल हे या पुतळ्याचे संयोजक होते व छ. शहाजी महाराजांनीं या पुतळ्यास २५ हजार रु. देणगी दिली आहे. पुतळा समितींत श्री. वसंतराव बागल (अध्यक्ष), श्री. ना. तु. सरनाईक व श्री. त्र्यं. सी. कारखानीस यांचा समावेश आहे. हा पुतळा कोल्हापूरचे ख्यातनाम कलामहर्षी कै. बाबूराव पेंटर यांनीं तयार केला व त्याचें उद्घाटन ता. ७ जून १९५४ रोजीं मुंबई राज्याचे महसूल मंत्री श्री. भाऊसाहेब हिरे यांच्या हस्तें झालें.



म. गांधींच्या पुतळ्यापासून सुमारें दोन फर्लांगाच्या अंतरावर छ. शिवाजी महाराजांचा अर्धपुतळा आहे. श्री शिवाजी तरुणमंडळातर्फे हा पुतळा बसविण्यांत आला असून छ. शहाजी महाराजांच्या हस्तें या पुतळ्याचें उद्घाटन ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं झालें. हा पुतळाहि कलामहर्षी कै. बाबूराव पेंटर यांनीं तयार केला आहे. कोल्हापूर नगरपालिकेच्या शाहू उद्यानांत असलेला छ. शाहू महाराजांचा पुतळा श्री. माधवरावजी बागल यांनीं दिलेल्या प्लॅस्टर मॉडेलवरून नगरपालिकेनें ब्राँझमध्यें ओतविला. या पुतळ्याचेंहि उद्घाटन ता. २५ फेब्रुवारी १९५१ रोजीं शहाजी महाराजांच्या हस्तें झालें. पद्माराजे उद्यानांतील कलातपस्वी कै. बा. आबालाल रहिमान यांचा पुतळा कोल्हापूर आर्ट सर्कलनें नगरपालिकेस दिला असून तो श्री. बाळ चव्हाण यांनीं तयार केला. त्याचें उद्घाटन २८ डिसेंबर १९४८ इ. रोजीं शेख फत्तेलाल यांच्या हस्तें झालें.



डॉ. आंबेडकर पुतळा समितीकडून डॉ. भीमराव आंबेडकर यांचा व श्री शाहू सत्यशोधक समाजाकडून म. ज्योतिराव फुले यांचा असे दोन पुतळे कोल्हापूर नगरपालिकेस देण्यांत आले आहेत. त्यांचा उद्घाटन समारंभ बिंदू चौकांत ता. ९ डिसेंबर १९५० रोजीं श्री. माधवरावजी बागल यांच्या अध्यक्षते-खालीं कोल्हापुरांतील जनतेकडून झाला. डॉ. आंबेडकरांचा पुतळा श्री. बाळ चव्हाण यांनीं व म. फुले यांचा पुतळा कलामहर्षी कै. बाबुरावपेंटर यांनीं केले आहेत. कै. लक्ष्मीबाई महाराणीसाहेब यांचा पुतळा १९२९ सालीं बसविण्यांत आला. त्यांच्या नांवानेंच लक्ष्मीपुरी वसाहत करण्यांत आली. या पुतळ्याचें उद्घाटन त्या वेळचे भारताचे व्हाईसरॉय लॉर्ड आयर्विन यांनीं केलें. शहर पोलीस चौकीजवळ हा पुतळा आहे.

**(१९) पुणें विद्यापीठाशीं विलीनीकरणः**— नंतर झालेल्या फायद्यांपैकीं एक महत्त्वाचा फायदा म्हणजे पुणें विद्यापीठाशीं या नगरपालिकेचा प्रत्यक्ष संबंध जोडला गेला. सध्यां पुणें विद्यापीठाचे कोर्टावर या जिल्ह्यांतील सर्व नगरपालिकांतर्फे एक प्रतिनिधि निवडला जातो. पण आतांपर्यंत ही जागा या नगरपालिकेच्या सभासदांनाच मिळाली आहे. चालू मुदतींत श्री. एस्. बी. प्रभावळे व श्री. बी. बी. पाटील, बी. एससी. (ऑनर्स) यांची या जागेवर निवड झाली आहे.

**(२०) कामगारांच्या संघटना:**—कोल्हापूर शहर म्युनिसिपल कामगार संघाची स्थापना २० एप्रिल १९४६ रोजीं श्री. माधवरावजी बागल यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. श्री. माधवरावजी बागल व श्री. शंकरराव प्रभावळे, यांनीं सुरवातीच्या काळांत या संघाच्या वाढीस बरेंच सहाय्य केलें. १९४९ मध्यें नगरपालिका नोकर संघाची स्थापना झाली. या दोन्ही संघटनांनीं कामगारांचे कामाचे तास, साप्ताहिक सुट्टी, बोनस, युनिफॉर्म, इत्यादि आ त्या प्रश्नांबाबत नगरपालिकेचे सभासद व अधिकारी यांचें वेळोवेळीं सहकार्य घेऊन व आवश्यक तर औद्योगिक न्यायालयामार्फत प्रयत्न करून कामगारांच्या परिस्थितींत सुधारणा घडवून आणली आहे. सध्यां नगरपालिकेच्या कामगारांना साप्ताहिक सुट्टी मिळते. नोकरांना ड्रेस, घोंगडी, घरभाडें व बूट देणें व त्यांचे युनिफॉर्म्स धुऊन देणें हीं कामें नगरपालिका स्वखर्चानें करते.

**(२१) नोकरांची को-ऑपरेटिव्ह क्रे. सोसायटी:**—नगरपालिकेच्या नोकरांनीं आर्थिक मंदीच्या काळांत स्वतःच्या गरजा नोकरांच्या जमविलेल्या फंडांतूनच सहकारी तत्त्वाचे साहाय्यानें भागवितां याव्यात, याकरितां सन १९४५ मध्यें संस्थेची स्थापना केली असून सदरची संस्था सुरवातीपासून एकसारखी भरभराटींत आहे. या सोसायटीचें शेअर भांडवल ३३०० रु. असून खेळतें भांडवल १ लक्ष २५ हजार रु. आहे. सोसायटीचा रिझर्व्ह फंड ३ हजार रु. आहे. संस्थेचा कारभार पूर्णपणें सहकारी तत्त्वावर होत असून तो संपूर्णपणें म्यु. पल नोकरांचेच हातीं आहे. सदर संस्थेस 'अ' वर्ग मिळाला आहे.

या संस्थेमुळें नोकरांच्या गरजा शक्यतों लवकर भागत असून प्रत्येक सभासद स्वतःची जबाबदारी दक्षतेनें पार पाडीत आहे. त्यामुळें कारभार दिवसेंदिवस प्रगतिपथावर आहे, हें पुढील आंकड्यांवरून दिसून येईल:—

| साल | सभासद | शेअर भांडवल | दिलेलें कर्ज |
|---|---|---|---|
| १९५१।५२ | ३११ | २००३० | ४८१५३ |
| १९५२।५३ | ३२९ | २७८८० | ४७८५० |
| १९५३।५४ | ३५५ | ३३०२० | ६२१८५ |

या सोसायटीच्या सभासदांत नगरपालिकेचा सर्व प्रकारचा नोकरवर्ग आहे व सोसायटीमुळें त्यांच्यांत बचत करण्याची प्रवृत्ति निर्माण होत आहे.

**(२२) नगरपालिका नोकर क्लब:**—म्यु. चे नोकर वर्गानें सन १९४८ सालीं क्लब स्थापन केला असून तो रजिस्टर करण्यांत आला आहे. क्लबमध्यें बैठे व इतर खेळ खेळले जातात. या क्लबला म्यु. दरसाल एक हजार रु. ग्रॅन्ट देते. हा क्लब सर्व कनिष्ठ व वरिष्ठ नोकरांना खुला आहे. क्लबला स्वतःची इमारत नाहीं. स्वतःची एक सुंदर इमारत व सभोंवार क्रीडांगणासाठीं जागा असावी या दृष्टीनें क्लबचे प्रयत्न सुरू आहेत. नोकरांत क्रीडावृत्तीची व कलाविषयक गुणांची वाढ व्हावी, हा या क्लबचा हेतु आहे. क्लबमधील बऱ्याच सभासदांनीं सार्वजनिक खेळांत भाग घेऊन आपलें क्रीडानैपुण्य दाखवून खेळांत पारितोषिकेंही मिळविलीं आहेत.



क्लबकडील तीन सालचे जमाखर्चाचे आंकडे पुढें दिले आहेत:—

| | जमा | खर्च |
|---|---|---|
| सन १९५०–५१ | १३५३–११–१० | ८३१– ८–६ |
| सन १९५१–५२ | २७७९– ३– ४ | २१६१–१४–० |
| सन १९५२–५३ | १६९५–११–१० | ६७१–१४–६ |

**(२३) श्रमदान:**—सन १९५२–५३ सालामध्यें टेंबलाईवाडी या उपनगराचे लोकांनीं श्रमदान करून दोन फर्लांग रस्ता तयार केला. त्यास नगरपालिकेनें जरूर तें साहाय्य दिलें असून शिवाय पाण्याचा नळही दोन हजार फूट लांबीवरून आणून व ५ हजार रु. खर्चून पाण्याची कायमची सोय केली आहे. यासाठीं तेथील नागरिकांनीं पाईपसाठींही खुदाई केली आहे. टेंबलाईवाडीच्या नागरिकांनीं श्रमदान करून शाळेसाठीं दगड काढले आहेत. नगरपालिकेच्या हद्दींत श्रमदान केल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे. भोसलेवाडीच्या लोकांनींहि १९५२–५३ सालीं २ रस्ते श्रमदानानें केले आहेत.

**(२४) महिलांच्या हिताचें कार्य:**—१९४३ पासून कोल्हापूर नगरपालिकेनें महिलांच्या हिताकडे विशेष लक्ष दिलें आहे. रेसकोर्सवरील पद्माराजे वाचनालय नगरपालिकेनें फक्त स्त्रियांच्या-साठीं १९४५ ते १९५२ पर्यंत चालविलें होतें. १९५१ सालीं 'सावित्रीबाई फुले सूतिकागृह'



नगरपालिकेनें सुरू केलें. गरीब महिलांच्या बाळंतपणाची सोय या सूतिकागृहांत अल्प खर्चांत होते. या सूतिकागृहांत २१ खाटा असून, १९५३–५४ मध्यें या सूतिकागृहांत बाळंतपणाच्या ३३५ केसीस आल्या.


**मुलींचें मोफत हायस्कूल:—**कोल्हापूर संस्थानच्या विलीनीकरणापूर्वी मुलींना सर्व प्रकारचें शिक्षण मोफत मिळत असे. पण विलीनीकरणानंतर या सर्व सवलती बंद झालेनें बहुजनसमाजांतील मुलींना शिक्षणाचा मार्ग बंद झाला. पालक नेहमीं मुलांच्या शिक्षणाकडे जितक्या आस्थेवाईकपणें लक्ष देतात, तितक्या आस्थेवाईकपणें मुलींच्या शिक्षणाकडे देत नाहींत. स्त्री सुशिक्षित असल्यास घरांतील मुलांनाहि चांगले संस्कार लाभतात. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन नगरपालिकेनें स्वत:चें मुलींचें मोफत हायस्कूल ता. ७ जुलै १९५४ पासून सुरू केलें आहे. सध्यां या हायस्कूलमध्यें ८, ९ व १० वीचे एकूण ५ वर्ग असून शिक्षकवर्ग विनीत असा नेमलेला आहे. आज या शाळेंत १५२ मुली शिक्षण घेत असून, सदर हायस्कूल हें सर्व शैक्षणिक साधनांनीं सुसज्ज करून तें एक उत्कृष्ट मुलींचें हायस्कूल करावें, या उद्देशानें नगरपालिकेनें पहिल्याच वर्षीं यावर ३० हजार रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. आज हें हायस्कूल ज्या ठिकाणीं भरतें, ती जागा थोडी अडचणीची आहे. ही अडचण दूर करण्याच्या दृष्टीनें नगरपालिकेनें रविवार पेठेंतील तोफखाना या नांवाची सरकारी गोडाऊनची जागा सरकारकडे मागितली असून ती मिळविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तसेंच सदर हायस्कूल हें ५०० विद्यार्थिनींचें करून तें उत्तम तऱ्हेनें चालवून एक आदर्श शैक्षणिक संस्था बनविण्याचा नगरपालिकेचा मानस आहे.

(२५) **ग्रँट्स:—**शहरांतील प्रमुख सार्वजनिक व उपयुक्त संस्थांना नगरपालिका दरसाल ग्रँट्स देते. गेल्या ३ वर्षांत नगरपालिकेनें दिलेल्या मुख्य ग्रँट्सचा निर्देश खालीं केला आहे:—

| अ. नं. | खर्चाची बाब | सन १९५१-५२ | सन १९५२-५३ | सन १९५३-५४ |
|---|---|---|---|---|
| १ | अभ्यासिका, शेलाजी वन्नाजी विद्यालय | ३०० | २५० | .... |
| २ | म्यु. पल सर्व्हंटस् जिमखाना | ५०० | १००१ | १००१ |
| ३ | लोकल सेल्फ इन्स्टि. वर्गणी | १५० | १५० | १५० |
| ४ | जयंत पी. नाईक शिष्यवृत्ति | ९६ | ९६ | ९६ |
| ५ | माधवरावजी बागल शिष्यवृत्ति | ९६ | ९६ | ९६ |
| ६ | बालवीर संस्थेस मदत | .... | ५०० | ५०० |
| ७ | नाईट हायस्कूलला मदत | ३००० | ३००० | ३००० |
| ८ | एस. डी. एफ. हायस्कूलला मदत | ३००० | ३००० | ३००० |
| ९ | करवीर नगर वाचन मंदिर | .... | २००० | १५०० |
| १० | रिमांड होम | ७५० | १००० | १००० |
| ११ | बालविकास मंदिर ( खासबाग ) | .... | .... | १००० |
| १२ | कसबा बावडा हायस्कूल | .... | .... | ३००० |



(२६) **वाचनालयें:—**१९४१–४५ या कालांत कोल्हापूर नगरपालिकेनें महाराणी ताराबाई वाचनालय, भास्करराव जाधव वाचनालय व पद्माराजे वाचनालय अशीं तीन वाचनालयें सुरू केलीं.



विलीनीकरणानंतर १९५२ मध्यें भा. जा. वाचनालयांत इतर दोन वाचनालयें समाविष्ट करण्यांत आलीं. भास्करराव जाधव वाचनालयावर कोल्हापूर नगरपालिकेनें आजपर्यंत १ लक्ष ६० हजार रु. खर्च केले आहेत. या वाचनालयांत सध्यां २० हजार पुस्तकें असून, ८५ नियतकालिकें देण्यांत येतात. गेल्या एप्रिलपर्यंत हें वाचनालय मोफत होतें. सध्यां पुस्तकांसाठीं मासिक फक्त ४ आणे वर्गणी घेण्यांत येते. नियतकालिकांचा विभाग सध्यांहि सर्वांना मोफत आहे. याशिवाय कोल्हापुरांत ६३ सार्वजनिक वाचनालयें व संस्थांना नगरपालिकेतर्फे दरसाल प्रत्येकीं ५० रु. पर्यंतचीं नियतकालिके देणगी म्हणून देण्यांत येतात. यासाठीं नगरपालिका वार्षिक २ हजार रु. खर्च करते.

**व्याख्यानमाला:—** भा. जा. वाचनालयातर्फे सुरू करण्यांत आलेल्या भास्कर व्याख्यान मालेंत मे व जून १९५४ मध्यें श्री. चिं. वि. जोशी, श्री. कृ. पां. कुलकर्णी, श्री. मामा वरेरकर, श्री. ग. वा. कवीश्वर, प्रा. अनंत काणेकर, खासदार श्री. शंकरराव मोरे यांचीं व्याख्यानें करण्यांत आलीं. 'कुटुंबनियोजन' या विषयावरील परिसंवादांत श्री. वि. स. खांडेकर, श्री. माधवरावजी बागल, डॉ. सुमति क्षेत्रमाडे, डॉ. एम. डी. जाधव ( सिव्हिल सर्जन ), डॉ. भद्रे, डॉ. काळे वगैरेनीं भाग घेतला. हीं सर्व व्याख्यानें नागरिकांना मोफत होतीं व त्यांचा फायदा हजारों नागरिकांनीं घेतला.

(२७) **नगरपालिकेची मालमत्ता:—**नगरपालिकेच्या मालकीच्या इमारती, बागा व खुल्या जागा यांची किंमत खालीं दिली आहे. नगरपालिकेच्या मुख्य इमारतींचें क्षेत्रफळ ३५३८ चौरस यार्ड असून किंमत ९ लक्ष ३७ हजार रु. आहे:—

**इमारती:—**वॉर्ड ए किं. रु. ७९५५०, बी ३७२२२, सी ९३७९६७, डी ५९०००, ई १८१२४०.

**धर्मशाळा**:—वॉर्ड ए किं. रु. ६७००, सी २६००, डी ४२०००.

**प्राथमिक शाळा**:—वॉर्ड ए किं. रु. २५२७४६, बी २११२००, सी ७५८००, डी १६०६००, ई २७५६९९.

**बागा**:—वॉर्ड ए किं. रु. २१६४२, डी ३४०००, ई १६७२५.

**सार्वजनिक संडास**:—वॉर्ड ए किं. रु. ५५३४४, बी ४४६९८, सी ३३५११, डी ३५७००, ई २५२६२.

**मुत्र्या व कोंडाळीं**:—वॉर्ड ए किं. रु. १६९२, बी ९४०५, सी ८०४४, डी ४८१३, ई ६३६९.

**नाकीं**:—वॉर्ड ए किं. रु. १८००, बी ५५००, डी ३१००, ई १८६६६.

**मटन दुकानें**:—वॉर्ड ए किं. रु. ११६७५, बी १००००, सी १०४०००, ई २३९९८.

**पाण्याचे हौद**:—वॉर्ड ए किं. रु. १०१४३, बी १२५०, सी २२००, ई ५५९६.

**मालकीच्या जमिनी**:—सर्व वॉर्डमध्यें मिळून एकर १५२–२ किं. रु. ४५९८७५.

वरील अहवालावरून या कालांत किती महत्त्वाचीं सार्वजनिक कामें करण्यांत आलीं आहेत याची थोडीशी कल्पना येईल.

५ **जमाखर्च**:— सध्यांच्या नगरपालिकेचें उत्पन्न व खर्च यांची नीट कल्पना यावी म्हणून गेल्या पांच सालच्या जमेचे व खर्चाचे तक्ते स्वतंत्रपणें पान १३३ ते १३७ वर देण्यांत आलेले आहेत.



( १९४९ ते १९५४ सालांतील ) **जमा**

| बाब | १९४९–५० | १९५०–५१ | १९५१–५२ | १९५२–५३ | १९५३–५४ |
|---|---|---|---|---|---|
| **म्यु.पल कर** | | | | | |
| ऑक्ट्राय | ७५११९८ | १००६८५६ | ११७१००४ | १४३९७८५ | १२५२३०६ |
| घरपट्टी | १७२८३७ | २३८७६६ | २८२७८२ | ४०७५३१ | ४०११२६ |
| तारदखाना | ३७०८० | १७१५८ | १८२११ | २५०६२ | २६३०४ |
| ज. सॅ. सेस | १३३६६ | ४४६८५ | ४३९५५ | ४४०३७ | ४६१४१ |
| **चाकपट्टी** | | | | | |
| मोटार कर | ... | १०२ | ... | ... | ... |
| गाडी–घोडा | ४०६५ | ४३३६ | ४१७० | ३२६९ | ३२५७ |
| नाटक सिनेमा कर | ७१५८ | १०३२० | २२८७८ | २०९६१ | १७७६१ |
| लग्न कर | २२७५ | ४२४५ | ४२९० | ४३७५ | ३११५ |
| कुऱ्यावरील कर | ७२ | १८५ | १८० | २०१ | १५६ |
| एकूण... | ९९६०५१ | १३२६६५३ | १५४७४७२ | १९४५२२९ | १७५८२४६ |
| **विशिष्ट कायद्यान्वयें येणारी जमा** | | | | | |
| कोंडवाडा दंड | ४८१ | ४१२ | २०७४ | १८७६ | १६८१ |
| कोंडवाडा चराई | ९२३ | ८४९ | १२९३ | १०७० | ९६५ |
| लोकल फंड सेस | ... | ... | ... | ... | ... |
| ॲग्रिकल्चरल व नॉन-ॲग्रिकल्चरल सेस | १५११६८ | ... | ... | ... | ... |
| **म्यु. च्या मिळकतीवरील व करांव्यतिरिक्त येणारें उत्पन्न** | | | | | |
| खुली जागा (पेट्रोल पंप, गव. छपऱ्या) | ८१५६ | ९११६ | ९८७० | ९८७१ | ११८२९ |
| जमीन लागणीचा खंड | ८७८१ | ८१९३ | ६०२० | ४१३१ | ५४९७ |
| रस्त्याच्या बाजूच्या चराऊ पट्ट्या लिलांव | ६०४ | १०४४ | ५१९ | ३८५ | ३८८ |
| मार्केटांतील दुकान भाडें | ६७३९२ | ९५४७९ | १११८५३ | १३६८१० | १०७१२१ |
| जनावरांचें बाजारापासून उत्पन्न | ६३१८ | ६२५१ | ६१९२ | ४६९५ | ५७७१ |
| बकरी विक्री | १५६२ | ११९४ | १२०५ | १५०० | २६१० |
| मासे विक्री | ... | ... | ४८१ | ६३१ | ७८४ |
| स्लॉटर हौस (कत्तलखाना प्रवेश फी) | २२८० | २७२७ | ३५३१ | ४२४० | ५१५४ |
| जनावरें कापणें | २५० | ३८८ | १००७ | ११७० | १८५२ |
| मटन–फिश मार्केट भाडें | ३११३० | ४२८७४ | ८५४२ | २३९६१ | ३२९८० |
| लायसेन्स फी | ३४१२४ | ४११०० | ४२३११ | ४३५४६ | ४५१८० |
| नोटीस फी | २०३८ | ४५३० | २९१३ | ३०९५ | २५९१ |

( १९४९ ते १९५४ सालांतील ) जमा

| बाब | १९४९–५० | १९५०–५१ | १९५१–५२ | १९५२–५३ | १९५३–५४ |
|---|---|---|---|---|---|
| वॉरंट फी | ६०२ | ११९१ | १२९४ | ६९१ | ८३२ |
| मांडव फी | ५४४ | १०९३ | १२३२ | ९४९ | ६७० |
| रस्त्यावर माल टाकलेची फी | २४११ | ३५०४ | २८७० | २३९१ | २२८९ |
| म्यु. पल ॲक्टान्वयें होणारा दंड | ... | ... | ... | ... | १५७८३ |
| गॅलरी, सज्जे, झडपा, पायट्याच्या फळ्या फी | ५९५५ | ६९०७ | ६४८२ | ६९२० | ६७९७ |
| स्टीम व दगडी रोलर भाडें | ३०५ | ५३४ | ६५० | ४११ | ३५५ |
| मोटार भाडें | १०८ | ३४५ | ५५६ | ३४२० | २९४८ |
| कॉंट्रॅक्टर यादींत नांव दाखल करणेची फी | १०० | ५२८ | ३९६ | ५३६ | ४८८ |
| मोटार तळ भाडें | ३६३० | २१४७ | ३०५६ | १६२५ | ४४२ |
| एकूण... | १९२८६२ | २३१२०६ | २१४३४७ | २५३९२४ | २५५००७ |
| **देणग्या व वर्गणी (सरकारकडून)** | | | | | |
| म्यु. पल फंडास मदत | ... | ... | ... | ... | २५१ |
| नोकर महागाई बा॥ मिळणारी ग्रँट | २०२११२ | २००६४७ | २२५७१४ | २३३१९४ | ११७८२४ |
| | ... | ... | ... | ... | २०९१ |
| **किरकोळ** | | | | | |
| माती विक्री | ... | ... | १० | ... | ... |
| करंट अकौंट व फिक्स्ड डिपॉझिट व्याज | ४६९९ | ६०७२ | ३६०९ | १३०१ | ६४०० |
| खत व कचरा विक्री | ४५८४५ | ८६११५ | ९८७६५ | ९५४०० | १२१०७५ |
| शोधनावळ फी | २०२ | ३९४ | २८२ | ४१५ | २९९ |
| लॅंड रेव्हिन्यू व नॉन ॲग्रिकल्चरल असेसमेंट | ... | ११२६८ | ८२९७ | २३३१८ | ५६१८ |
| निरुपयोगी माल विक्री | २७५ | ३२९७ | ९१७३ | १८७७ | ७७० |
| फॉर्म्स विक्री | २६९ | ४७५ | ४८२ | ५८६ | ६५० |
| नोकर दंड | ५१२ | ... | ५९६ | २१० | ७२ |
| गुमास्ता | ... | ७२६ | ८७७ | ८८६ | ८८५ |
| मार्केट फंड ( दुकान भाडें ) | ... | ... | ... | ... | ... |
| गांधी मार्केट विजेच्या दिव्याचें भाडें | ८२६ | २६८३ | ८१७० | ६७५८ | ६८९३ |



( १९४९ ते १९५४ सालांतील ) जमा

| बाब | १९४९–५० | १९५०–५१ | १९५१–५२ | १९५२–५३ | १९५३–५४ |
|---|---|---|---|---|---|
| औषध फी | १३५५ | १०६४ | १०५८ | २१२७ | ५६०३ |
| शेण गदाळा वैगेरे मक्ते | ६४३ | १४८० | १४२४ | ७३० | १२१८ |
| इतर किरकोळ | ५००८ | ६५००३ | ३८३२४ | १९२५१ | ५५४८ |
| नकाशा फी | २५९ | ... | ... | ... | ... |
| भेसळ प्रतिबंधक लायसेन्स | ... | ... | १२६० | १८८५ | ७७३ |
| गुमास्ता कायद्यान्वयें येणारें उत्पन्न | ६४५० | ... | १६४२ | १०३ | १२५ |
| पाणी हंशील | ... | ... | ... | १६१६ | २०९६ |
| **असाधारण व कर्ज** | | | | | |
| ट्रेलर पंपाचें भाडें | ... | ... | ७५ | ३१ | ... |
| नागरिकांचें खाजगी काम केलेबद्दल | ११९ | ... | ... | ... | ... |
| नागरिकांकडून नादुरुस्त केलेले रस्ते दुरुस्त केलेबद्दल | ... | ... | ... | २९५५ | ३३१२ |
| बेवारस प्रेतें दहन किंवा दफन केलेबद्दल | ... | ८२४ | ४३२ | १९२ | ४०० |
| पंचगंगा स्मशान जळण विक्री | १२०८१ | १४३२३ | १६२८१ | १४७१० | १११५४ |
| शहर सुधारणा खातें | ... | ... | ... | ... | ... |
| शहर सुधारणेबद्दल | ... | ... | ... | ... | ... |
| श्रीमहाराणी ताराबाई शाळा इमारत फंड | ११०१ | ... | ... | ... | ... |
| बेलबाग व इतर वसाहतींतील ब्लॉक व इतर जागा विक्रीचें उत्पन्न | २४६०२ | ५८१९ | २१८०१ | २६२ | १०१३९ |
| फ्री पास | ... | ... | १०१६ | ११५६ | ११४५ |
| नंबर प्लेट | ... | ... | २४८ | २९४ | २७१ |
| कोर्ट खर्च | ... | ... | ३१४३ | २२८८ | ४१७३ |
| समन्स भत्ता | ... | ... | ८९ | ९२ | ६७ |
| वेब्रिज | ... | ... | ७२४ | ७०८ | २०६ |
| इलेक्शन याद्या व फॉर्म विक्री | ... | ... | ९४२ | ... | ... |
| एकूण निव्वळ जमा... | १४९५२७१ | १९५८८४९ | २२०६२५३ | २६११४०५ | २३२२३११ |

## खर्च

| बाब | १९४९–५० | १९५०–५१ | १९५१–५२ | १९५२–५३ | १९५३–५४ |
|---|---|---|---|---|---|
| जनरल ॲडमिनिस्ट्रेशन खातें | ७४२८९ | ११३१८८ | ११६१६५ | १०१७२५ | १०५८६२ |
| जकात खातें | ११३७८१ | १५९१११ | १६७७५५ | १६१३३७ | १६८२६५ |
| कर वसुली खातें | ४४५४६ | ७६७६९ | ७१०९५ | ६५६०१ | ६७८१९ |
| ऑक्ट्राय रिफंड | ... | ७७४ | ७६७ | ९५०४ | ११९४१ |
| इतर रिफंड | ... | २६३८२ | ३५२२ | ४३०५ | ४२११ |
| पेन्शन ग्रॅच्युटी खातें | १४७१० | २७४११ | ३२११० | ५९८६६ | ३९३७७ |
| गुमास्ता खातें | २५२३ | २९४५ | ४१४३ | ४१९२ | ४४७७ |
| सार्वजनिक सुरक्षितता खातें | ५७५९५ | ९०९३२ | ८९९७७ | ३१५२० | ३७१८६ |
| ,, उनाड कुत्रीं मारणें | ... | ... | ... | ३५१० | ५२७१ |
| ,, रोषणाई खातें | ... | ... | ... | ४७६३५ | ७१९१५ |
| ,, आरोग्य व सुखसोई | ४९०३६ | ६९३१८ | ७५७७५ | ५३८३३ | ४७३९३ |
| ,, जनरल कॉंझरव्हन्सी खातें | १८७५६० | २५९८५३ | २६४५०१ | २५२१७९ | २८२७७६ |
| ,, स्पेशल कॉंझरव्हन्सी खातें | २१९६१६ | २५३७५३ | २२९९८२ | २७६५४८ | ३७७२३१ |
| ,, गटर्स, मुऱ्या वगैरे | ३१६१५ | १५१३४ | ६३६९९ | १०१९०९ | ६२८०८ |
| ,, होमिओपॅथिक दवाखाना | ७१०१ | १२१९१ | ११५४५ | १०६१४ | ११३१९ |
| ,, ॲलोपॅथिक दवाखाना | ८९८२ | ११७३५ | ९३०९ | ८३९४ | ७४५७ |
| ,, श्रीअहिल्याबाई देशी दवाखाना | ६३८० | ८११५ | ८१२९ | ७७११ | ८५४२ |
| ,, ई वॉर्ड महात्मा जोतीराव फुले आ. दवाखाना | ... | ... | ... | ... | ४२५८ |
| ,, श्री सावित्रीबाई फुले सूतिकागृह | ... | ... | १७३८७ | २२९८६ | २३२३६ |



## खर्च

| बाब | १९४९–५० | १९५०–५१ | १९५१–५२ | १९५२–५३ | १९५३–५४ |
|---|---|---|---|---|---|
| सांथ प्रतिबंधक उपाययोजना खातें | ९२५० | १४३१८ | १७३६६ | १९८९० | ३१२२६ |
| मार्केट खातें | ५१७५ | ८८१८ | ७२२९ | १२८१८ | २१७१४ |
| भेसळ प्रतिबंधक खातें | ... | ... | ... | ९९६ | ३६३ |
| देवी खातें | ... | ... | ... | ... | १८४१ |
| जनन व मयत नोंद खाते | ... | ... | ... | १६१० | १५९३ |
| पाणी पुरवठा खातें | १६११ | ५६४२ | १२२७५ | १७६९३ | १४८९२ |
| कोंडवाडा | ३२३ | ४०१ | २५४६ | २६४३ | २९५२ |
| धर्मशाळा | ६५५ | १०६४ | ९६० | ९०० | ७३५ |
| सार्वजनिक बागा खातें | १८००० | २६४५८ | ३६७१८ | ३०६१४ | ३७३८५ |
| पब्लिक वर्क्स खातें | ११६३४३ | २३३२३३ | १११७०६ | १३७६७२ | १३६३६९ |
| इमारत बांधणें व दुरुस्ती | ५९८६७ | ३८१३६ | ७६०३६ | १०६७५० | १३३२८९ |
| रस्ते | १५११३३ | ३१२०७८ | ४८८८९५ | ३६३६११ | १९९१३५ |
| स्टीम रोलर व वर्कशॉप खातें | १४६७० | १५९९४ | २३४४८ | ११४४३ | १६८६२ |
| लोकशिक्षण खातें | १५९२३२ | २५८२०४ | २९६९५९ | २६०६८६ | २८२६१२ |
| भास्करराव वाचनालय | ... | ... | ... | १०००२ | ११७३० |
| किरकोळ | ७६१३७ | ४२७६५ | ५६३७० | ८७१४९ | ८९६८९ |
| मोफत दवाखान्यांना मदत | ५०० | ५०० | ... | ... | ... |
| शाहू मिलनजिक हरिजन वसाहतींत दवाखानेची सोय | ... | ... | १५४६ | ... | ... |
| निव्वळ खर्च | १४३२५६० | २१७३९५२ | २२९३७०५ | २२८७८४६ | २३२२९३२ |

# प्रकरण १० वें

# नगरपालिकेचें शैक्षणिक कार्य

## ( १९४२–१९५४ )

इ. स. १९४२ पर्यंत कोल्हापूर शहरांतील प्राथमिक शिक्षणाची सर्व व्यवस्था दरबारकडेच होती व त्याच्याशीं नगरपालिकेचा कोणताही संबंध नव्हता. नगरपालिकेनें आपणाकडे प्राथमिक शिक्षण सुपूर्त करावें, अशी मागणी अनेक वेळां केली होती. त्याचा परिणाम होऊन ता. २४ सप्टेंबर १९४२ रोजीं कोल्हापूर नगरपालिकेला प्राथमिक शिक्षणाचा ताबा मिळाला. यावेळीं The City of Kolhapur Primary Education Act, 1942 हा कायदा दरबारनें पास केला. या कायद्याचा अंमल संस्थान विलीन होईतोंपर्यंत म्हणजे ता. १ मार्च १९४९ पर्यंत होता.

(२) **शिक्षण समिति व स्कूल बोर्ड**:—१९४२ च्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याप्रमाणें १४ सभासदांची एक शिक्षण समिति निवडली जात असे. या समितीमध्यें खालीं दिल्याप्रमाणें सभासद वेळोवेळीं निवडून आले:—

### शिक्षण समिति ( १९४२–४५ )

(१) प्रो. आर. जी. पाटील (२) श्री. आर. टी. बगाडे (३) श्री. आर. आर. जाधव ( ३०-६-४३ पर्यंत ), श्री. एस. आर. जाधव ( ९-१०-४३ पासून ) (४) सौ. वालावलकर ( २१-९-४४ पर्यंत ), सौ. गंगूबाई कोकीळ ( ७-१०-४४ पासून ) (५) डॉ. जनाबाई चव्हाण (६) श्री. गुलाम अब्बास बोहरी (७) श्री. एच. वाय. शेख ( १६-५-४४ पर्यंत ), श्री. वाय. डी. डंगरी ( १६-६-४४ पासून ) (८) श्री. व्ही. के. हराळे (९) श्री. व्ही. जी. पोळ (१०) श्री. पी. एन. कांबळे (११) श्री. जी. बी. शिंदे (१२) श्री. आर. बी. मुर्के (१३) श्री. आर. एन. पुसाळकर (१४) श्री. एम. जी. नागेशकर ( १६-५-४४ पर्यंत ), श्री. ए. एस. जगताप ( १६-६-४४ पासून )

### शिक्षण समिति (१९४५–४८)

(१) श्री. डी. एस. खांडेकर ( २५-११-४७ पर्यंत ), डी. एच. शेळके ( १९-१-४८ पासून ) (२) श्री. टी. एस. कारखानीस (२५-११-४७ पर्यंत), श्री. व्ही. जी. बेनाडीकर (१९-१-४८ पासून) (३) आर. बी. मुर्के (४) कु. आक्काताई पाटील (१३-२-४७ पर्यंत), कु. मालती गुप्ते ( ६-५-४७ पासून ) (५) श्री. गुलाम आब्बास बोहरी (६) श्री. बी. ए. जमादार (७) श्री. व्ही. जी. पोळ (८) श्री. मा. ता. मोरे (९) श्री. ए. एस. जगताप (१०) श्री. आर. एन. पुसाळकर (११) श्री. ज. पां. सुतकर (१२) डॉ. व्ही. बी. पुरोहित ( ता. ५-९-४७ पर्यंत ), श्री. रं. कृ. साळोखे ( १९-१-४८ पासून ) (१३) श्री. आर. के. जोशी (१४) सौ. विमलाबाई बागल.



### शिक्षण समिति ( १९४८–१९५३ )

(१) बॅ. बी. एच. खर्डेकर ( १९४८-४९ ) (२) श्री. व्ही. जी. सरनाईक (३) श्री. एस. व्ही. लिंग्रस (४) श्री. एम. बी. सोलापुरे (५) श्री. एस. डी. पाटील (६) श्री. पी. बी. साळुंखे (७) श्री. एच. वाय. शेख (८) सौ. विमलाबाई बागल (९) कु. कमल कारेकर (१०) श्री. ख. र. उस्ताद ( १९५० पर्यंत ), (११) श्री. आ. आ. मोमीन (१२) श्री. आ. रा. सोनवणे (१३) श्री. बी. डी. शिंगे (१४) श्री. वाय. बी. भोसले.

इ. स. १९५३ सालीं The Bombay Primary Education Act, 1947 याखालीं निवडणुका होऊन बारा सभासदांचें पहिलें स्कूलबोर्ड अस्तित्वांत आलें. त्यांत पुढें दिल्याप्रमाणें सभासद आहेत:—

### लोकनियुक्त

१ श्री. एन्. डी. निकम–चेअरमन २ द. रा. बुवा–व्हा. चेअरमन ३ श्री. एस. के. डिंगे ४ श्री. आर. के. साळुंखे ५ श्री. बी. बी. पाटील ६ श्री. बी. टी. पाटील ७ श्री. बी. टी. सरनाईक ८ श्री. जे. डी. भोसले ९ श्री. डी. ए. लिगाडे १० सौ. विमलाबाई करमरकर.

### सरकारनियुक्त

११ श्री. एस. एम. घाटगे १२ श्री. मुख्याध्यापक, राजाराम हायस्कूल (सध्यां श्री. परुळेकर)

(३) **पदाधिकारी**:—१९४२ ते आजतागायत निवडून आलेले चेअरमन यांचीं नांवें पुढें दिलीं आहेत:—

(१) प्रो. आर. जी. पाटील, एम. ए., डिप्लोमा इन् जिऑग्रफी [लीड्स] १९४२ ते १९४५
(२) श्री. आर. एन. पुसाळकर, बी. ए., एलएल. बी. १९४५
(३) श्री. डी. एस. खांडेकर, बी. ए., एलएल. बी. १९४५ ते १९४८
(४) श्री. डी. एच्. शेळके, बी. ए., एलएल. बी. १९४८ ते १९४९
(५) श्री. बॅ. बी. एच. खर्डेकर, बी. ए., एलएल. बी., बार-ॲट-लॉ (कँटब) १९४८ ते १९४९
(६) श्री. व्ही. जी. सरनाईक, एम. ए., एलएल. बी., ॲडव्होकेट, हायकोर्ट बॉम्बे १९४९ते५३
(७) श्री. एन. डी. निकम, एम. एससी. १९५३ पासून

त्याचप्रमाणें वरील अवधींत पुढें दिलेले शाळाधिकारी अधिकारांत होते:—

१. श्री. आर. एस. सुर्वे १–१०–४२ तें १५–१२–४९
२. श्री. एस. जी. माळी १६–१२–४९ तें ५–५–५०, २५–७–५०तें१४–७–५३
३. श्री. ए. ए. परकार ६–५–५० तें २४–७–५०
४. श्री. एम. जी. चव्हाण १५–७–५३ तें २३–६–५४
५. श्री. व्ही. बी. सुळे
६. श्री. पी. टी. काथे ( Officiating ) २४–६–५४ पासून श्री. सुळे हजर होईपर्यंत.

**(४) इ. स. १९४२ सालची शहरांतील प्राथमिक शिक्षणाची स्थितिः**—प्राथमिक शिक्षणाची अधिकारसूत्रें कोल्हापूर नगरपालिकेकडे दिल्यावेळीं शहरांमध्यें प्राथमिक शिक्षणाच्या एकूण ६६ शाळा होत्या. त्यांपैकीं १४ शाळा दरबारकडून चालविल्या जात असत; ३ शाळा इलाखा पंचायतीच्या ताब्यांत होत्या व ४९ शाळा खाजगी मदतीच्या होत्या. विद्यार्थ्यांची एकूण संख्या ९,७६२ असून त्यांपैकीं २९४६ इतकी संख्या मुलींची होती. शिक्षकांची संख्या एकूण ४२९ होती. पैकीं ट्रेंड शिक्षक फक्त ७० होते. प्राथमिक शिक्षणासाठीं दरबारकडून एकूण ३६,००० रु. खर्च होत असत. पैकीं ४,००० रुपये खाजगी शाळांना मदत म्हणून दिली जात असे. दरबार व इ. पं. च्या मिळून एकूण १७ शाळा मोफत होत्या. या शाळांमध्यें एकूण १०६ शिक्षक काम करीत होते. त्यांना पगार अतिशय कमी मिळत असे व त्यांच्या पगाराचें प्रमाणहि ठरलेलें नसे. खाजगी मदतीच्या शाळांमध्यें काम करीत असलेल्या ३२३ शिक्षकांपैकीं फक्त २१ शिक्षक ट्रेंड होते. या सर्व शिक्षकांच्या पगाराची, नोकरीची व ट्रेनिंगची वगैरे व्यवस्था ग्रँट–इन्–एड कोडच्या अभावीं असमाधानकारक होती.

शिक्षण समितीकडे देण्यांत आलेल्या एकूण १७ मोफत सरकारी शाळांपैकीं फक्त ९ शाळांना चांगल्या इमारती मिळाल्या होत्या. बाकीच्या शाळा भाड्याच्या इमारतींत भरविल्या जात असत. खाजगी मदतीच्या ४९ शाळांपैकीं फक्त चार शाळांना स्वतःच्या इमारती होत्या. बाकीच्या सर्व शाळा भाड्याच्या इमारतींत भरविल्या जात. ह्या सर्व ६६ शाळांपैकीं फक्त ४ शाळांना विद्यार्थ्यांकरितां खेळण्यासाठीं थोडीशी जागा होती; बाकीच्या सर्व शाळा अरुंद–अपुऱ्या जागेंत भरत असत.

ही शोचनीय स्थिति सुधारण्यासाठीं नगरपालिकेनें गेल्या १२ वर्षांत काय सुधारणा घडवून आणल्या आहेत, तें आपण पाहूं:—

**(५) शाळाः**—छ० ताराबाई महाराणीसाहेब यांनीं २३–९–१९५४ रोजीं कोल्हापूर शहरांतील प्राथमिक शिक्षणाची सर्व व्यवस्था व जबाबदारी नगरपालिकेकडे सोंपवली व नगरपालिकेनेंही ही जबाबदारी २१–१२–१९४२ पासून आपण निवडलेल्या शिक्षण समितीकडे संपूर्णतया सोंपविली. यावेळीं दरबारनें चालविलेल्या १४ व इलाखा पंचायतीनें चालविलेल्या ३ अशा १७ शाळा नगरपालिकेकडे चालविण्यास आल्या; आणि त्यावेळीं असलेल्या ४९ खासगी शाळांना कायद्याप्रमाणें मदत देण्याची जबाबदारीही नगरपालिकेवर पडली. आज ता. ३१ मार्च १९५४ रोजीं नगरपालिकेच्या हद्दींत नगरपालिकेतर्फे २४ शाळा चालविल्या जात असून खासगी संस्थांनीं चालविलेल्या शाळांची संख्या ५३ आहे.

प्रथमपासूनच खासगी शाळांना उत्तेजन देण्याचें धोरण नगरपालिकेनें ठेवल्यानें खासगी शाळांत वाढच झालेली आहे. याशिवाय मंगळवार पेठेंत मागासलेल्या वस्तीसाठीं व ढोर समाजासाठीं नगरपालिकेनें एक नवीन शाळा अद्यावत् व भव्य अशी इमारत बांधून १–६–४७ पासून सुरूं केली व नगरपालिकेची हद्द वाढल्यामुळें बावडा (३), कदमवाडी (१), जाधववाडी (१) व टेंबलाईवाडी (१) अशा ६ नवीन शाळांची त्यांत भर पडली.



**(६) विद्यार्थीः**—इ. स. १९४२ सालीं नगरपालिकेच्या हद्दींतील सर्व शाळांमधून ९,७६२ विद्यार्थी शिक्षण घेत होते. ता. ३१ मार्च १९५४ रोजीं विद्यार्थ्यांची संख्या १८,२६१ होती. म्हणजे गेल्या बारा वर्षांत ही संख्या दुप्पट झाली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणें:—

| | मुलें | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| १ नगरपालिकेच्या शाळा | ४,३१३ | २,९५७ | ७,२७० |
| २ खासगी शाळा | ६,९३६ | ४,०५५ | १०,९९१ |
| एकूण | ११,२४९ | ७,०१२ | १८,२६१ |

याचाच इयत्तावार तपशील येणेंप्रमाणें:—

| इयत्ता | मुलें | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| पहिली | ३,१६८ | २,४८३ | ५,६५१ |
| दुसरी | २,०९२ | १,३६७ | ३,४५९ |
| तिसरी | १,८५१ | १,१४५ | २,९९६ |
| चौथी | १,८२९ | १,००४ | २,८३३ |
| एकूण (१–४) | ८,९४० | ५,९९९ | १४,९३९ |
| पांचवी | ९९२ | ४६४ | १,४५६ |
| सहावी | ७०३ | २८० | ९८३ |
| सातवी | ६१४ | २६९ | ८८३ |
| एकूण (५–७) | २,३०९ | १,००३ | ३३३२ |
| एकूण (१–७) | ११,२४९ | ७,०१२ | १८,२६१ |

**(७) शिक्षकः**—इ. स. १९४२ सालीं नगरपालिकेच्या प्राथमिक शाळांत काम करणाऱ्या शिक्षकांची संख्या १०६ होती. त्यांपैकीं ११ स्पेशल शिक्षक (चित्रकला, शारीरिक शिक्षण, शिवण, कशिदा आदि) बाजूस काढले, तर राहिलेल्या ९५ शिक्षकांपैकीं ७१ पुरुष व २४ स्त्रिया होत्या. एकूण शिक्षकांपैकीं ५ इंग्रजी शिकलेले, २ तिसरें वर्ष विनीत, २३ दुसरें वर्ष विनीत व १५ पहिलें वर्ष विनीत होते. राहिलेल्यांपैकीं ३३ मुलकी पास असून १६ अन्पासड होते. आतां नगरपालिकेच्या शाळांतील शिक्षकांची संख्या २२० झाली असून त्यांत १५६ पुरुष व ६४ स्त्रिया आहेत. या २२० पैकीं १३८ विनीत, ५६ मुलकी पास, १० अन्पास व १६ स्पेशल शिक्षक आहेत.

इ. स. १९४२ सालीं खाजगी शाळांतून एकूण ३२३ शिक्षक काम करीत होते व त्यांपैकीं फक्त २१ ट्रेनीत होते. सध्यां खाजगी शाळांतून ३१७ शिक्षक काम करीत असून त्यांपैकीं ८५ ट्रेनीत आहेत. तसेंच यांत २५५ पुरुष व ६२ स्त्रिया आहेत.

**(८) शिक्षकांचा पगार**:—इ. स. १९४२ सालीं शिक्षकांना वेतनश्रेणीच नव्हती. यावेळीं काम करणाऱ्या १०६ शिक्षकांवर पगारासाठीं २८,४१६ रुपये खर्च पडत असे. आज नगरपालिकेनें आपल्या सर्व शिक्षकांना १ मार्च १९४९ पासून मुंबई इलाख्यांतील इतर प्राथमिक शिक्षकांप्रमाणेंच पगाराची स्केल्स लागू केली असून महागाई भत्ताहि दिला आहे. इ. स. १९५३–'५४ सालीं नगरपालिकेनें शिक्षकांचा पगार व महागाई भत्ता यांसाठीं रु. १,३९,१४४ खर्च केलेले आहेत.

खाजगी शाळांतील शिक्षकांच्या पगारांतही या बारा वर्षांच्या मुदतींत वरीलप्रमाणें बरीच वाढ झालेली आहे.

**(९) शेती-शिक्षण**:—नगरपालिकेच्या शाळांपैकीं दोन शाळांमधून (कसबा बावडा विद्यालय व रावबहाद्दूर विचारे विद्यालय) शेतीशिक्षण देण्याची सोय करणेंत आली आहे. बावडा विद्यालयास २ ए. १५ गुंठे व विचारे विद्यालयास १ ए. ३० गुंठे शेतजमीन आहे.

**(१०) शाळा-इमारती**:—प्राथमिक शाळांना चांगल्या इमारती मिळाव्यात म्हणून शि. स.च्या शिफारशीवरून नगरपालिकेनें एकंदर ४० प्राथमिक शाळा-इमारती बांधण्यासाठीं व आवश्यक अशीं सर्व क्रीडांगणें तयार करण्यासाठीं एक सर्वंकष योजना तयार करून हातीं घेतली होती. तिचा सारांश थोडक्यांत पुढें दिला आहे:—

(१) कोल्हापूर शहरांतील एकंदर ८३ प्राथमिक शाळांपैकीं केवळ १२ आपल्या इमारतींत भरतात; व त्यांपैकीं फारच थोड्यांना स्वतःच्या मालकीचीं क्रीडांगणें आहेत. एकंदर १२,३०० विद्यार्थी असावे अशी अपेक्षा असतां, आमच्या हल्लींच्या इमारतींत अवघ्या ४००० विद्यार्थ्यांचीच सोय आहे. यावरून आतांच आम्ही किती मागासलेले आहोंत, याची कुणालाहि कल्पना करितां येईल. आमची लोकसंख्या झपाट्यानें वाढत आहे व आम्हांला लवकरच आणखी कितीतरी अधिक विद्यार्थ्यांची सोय करावयाची आहे याचा विचार केला, तर आमच्या मागासलेपणाचें चित्र अधिकच भयानक वाटूं लागतें.

**(२) सर्वसामान्य तत्त्वें**:—इमारती व क्रीडांगणें यांची योजना अंमलांत आणावयाची झाल्यास शाळांच्या संख्येला मर्यादा घालणें, हें अत्यंत आवश्यक आहे. कारण हल्लीं ज्या अनेक छोटेखानी व कमकुवत शाळा आहेत, त्या सर्वांना इमारती व क्रीडांगणें यांचा लाभ करून देणें हें शक्य नाहीं.



सध्यां एकंदर ८३ शाळा व सुमारें १२००० विद्यार्थी आहेत. याचाच अर्थ असा कीं, सर्वसाधारणपणें प्रत्येक शाळेंत १५० विद्यार्थी आहेत. ही संख्या फारच कमी आहे. निदान योग्य रीतीनें शाळा चालवावयाची असेल, तर तिच्यांत किमान २०० विद्यार्थी असले पाहिजेत. प्रत्येक शाळेंत ४०० विद्यार्थी असणें, हें फारच चांगलें. म्हणून वाईट रीतीनें चाललेल्या शाळा बंद करून लहान लहान शाळांचा मिलाफ करून, चांगल्या व कार्यदक्ष अशा ४० शाळा मात्र शहरांत ठेवण्याचें ठरलें. त्यांच्याकरितां जागा निवडतांना खालीं दिलेलीं तत्त्वें नजरेपुढें ठेवण्यांत आलीं आहेत:—

(१) प्रत्येक प्राथमिक शाळेंत पांच शिक्षक असावे अथवा सक्तीच्या शिक्षणाच्या चार वर्गांना प्रत्येकीं एक असावा व मुख्याध्यापकाचे कामाकरितां एक शिक्षक अधिक असावा. याकरितां प्रत्येक प्राथमिक शाळेंत निदान २०० विद्यार्थी असले पाहिजेत. (५ खोल्या)

(२) चांगल्या प्राथमिक शाळेंत २०० मुलें व २०० मुली मिळून ४०० विद्यार्थी व एक पूर्ण वेळ शाळेचें काम पहाणारा मुख्याध्यापक, असे ९ शिक्षक व ९ खोल्या असाव्यात.

(३) प्राथमिक शाळांची जागा ठरविण्यांत मुलांच्या घरापासून ती किती अंतरावर आहे, हें पहाणें फार महत्त्वाचें आहे. म्हणून लांबलांब ठिकाणीं फार मोठ्या प्राथमिक शाळा असणें इष्ट नाहीं. एका शाळेपासून दुसरी शाळा ४ ते ६ फर्लांगाच्या अंतरावर असणें, हें उचित होय. कारण त्यामुळें प्रत्येक मुलाला आपल्या घरापासून २ किंवा ३ फर्लांगाच्या अंतरांत एक तरी प्राथमिक शाळा मिळूं शकते.

(४) प्राथमिक शाळांना जागा निवडण्याची योजना व शहराची आरोग्यसुधारणा यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न व्हावा अथवा हल्लीं गलिच्छ व अनारोग्यकर असलेल्या जागा प्राथमिक शाळांकरितां प्रामुख्यानें निवडण्यांत याव्यात.

(५) प्राथमिक शाळांना देण्यांत येणाऱ्या जागांची एक सर्वंकष योजना तयार करावी. मात्र प्रसंगानुसार थोडाफार बदल करावा लागल्यास तसा करण्याची सवड सदर योजनेंत असली पाहिजे.

(६) ही योजना अंमलांत आणण्याचा निश्चित कार्यक्रम तयार करावा व तीन वर्षांत तो पुरा करावा.

(७) कार्यक्रम अंमलांत आणतांना ज्या ठिकाणीं मुळींच शाळा नव्हत्या अथवा ज्या भागांत गरीब लोकांची वस्ती आहे तेथील शाळा अगोदर हातीं घेतल्या जाव्या.

**(३) स्थलांची निवड**:—या सर्वसाधारण तत्त्वांनुसार शहराच्या निरनिराळ्या भागांतील ४० जागा प्राथमिक शाळांसाठीं निवडण्यांत आल्या आहेत. त्यांचा गोषवारा पुढें दिला आहे:—

| वॉर्ड | लोकसंख्या | मुलांची संख्या | | | शाळांच्या जागा व इमारती यांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ज्यांच्यासाठीं सोय आहे अशी | ज्यांच्यासाठीं सोय करावयाची आहे अशी | एकंदर | अगोदरच्या असलेल्या: नगरपालिकेच्या | अगोदरच्या असलेल्या: खासगी | सुचविलेल्या | एकंदर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ए | १८,२१२ | ३०० | २००० | २३०० | १ | ० | ६ | ७ |
| बी | १६,५२६ | १५०० | ६०० | २१०० | ३ | २ | ५ | १० |
| सी | २२,५९८ | ५०० | २३०० | २८०० | ० | १ | ५ | ६ |
| डी | १६,६०८ | ८०० | १३०० | २१०० | २ | ० | ६ | ८ |
| ई | १९,२२२ | ४०० | २१०० | २५०० | १ | ० | ७ | ८ |
| लाईन बाजार | सुमारें ४००० | ५०० | ० | ५०० | १ | ० | ० | १ |
| | ९७,१६६ | ४,००० | ८,३०० | १२,३०० | ८ | ३ | २९ | ४० |

**कार्यक्रम**:–वर केलेल्या विश्लेषणावरून असें दिसून येईल कीं, आम्हांला सुमारें ८३०० मुलांची सोय करण्यासाठीं २९ नवीन जागा मिळवून त्यांवर इमारती तयार केल्या पाहिजेत. या जागा मिळविण्याचा खर्च २,२०,००० रुपये होईल असा अंदाज आहे; व हें सर्व कार्य तीन वर्षांत व्हावयाचें आहे. सन १९४३–४४ या पहिल्या वर्षी नगरपालिकेनें २०,०००रु. खर्च करण्याचें योजिलें आहे. सन १९४४–४५ या दुसऱ्या वर्षी १,००,००० रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. त्यांपैकीं ५०,००० रुपये नगरपालिकेनें द्यावयाचे असून ५०,००० रुपयांचा खर्च दरबारनें सोसावयाचा आहे. पुढच्या वर्षाच्या अंदाजपत्रकांत याविषयीं अगोदरच तरतूद करण्यांत आली आहे. तिसऱ्या वर्षी पुन: १,००,०० रुपये खर्चण्याचें असून त्यांपैकीं ५०,००० रु. नगरपालिकेनें व ५०,००० रु. दरबारनें द्यावयाचे आहेत. ही योजना नगरपालिका व दरबार या दोघांनींहि मान्य केली आहे. इमारतींना ७,८०,००० रुपये खर्च येईल असा अन्दाज आहे. त्यांपैकीं ३०,००० रुपये पहिल्या वर्षी म्हणजे १९४३–४४ सालीं खर्च करण्याचा नगरपालिकेचा विचार आहे. पुढील तीन वर्षांसाठीं दरवर्षी २,५०,००० रुपये खर्च पुढीलप्रमाणें करण्याचें योजिलें आहे:—



रु. १,००,००० नगरपालिकेची मदत
रु. १,००,००० दरबारची मदत
रु. ५०,००० देणग्या

रु. २,५०,०००

१९४६–४७ या सालीं हा कार्यक्रम पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

या कार्यक्रमाप्रमाणें नगरपालिकेनें १४ शाळा इमारती बांधून पुऱ्या केल्या आहेत. पूर्वी असलेल्या १३ शाळा इमारती जमेस धरतां नगरपालिकेच्या मालकीच्या शाळाइमारतींची संख्या सध्यां २७ आहे. यांपैकीं २० शाळा नगरपालिकेच्या शाळांसाठीं वापरण्यांत येतात; एक इमारत फी घेणाऱ्या खाजगी शाळेला व ६ इमारती मोफत शिक्षण देणाऱ्या खासगी शाळांना नाममात्र भाडें घेऊन देणेंत आल्या आहेत.

**(११) खाजगी मोफत शाळा**:–आज कोल्हापूर शहरांत एकूण खाजगी शाळा ५३ आहेत. यांत मोफत शिक्षण देणाऱ्या २७ शाळा असून फी घेणाऱ्या २६ आहेत. १९४२ सालीं ज्यावेळीं प्रथमतः नगरपालिकेनें प्राथमिक शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली, त्यावेळीं खासगी ४९ शाळा होत्या. त्यावेळीं या शाळा फी घेऊन काम करीत होत्या. पण नंतर नगरपालिकेनें या शाळा कमी न करतां उलट फीच्या शाळांचें रूपांतर मोफत शाळांत करण्याचें ठरविलें व यासाठीं अशा मोफत शाळांना जास्तींत जास्त मदत देण्याचें ठरविलें. यासाठीं सुरवातीच्या प्रत्येक मुलामागें इयत्ता १, २, ३ व ४ यांकरितां अनुक्रमें ४,५,६, व ७ रु. असलेले दर बदलून नंतर ‘अ’, ‘ब’ व ‘क’ या वर्गांत शाळा असल्यास १२,१० व ८ रु. व नंतर सरासरी हजेरीमागें प्रत्येकीं ‘अ’, ‘ब’ व ‘क’ या वर्गांसाठीं १ ते ४ इयत्तांना १८,१६ व १४ व इ. ५ ते ७ यांना २०,१८ व १६ असे दर ठरवून देणेंत आले. यांत त्यावेळीं येथील सरकारी नियमाप्रमाणें असणारा महागाई भत्ताही ८ रु. समाविष्ट होता. नंतर म. भत्ता २० रु. झाल्यावर प्रत्येक महिन्यास प्रत्येक शिक्षकास मासिक १२ रु. प्रमाणें जादा ग्रँट मिळत असे. याचा सुयोग्य परिणाम होऊन बऱ्याच फीच्या शाळांचें रूपांतर मोफत शाळांत झालें व आज या २७ शाळांत ११९५६ मुलें शिक्षण घेत आहेत. त्याचबरोबर नगरपालिकेनें फीच्या शाळांना ग्रँटचें एक वेगळें प्रमाण ठरवून दिलें होतें. या शाळांतून मोफत शिक्षणाचें नगरपालिकेचें ध्येय जास्त मदत देऊन देखील अगदीं कमी खर्चांत साध्य केलें जातें, हें या खासगी मोफत शाळांचें वैशिष्ट्य होय.

**(१२) शारीरिक शिक्षण**:—नगरपालिकेनें बौद्धिक शिक्षणाबरोबर शारीरिक शिक्षणालाही १९४२ सालापासून मोठीच चालना दिली आहे. संस्थान विलीन झाल्यानंतर मुंबई सरकारचे नियमाप्रमाणें शारीरिक शिक्षणाच्या बऱ्याच बाबींवर ग्रँट मिळत नसतांनादेखील पूर्वीप्रमाणेंच नगरपालिकेनें सर्व खर्च चालूं ठेविला आहे. १९५० सालीं २००० रु. खर्च करून पन्हाळा येथें १०० शिक्षकांसाठीं शारीरिक शिक्षण रिफ्रेशर व स्काऊट मास्टर्स ट्रेनिंग कँप चालविला. स्त्रियांचेसाठीं

स्वतंत्र ४२ दिवसांचा शारीरिक शिक्षणवर्ग चालविला. त्याचप्रमाणें हल्लीं दरवर्षीं सरकारच्या नियमानुसार १० ते १५ शिक्षक व शिक्षिका शारीरिक शिक्षणाच्या शॉर्ट टर्म कोर्ससाठीं पाठविल्या जातात.

सर्व प्राथमिक शाळांमधून आवश्यक शारीरिक शिक्षण साहित्य आहे. म्यु. शाळांसाठीं दरवर्षीं १००० रु. चे पुढें शारीरिक शिक्षणसाहित्यावर खर्च केले जातात.

शारीरिक शिक्षणाचें एक महत्त्वाचें अंग म्हणजे खेळांचे सामने हें होय. या सामन्यांमधून चांगले खेळाडू निर्माण व्हावे या हेतूनें नगरपालिका दरवर्षीं २००० रुपये खर्च करिते. हे सामने मुलांचे निराळे व मुलींचे निराळे होतात. एकूण सर्व शाळांतील सुमोरें २३०० मुलें मुली या सामन्यांत भाग घेतात व यशस्वितांना बक्षीसें दिलीं जातात. फिरतीं बक्षीसें एकूण २६ असून त्यांत मध्यम आकाराचीं १५ चांदीचीं शील्ड्स, ९ मोठे करंडक व २ मोठीं शील्ड्स आहेत. तसेंच कायमचीं बक्षिसें दरवर्षी सुमोरें १०० दिलीं जातात. वैयक्तिक खेळांत ९, १२ व १५ वर्षें वयाच्या प्रत्येक विभागांत अजिंक्यपद मिळविणाऱ्या मुलांस व मुलींस मे. जे. पी. नाईक यांची ९६ रुपये व स्कूल बोर्डकडील ४८ रुपये अशी १४४ रुपये व मे. माधवराव बागल यांचे नांवें ९६ रुपये अशी रक्कम स्कॉलरशिप् म्हणून दिली जाते.

आपल्याकडील मेडिकल स्टाफमार्फत सर्व मुलांची वैद्यकीय तपासणी नियमितपणें दरवर्षीं करण्याची योजना नगरपालिकेनें हातीं घेतली आहे.

बालदिन, शारीरिक शिक्षणदिन वगैरे कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर होत असून त्यावेळीं ३ ते ५ हजारपर्यंत मुलांमुलींची सांघिक कवाईत व रॅली घेतली जाते.

शारीरिक शिक्षणाच्या या सर्व कार्यावर देखरेख ठेवण्यासाठीं सुपरवायझर ऑफ फिजिकल एज्युकेशन ही जागा १९४२ सालापासून निर्माण केली असून या जागेवर श्री. एच. के. साळुंखे हे काम पहात असतात.

**१३ बालवीर व गाईड शिक्षणः**—४५ शाळांत बालवीर व गाइडपथकें असून यांत ५१ बालवीर व १५ गाइडपथकें आहेत. बालवीर व गाइड यांची संख्या एकूण १२०० आहे. हीं सर्व पथकें भारत स्काउट्स अँड गाइड्स लोकल असोसिएशन, कोल्हापूर या संस्थेस जोडलीं आहेत. बालवीर गाईड सप्ताह, रॅली, कॅंप्स् व इतर सर्व कार्यक्रम यांत याच पथकांचा जास्त भाग असून, म्यु. स्कूलबोर्डकडून या कार्यास प्रत्यक्ष मदत केली जाते.

ट्रेनिंग घेतलेले बालवीर शिक्षक ११० असून ३० गाइड कॅप्टन्स् आहेत.

**१४ मुलींचें शिक्षणः**—१९४२ सालीं ज्यावेळीं नगरपालिकेकडे प्राथमिक शिक्षणाची सर्व सूत्रें आलीं, त्यावेळीं शाळांत शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या २,९४६ होती. ही स्थिति सुधारण्यासाठीं त्यावेळच्या शिक्षणसमितींत लेडी ॲसिस्टंट टु दि शाळाधिकारी या नांवाची एक जागा खास निर्माण केली गेली. ही जागा संस्थान विलीनीकरणानंतर नवीन कायद्यांत अशा जागेची तरतूद नसलेनें रद्द करणेंत आली. त्याचबरोबर खाजगी शाळांतील प्रत्येक मुलीमागें



सुरवातीला १ रुपया जादा ग्रँट दिली जात असे. याचा सुयोग्य परिणाम होऊन गेल्या बारा वर्षांत मुलींची संख्या २,९४६ वरून ७,०१२ वर गेली आहे.

**१५ खर्चः**—प्राथमिक शिक्षणावर १९४२ सालीं फक्त रु. ३६००० खर्च केले जात असत. सध्यां नगरपालिका यावर किती खर्च करीत आहे, हें १९५३–५४ सालच्या पुढें दिलेल्या आंकड्यांवरून दिसून येईलः—

**प्राथमिक शिक्षणावरील खर्च ( १९५३–५४ )**

| | |
|---|---|
| ऑफिस | १४९३८ |
| शिक्षक व शिपाई पगार, महागाई व घरभाडें भत्ता आदि | २,३१,५८० |
| शाळा कॉन्टिन्जन्सीस | १७,०१६ |
| गरीब मुलांना पाट्या पुस्तकें व निर्वासितांना मदत | १,५२३ |
| शाळा–इमारती–दुरुस्ती | २१,७०० |
| फिजिकल एज्युकेशन | ४,८९० |
| रजिस्टर्ड शाळा ग्रँट | १,५३,३३६ |
| पेन्शन व प्रॉव्हिडंट फंड | १७,११४ |
| | ४,५२,०९७ |

हा खर्च चालविणेंसाठीं कोणाकडून किती रकमा म्यु. स्कूलबोर्डास १९५३–५४ सालीं मिळाल्या तें पाहूं.

| | | | शें. प्रमाण |
|---|---|---|---|
| ( १ ) | गव्हर्मेंट ग्रँट | १,७४,१८६ | ३८·५ |
| ( २ ) | म्यु. पल ग्रँट | २,६३,६८५ | ५८·५ |
| ( ३ ) | किरकोळ | ५,४७३ | ३·० |

**१६ पुढील योजनाः**—नगरपालिकेचे प्रचलित उदारतेचे धोरणास अनुसरून लवकरच प्राथमिक शाळेंतील मुलांमुलींची वैद्यकीय तपासणीची व्यवस्था चालू सालांत होणार आहे. याची योजना आंखली जात आहे.

वैद्यकीय तपासणींत निदर्शनास आलेल्या विद्यार्थ्यांचे दोषांवर शक्य तितकें लवकर वैद्यकीय उपचार करण्याची तजवीज करण्याचें नियोजिलें आहे.

विद्यार्थ्यांची वाढती संख्या व सध्यांच्या इमारतींचा अपुरेपणा विचारांत घेऊन, दर वर्षीं एकादी इमारत बांधण्याची योजना, नगरपालिकेनें हातीं घेण्याचें ठरविलें आहे. या बाबतींत "अग्र हक्क इमारत" योजना तयार झाली आहे.

प्राथमिक शिक्षण सर्वांना सुलभ व जास्तींत जास्त चांगलें मिळावें यासाठीं नगरपालिका प्राथमिक शिक्षक, शारीरिक शिक्षण साहित्य, बक्षिसें, पारितोषिकें इत्यादि अनेक बाबींवर सढळ हातानें खर्च करून, आपलें प्राथमिक शिक्षणाचें आद्यकर्तव्य अत्यंत आपुलकीनें बजावीत आहे.

**१७ इतिहासाचा समारोपः**—चालू सालीं नगरपालिकेला शंभर वर्षे पुरी होत आहत आणि तिचा शतसांवत्सरिक उत्सव साजरा केला जात आहे. यावेळीं हा इतिहास पुरा करण्यापूर्वी आजच्या नगरपालिकेपुढें कोणत्या मुख्य समस्या उभ्या आहेत, त्याचें दिग्दर्शन थोडक्यांत करणें अस्थानीं होणार नाहीं.

कोल्हापूर हें एक झपाट्यानें वाढणारें शहर आहे. १८५४ सालीं त्याची लोकसंख्या फक्त चाळीस हजार होती. आतां ती अजमासें एक लक्ष चाळीस हजार झाली आहे. शंभर वर्षे पुढें नजर टाकली आणि दोन हजार चोपन्न सालीं कोल्हापूरची लोकसंख्या अदमासें अडीच लाख होईल असें भविष्य केलें, तर तें फारसें चूक होणार नाहीं. आजच्या शहरांतील सर्व दोष काढून टाकून त्याच्या गरजा पुरविणें आणि वाढत्या शहराच्या सर्व जबाबदाऱ्या स्वीकारणें, हें येत्या शंभर वर्षांतील नगरपालिकेचें मुख्य कर्तव्य आहे. शहरवाढीच्या योजना आंखणें व पार पाडणें; गांवांतील दाट वस्ती कमी करणें; नवीन घरांची सोय करणें; पाणी पुरवठ्याची योजना सरकारकडून ताब्यांत घेणें, व नागरिकांना जास्तीत जास्त उपयोग होईल अशा रीतीनें चालविणें; अंडरग्राऊंड ड्रेनेजची योजना पुरी करणें; सक्तीचें शिक्षण अंमलांत आणणें व त्यासाठीं लागणाऱ्या इमारती, शिक्षक व साहित्य यांची तरतूद करणें, नोकरवर्गाची कार्यक्षमता वाढावी म्हणून त्यांच्यासाठीं घरें वगैरे बांधणें; कुंभार, लोणारी वगैरे लोकांच्या वसाहती स्वतंत्रपणें स्थापन करणें; इत्यादि अनेक कार्ये नगरपालिकेस हातीं घेऊन पार पाडावयाचीं आहेत. यासाठीं योग्य मार्गानें नागरिकांत शिक्षण व जागृति निर्माण केली पाहिजे; चांगला कार्यक्षम नोकरवर्ग मिळवून टिकविला पाहिजे; तज्ज्ञांच्या सल्ल्यानें चांगल्या योजना तयार केल्या पाहिजेत; आणि जरूर त्या खर्चाची सोय करण्यासाठीं करवाढ केली पाहिजे. सिटी बस सर्व्हिस, वीज पुरवठा, इत्यादि बाबी नगरपालिकेच्या ताब्यांत मिळविल्या पाहिजेत आणि नगरपालिकेच्या खुद्द मिळकतीचें उत्पन्न बऱ्याच मोठ्या प्रमाणांत वाढविलें पाहिजे.

सध्यांच्या नगरपालिकेच्या कारभाराकडे पाहतांना किस्येकांना असें वाटण्याची शक्यता आहे कीं, आमची प्रगति फारच सावकाशीनें चालू आहे व तिचा वेग वाढला नाहीं तर आमचें उद्दिष्ट साध्य करण्यास फारच मोठा कालावधि लागेल. पण गेल्या शंभर वर्षांच्या इतिहासाकडे नजर फेकली व १८५४ सालच्या कोल्हापूर शहरांतील घाण व गैरसोयी आणि दरसाल रुपये तीनशेंहे उत्पन्न असलेली तत्कालीन नगरपालिका यांची आजच्या प्रशस्त शहराशीं व सत्तावीस लाख रुपये उत्पन्न असलेल्या नगरपालिकेशीं तुलना केली, तर आम्ही गेल्या शंभर वर्षांत किती प्रगति केली आहे, हें लक्षांत येतें व त्यामुळें येत्या शंभर वर्षांतील समस्या सोडविण्याबद्दलचा आत्मविश्वास निर्माण होतो, हाच या इतिहासाचा मुख्य संदेश आहे.


> In front the Sun climbs slow, how slowly;
> But westward look, the land is bright! — *A. H. Clough*

( समोर उगवत्या सूर्याकडे पाहिलें, तर तो अगदी हळूंहळूं उगवत आहे असें दिसतें; पण पश्चिमेकडे पहावें, तर सर्व जमीन तेजाळून गेलेली आहे, असें दृश्य नजरेस पडतें. )

**जयहिंद**

# आजची कोल्हापूर नगरपालिका

# १९५४





# आजची कोल्हापूर नगरपालिका

कोल्हापूर नगरपालिकेची वाढ गेल्या शंभर वर्षांत कशी झाली, हें आपण पाहिलेंच आहे. कोणत्याही इतिहासाच्या पुस्तकांत वर्तमानकाळ हाही एक बिंदु आहे, असें मानूनच त्याबद्दलची माहिती द्यावी लागते. याचा अर्थ असा कीं, गेल्या शंभर वर्षांचा नगरपालिकेचा इतिहास लिहितांना पहिल्या दहा वर्षांतील घडामोडींना जेवढें स्थान दिलें असेल, त्याहून अवास्तव अधिक स्थान अखेरच्या दहा वर्षांनाहि देतां येणार नाहीं. त्यामुळें कोल्हापूर नगरपालिकेची आजची स्थिति काय आहे, या मोठ्या सार्वजनिक संस्थेचें कामकाज कसें चालतें, नगरपालिकेचे सभासद कसे निवडून येतात, नागरिकांपासून कर कसा घेतला जातो व अखेरीस त्या कराचा नागरिकांना कोणता फायदा मिळतो, नगरपालिकेनें जनतेच्या कोणत्या सोयी केल्या आहेत व कोणत्या सुधारणा जनतेच्या पदरांत लवकरच पडणार आहेत इत्यादि गोष्टींविषयीं सर्वसामान्य माणसास वाटणारी उत्सुकता इतिहासांत पूर्ण करणें शक्य नसतें. म्हणून कोल्हापूर नगरपालिकेच्या सद्यःस्थितीची अधिक सविस्तरपणें माहिती देण्यासाठीं प्रस्तुत भागाचा समावेश या पुस्तकांत करण्यांत आलेला आहे.


नगरपालिकेची हद्द वेळोवेळीं जरूरीप्रमाणें वाढविण्यांत आलेली आहे. बऱ्याच काळपर्यंत नगरपालिकेचें क्षेत्र फारच कमी म्हणजे ६·७ चौरस मैल होतें; परंतु शहराच्या वाढत्या गरजा लक्षांत घेऊन सन १९४६ सालीं ही सरहद्द वाढविण्यांत आली. त्याप्रमाणें नगरपालिकेचें सध्यांचें क्षेत्र २५·७ चौरस मैल एवढें आहे. यामध्यें कसबा करवीर येथील रि. स. नं. ११२३ तें ११४२ खेरीज इतर सर्व भाग, कसबा बावड्याचा सर्व भाग, टेंबलाई वाडीचा सर्व भाग, मौजे उजळाईवाडी-पैकीं रि. स. नं. २०३ तें २३१, नवे बालिंगेपैकीं रि. स. नं. २३३ तें २६३ व उंचगांवपैकीं रि. स. नं. १०१ तें १०९, ११८ तें १२५, १३४, १३७, १३८, १४३, १४४, १४६, १४७, ३९७, ४०१ ते ४०३, ४०९, ४१२, ४१६, ४१७ व ४१८ आणि मौजे कळंबेपैकीं रि. स. नं. २९७ तें ३१३ यांचा समावेश होतो.

## नगरपालिकेची निवडणूक

कोल्हापूर नगरपालिकेंत एकंदर ४४ सभासद आहेत. या ४४ जागांपैकीं ३ जागा स्त्रियां-साठीं राखीव असून २ जागा वर्गीकृत जमातींसाठीं राखीव आहेत. या सर्व जागांच्या प्रौढ मतदान-पद्धतीनें निवडणुका होतात. निवडणुकीसाठीं कोल्हापूर शहराचे ११ विभाग करण्यांत आले आहेत. (त्याचा नकाशा पान १५० वर पहा.) ए वॉर्डांत २, बी वॉर्डांत २, सी वॉर्डांत २, डी वॉर्डांत २ व ई वॉर्डांत ३ विभाग आहेत.




ब्यूरो खातें



वहातूक खातें ट्रक्स






म्यु. स्कूलबोर्डानें खेळांच्या स्पर्धेसाठीं ठेविलेली पारितोषकें





फायरब्रिगेड विभाग

## नगरपालिकेचा प्रमुख नोकरवर्ग




वसुली खातें




कायदा-सल्लागार खातें

नगरपालिकेचा प्रमुख नोकरवर्ग




मॅनेजमेंट ऑफ म्यु. प्रापर्टीज् डिपार्टमेंट




पोटसमित्यांचे चिटणीस

या निरनिराळ्या वॉर्डांत किती जागा आहेत व त्यांतील राखीव कोणत्या आहेत, हें दाखविणारा तक्ता खालीं दिला आहे:—

| अनुक्रम नंबर | म्युनिसिपल वॉर्ड | निवडणुकीचा वॉर्ड ( विभाग ) नंबर | निवडणूक वॉर्डानें ( विभागानें ) निवडावयाचे सभासद |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ए | १ | ४<br>( पैकीं स्त्रियांसाठीं राखीव जागा १; फिरती विभाग नं. १, २, ३, मध्यें. सुरवात नं. १ पासून. ) |
| २ | ए | २ | ४ |
| ३ | बी | ३ | ४ |
| ४ | बी | ४ | ४<br>( पैकीं स्त्रियांसाठीं राखीव १ जागा; फिरती नं. ४, ५, ६ मध्यें. सुरवात नं. ४ पासून. ) |
| ५ | सी | ५ | ४ |
| ६ | सी | ६ | ४<br>( पैकीं शेड्यूल्ड कास्टसाठीं राखीव जागा १ ). |
| ७ | डी | ७ | ४<br>( पैकीं स्त्रियांसाठीं राखीव जागा १; फिरती विभाग नं. ७, ८, ९ मध्यें. सुरवात नं. ७ पासून ). |
| ८ | डी | ८ | ४ |
| ९ | ई | ९ | ४<br>( पैकीं शेड्यूल्ड कास्टसाठीं राखीव जागा १ ). |
| १० | ई | १० | ३ |
| ११ | ई | ११ | ५<br>( शेड्यूल्ड कास्टसाठीं राखीव जागा १ आहे. एक जागा स्त्रियांसाठीं राखीव असून ती वॉर्ड नं. ११ व १० यामध्यें फिरती रहाणार आहे. सुरवात नं. ११ पासून ). |



नागपूरकर तिकटी, जोशीराव गणपती, महाद्वार रोड, कळंबा तिकटी इत्यादि भागांचा समावेश ए वॉर्डांत होतो. मिरजकर तिकटी, साठमारी वसाहत, बिंदु—चौक, जिती नाला इत्यादि भागांचा समावेश बी वॉर्डांत होतो. काळइमाम तालीम, पापाची तिकटी, शाहू महाराज पुतळ्यापासून मटन मार्केटवरून बिंदुचौकापर्यंत, स्मशानापासून मडेगेटपर्यंत, रविवार गेटावरून आदितवार पुलापर्यंतचा भाग सी वॉर्डांत मोडतो. बुरुड गल्ली, बावडा गेट, पंचगंगेचा पूर्व किनारा, उत्तरेश्वर नाका, गांधी मार्केटची पश्चिम बाजू इत्यादि भाग डी वॉर्डांत मोडतो. टेंबलाई वाडी, उजळाई वाडी, राजारामपुरी, स्टेशन पुलापासून उचगांव तिकटीपर्यंत, जिती नाल्याच्या बाजूनें बावडा पुलापर्यंत व पंचगंगेच्या किनाऱ्यानें उचगांव रि. स. नं. ८५ पर्यंत ई वॉर्ड होतो.

या ११ विभागांतून जे ४४ सभासद निवडून देतात, त्यांची सर्वसाधारण सभा होते व तिच्यामार्फत नगरपालिकेचा कारभार चालविला जातो. नगरपालिकेच्या निवडणुका झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालीं सर्वसाधारण सभा बोलाविली जाते व या सभेंत प्रथम नगराध्यक्षांची निवड होते. त्यानंतर नगराध्यक्षांचें अध्यक्षतेखालीं उपाध्यक्ष व इतर पोटसमित्यांची निवडणूक होते. सन १९५२ मध्यें ज्या निवडणुका झाल्यां, त्यांत निवडून आलेल्या म्हणजे नगरपालिकेच्या सध्यांच्या सभासदांचीं नांवें पूर्वीं दिलीं आहेत.

**पदाधिकारी व पोटसमित्याः**—कायद्याप्रमाणें सर्वसाधारण सभेकडून अध्यक्ष व उपाध्यक्षांची निवड केली जाते. चालू वर्षीं अध्यक्षपदीं श्री. बा. स. मुटकेकर, बी. ए. एलएल. बी. यांची व उपाध्यक्षपदीं श्री. पां. ह. हळदकर यांची निवड झाली आहे. कामाच्या सोयीसाठीं सर्वसाधारण सभेकडून निरनिराळ्या ११ समित्या निवडल्या जातात. सध्यांच्या समित्यांचीं व त्यांतील सभासदांचीं नांवें पुढें दिलीं आहेत:—

## स्टँडिंग कमिटी

कलम ३७ (१) प्रमाणें ता. २४–४–१९५४

१ मे. बा. ब. लोंढे, ( चेअरमन )
२ मे. मा. बा. साळोखे
३ मे. द. बा. पाटील
४ मे. भि. बा. पाटील
५ मे. दि. ह. चव्हाण
६ मे. ज. द. भोसले
७ मे. पां. पि. पोवार
८ मे. स. आ. जानवेकर
९ मे. बा. पां. चव्हाण
१० मे. मा. भा. भालेकर
११ मे. द. मा. साळोखे
१२ मे. शं. खं. डिगे

## सॅनिटरी कमिटी

कलम ३८ प्रमाणें ता. २५–४–१९५४ पासून

१ मे. बा. पां. चव्हाण, ( चेअरमन् )
२ मे. मा. भा. भालेकर
३ मे. शं. द. माने
४ मे. के. ब. जगदाळे
५ मे. भा. सा. पाटील
६ मे. सौ. वि. भि. करमरकर
७ ( जागा खाली )

## ऑक्ट्रॉय कमिटी

कलम ३८ प्रमाणें ता. २५–४–१९५४ पासून

१ मे. भि. बा. पाटील, ( चेअरमन् )
२ मे. मा. बा. साळोखे
३ मे. भा. सा. पाटील
४ मे. दि. ह. चव्हाण
५ मे. पां. पि. पोवार
६ मे. द. बा. पाटील
७ मे. य. भा. पाटील

## ड्रेनेज कमिटी

कलम ३८ प्रमाणें ता. २५–४–१९५४ पासून

१ मे. ज. द. भोसले, ( चेअरमन् )
२ मे. भि. बा. पाटील
३ मे. मा. भा. भालेकर
४ मे. मा. बा. साळोखे
५ मे. य. भा. पाटील

## उपनगर सुधारणा कमिटी

कलम ३८ प्रमाणें ता. २५–४–१९५४ पासून

१ मे. द. रा. बुवा, ( चेअरमन् )
२ मे. मा. बा. साळोखे
३ मे. पां. पि. पोवार
४ मे. द. बा. पाटील
५ मे. के. ब. जगदाळे
६ मे. य. भा. पाटील
७ मे. शं. द. माने



## स्कूल कमिटी

कलम ३८ प्रमाणें ता. ८–४–१९५४ पासून

१ मे. शं. खं. डिगे, ( चेअरमन् )
२ मे. भि. बा. पाटील
३ ( जागा खाली )

## सूतिकागृह व दवाखाना कमिटी

कलम ३८ प्रमाणें ता. २५–४–१९५४ पासून

१ मे. सौ. वि. व. बागल, ( चेअरमन् )
२ मे. सौ. इं. म. नलवडे
३ मे. स. आ. जानवेकर
४ मे. पां. पि. पोवार
५ मे. शं. खं. डिगे
६ मे. नि. द. निकम

## बायलॉज कमिटी

कलम ३९ प्रमाणें ता. ८–४–१९५४ पासून

१ मे. द. ह. शेळके, ( चेअरमन् )
२ मे. भि. बा. पाटील
३ मे. शं. खं. डिगे
४ मे. नि. द. निकम

## लॉ अँड रेफरन्स कमिटी

कलम ३९ प्रमाणें ता. २५–४–१९५४ पासून

१ मे. अध्यक्ष
२ मे. चेअरमन्, स्टँ. क.
३ मे. पी. बी. साळुंखे

## फायनान्स कमिटी

कलम ३९ प्रमाणें ता. २५–४–१९५४ पासून
कानू व पोटकायदे नियम नं. ६९ प्रमाणें ( पा. नं. ५८ )

१ मे. अध्यक्ष
२ मे. उपाध्यक्ष
३ मे. सर्व कमिट्यांचे चेअरमेन्

## श्री. भास्करराव जाधव वाचनालय कमिटी

(१) मे. य. भा. पाटील (चेअरमन)
(२) मे. द. मा. साळोखे
(३) मे. के. बा. जगदाळे

याखेरीज बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट १९४७ प्रमाणें नगरपालिकेनें स्कूल बोर्डाची निवडणूक केली असून त्यांतील सभासदांचीं नांवें पा. नं. १२९ वर आलीं आहेत.

## सर्वसाधारण विभाग

## नगराध्यक्षांची कचेरी

नगराध्यक्षांच्या ऑफिसकडे एक अव्वल कारकून व एक कारकून असे दोन नोकर काम करीत आहेत. सर्वसाधारण सभेच्या दसरचें काम अव्वल कारकून पाहतात. सर्वसाधारण सभेपुढें मंजुरीसाठीं ठेवल्या जाणाऱ्या सर्व कामांची कार्यपत्रिका तयार करणें, सर्वसाधारण सभा चालविण्यास मदत करणें, सभा चालू असतां सभेच्या वृत्तांताचीं कच्चीं टांचणें घेणें व इतर पत्रव्यवहार पहाणें इत्यादि कामें हे अव्वल कारकून करतात. शिवाय, मंजूर झालेल्या कामांचे ठराव करून ते अंमलबजावणीसाठीं संबंधित खात्याकडे त्यांच्याकडून पाठविले जातात. नगराध्यक्षांच्या ऑफिसच्या सर्व कामांची जबाबदारी त्यांचेवर असते. नगराध्यक्ष यांच्याकडे येणारीं सर्व महत्त्वाचीं कामें ज्या त्या वेळीं नगराध्यक्षांचे नजरेस आणून त्यांची निर्गत करण्याची जबाबदारी त्यांचेवर असते.

## सर्वसामान्य कारभार

सर्व समित्यांच्या धोरणानुसार मुख्याधिकारी हे नगरपालिकेचा प्रत्यक्ष कारभार पाहतात.

मुख्याधिकारी यांच्या प्रत्यक्ष हुकमतीखालीं खालील शाखा आहेत:—

(१) जबाबी (२) नगदी (अकौंट्स व ऑडिट) (३) ऑक्ट्रॉय (४) कर वसुली व शिंगोटी (५) रेकॉर्ड (६) स्टोअर (७) ब्युरो (८) कोंडवाडा (९) भा. जा. वाचनालय (१०) म्यु. पल गर्ल्स हायस्कूल (११) गुमास्ता.



श्री. जी. ए. कदम, बी. ए.
मुख्याधिकारी.

### (१) जबाबी शाखा

मुख्याधिकारी यांच्या कचेरीच्या मुख्य शाखा, म्हणजे सर्वसाधारण कारभार पहाणेसाठीं जबाबी शाखा होय. या शाखेवर प्रत्यक्ष देखरेख करण्यासाठीं श्री. आर. जी. चिटणीस यांची ऑफिस सुपरिंटेंडेंट म्हणून नेमणूक झाली आहे. जबाबी शाखा, स्टोअर, रेकॉर्ड, कार्यकारी मंडळें व बोर्डाचें काम त्यासाठीं नेमलेल्या कारकुनांकडून वेळेवर, बिनचूक करून घेण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. सर्वसाधारण सभेचें काम चालविणें, सर्व खात्यांना




स्टेशनरी पुरविणें व मुख्याधिकारी यांचे हुकमतीस पात्र राहून सर्व खात्यांतील नोकरवर्ग वेळचे वेळीं कचेरीस येतो अगर कसें हें पाहणें, बाहेरील पत्रव्यवहार पाहणें, नागरिकांचेकडून येणारे अर्ज स्वीकारणें, त्यांना जरूर ती माहिती पुरविणें वगैरे कामें ऑफिस सुपरिंटेंडेंट यांचेकडे आहेत. याशिवाय ब्यूरो खातें, गुमास्ता खातें, भा. जा. वाचनालय, गर्ल्स हायस्कूल व मुख्याधिकारी यांच्या प्रत्यक्ष नजरेखालीं आणखी जीं कामें येतात त्यांचेसंबंधीं त्या त्या खात्याकडून येणारीं कामें पाहून यथावत ऑफिस सुपरिंटेंडेंट मदत करतात. त्यासाटीं त्यांच्या हाताखालीं जरूर तो नोकरवर्ग दिलेला आहे.



श्री. आर. जी. चिटणीस
ऑफिस सुपरिंटेंडेंट

ब्यूरो ऑफिस सन १९४५ पासून चालू असून या खात्याची नागरिकांच्या दृष्टीनें अतिशय उपयुक्तता आहे. कोणाहि नागरिकास तक्रार, सूचना वगैरे करावयाची असेल किंवा आपले अर्जाची, कामाची दाद लावून घेणेची असेल किंवा नगरपालिकेंतील कोणत्याहि शाखेसंबंधीं जरूर ती माहिती या शाखेंतून नागरिकांस अल्प वेळांत मिळूं शकते. या खातेवर हेड् ऑफ दि ब्यूरो म्हणून श्री. हरी गंगाजी पाटील यांची दुय्यम अधिकारी म्हणून नेमणूक केली असून, त्यांच्या हाताखालीं पांच कारकून दिले आहेत. नागरिकांस त्यांच्या अर्जांचा निकाल कळविणेसाटीं तीन सायकलस्वार दिले आहेत. हें खातें निर्माण केल्यापासून नागरिकांचे दृष्टीनेंच नव्हे, तर नगरपालिकेच्या दृष्टीनेंहि फारच उपयुक्त झालें आहे. दररोज किती अर्ज येतात, किती कामांची निर्गत होते, कोणतें काम कोठें आहे, कां पडून आहे, याबद्दलची माहिती तावडतोब मिळूं शकते.



श्री. के. आय्. घाटगे,
अकौंटंट

नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांचे प्रत्यक्ष नियंत्रणाखालीं नगदी शाखेचें कामकाज चालतें. या शाखेचे मुख्यतः दोन भाग पडतात:—

(१) अकौंट्स शाखेचे प्रमुख श्री. के. आय्. घाटगे आहेत.

(२) ऑडिट शाखेचे प्रमुख श्री. के. पी. देशपांडे आहेत.

(१) अकौंट शाखेचे मुख्य अंमलदार अकौंटंट हे असतात. अकौंटंट यांनीं नगदीकडील सर्व हिशोबांचीं पुस्तकें, नगदी कीर्द, प्रॉ. फंड रजिस्टर्स, अनामत व तसलमात रजिस्टर्स,

कालिफाईड रजिस्टर्स, वेळच्या वेळीं लिहिलीं जातात किंवा नाहीं, हें पहावयाचें असतें. चलनें व व्हौचर्सची रुजुवात घेऊन पैशाच्या व्यवहाराच्या नोंदी झाल्या कीं नाहीं तें पहाणें, मासिक, ताळेबंद पत्रकें मे. स्टँडिंग कमिटी व मे. जनरल कमिटीचे मंजुरीसाटीं पाठविणें, नगरपालिकेचें अंदाजपत्रक तयार करणें, नगरपालिकेच्या सांपत्तिक स्थितीवर देखरेख ठेवणें यांसारखीं महत्त्वाचीं कामें अकौंटंट यांना करावीं लागतात. त्यांच्या कामांत मदत करण्यासाठीं बजेट कारकून, कॅशियर, नगदी-मदत कारकून, प्रॉव्हिडंट फंड दप्तर कारकून व एस्टाब्लिशमेंट कारकून असतात.



श्री. के. पी. देशपांडे,
ऑडिटर.

(२) ऑडिट शाखेचे मुख्य ऑडिटर श्री. के. पी. देशपांडे हे आहेत. त्यांनीं नगरपालिकेकडील खर्चांचीं सर्व बिलें ऑडिट करावयाचीं असतात. त्यांत कॉन्ट्रॅक्टर्स, सप्लायर्स, पगार बिलें, वीजपुरवठा, पगार बिलें, वगैरे प्रकारचे बिलांचा समावेश होतो. ही संख्या वर्षास साधारणत: ४००० पर्यंत होते; तसेंच निरनिराळ्या खात्यांकडून विचारणेंत येणाऱ्या कायदेशीर प्रश्नांना म्यु. चे प्रचलित नियम व बरोज ॲक्ट व इतर कायदे यांस अनुसरून अभिप्राय द्यावे लागतात. नोकरांच्या रजा सर्टिफाय कराव्या लागतात. एकंदरींत सर्व खात्यावर हिशोबीदृष्ट्या जमाखर्चाचे हिशोब योग्य प्रकारें ठेविले जातात किंवा नाहीं, नियमाप्रमाणें ठेवावीं लागणारीं रजिस्टरें ठेविलीं जातात कीं नाहीं; तसेंच योग्य त्या मंजुरीनें कामें होतात अगर नाहीं, या बाबतींत ऑडिटर यांना नियंत्रण ठेवावें लागतें.

(३) **स्टोअर:**—कोल्हापूर नगरपालिकेचे एकूण तीन स्टोअर्स असून, त्यांपैकीं पब्लिक वर्क्स स्टोअरकडून हार्डवेअर व आरोग्य खात्याचे स्टोअरकडून औषधें, गॅमेग्झिन, डी. डी. टी., फिनॉइल, कलर्स, खराटे वगैरे माल खरेदी केला जातो. ऑफिस स्टोअरकडे वार्षिक सुमारें ४० ते ५० हजार रु. चा माल खरेदी केला जातो.

ऑफिसचे मुख्य स्टोअरमध्यें प्रामुख्यानें चार बाबी मोडतात, त्या अशा:-(१) सादिल्वार खरेदी (२) छपाई (३) नोकर ड्रेस (४) फर्निचर.

सादिल्वार—कोल्हापूर नगरपालिकेच्या सर्व ऑफिसकरितां या मध्यवर्ती स्टोअरकडून कागद, शाई वगैरे सर्व तऱ्हेचा सादिल्वार माल पुरविला जातो. त्याचा वार्षिक खर्च अंदाजें बारा ते चौदा हजार रुपयांचा आहे.

या नगरपालिकेस अकौंट कोडप्रमाणें लागणारे छपाईचे फॉर्म्स ११६ असून त्याशिवाय ऑफिस सोईच्या दृष्टीनें तयार केलेले फॉर्म्स अंदाजें २०० आहेत. ही सर्व छपाई, वार्षिक टेंडर



मंजूर करून त्याप्रमाणें करून घेतली जाते. मात्र छपाईस लागणारा कागद नगरपालिका पुरविते. छपाईचा वार्षिक खर्च अंदाजें कागद छपाईसह वीस हजार रुपये असून, त्यामध्यें कागद खर्च पंधरा हजार रुपये आहे.

(५) **रेकॉर्ड:**—रेकॉर्ड ऑफिस खात्याकडे एक कारकून व एक शिपाई काम करतात. शिवाय नकला वगैरे काढण्यास मदतनीस म्हणून पांच उमेदवार आहेत.

रेकॉर्डमध्यें अतिशय महत्त्वाचे कागद असतात. म्हणून ते चांगल्या रीतीनें व सुरक्षितपणें ठेवण्याची दक्षता घेतली जाते. प्रत्येक वर्षीं ऑडिट झाल्यानंतर ज्या त्या खात्याचे कागदपत्र रेकॉर्डकडे येतात. ते आल्यानंतर त्यांची वर्गवारी करून ते कागद रेकॉर्डसाठीं मुद्दाम तयार केलेल्या लांकडी शिड्यांवर व्यवस्थितपणें लावले जातात.

(६) **नगरपालिकेचे वकील:**—कोल्हापूर नगरपालिकेकडून सन १९४९ पासून सन १९५२ पर्यंत २६६ दोनशेंहे सासष्ट दावे व सन १९५३–५४ सालांत १५७ एकशेंहे सत्तावन दावे दाखल करण्यांत आले. शिवाय कबजाबद्दल व रकमा वसुलीसाठीं २४२ दरखास्ती दाखल झाल्या आहेत.

कोल्हापूर नगरपालिकेनें बॉम्बे म्युनिसिपल बरोज ॲक्ट १९२५ भेसळ–प्रतिबंधक व गुमास्ता कायदा यांखालीं कोल्हापूर येथील ज्युडि. मॅ. वर्ग १ कोर्ट नं. ३ यांचे कोर्टांत एकूण ८११ दावे दाखल केले असून त्यांपैकीं ७१६ चा निकाल नगरपालिकेचे बतीनें होऊन बाकी कामें कोर्टांत चालू आहेत.


तसेंच कोल्हापूर नगरपालिकेच्या निरनिराळ्या खात्यांकडील मागणीप्रमाणें सन १९५३–५४ या सालांत एकूण अंदाजें २०० च्या वर अभिप्राय देणेंत आले असून, शिवाय करारपत्रें, मसुदे, नोटीसा व त्यांचीं उत्तरें ४०/५० प्रकरणांत तयार केलीं आहेत. कोल्हापूर नगरपालिकेच्या वर दिलेल्या सर्व कामांसाटीं व दिवाणी–फौजदारी कामाकरितां श्री. व्ही. जी. सरनाईक एम. ए., एलएल. बी. यांची नेमणूक झाली आहे.

(७) **नोकरवर्ग:**— कोल्हापूर नगरपालिकेच्या कामाच्या सोयीसाठीं निरनिराळीं खातीं पाडलेलीं आहेत. सर्व खात्यांकडे मिळून एकूण ११२३ नोकरांच्या जागा मंजूर आहेत. त्यांपैकीं प. वर्क्स खात्याकडील ९३ व सफाई खात्याकडील ५८८ असा कामगार वर्ग सोडून उरलेल्या कनिष्ठ व वरिष्ठ प्रतीच्या नोकरांची संख्या ४४२ आहे.

हे नोकर ज्या त्या हुद्याप्रमाणें एकूण ३१ खात्यांत काम करीत आहेत व त्यांच्या ३१ प्रकारच्या वेतनश्रेणी ठरविलेल्या आहेत.

वरील सर्व नोकरांच्या पगाराची व महागाई भत्याची दरमहाची रकम अनुक्रमें रुपये ४८००० व ४०००० आहे.

(८) **कर वसुली**:—या खात्याच्या उत्पन्नापासून नगरपालिकेस १९५३–५४ सालीं ७॥ लक्ष रु. उत्पन्न मिळालें. या महत्त्वाच्या खात्याचें कामकाज चीफ ऑफिसर यांच्या नियंत्रणाखालीं चालत असून टॅक्स सुपरिंटेंडेंट श्री. ए. आय. मोहिते या खात्याचे प्रमुख आहेत. या खात्यांत सध्यां १ टॅक्स सुपरिंटेंडेंट, १ मॅनेजर ऑफ म्यु. प्रॉपर्टीज, २९ कारकून व १६ शिपाई असे एकंदर ४७ नोकर काम करीत आहेत. या खात्यामार्फत घरपट्टी, तारदखाना पट्टी, जनरल सॅनिटरी सेस, लग्न कर, करमणूक कर, कुत्रा कर, लायसेन्स फी, शिंगोटी फी, मार्केट भाडें, खुल्या जागांचे भाडें वगैरेंची वसुली होते. गेल्या तीन वर्षांत कर वसुली खात्यानें केलेल्या प्रत्यक्ष वसुलाचे आंकडे पुढें दिले आहेत, त्यावरून या खात्यानें केलेल्या कामाची कल्पना येतेः—



श्री. ए. आय. मोहिते
टॅक्स सुपरिंटेंडेंट

स. १९५१-५२ ते स. १९५३-५४ या काळांत कर वसुली खात्याकडील उत्पन्न दर्शविणारा तक्ता

| बाब | संख्या | उत्पन्न | | |
|---|---|---|---|---|
| | | १९५१–५२ | १९५२–५३ | १९५३–५४ |
| घरपट्टी | १५९९३ | २८२७६५ | ३७२०९९ | ४०९१२६ |
| तारद. कर | ४९८४ | ४३९६७ | ४४०३७ | ४६१४१ |
| जन. सनि. सेस | ... | १८२१८ | २५०४६ | २६३०४ |
| चाकपट्टी | ७७७ | ४१७० | ३२६९ | ३२५७ |
| नाटक सिनेमा कर | १२ | २२८७८ | २०९६१ | १७७६१ |
| लग्न कर | ... | ४२९० | ४३७५ | ३१९५ |
| कुत्रा कर | ... | १८० | २०१ | १५६ |
| खुल्या जागा, जमिनी | ... | १६४०९ | १४३८७ | १७७१४ |
| मार्केट भाडें, दुकानें, गाळे | ४०३ | १२०३९५ | १६०७७१ | १४०१०१ |
| शिंगोटी | ... | ६१९२ | ४६९५ | ५७७१ |
| मक्ते बाब | ... | ७६४८ | ८२७१ | ११६१८ |
| लायसेन्स फी | ३२५८ | ४२३११ | ४३५४६ | ४५१८० |
| नोटीस फी, वॉरंट | ... | ४२०७ | ३७८६ | ३४२३ |
| मंडप व रस्त्यावर माल टाक. फी | ... | ४१०२ | ३३४० | २९५९ |
| गॅलरी पायठाफळी फी | ... | ६४८२ | ६९२० | ६७९७ |
| मोटार नळ फी | ... | ३०५६ | १६२५ | ४४१ |
| इले. दिवा भाडें | ... | ८१७० | ६७५८ | ६८९३ |
| नंबर प्लेट | ... | २४८ | २१४ | २७१ |
| पाणी हद्दील | ... | ... | १६१६ | २०१६ |






सर्वसामान्य कारभार खातें




नगदी खातें

नगरपालिकेचा प्रमुख नोकरवर्ग




आरोग्य खातें




ऑक्ट्रॉय खातें

नगरपालिकेचा प्रमुख नोकरवर्ग





सार्वजनिक बांधकाम खातें





गुमास्ता खातें

# कोल्हापूर नगरींतील दोन शैक्षणिक इमारती



ताराराणी विद्यामंदिर



पद्माराजे गर्ल्स हायस्कूल



(९) **ऑक्ट्रॉयः**—या खात्याची सुरवात ता. १ एप्रिल १९३५ रोजीं झाली. ऑक्ट्रॉय (जकात) वसूल करण्याकरितां कोल्हापूर शहराच्या सरहद्दीवर एकूण १९ नाकीं आहेत. यांपैकीं बहुतेक नाकीं आधुनिक पद्धतीनें सिमेंटचीं बांधलीं असून त्यांच्यासाठीं विजेची सोय करण्यांत आली आहे. १९५३–५४ सालीं जकातीपासून नगरपालिकेस १२ लक्ष ५२ हजार रुपये मिळाले. नगरपालिकेच्या उत्पन्नाच्या निरनिराळ्या बाबींत हें खातें सर्वांत मोठें आहे. या खात्याचे प्रमुख श्री. हेर्लेकर हे आहेत. या खात्यांत १ जकात सुपरिंटेंडेंट, ५ इन्स्पेक्टर्स, ५६ कारकून, १७ मुकादम, ४८ शिपाई व १ मोटार ड्रायव्हर असे एकूण १२८ नोकर आहेत. नगरपालिकेची स्टेशन वॅगन प्रत्येक नाक्यावर दररोज जाते व जमा कारकून सर्व नाक्यांवरील जकात नगरपालिकेंत जमा करतो. आतांपर्यंतच्या उत्पन्नांच्या कालाची बारकाईनें पहाणी करतां असें आढळून येतें कीं, जून ते ऑक्टोबरपर्यंत पावसाळ्यामुळें या खात्याच्या उत्पन्नांत घट येते व नोव्हेंबर ते मे अखेर उत्पन्न अधिक येतें. नगरपालिकेच्या इमारतीजवळ नगरपालिकेनें एक वे ब्रिज बसविला असून, ट्रक्स, गाड्या वगैरेंचें वजन करण्याचें काम रात्रंदिवस चालूं असतें. जकात नाकींहि दररोज २४ तास चालूं असतात.



श्री. डी. एम्. हेर्लेकर
ऑक्ट्रॉय सुपरिंटेंडेंट.

जकातीपासून गेल्या तीन वर्षांत मिळालेलें उत्पन्न पुढें दिलें आहे :—

| | |
|---|---|
| १९५१–५२ | ११,७१,००४ |
| १९५२–५३ | १४,३९,७८५ |
| १९५३–५४ | १२,५२,३०५ |

सन १९५३–५४ सालांत शहरांत आयात झालेल्या मालावरील जकातीचें पत्रक पान १६२–६३ वर दिलें आहे. त्यावरून या खात्याच्या उत्पन्नाची कल्पना येईल. तसेंच कोल्हापूर शहरांत कोणता माल किती प्रमाणांत आयात होतो याचीहि माहिती मिळेल.

## (१०) बांधकाम (पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट):—

शहर सुस्थितींत ठेवणें व विकासाची रूपरेखा आंखून ती प्रत्यक्षांत आणणें हीं महत्त्वाचीं कामें या खात्यामार्फत केलीं जातात. जनतेच्या दैनंदिन गरजा या खात्यामार्फत दूर केल्या जातात. म्हणून या खात्याच्या कारभाराकडे विशेष लक्ष पुरवावें लागतें. कोल्हापूर नगरपालिकेचा हा विभाग अत्यंत कार्यक्षम आहे. या खात्यावर १९५३–५४ सालीं ५ लक्ष ४१ हजार रुपये खर्च करण्यांत आले आहेत. या खात्याचे प्रमुख श्री. जी. एस. दिवाण B. E. (Civil) हे एक्झि. इंजिनीयर म्हणून काम पहात आहेत. कामाच्या सोयीसाठी या खात्याचे ५ विभाग करणेंत आलेले आहेत.


| जकात खातें:— तपशील | निव्वळ आयात | निव्वळ जकात जमेची रक्कम |
|---|---|---|
| **वर्ग १** | | रु. आ. पै |
| धान्य— वजनी मुंबई मण | २०२२३०९–१० | २५८७२०–१४– २ |
| किंमत रुपये | ३३६२८१– ० | १०७१९–१४– ० |
| शुभ्र साखर— मुंबई मण | ३४०७८– ० | १२७७९– ४– ३ |
| गूळ— ” ” | २५२०५५३–१० | १६७५९५– ५– ९ |
| तूप— ” ” | ४६०४–१० | ५७५७–१५– ० |
| चहा— किंमत रुपये | १७४३९२३– ० | ५४४९७– ९– ३ |
| एकूण वजनी मुंबई मण | ४५८१५४४–३० | ४४४८५२– ७– ३ |
| एकूण किंमत रुपये | २०८०२०४– ० | ६५२१७– ७– ३ |
| **वर्ग २** | | |
| तेलें— मुंबई मण | ४०६७०७–३० | ९०१३९–१२– ३ |
| **वर्ग ३** | | |
| सरपण, प्रकाशासाठीं लागणारीं तेलें, व धुण्यासाठीं लागणारीं तेलें व तेलयुक्त बीं | | |
| मुंबई मण | १४०३६२३–२० | १०१३३५– ७– ० |
| किंमत रुपये | २६४०६४९– ० | ४१४८३–१४– ३ |
| वर्ग ३ एकूण बेरीज | | १४२८१९– ५– ३ |
| **वर्ग ४** | | |
| इमारत उपयोगी सामान | | |
| मुंबई मण | २६८५२०–३० | २२०८०– ५– ९ |
| किंमत रुपये | ९०१८९०– ० | २४६७२–१५– ० |
| वर्ग ४ ची एकूण बेरीज | | ४६७५३– ४– ० |
| **वर्ग ५** | | |
| औषधें, अत्तरें वगैरे सुगंधी सामान | | |
| मुंबई मण | ३१७३३–१० | ८०९८–१३– ३ |
| किंमत रुपये | १२००८२८– ० | ३३९०४– २– ० |
| वर्ग ५ ची एकूण बेरीज | | ४२००२–१५– ३ |



| तपशील | निव्वळ आयात | निव्वळ जकात जमेची रक्कम |
|---|---|---|
| **वर्ग ६** | | रु. आ. पै |
| तंबाखू | | |
| मुंबई मण | १७११८–१० | १३१०८–१३– ६ |
| किंमत रुपये | ३३२८२४– ० | २०८०१– ८– ६ |
| वर्ग ६ ची एकूण बेरीज | | ३३९१०– ६– ० |
| **वर्ग ७** | | |
| कापड आणि तयार कपडे | | |
| मुंबई मण | ४७३२९– ० | ११५०७– ४–० |
| किंमत रुपये | ७१३७०४१– ० | १११५१६– ४–३ |
| वर्ग ७ ची एकूण बेरीज | | १२३०२३– ८– ३ |
| **वर्ग ८** | | |
| धातू आणि धातूच्या वस्तु | | |
| मुंबई मण | ५८४३४–२० | ४०५३– ४– ६ |
| किंमत रुपये | ८७३६८३८– ० | १४९७४०–१५– ३ |
| वर्ग ८ ची एकूण बेरीज | | १५३७९४– ३– ९ |
| **वर्ग ९** | | |
| स्टेशनरी, सीने फिल्म्स, ओलीं व सुकलेलीं कातडीं व हाडें | | |
| मुंबई मण | ८५४०– ० | ५३३–१२– ० |
| किंमत रुपये | २२९८९४४– ० | ४०७२३– ४– ९ |
| फूट | ८१२२०००– ० | २०३०– ८– ० |
| तपकीर— मुं. मण | १०७१८४– ० | ३३४९– ८– ० |
| वर्ग ९ ची एकूण बेरीज | | ४६६३७– ०– ९ |

वर्ग १ ते ९ च्या निव्वळ जकात जमेची बेरीज १२५२३०५–६–९ आहे.

**बांधकामः**—(१) मुख्य ऑफिस (२) फायर ब्रिगेड (३) वर्कशॉप (४) बागा (५) रोवणाई.




श्री. जी. एस्. दिवाण,
B. E. (Civil)
एक्झिक्युटिव्ह इंजिनियर

मुख्य ऑफिसचें काम प्रामुख्यानें देखरेखीचें असून त्यांत १ असिस्टंट इंजिनीयर, ६ ओव्हरसियर्स, ५ मेस्त्री, १ हेड-क्लार्क, ३ कारकून २ ड्राफ्टस्मन २ सर्व्हेअर्स, १ ट्रेसर व ५ शिपाई असे एकूण २६ नोकर आहेत.

शहराच्या प्रत्येक वॉर्डकडे एक ओव्हरसियर व एक मेस्त्री यांची नेमणूक असते. त्या विभागांतील नागरिकांना बांधकाम परवानगी देणें, नागरिकांच्या बांधकामबाबतच्या तक्रारी दूर करणें, नगरपालिकेच्या इमारती सुस्थितींत ठेवणें, नवीन इमारतीच्या बांधकामावर देखरेख ठेवणें, गटारें व रस्ते दुरुस्त ठेवणें, नवीन बांधणें आणि बागांची जोपासना व सर्वसाधारण देखरेख वगैरे स्वरूपाचीं कामें या नोकरवर्गावर सोंपविलेलीं आहेत.

याशिवाय महत्त्वाच्या कामांचीं एस्टिमेटस् तयार करणें व बजेटसाठीं करावीं लागणारीं प्लॅन्स व एस्टिमेटस् यांसाठीं एका स्वतंत्र ओव्हरसियरची नेमणूक आहे. तसेंच नगरपालिकेच्या प्रॉपर्टीचें रजिष्टर ठेवणें, ग्यालरी, फळी, गटारांचें पाणी वापरणाऱ्या लोकांचें जमिनींचें क्षेत्र तपासून देणें, अतिक्रमणें दूर करणें, नागरिकांना बांधकाम करणेच्या वेळीं हद्दीच्या खुणा करून देणें यांसाठीं दोन सर्व्हेअर्स नेमण्यांत आलेले आहेत.

**फायरब्रिगेडः**—शहरांत लागलेल्या आगी विझवणें, इमारत अथवा झाड कोसळलें असल्यास त्याखालीं सांपडलेल्यांना बाहेर काढणें वगैरे कामें या विभागा-मार्फत केलीं जातात. या कामासाठीं सर्व प्रकारच्या अद्यावत साधनसामुग्रींनीं युक्त असे तीन फायर फायटर्स, एक ट्रेलर पंप, एक जलसिंचक ही यंत्रसामुग्री आहे. अद्यावत फायर फायटिंगचें मुंबई येथें शिक्षण घेतलेले श्री. एस. डी. शेळके हे या विभा-गाचे प्रमुख आहेत. या विभागांत १ फायर सुपरिंटेंडेंट ६ ड्रायव्हर्स, ६ क्लीनर्स व ६ शिपाई हा नोकरवर्ग आहे. नगरपालिका इमारत व सुभाष स्टोअर या दोन ठिकाणीं फायर ब्रिगेड स्टेशन्स केलीं असून आगीची वर्दी तात्काळ मिळावी म्हणून दोन्ही ठिकाणीं टेलिफोन्स ठेवण्यांत आलेले आहेत. नगरपालिका स्टेशन नं. १०१ व सुभाष स्टोअर स्टेशन नं. २०६ हे टेलिफोनचे नंबर आहेत. या विभागानें



श्री. एस्. डी. शेळके,
फायरब्रिगेड सुपरिंटेंडेंट.



शहरांत लागलेल्या प्रचंड आगी विझविणेच्या कामीं दाखविलेल्या कौशल्याबद्दल वेळोवेळीं जनते-कडून दुवा मिळालेला आहे.

फायर ब्रिगेडची कार्यतत्परता वाढविणें व आगीचे वेळीं तात्काळ पाण्याचा पुरवठा अल्प वेळेंत व्हावा या हेतूनें पांच ठिकाणीं विजेचे पंप बसविण्यांत आलेले आहेत. आणखी दोन ठिकाणीं पंप बसविणेचें काम चालू आहे. तसेंच पंपानें पाणी भरण्यास लागणारा वेळ देखील वांचवावा म्हणून बारा फूट उंचीवर पाण्याच्या टाक्या तीन ठिकाणीं बांधण्यांत आलेल्या आहेत. या विभागाची कार्यक्षमता व कार्यतत्परता वाखाणण्यासारखी आहे.

## वर्कशॉप व सुभाष स्टोअर

नगरपालिकेच्या मोटारी, फायर फायटर्स, कचरा ट्रक्स, मैला ट्रक्स, इलेक्ट्रिक मोटर पंप्स व इतर मशिनरी यांच्या दैनंदिन दुरुस्तीचीं कामें या विभागामार्फत केलीं जातात. वरील सर्व मशिनरी सुस्थितींत ठेवण्याची जबाबदारी या विभागाकडे सोंपविलेली असून या विभागांत एक मेकॅनिक, एक सुतार, दोन फिटर्स, एक घिसाडी, एक घणकरी, एक मदतनीस सुतार व एक रखवालदार या-प्रमाणें नोकर काम करीत आहेत.

नगरपालिकेस लागणाऱ्या डिपार्टमेंटली कामाकरितां व कंत्राटदारांना देण्यांत येणाऱ्या सीमेंट, सळी, दगडी कोळसा, डांबर, लोखंडी पिंपें, मोटारीचे स्पेअर पार्टस्, टायर्स वगैरेच्या व्यवस्थेसाठीं व देण्याघेण्याच्या जबाबदारीसाठीं एका स्टोअरकीपरची नेमणूक करणेंत आली आहे. नगर-पालिकेकडे दोन रोड रोलर्स आहेत. साडेबारा टन वजनाचा व डिझेल ऑईलवर चालणारा एक नवा रोलर नुकताच खरेदी केला आहे.

नगरपालिकेच्या मालमत्तेची व्यवस्था श्री. डी. डी. पाटील यांच्याकडे असून त्यांचा हुद्दा 'मॅनेजर, म्युनिसिपल पार्टीज' असा आहे.

**सार्वजनिक बागाः**—शहराच्या निरनिराळ्या भागांत एकूण ५ बागा आहेत. प्रत्येक बागेंत नागरिकांचे करमणुकीसाठीं लाऊड स्पीकरसह रेडिओ सेट्स बसविणेंत आलेले आहेत. त्याशिवाय हिंदोळे, घसरगुंडी वगैरे साहित्यांची सोय केलेली असल्यामुळें नियमितपणें शहरांतील हजारों बालकें सायंकाळीं या बागांतून इतस्ततः खेळत असलेलीं दिसतात. बागांची निगा उत्तम तऱ्हेनें राखण्यांत आलेली आहे. या बागांची व्यवस्था वॉर्ड ओव्हरसियरकडून पाहण्यांत येते. बागकामावर एकूण १८ माळी नोकर आहेत. बागांची पाहणी सरकारी गार्डन सुपरिंटेंडेंट यांचेकडून होत असते.

**विजेचे दिवेः**—शहरांतील सर्व भागांत विजेच्या दिव्यांची सोय केलेली आहे. या दिव्यांची संख्या १७०० वर असून गरजेप्रमाणें त्यांत वाढ होत आहे. अत्यंत रहदारीचे ठिकाणीं व विशेष प्रमुख ठिकाणीं १०० ते ३०० कॅंडलसचे ३५० दिवे बसविण्यांत आलेले आहेत. या कामावर देखरेख करण्यासाठीं एका लाईट इन्स्पेक्टरची नेमणूक केलेली आहे.

**पाणी पुरवठाः**—पाणी पुरवठा ही बाब नगरपालिकेच्या ताब्यांत अद्याप आलेली नाहीं. तथापि ज्या भागामध्यें सरकारकडून पाणी पुरवठा केलेला नाहीं अगर अपुरा पुरवठा आहे अशा भागांत जनतेच्या सोयीसाठीं एकूण ३९ ठिकाणीं पाण्याचे हौद व चाव्यांची व्यवस्था नगरपालिकेनें स्वखर्चानें केली आहे.

**रस्तेः**—कोल्हापूर नगरपालिकेच्या हद्दींत एकूण ९४ मैल लांबीचे रस्ते आहेत. त्यांत १५ मैल डांबरी, ४५ मैल खडीचे, २९ मैल मुरुमाचे व ५ मैल फरशीचे बोळ असे प्रकार आहेत. सर्वसाधारण मानानें पाहिल्यास रस्त्यांची स्थिति चांगली आहे. पूर्वींचे अनेक अरुंद रस्ते रुंद करण्यांत आले आहेत व कांहीं नवीन रस्तेहि तयार करण्यांत आले आहेत. त्याशिवाय शहर विकास योजनेंत आणखी कांहीं रस्त्यांच्या नवीन योजना आंखण्यांत आलेल्या आहेत.

**ड्रेनेजः**—अंडरग्राउंड ड्रेनेज करण्याचें या नगरपालिकेनें ठरविलें असून त्यास मुंबई सरकारकडून मंजुरी मिळाली आहे. या योजनेवर रु. ६६,६३,००० खर्च होणार आहे. या योजनेसाठीं आवश्यक असलेली सर्व्हेची कामें मे. पब्लिक हेल्थ इंजिनीअर टू गव्हर्मेंट ऑफ बॉम्बे यांचेमार्फत चालू आहेत. सध्यां शहरांतील सांडपाणी व पावसाचें पाणी यांच्या निर्गतीसाठीं एकूण ४८ मैल लांबीचीं गटारें असून त्यांपैकीं २६ मैल लांबीचीं पक्कीं गटारें आहेत.

**रस्त्याकडेचीं झाडें**:—रस्त्यांच्या दोन्ही बाजूंस झाडें लावण्याचा उपक्रम दरवर्षी केला जात आहे. सध्यां शहरांतील रस्त्यांचे बाजूस १६०० झाडें आहेत.

**शहरसुधारणा योजनाः**— नवीन टाऊन प्लॅनिंग स्कीमची शहरास आवश्यकता आहे. यासाठीं नगरपालिकेनें आधुनिकीकरणाच्या दोन योजना सरकारकडे सुचविल्या आहेतः—

(१) शाहू मिल मांगवाडा, डोंबारी वसाहत, बडुशाडी वगैरे ई वॉर्डांतील भाग.

(२) दुधाळी, धोत्री, दारूभट्टी जवळील शेताचा भाग.

यांपैकीं पहिल्या योजनेस सरकारची मंजुरी मिळालेली असून दुसरीहि विचारासाठीं सरकारपुढें आहे.

**मास्टर प्लॅनः**—शहरसुधारणेच्या लहानसहान प्रयत्नाबरोबरच एकवार संपूर्णपणें शहर सुधारणेचा आराखडा आंखणें आवश्यक वाटलें, म्हणून नगरपालिकेनें मास्टर प्लॅनची कल्पना सरकारपुढें मांडली. सरकारनेंहि विलीन संस्थानी भागांतील या शहरास अग्र हक्क देऊन मास्टर प्लॅन करण्याची योजना मंजूर केली आहे. या प्लॅनसाठीं प्राथमिक सर्व्हेचें काम कोल्हापूर येथील असिस्टंट कन्सल्टिंग सर्व्हेअर यांचे ऑफिसमार्फत चालू आहे.

वर नमूद असलेल्या सर्व विभागांतील कामकाजांसाठीं नेमलेल्या नोकरवर्गाखेरीज पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटकडे नेहमींच्या गरजेच्या कामगिरीवर ६८ मजूर, १३ गाडीवान, ८ मुकादम, ३ गवंडी व १ सुतार असे एकूण ९३ नोकर आहेत. हा सर्व नोकरवर्ग कायमपणें नोकरींत आहे.



**११ आरोग्य खातेंः**—नागरिकांच्या आरोग्याचें रक्षण करणें, रोगप्रसारास आळा घालणें, सांथीच्या वेळीं विशेष दक्षता घेऊन सांथ आटोक्यांत आणणें, औषधें सर्वसामान्य नागरिकांच्या आटोक्यांत आणणें इत्यादि अनेक महत्त्वाचीं कामें या खात्याकडे आहेत. या खात्यावर कोल्हापूर नगरपालिकेनें १९५२–५४ सालीं एकंदर ८ लक्ष ८१ हजार रुपये खर्च केला आहे. डॉ. के. पी. कदम हे या खात्याचे प्रमुख आहेत. सॅनिटरी इन्स्पेक्टर्स, डॉक्टर्स, वैद्य, नर्सेस, ड्रेसर्स, मार्केट इन्स्पेक्टर्स, ड्रायव्हर्स, झाडू व भंगी कामगार इत्यादि ६२२ नोकर या खात्यांत काम करतात. त्यांपैकीं २५० झाडू कामगार व २०८ भंगी कामगार आहेत.



डॉ. के. पी. कदम,
आरोग्याधिकारी.

या खात्यातर्फे शहरांतील भाजी बाजार, मटन बाजार, मासे बाजार, फळ बाजार इत्यादींची तपासणी होते. शहरांत सध्यां शिवाजी मार्केट, वरुणतीर्थ मार्केट, शुक्रवार धर्मशाळा मार्केट, बागल मार्केट व शाहूपुरी मार्केट असे पांच स्वतंत्र मोठे बाजार आहेत. त्याशिवाय मटन मार्केट व फिश मार्केट असून ५४ मटन दुकानें आहेत. जनावरांचा बाजार, बकरी बाजार, लांकूड बाजार, गवत मंडई व धान्य बाजार स्वतंत्र आहेत. शहरांत दोन कत्तलखाने असून त्यांत दरमहा सुमारें दीड हजार जनावरें व पन्नास हजार बकरीं मारलीं जातात. रविवारीं शहराचा मुख्य बाजार भरतो. नागरिकांच्या आरोग्यास विघातक असा माल या बाजारांत ठेवण्यांत आला तर त्याचा नाश करण्यांत येतो. शहरांतील सर्व रस्ते व गटारें स्वच्छ ठेवण्याचें कामहि या खात्यातर्फे होतें. तसेंच शहरांतील पाण्याच्या व दलदलीच्या भागांत फिनाईल, गॅमेक्सिन, क्रूडॉईल वगैरे टाकून रोगप्रसारक जंतु व डांस यांचा नाश करण्यांत येतो. नागरिकांना उंदीर व घुशी पकडण्याचे सांपळे देणें व पकडलेल्या उंदीर व घुशींचा नाश करण्याचेंहि काम हें खातें करतें.

नगरपालिकेनें एकंदर चार दवाखाने चालविले आहेत. त्यांपैकीं एक होमिओपाथिक, एक आयुर्वेदिक, एक ॲलोपॅथिक व एक आयांग्ल आहे. त्यांतून दररोज सुमारें ४०० नागरिक अल्पदरानें औषध घेतात. असे आणखी दोन दवाखाने काढण्यास नगरपालिकेनें मंजुरी दिली आहे. नगरपालिकेनें याशिवाय 'सावित्रीबाई फुले सूतिकागृह' चालविलें आहे.

शहरांतील जन्ममृत्यूंची नोंद आरोग्य खात्यातर्फे ठेवली जाते. गेल्या तीन वर्षांतील कोल्हापुरांतील जननमृत्यूंचे आंकडे खालीलप्रमाणें आहेतः—

| | जन्म | मृत्यु |
|---|---|---|
| १९५१–५२ | ४८९१ | १९९६ |
| १९५२–५३ | ५१६२ | २०७९ |
| १९५३–५४ | ५२६३ | २२७० |

देवी काढण्याचीं ११ केंद्रें शहरांत आहेत. एप्रिल १९५४ मध्यें देवीप्रतिबंधक सप्ताह साजरा करण्यांत आला व सरकारच्या सहकार्यानें ५६ हजार लोकांना देवीप्रतिबंधक लस टोंचण्यांत आली.

कोल्हापुरांतील कचरा व मैला निर्गतीचें काम या खात्याकडून केलें जातें. शहरांतील कचरा उठावासाठीं या खात्याकडे १ गार्बेज युनिट ट्रेलरसह, ५ ट्रक्स व ३ बैलगाड्या आहेत. मैला उठावासाठीं ५ ट्रक्स, ६ नाईट सॉईल ट्रेलर टँक्स व ३ लदाऊ गाड्या आहेत. शहरांतील मैला व कचरा शहरापासून २ मैलांवरील माळावर कंपोस्ट खतासाठीं दररोज नेला जातो.

**कंपोस्ट खत:**—ही नगरपालिकेच्या उत्पन्नाची एक मोठी बाब असून १९५३-५४ सालीं १ लक्ष २१ हजार रु. चें २४०२ ब्रास कंपोस्ट खत विकण्यांत आलें. शहरांत एकूण ४३४ सार्वजनिक संडास व १२५ सार्वजनिक मुत्र्या आहेत. स्मशानांतील व्यवस्थाही या खात्याकडेच आहे. कोल्हापुरांत हिंदूंचें स्मशान पंचगंगा नदीच्या घाटावर शिवाजी पुलाखालीं असून मुसलमानांचें दफनाचें ठिकाण बागल मार्केटजवळ व ख्रिश्चनांचें सदरबाजारजवळ आहे. बेवारशी प्रेतें वाहून नेण्यासाठीं नगरपालिकेनें एक शवपेटिका गाडी ठेविली आहे. शहरांतील कुत्रीं मारण्याचें कामहि या खात्यातर्फे आधुनिक पद्धतीनें होतें.

**१२ गुमास्ता खातें:**—या खात्याचें काम चीफ ऑफिसर यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं चालतें. या खात्याकडे एक इन्स्पेक्टर, एक कारकून व एक शिपाई यांप्रमाणें नोकरवर्ग आहे. दि बॉंबे शॉप्स ॲन्ड एस्टाब्लिशमेंट ॲक्ट १९४८ हा कायदा नगरपालिकेस ता. २७।७।१९४९ पासून लागू झाला असून त्या कायद्याअन्वयें या खात्याचा कारभार चालू आहे. सध्यां श्री. जे. के. वाघ, बी. ए., हे इन्स्पेक्टर आहेत.

गेल्या तीन सालांत नोंदणी फी, फेरबदल फी, किती जमा झाली, कोर्टांत केसीस् किती दाखल झाल्या, त्यांपैकीं अनुकूल निकाल झालेल्या केसीसमध्यें दंड किती झाला, इन्स्पेक्टरांनीं किती वेळां भेटी दिल्या, सरकारी ग्रँट किती मिळाली व या खात्यावर खर्च किती झाला, याचा तक्ता खालीं दिला आहे:—

| | १९५१-५२<br>रु. | १९५२-५३<br>रु. | १९५३-५४<br>रु. |
|---|---|---|---|
| नोंदणी फी | ५०९ | ४२१ | ६०३ |
| फेरबदल फी | ३६८ | ४६५ | २८२ |
| केसीसची संख्या | १६ | ० | ३६ |
| दंडाची रक्कम | ३०० | ० | ७१० |
| व्हिजिटची संख्या | ९१४ | ७६९ | १४७६ |
| गव्हर्मेंट ग्रँट रक्कम | १६४२ | १०३ | १२५ |
| या खात्याचा खर्च | ४११३ | ४१९२ | ४४७७ |




दुकानें व व्यापारी संस्था वेळेवर उघडतात व बंद होतात कीं नाहीं हें पाहणें, या संस्थांतील नोकरांकडून ठराविक तासांपेक्षां अधिक काम करून घेतलें जातें कीं काय हें तपासणें, नोकरांना साप्ताहिक सुट्टी मिळते कीं नाहीं हें पाहणें, इत्यादि कामें इन्स्पेक्टर करतात व आवश्यक तर संबंधित मालकावर कायदेशीर उपाययोजना करण्यास नगरपालिकेस कळवितात.

कोल्हापूर नगरपालिकेच्या हद्दींत गुमास्ता कायद्याखालीं रजिस्टर झालेल्या संस्था व संस्थांमधील नोकरांची संख्या वगैरेसंबंधानें माहितीचें ता. ३१।३।५४ इ. अखेरचें पत्रक पुढें दिलें आहे:—

| संस्थेचा प्रकार | दुकानें वगैरे संस्थांची संख्या | कामावर ठेवणाऱ्या कुटुंबांतील व्यक्तींची संख्या — प्रौढ पुरुष | प्रौढ स्त्रिया | अल्पवयी पुरुष | धंद्यांतील खाजगी स्वरूपाचीं कामें करणारे व व्यवस्थापकाचीं कामें करणारे नोकर | नोकरांची एकूण संख्या — प्रौढ पुरुष | प्रौढ स्त्रिया | अल्पवयी पुरुष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) दुकानें | ३४०१ | १४३१ | ३०५ | १४९ | १११ | २३६२ | २४ | १०५ |
| (२) व्यापारी संस्था | ७४४ | १६१ | १२ | २२ | ११ | १४६९ | ३४ | ३१ |
| (३) राहण्याची सोय असलेल्या खानावळी | १९ | ४ | ३ | ४ | ० | ९१ | २२ | २ |
| (४) हॉटेल्स व खानावळी | ४२१ | २०३ | २० | २५ | १३ | ६९७ | ३० | ६८ |
| (५) थिएटर्स व इतर सार्वजनिक करमणुकीचीं ठिकाणें | १२ | ० | ० | ० | ० | २०९ | ६ | ० |




शिवाजी चौकाचें एक दृश्य.



शिवाजी मार्केट ( पूर्वीचें ' फेरिस मार्केट )

# कोल्हापूर शहराचा इतिहास

( ख्रिस्त शकपूर्व १ लें शतक ते १९५४ )




# कोल्हापूर शहराचा इतिहास

## प्रकरण पहिलें

## प्राचीन कोल्हापूर

(सुमारें इ. स. ८०० पर्यंत)

शहरांचा इतिहास लिहिण्याची प्रथा आपल्याकडे नाहीं. पण प्रत्येक शहरांतील नागरिकांना आपल्या गांवाची सुरवात कशी झाली, त्या गांवाच्या रचनेंत कोणतीं स्थित्यंतरें झालीं, आतांपर्यंतच्या कालांतील कोणत्या सामाजिक, राजकीय अथवा धार्मिक घटनांचा शहरावर कसा परिणाम झाला आहे इत्यादींबद्दल अतिशय उत्सुकता असते. एवढेंच नव्हे, तर त्या शहरास भेट देणाऱ्या प्रवाशांनाहि हें औत्सुक्य असतेंच. नगररचना करतांनाहि त्या शहराचा इतिहास समजून घेणें आवश्यक असतें. कारण, अशा इतिहासाच्या अभ्यासांतूनच शहरांतील अनेक समस्या कशा निर्माण झाल्या, हें कळूं शकतें. या सर्व गोष्टी ध्यानांत घेऊन कोल्हापूर शहराचा हा इतिहास या पुस्तकांत समाविष्ट करण्यांत आला आहे.

२. **ऐतिहासिक कालखंडः**—कोल्हापूर शहर ज्या खेड्यांतून निर्माण झालें तें खेडें अगर खेडीं मानवानें प्रथम केव्हां वसविलीं, हें सांगणें कठीण आहे. पण हा अज्ञात इतिहास सोडून दिला, तरी या शहराचा कमींत कमी दोन हजार वर्षांचा इतिहास आज ज्ञात आहे. या इतिहासामध्यें मुख्यतः तीन कालखंड पडतातः—

१. **प्राचीन कालः**—हा काल अदमासें इ. सनाच्या नवव्या शतकापर्यंतचा मानावा लागेल. या कालांत ब्रह्मपुरीवर वसाहतीचें केंद्र होतें आणि श्रीमहालक्ष्मी देवालयाची स्थापना झालेली नव्हती.

२. **मध्ययुगः**—श्रीमहालक्ष्मीच्या देवालयाच्या स्थापनेपासून रेसिडेन्सीची स्थापना होई-पर्यंतच्या या दुसऱ्या कालखंडाला शहराच्या इतिहासांतील मध्ययुग असें म्हणतां येईल. या कालांत वसाहतीचें मुख्य केंद्र महालक्ष्मीचें देवालय हेंच होतें व शहराच्या धार्मिक आणि राजकीय अशा दोन्हीं केंद्रांचें स्वरूप त्याला प्राप्त झालें होतें.

३. **अर्वाचीन कालः**—कोल्हापुरामध्यें इ. स. १८४४–४८ सालीं रेसिडेन्सी स्थापन झाल्याबरोबर शहराच्या इतिहासांतील आधुनिक युगाला सुरवात झाली, असें म्हणतां येईल.

या व पुढील दोन प्रकरणांत शहराच्या इतिहासांतील तीनही कालखंडाची माहिती दिली आहे आणि चौथ्या प्रकरणांत उद्यांच्या कोल्हापुरासंबंधीं कांहीं कल्पना व सूचना मांडल्या आहेत.


**३. प्राचीन कालांतील नैसर्गिक केंद्रें:**—साधारण इ. सनाच्या नवव्या शतकामध्यें श्रीमहालक्ष्मीच्या देवालयाची स्थापना झाली. आज कोल्हापूर शहरांत जी हद्द सामील आहे, त्या हद्दींत त्यावेळीं सहा लहान लहान खेडीं होतीं. हीं खेडीं नदीकांठ अथवा तळ्याचा कांठ अशा 'नैसर्गिक' सौकर्यामुळेंच वसविलीं गेलीं असावींत आणि म्हणूनच त्यांना आजच्या शहर वसाहतीची प्राचीन 'नैसर्गिक केंद्रे' असें संबोधिलें जातें. हीं केंद्रें म्हणजे (१) ब्रह्मपुरी (२) उत्तरेश्वर (२) खोल खंडोबा (४) रंकाळा (५) पद्माळा व (६) रावणेश्वर हीं सर्व गांवें लोकसंख्येनें व आकारानें फारच लहान असून तीं एकमेकांपासून स्वतंत्र होतीं, असें मानण्यास भरपूर पुरावा आहे. यांपैकीं ब्रह्मपुरी हें केंद्र सर्वांत जुनें होतें व त्याच्याबद्दल पुष्कळच ऐतिहासिक माहिती आज मिळूं शकते. पण त्या मानानें इतर पांच केंद्रांबद्दल फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. म्हणून कोल्हापूर शहराचा प्राचीन काळचा इतिहास याचा अर्थ ब्रह्मपुरी केंद्राची तपशिलवार माहिती व इतर पांच केंद्रांची स्वतंत्रपणें मिळूं शकणारी थोडी माहिती असाच करावा लागतो. वास्तव या प्रकरणांत प्रथम ब्रह्मपुरीबद्दलची सर्व उपलब्ध माहिती देऊन नंतर बाकीच्या पांच केंद्रांची थोडी माहिती नमूद करण्यांत आली आहे.

**४. ब्रह्मपुरी:**—ज्या खेड्यांमधून आजच्या कोल्हापूरचा उगम झाला त्यांपैकीं सर्वांत जुनें खेडें पंचगंगेच्या कांठावर आतां "ब्रह्मपुरी" या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या टेकडीवर होतें, असें मानण्याला भरपूर पुरावा आहे. मानवाच्या इतिहासाकडे नजर फेंकली म्हणजे लक्षांत येतें कीं, हजारों वर्षांपूर्वीं जेव्हां शेतीचा शोध प्रथम लागला त्यावेळींच तो एके ठिकाणीं वस्ती करून राहूं लागला. म्हणजे खेड्यांच्या स्थापनेची सुरवात हजारों वर्षांपूर्वीं पण मानवाला शेतीचा शोध लागल्यानंतरच झाली असें मानावें लागतें. या कालांत मानवानें जीं खेडीं वसविलीं तीं शेतीच्या दृष्टीनेंच वसविलीं. असेंही आढळून येतें. कारण त्यांपैकीं बव्हंशीं खेडीं नदीकांठावरील उंचवट्यावर वसविलेलीं दिसतात. अशा जागीं स्वतःला व आपल्या गुरांना प्यावयाला भरपूर पाणी मिळूं शकतें, शेतीला उत्तम व मुबलक जमीन मिळूं शकते आणि उंचवट्यावर घरें बांधलीं तर त्यांना पुरापासून धोका येऊं शकत नाहीं ह्या गोष्टी तत्कालीन मानवाच्या लक्षांत येऊन त्यानें नदीकांठच्या टेंकड्या अगर उंचवटे आपल्या वसाहतीसाठीं निवडले व तेथें पहिलीं खेडीं स्थापन केलीं असें इतिहासांत मानलें जातें. मानवी जीवनांतील उत्क्रांतीच्या याच कालांत ब्रह्मपुरीवर वसाहत झाली असली पाहिजे. कारण या ठिकाणीं नदी, त्यांत बाराही महिने पाणी टिकेल असा डोह, शेतीकरितां उत्तम जमीन व घरें बांधण्यासाठीं पुरामध्यें केव्हांही बुडणार नाहीं अशी टेंकडी, ही सर्व अनुकूल नैसर्गिक परिस्थिति उपलब्ध होती. म्हणून आजच्या कोल्हापुराचा उगम या अत्यंत प्राचीन अशा ब्रह्मपुरी-वरील नैसर्गिक केंद्रापासूनच झाला, असें मानणें क्रमप्राप्त आहे.

अर्थातच या केंद्राला "ब्रह्मपुरी" हें नांव जेव्हां ती वसाहत झाली त्या प्राचीन काळीं नव्हतें, हें उघड आहे. एवढेंच नव्हे, तर ज्या कालांत या टेंकडीवर वसाहत झाली त्या काळीं आर्य लोक हिंदुस्थानांतही आले नव्हते, मग ते कोल्हापुरांतही नव्हते हें सांगावयास नकोच. या टेंकडीवर आजही एक "स्थळ" देवालय (आनार्यांचा देव) आहे व त्या नजीक आजही एक हरिजन



वसाहत आहे. या टेकडीवर झालेली पहिली वसाहत अर्थातच हिंदुस्थानांतील प्राचीन लोकांनीं या स्थळ देवालयाच्या आसपास वसाहत केली असावी व पुढें या भागांत आर्यलोक आल्यानंतर त्यांनींही त्याच ठिकाणीं व त्याच नैसर्गिक कारणास्तव पुनः आपली वसाहत केली असावी, असें वाटतें; आणि त्यानंतर बऱ्याच कालानंतर या विभागाला "ब्रह्मपुरी" असें नांव प्राप्त झालें असावें.



ब्रह्मपुरी टेकडी

"ब्रह्मपुरी" हें नांव कां आलें यासंबंधीं दोन प्रकारचीं मतें सांगितलीं जातात. एक विचार असा आहे कीं, या विभागांत प्राचीन काळीं मुख्यतः ब्राह्मणवस्ती जास्त असल्यामुळें या वस्तीला "ब्रह्मपुरी" असें नांव पडलें असावें. पण डॉ. सांकलिया यांचें म्हणणें असें आहे कीं, हें गांव कसें वसविलें गेलें याची माहिती नसल्यामुळें स्वतः ब्रह्मदेवानें तें निर्माण केलें अशी आख्यायिका प्रसृत झाली व त्याला "ब्रह्मपुरी" असें नांव रूढ झालें.* या ठिकाणींच कोल्हापुरची अत्यंत जुनी वसाहत होती, याला आतां भरपूर पुरावा मिळाला आहे.

---

* An inscription of the Kolhapur Silahara King Gandaraditya of Saka 1048 (A. D. 1126-7) calls Kollapura a **Mahatirtha** and refers to a temple of Khedaditya (a Sun temple) at Brahmapuri. Therein the statement that Kollapura or Brahmapuri was created by Brahman might signify that the site of Brahmapuri was so old, that its origin in course of time was attributed to Brahma, the lord of creation himself.
**H. D. Sankalia & M. G. Dixit**: Excavations at Brahmapuri (Kolhapur) 1945-46, P. 4.

(कोल्हापूरचा एक शिलाहार राजा गंडरादित्य याच्या कारकीर्दींत शके १०४८ (इ. स. ११२६-२७) च्या एका शिलालेखांत कोल्हापूरचा "महातीर्थ" असा उल्लेख असून ब्रह्मपुरींत खेडित्याचें (सूर्याचें) देवालय असल्याचेंहि त्यांत नमूद केलें आहे. या शिलालेखांत असें म्हटलें आहे कीं, 'कोलापूर' किंवा ब्रह्मपुरी ब्रह्मानें निर्माण केली. याचा अर्थ असा कीं, ब्रह्मपुरी वसाहत इतकी प्राचीन होती कीं, ती स्वतः ब्रह्मदेवानें वसविली असावी असें त्याकाळीं मानलें जात असावें. —एच्. डी. सांकलिया आणि एम्. जी. दिक्षित : एक्सकॅव्हेशन्स ॲट ब्रह्मपुरी (कोल्हापूर) १९४५-४६ पृष्ठ ४)

ब्रह्मपुरीवर अनेक शतकेंपर्यंत एकादें लहानसें खेडेंच असलें पाहिजे असें वाटतें. त्याचें शहरांत रूपांतर केव्हां झालें हें नक्की सांगणें कठीण आहे. पण ब्रह्मपुरीमध्यें जी उत्खननें * झाली त्यांवरून असें मानतां येतें कीं, अदमासें २००० वर्षांपूर्वी येथें एक राजधानी अगर बरेंच मोठें शहर होतें. डॉ. सांकलिया म्हणतातः—

"A city of well-built brick houses stood on the banks of The Panchganga river, when The Satvahana (or Andhra, according to The Puranas) Emperor, Gautamiputra Satkarni ruled in The Deccan, about A. D. 106-130. The beginnings of this city were probably laid in the preceding one or two centuries. At that time, several contemporary and probably related ruling families, Satavahana, Cutus Kuras, and Maharathis existed in this region, the city had good trade and cultural relations with the Roman world. Imported Roman objects, coins and bronze vessels, for instance, were imitated in clay. It was destroyed by fire probably in the reign of Sri Yajna Satakarni. †"

(इ. स. १०६–१३० च्या सुमारास सम्राट गौतमीपुत्र शातकर्णी अगर शालिवाहन दक्षिणेंत राज्य करीत असतां पंचगंगा नदीच्या कांठावर विटांच्या सुंदर घरांनी परिपूर्ण असें एक शहर होतें. या शहराच्या उभारणीची सुरवात पूर्वीच्या एक दोन शतकांत झाली असावी. या प्रदेशांत कित्येक समकालीन व कदाचित् नात्यानें संबंधित अशीं (शातवाहन, चुटु, कुर व महारथी) राजघराणीं त्या काळांत होतीं. व्यापार व संस्कृतीच्या दृष्टीनें या शहराचा रोमन जगाशीं चांगला संबंध होता. रोमहून आणलेल्या वस्तु, नाणीं व ब्रॉंझ धातूची भांडी इत्यादींचें अनुकरण मातीमध्यें केल्याचें आढळलें. हें शहर बहुधा श्रीयज्ञशातकर्णी याच्या कारकीर्दींत आगीनें उध्वस्त झालें असावें.)

उत्खननावरून निघालेले हे निष्कर्ष विश्वासार्ह आहेत यांत शंका नाहीं; आणि यावरून असें खात्रीनें म्हणतां येईल कीं, ब्रह्मपुरीच्या ऐश्वर्याला इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांत अथवा त्यानंतर लौकरच ओहोटी लागली. विशेष दुर्दैवाची गोष्ट ही कीं, एकदां ब्रह्मपुरीचें जें ऐश्वर्य गेलें तें पुनः परत आलेंच नाहीं. कारण ब्रह्मपुरीच्या नाशानंतर थोडा काळ गेल्यावर महालक्ष्मीचें देवालय स्थापन झालें व त्यामुळें कोल्हापूर शहराची त्यापुढील वाढ श्रीमहालक्ष्मीचें देवालय हें केंद्र मानून त्या सभोंवती होऊं लागली. सूर्योदयानंतर चंद्राची जी अवस्था होते तीच श्रीमहालक्ष्मीचें देवालय स्थापिल्यानंतर ब्रह्मपुरीची झाली, असें म्हटलें तरी चालेल.

ब्रह्मपुरीचा पुढील इतिहास अधिक मनोरंजक आहे. इसवी सनाच्या पंधराव्या शतकांत अगर त्याच्या आसपास या भागांत मुसलमान राज्य आलें व ब्रह्मपुरीवर थोडी मुसलमान वस्तीहि झाली.

* या जागेमध्यें उत्खननाला किती महत्त्व आहे, हें प्रथम १८७७ मध्यें समजून आलें. त्यानंतर वेळोवेळीं उत्खननाचें प्रयत्न झाले त्यामध्यें पहिला मुख्य प्रयत्न श्री. कुंदनगार यांनीं १९४४ मध्यें केला. दुसरा आणि सर्वांत मोठा प्रयत्न स्टेट रीजन्सी कौन्सिलच्या साहाय्यानें डॉ. एच. डी. सांकलिया व डॉ. एम. जी. दीक्षित यांनीं १९४६–४७ मध्यें केला.

† H. D. Sankalia & M. G. Dixit: op. Cit. P IV




एखाद्या लष्करी मोहिमेसाठीं पंचगंगेच्या तीरावर टाकलेल्या तळामुळें मुसलमानांच्या या वस्तीस सुरवात झाली असावी. याच वेळीं येथें एक दर्गा बांधला असावा असें वाटतें. तोच दर्गा (अथवा त्या ठिकाणीं बांधलेला दुसरा दर्गा) अद्यापही आहे. इ. स. १७०१ मध्यें औरंगजेबानें पन्हाळ्यास जात असतांना याच टेकडीवर मुक्काम केला होता असें म्हणतात. त्यावेळीं त्यानें येथील दर्ग्याच्या मुजावराला ज्या जमिनी इनाम दिल्या त्याच्या सनदा आजही पहावयास मिळतात. त्यानंतर येथील बरीच जागा, आणि विशेषतः औरंगजेबाचा तंबू जेथें होता असें म्हणतात ती जागा, इ. स. १८७४ मध्यें एका मिशन संस्थेला दिली गेली व त्यांनी त्यावर एक चर्चची इमारत बांधली आहे. हिंदुस्थानच्या इतिहासांत अनार्यांची वसाहत, आर्यांचें आगमन, मुसलमानी अंमल व ब्रिटिश राजवट असे जे मुख्य कालखंड पडतात ते सर्व या लहान टेकडीच्या इतिहासांतही पडले आहेत, हें पाहून मनाला कौतुक वाटल्यावांचून रहात नाहीं.

**(५) उत्तरेश्वर**:—कालानुक्रमानें विचार करावयाचा झाल्यास ब्रह्मपुरीच्यानंतर उत्तरेश्वर केंद्राचा विचार करावा लागेल. कारण वसाहतीसाठीं या केंद्राची जागा ब्रह्मपुरीइतकी चांगली नाहीं. सर्वांत सोईच्या जागेवर वसाहत प्रथम केली जाते आणि अशी जागा व्यापिल्यानंतरच कमी सोईच्या जागेवर वसाहत करतात, हा मानवी इतिहासाचा सर्वसामान्य नियम आहे. यावरून उत्तरेश्वर केंद्र हें ब्रह्मपुरी केंद्रानंतर अस्तित्वांत आलें असावें असें वाटतें.

उत्तरेश्वर वसाहत ज्या ठिकाणीं आहे ते ठिकाणही थोडेंसें ब्रह्मपुरीसारखेंच आहे. ही जागा म्हणजे देखील नदीकांठचा एक उंचवटाच आहे; पण तो ब्रह्मपुरीइतका नदीच्या जवळही नाहीं किंवा तितका उंचही नाहीं. महापुराच्या वेळीं याच्या आसपास दक्षिण, पश्चिम व उत्तर बाजूस नदीचें पाणी पसरतें आणि म्हणून ज्या नैसर्गिक कारणास्तव ब्रह्मपुरीवर वसाहत झाली त्याच कारणास्तव उत्तरेश्वराजवळही एक खेडें फार प्राचीन काळीं वसलें असावें.

ब्रह्मपुरीप्रमाणें या भागांतही उकरतेवेळीं अनेक जुने अवशेष सांपडतात. पण येथें पूर्वी उत्खनन झालेलें नाहीं व आतां इतकी दाट वस्ती झाली आहे कीं, यापुढें कांहीं चांगलें उत्खनन करण्याची शक्यताही राहिलेली नाहीं.

"उत्तरेश्वर" हें नांव केव्हां अस्तित्वांत आलें हें सांगणें कठीण आहे. ज्या देवालयाला हल्लीं उत्तरेश्वर म्हणून दाखविलें जातें तें शंकराचें देवालय आहे. तें अर्थातच फार जुनें आहे. त्यामधील शंकराची पिंडी इतकी मोठी आहे कीं, तशी मूर्ति दुसरीकडे क्वचितच पहावयास मिळते. या देवालयाची दुसरी एक चांगली स्मृति अशी आहे की या ठिकाणीं न्यायमूर्ति रानडे यांनीं कांहीं काळ वास्तव्य केलें होतें. त्यांनी आपल्या मृत्युपत्रांत या देवाच्या पूजाअर्चेसाठीं थोडी आर्थिक तरतूद करून ठेविली आहे. पण हें देवालय केव्हां बांधलें गेलें यासंबंधीं आज आपल्या हातीं कांहीच पुरावा नाहीं, आणि म्हणून उत्तरेश्वर हें नांव केव्हां वहिवाटींत आलें तें सांगणें कठिण



श्रीमहालक्ष्मीचें देवालय



पण दुर्दैवानें त्याबद्दल आज नक्की कांहीं सांगतां येत नाहीं. एवढें मात्र खरें कीं, या घाणेरड्या व दलदलीच्या जागेवर देऊळ बांधल्यामुळें तिचें नंदनवन झालें. मेजर ग्रॅहमनें कोल्हापूरला 'करवीर' असें कां म्हणतात, याचें कारण देतांना लिहिलें आहे कीं, श्रीमहालक्ष्मीनें आपल्या 'करा' नें हा प्रदेश प्रलयकालच्या पाण्यामधून वर उचलला ("वीर") म्हणून त्याला 'करवीर'* असें म्हणतात. करवीर महात्म्यामध्यें असा उल्लेख आहे कीं, महालक्ष्मीनें आपल्या हातानें उचलून धरलेले ते "करवीर" नगर[३] या दंतकथांचा सरळ भौगोलिक अर्थ एवढाच मानतां येईल कीं, हा भाग प्रथम सखल व दलदलीचा होता. आणि देवालयामुळें तो वर उचलला जाऊन स्वच्छ व सुंदर झाला. कदाचित् हें देवालय प्रथम एखाद्या ओढ्याशेजारीं अगर तलावांत सुद्धां असूं शकेल व मग तो तलाव मुजवून सभोंवार वस्ती झाली असावी.

**३. करवीर कीं कोल्हापूर ?**:—श्री महालक्ष्मीचे देवालय स्थापिल्यानंतर प्रथमच करवीर हा शब्द वापरलेला आढळतो. यापूर्वीच्या काळांत "करवीर" या शब्दाचा मुळींच उल्लेख नाहीं, आणि या शहराचा उल्लेख करतांना "कोल्लापूर" "कोल्लपूर," "कोल्लगिरी," "कोल्लादिगिरी पट्टण" इत्यादि नांवें वापरलेलीं दिसून येतात. यानंतरच्या कालांतहि शिलालेखांमध्यें या शहराचा उल्लेख "कोल्लापूर" या नांवानेंच केलेला आढळतो, परंतु देवालयाच्या स्थापनेनंतर ब्राह्मण-ग्रंथांतून मात्र 'करवीर' असा उल्लेख आढळतो. याचा अर्थ असा कीं, महालक्ष्मीचें देवालय स्थापन होण्यापूर्वीं व त्यानंतरहि अनेक शतकांपर्यंत या शहराचें जुने व सर्वसंमत असें नांव म्हणजे "कोल्लापूर" हेंच होतें. या नांवाची व्युत्पत्ति द्राविडी आहे. "कोल्ल" म्हणजे दरी आणि "कोल्लापूर" म्हणजे "दरींतील गांव." भौगोलिक दृष्ट्या हें नांव सार्थ आहे यांत शंका नाहीं. महालक्ष्मीचा प्रभाव व प्रस्थ वाढावें या हेतूनें गांवाच्या नांवाची नवीनच उत्पत्ति दिली गेली. मूळचा द्राविड शब्द विसरला गेला किंवा बाजूला सारला गेला आणि पुजारी किंवा पंडित वर्गानें "कोल्ल" या शब्दाचा अर्थ समजून न घेतां 'कोला' नांवाचा एक असुर निर्माण केला; आणि त्याचा महालक्ष्मीनें वध केला अशी दंतकथा निर्माण केली. "कोल्लापूर" हा त्यांना न आवडणारा शब्द काढून टाकून "करवीर" हा शुद्ध संस्कृत शब्द प्रचारांत आणण्यासाठीं हा प्रयत्न होता असें वाटतें. पण त्याला फारसें यश आलें नाहीं.

दुसरी एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, जुन्या ग्रंथामधून "कोल्हापूर" असा शब्द मुळींच आढळून येत नाहीं. १९ व्या शतकापर्यंत 'कोल्लापूर' अगर 'कोलापूर' असेच शब्द वापरले जात होते. या जुन्या नांवांत "ह" काराची वाढ ही अगदीं अलीकडेच व अकारण झाली आहे असें वाटतें. एकदां 'कोला' वरून व्युत्पत्ति रूढ झाल्यावर त्या शब्दाचा उच्चार

* According to Puranas, this tract of the country was originally called "Kurweer" (Karvira) from the Goddess Mahalakshmi using her hand (Kur) in lifting her favoured retreat from the water of the great deluge.

[३] करवीर महात्म्य अध्याय ६ पा. नं. २१–२२.

'कोल्हा' असा झाला तर आश्चर्य नाहीं. कदाचित् 'कोल्लापूर' या शब्दाचें कानडी वळण टाकून त्याला शुद्ध मराठी स्वरूप देतांना या "ह" काराचा प्रवेश झाला असेल.

**४. कोल्हापूर हें धार्मिक केंद्र बनलें:**—या महालक्ष्मीच्या देवालयाविषयीं अनेक वाद आहेत. तें केव्हां बांधलें गेलें, तें कोणीं बांधलें, तें जैनांचें आहे कीं हिंदूंचें आहे, वगैरे प्रश्नांबद्दल साधकबाधक चर्चा बऱ्याच पंडितांनीं केलेली आहे. या चर्चेला या पुस्तकांत स्थान नाहीं. शहररचनाशास्त्राच्या दृष्टीनें या देवालयाचा कोल्हापूर शहराच्या वाढीवर काय परिणाम झाला, एवढ्याच विषयाची चर्चा करणें येथें प्रस्तुत होईल.

या दृष्टीनें विचार करतां असें म्हणतां येईल कीं, श्री महालक्ष्मीचें देवालय निर्माण झाल्याबरोबर कोल्हापूरचें साध्या गांवामधून प्रथम "तीर्था" मध्यें व त्यानंतर "महातीर्था" मध्यें रूपांतर झालें. काशीयात्रेला आपण जावें, ही जुन्या हिंदु मनाची मोठी महत्त्वाकांक्षा होती. पण प्रत्यक्ष काशीला जाणें शक्य नसल्यामुळें या भागांतच काशीसारखें एकादें क्षेत्र असतें तर बरें झालें असतें, असें हजारों लोकांना त्यावेळीं वाटणें साहजिकच आहे. समाजशास्त्राचा एक नियम असा आहे कीं, लोकांना एकादी गोष्ट फार मोठ्या प्रमाणावर हवी आहे असें वाटूं लागलें, कीं ती बुद्धीला पटेल अशा रीतीनें मांडणारे पंडित आपोआपच निर्माण होतात. याच न्यायानें या भागांतील लोकांच्या काशीयात्रेच्या अतृप्त आकांक्षेच्या सामर्थ्यानें कोल्हापूर हें एक तीर्थ अथवा महातीर्थ आहे एवढेंच नव्हे, तर ती दक्षिणेंतील प्रत्यक्ष काशी आहे व तेथें गेल्यानें काशीयात्रेइतकेंच पुण्य मिळतें अशी कल्पना प्रसार पावूं लागली. भगवान विष्णूनें दोन एकसारखीं जुनी स्थानें काशी व करवीर हीं निर्माण केलीं; एका ठिकाणीं तो शिवाच्या रूपानें राहिला आणि दुसऱ्या ठिकाणीं म्हणजे करवीरांत तो शक्तीच्या अथवा महालक्ष्मीच्या रूपानें राहिला (करवीरमहात्म्य पहा) अशी आख्यायिका निर्माण झाली. नंतर काशींतील सर्व गोष्टी कोल्हापुरांत आहेत असें दाखविण्याचा प्रयत्न झाला. ज्या नदीला "भोगावती" हें नांव अद्यापही रूढ आहे व जिचा उल्लेख पूर्वीच्या वाङ्मयांत "पंचनदिका" म्हणून केला आहे, त्या नदीला "पंचगंगा" हें नांव रूढ झालें. भोगावतीचा कुंभी नदीशीं कोल्हापुरापासून थोड्या अंतरावर जो संगम होतो, त्याला गंगायमुनेच्या संगमाप्रमाणेंच "प्रयाग" असें नांव देण्यांत आलें.

कोल्हापुरांत काशीविश्वेश्वराचें देवालय, मनकर्णिका कुंड इत्यादि काशींतल्या गोष्टींची लहान आवृत्ति काढण्यांत आली आणि "दक्षिण काशी" या नांवाची सार्थकता लोकांना पटवून दिली गेली. या सर्व कल्पना इतक्या मोठ्या प्रमाणावर आणि इतक्या सातत्यानें पसरविल्या गेल्या, कीं त्यांचा पगडा जनमनावर अद्यापही आहे आणि बऱ्याच काळपर्यंत तो राहील यांत शंका नाहीं.

कोल्हापूरच्या धार्मिक महात्म्यावर जगणारा भिक्षुकवर्ग एवढ्यावरच थांबला नाहीं; तर त्यानें कोल्हापुरांतल्या अनेक गोष्टींना मोठें धार्मिक महत्त्व चिकटविण्यास सुरवात केली. जवळजवळ प्रत्येक तळ्याला आणि प्रसंगीं डबक्यांनासुद्धां वेगवेगळ्या तीर्थांचीं नांवें दिलीं गेलीं. कोटितीर्थ, वरुणतीर्थ, लक्षतीर्थ, कपिलतीर्थ, इंद्रकुंड हीं याच कल्पनेचीं उदाहरणें आहेत. त्याचप्रमाणें या शहरांत जीं अनेक देवालयें होतीं त्यांना मोठमोठीं नांवें देण्यांत आलीं व त्यांच्यासंबंधीं निरनिराळ्या आख्यायिकाही सांगण्यांत येऊं लागल्या. थोड्या कालानंतर या सर्व प्रवृत्तींचा परिणाम असा झाला कीं, धार्मिक क्षेत्रांच्या ठिकाणीं जें एक विशिष्ट वातावरण दिसून येतें, तें कोल्हापुरांतही निर्माण झालें व महालक्ष्मीचे देवालयासभोंवतीं कोल्हापूर शहराच्या इतिहासांतील धार्मिक केंद्राची स्थापना झाली.



**५. कोल्हापूर हें राजकीय केंद्र झालें:**—प्रत्येक धार्मिक केंद्र हें राजकीय केंद्र असतेंच असें नाहीं. पण श्रीमहालक्ष्मीच्या देवालयाविषयीं असें म्हणतां येईल कीं, अल्पावधींतच तें निव्वळ "धार्मिक" केंद्र न रहातां "धार्मिक व राजकीय" केंद्र बनलें. इसवी सनाच्या १२ व्या शतकांत कोल्हापुरांत व आसपासच्या भागांत शिलाहार वंशाच्या राजांचें राज्य होतें. कदाचित् त्यांची राजधानीही येथेंच असण्याचा संभव आहे. त्यानंतर या भागांत देवगिरीच्या यादवांचें राज्य स्थापन झालें व त्यांच्या एका प्रांताची राजधानी कोल्हापूरला नक्की होती असा पुरावा उपलब्ध आहे. याचाच अर्थ असा कीं, कोल्हापूरला ११ व्या शतकानंतर पुनः राजधानीचें स्वरूप प्राप्त झालें. पण या खेपेला ही राजधानी ब्रह्मपुरीवर न जातां महालक्ष्मीच्या देवालयाजवळच ठेविली गेली व या धार्मिक केंद्राचें धार्मिक व राजकीय केंद्रांत रूपांतर झालें.

इ. स. १३०६–०७ मध्यें देवगिरीच्या यादवांचा मुसलमानांनीं पाडाव केला. तेव्हांपासून ते इ. स. १३५९ सालीं थोरल्या शिवाजी महाराजांनीं पन्हाळा जिंकेपर्यंत या भागांत मुसलमानांचा अंमल होता. पण मौज ही कीं, मुसलमान राजांनीं ब्रह्मपुरी केंद्र स्वीकारलें नाहीं. तसेंच आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं, एकाही मुसलमान राजानें—आणि खुद्द औरंगजेबही कोल्हापुरला येऊन गेला होता—या देवालयाची मोडतोड करण्याचा फारसा प्रयत्न केला नाहीं. एवढेंच नव्हे तर सर्वच मुसलमान राजांनीं श्रीमहालक्ष्मीचें देवालय हेंच केंद्र समजून आपली वसाहत केली. त्यांचा राजवाडा हल्लींच्या जुन्या राजवाड्याच्या जागेजवळ कोठेंतरी असावा. त्यांच्या तीन मोठ्या मशिदी देवालयाच्या सभोंवतीं व जवळच बांधल्या गेल्या. अत्यंत दाट व जुनी अशी मुसलमान वस्तीही—बाराइमाम भाग—देवालयाच्या जवळच आहे. म्हणजे अदमासें तीन साडेतीनशें वर्षांच्या मुसलमानी अंमलांतही कोल्हापूर शहराचें राजकीय केंद्र बदललें गेलें नाहीं व धार्मिक बाबी आड न येतां तें महालक्ष्मीच्या देवालयाजवळच ठेविलें गेलें. १७ व्या शतकांत या प्रदेशांत मराठा राज्याची स्थापना थोरल्या शिवाजी महाराजांनीं केली व कोल्हापुरास छत्रपतींचें राज्य सुरूं झालें. त्यानंतर महाराणी ताराबाईनें करवीर राज्याची स्थापना केल्यामुळें कोल्हापुरचें महत्त्व अधिकच वाढलें. शेवटीं इ. स. १७८२ मध्यें कोल्हापुरला राजधानी आल्यावर तर पूर्वीं कधींही नव्हतें इतकें राजकीय महत्त्व त्याला एकदम प्राप्त झालें. १० व्या व ११ व्या शतकापासून चालत आलेल्या या परंपरेला अनुसरून छत्रपतींनींसुद्धां श्रीमहालक्ष्मीचें देवालय हेंच केंद्र मानून कुलस्वामिनी भवानीचें देवालय व आपला राजवाडा श्रीमहालक्ष्मीचे शेजारीच बांधला.

वरील वर्णनावरून दिसून येईल की, इ. स. ८०० च्या सुमारास श्रीमहालक्ष्मीच्या देवालयाच्या निर्मितीपासून कोल्हापूरच्या "शहरी" स्वरूपाची कल्पितावस्था होण्यास सुरवात झाली. प्रथम येथें एक धार्मिक केंद्र निर्माण झालें व नंतर या धार्मिक केंद्रास राजकीय महत्त्वही फारच लौकर आलें आणि तें सतत १९ व्या शतकापर्यंत टिकून राहिलें.

**६. महालक्ष्मीचे देवालयासभोंवतीं नवीन वसाहतीची स्थापनाः—** देवालय हें धार्मिक केंद्र बनल्याबरोबर साहजिकपणेंच त्यासभोंवती–मग पूर्वी तेथें एकादें गांव असो वा नसो–लोकवस्ती स्थापन होऊन तिची वाढ बऱ्याच झपाट्यानें होऊं लागली. तीर्थ म्हटलें म्हणजे पुजारीवर्ग तेथें येऊन रहातोच आणि तो हळूंहळूं वाढत जातो. यात्रेकरूंची व्यवस्था ठेवण्यासाठी जरूर असणारे व्यापार, उद्योगधंदा, नोकरी वगैरे करणारी माणसेंही हळूंहळूं अशा ठिकाणीं येऊन राहूं लागतात. नंतर कांहीं भक्तगणसुद्धां अधून मधून येण्याऐवजी कायमची वस्ती करून रहातात; आणि अशा रीतीनें निर्जन ठिकाणीं वसविलेल्या तीर्थासभोंवतीसुद्धां एकादें लहानसें गांव किंवा प्रसंगोपात्त शहरही निर्माण होतें. हीच घटना श्रीमहालक्ष्मीच्या देवालयाच्या बाबतीत घडली असावी.

पुढें मुसलमान राजांनींही देवालय हेंच केंद्र मानल्यामुळें त्या अंमलांतही देवालयासभोंवतालची वस्ती वाढूं लागली. मुसलमान लोकांची मुख्य राजधानी पन्हाळ्याला होती. तरी पण संरक्षणासाठीं त्यांनीं कोल्हापुरासभोंवती म्हणजे देवालयासभोंवती जी वसाहत झाली होती, त्याभोंवती एक मातीचा कोट बांधला व त्यासभोंवती खंदक खणून कोल्हापुरला किल्ल्याचें स्वरूप आणलें. या किल्ल्याचे शनिवार गेट अल्ली अदिलशहानें बांधलें अशी एक आख्यायिकाही गॅझेटीअरमध्यें नमूद आहे. पुढें मराठा अंमलामध्यें व विशेषतः कोल्हापूरला राजधानी आल्यावर देवालयासभोंवतालच्या वसाहतींत फारच मोठी वाढ झाली. छत्रपतींनीं आपला राजवाडा देवालयाच्याजवळ बांधला, हें वर सांगितलेंच आहे. त्यामुळें त्याला लागून सर्व जहागिरदार व मानकरी मंडळींनी–कागलकर, हिंमतबहाद्दर, सरलष्कर, राजाज्ञे, जसनमुल्ख, जोशीराव, गुरुमहाराज–आपले वाडे बांधले. मग इतर इनामदार आले. या सर्वांची इच्छा की आपण कोटांतच रहावें. त्यामुळें कोटभागांत एकच गर्दी झाली.

पुढें राजधानीच्या संरक्षणासाठीं जुना मातीचा तट पाडून तो दगडी बांधला गेला. या भक्कम स्वरूपाच्या किल्ल्याचें ग्रॅहॅमनें पुढें दिल्याप्रमाणें वर्णन केलें आहे:—"या मूळ शहराभोंवती जवळजवळ वर्तुलाकार अशी पावणेदोन मैल लांबीची भिंत आहे. या भिंती दगडाच्या असून त्यांची उंची तीस फूट व रुंदी दहा ते सव्वीस फूट आहे. त्यामध्यें ठिकठिकाणीं लढाईची सर्व सोय असलेले पंचेचाळीस बुरुज आहेत." ●

सर्वसाधारणपणें परंपरा अशी असते की, चांगलें ठिकाण पाहून प्रथम भक्कम किल्ला बांधला जातो आणि मग त्यामध्यें व त्याच्याजवळ मोठ्या वसाहतींची स्थापना होते. कोल्हापूरच्या बाबतींत या घटना बरोबर उलट झाल्या आहेत. येथें प्रथम वसाहत स्थापन झाली आणि नंतर दगडी किल्ला त्यासभोंवतीं बांधला गेला.

● रिपोर्ट पान ११२



**७. श्रीमहालक्ष्मीच्या देवालयाचा पूर्वीच्या सहा नैसर्गिक केंद्रांवर झालेला परिणामः—** येथवर महालक्ष्मीच्या देवालयासभोंवती एक अत्यंत दाट वसाहत कशी झाली व त्या सभोंवती प्रथम मातीचा व नंतर दगडी किल्ला कसा बांधला गेला, हें सांगितलें. आतां या प्रभावी धार्मिक व राजकीय केंद्रामुळें पूर्वीच्या सहा नैसर्गिक केंद्रांवर काय परिणाम झाला हें पाहूं.

पहिला महत्त्वाचा परिणाम म्हणजे हीं सर्व सहाही केंद्रें या मध्यवर्ति केंद्राकडे खेचली गेली, हा होय. अशा रीतीनें गावें एकाद्या केंद्राकडे कशी खेचली जातात हें अनेक परिस्थितींत पहावयास मिळतें. गांवाजवळ रस्ता झाला म्हणजे गांव रस्त्याकडच्या बाजूला वाढूं लागतें व अनेक वेळां इतकें वाढतें की, एकावेळीं दूर असलेलें गांव रस्त्यापर्यंत तर येतेंच, पण रस्त्याच्या पलीकडेही वाढतें. तसेंच मोठ्या गांवाच्या जवळ एकादें लहान गांव असल्यास तें लहान गांव मोठ्या गांवाच्या दिशेनें वाढूं लागतें.

गांवाजवळ एकादा कारखाना, दवाखाना, कॉलेज अगर कचेरी असें कांहीं केंद्र निर्माण झालें, की त्या केंद्राकडे गांवाची धांव सुरूं होते. हा नगररचनाशास्त्रांतील गुरुत्वाकर्षणाचा अबाधित नियम आहे. त्याला अनुसरून पूर्वीच्या सर्व नैसर्गिक केंद्रांना महालक्ष्मीचें देवालय बांधल्याबरोबर एक गुरुत्वाकर्षण बिंदु निर्माण झाला व त्या सर्वांची वाढ देवालयाच्या दिशेनें होऊं लागली. म्हणजे थोड्याच काळांत या सर्व केंद्रांतील वसाहती देवालयासभोंवतालच्या वसाहतींत मिळणार व त्या सातही स्वतंत्र वसाहतींची एक प्रचंड व नवीन वसाहत बनणार, हें नक्की आहे असें वाटूं लागलें. अर्थातच नगररचनाशास्त्रांतील या गुरुत्वाकर्षणाचा वेग फार कमी असतो. म्हणून हें काम पुरें होण्यास इ. स. ८०० ते इ. स. १८०० पर्यंत अदमासें एक हजार वर्षें लागलीं. पण या अंतिम मीलनाची अपरिहार्यता देवालयाच्या निर्मितीबरोबरच सिद्ध झाली होती असें मानावें लागेल.

देवालयाच्या स्थापनेचा दुसरा परिणाम असा झाला की, पूर्वीच्या सहाही नैसर्गिक केंद्रांतील वस्ती पूर्वीपेक्षां जास्त झपाट्यानें वाढूं लागली. देवालयासाठीं किंवा त्याजवळच असलेल्या राजकीय केंद्रासाठीं अनेक लोक कोल्हापुरांत राहण्यासाठीं आले. अर्थात् या सर्वांचीच इच्छा शक्यतों कोटामध्यें रहावें अशी असणार, हें उघड आहे. पण प्रत्येकाची ही इच्छा पूर्ण होणें स्वाभाविकपणेंच अशक्य होतें. म्हणून कोटामध्यें जागा न मिळालेले, उशिरा आलेले, कोटांतील जास्त किंमतीची जागा विकत घेऊं न शकणारे अशा अनेक प्रकारच्या लोकांनीं दगडापेक्षां वीट मऊ या न्यायानें पूर्वीच्या सहा केंद्रांपैकीं एकाद्या केंद्रांत जागा निवडली व तेथें रहाण्यास सुरवात केली. याचाच अर्थ असा की, देवालयाभोंवतील कोटभागांतील वस्ती आणि पूर्वीच्या सहा नैसर्गिक केंद्रांतील वस्ती यामध्यें शहर व उपनगरांचें नातें निर्माण झालें. बाहेरचे लोक शहरासाठीं प्रथम येतात, पण शहरामध्यें जागा न मिळाल्यामुळें उपनगरामध्यें रहातात. अशा रीतीनें उपनगरांची वस्ती वाढते आणि शेवटीं मूळ शहर व उपनगरें एकमेकांत मिसळून जातात, असाच सगळीकडचा अनुभव आहे. मुंबई शहर व त्याजवळची उपनगरें हीं प्रथम वेगळीं असूनसुद्धां कालांतरानें तीं मूळ शहरांत सामील होऊन

बृहन्मुंबईचा जन्म झाला, हें आपण पहातोंच आहों. याच तत्त्वाप्रमाणें महालक्ष्मीच्या देवालया-संभोंवतालचा कोटभाग व ब्रह्मपुरी, उत्तरेश्वर, खोलखंडोबा, रंकाळा, पद्माळा आणि रावणेश्वर हीं सहा उपनगरवजा असलेलीं नैसर्गिक केंद्रें यांचा मिलाफ होऊन त्यामधून १९ व्या शतकांतील मोठ्या कोल्हापूर शहराचा जन्म झाला, असेंच मानावें लागेल.

**८. शंकराचार्यांचा मठः**—श्रीमद्‌जगद्‌गुरु पहिले शंकराचार्य यांनीं जे चार मठ स्थापिले, त्यांपैकीं शृंगेरी मठ एक होय. या मठावर अधिष्ठित असलेल्या श्रीविद्याशंकरभारती यांनीं कोल्हापूर येथें शंकराचार्यांचा मठ इसवी सनाच्या १३ व्या शतकांत स्थापिला. हा मठ स्थापन करण्याचें मुख्य कारण म्हणजे त्यावेळीं कोल्हापुरला आलेलें धार्मिक महत्त्व हेंच होय. ज्याला लोक दक्षिण-काशी असें मानतात व जेथें महालक्ष्मीचें अत्यंत पवित्र स्थान आहे, त्या महातीर्थाच्या ठिकाणीं आपला मठ असावा, असें या स्वामींना वाटलें तर त्यांत नवल तें काय? कोल्हापूरच्या मठाधीश शंकराचार्यांची जी बिरुदावली आहे, त्यांत "अभिनव पंचगंगातीरवास कमलानिकेतन करवीरसिंहासनाधीश्वर श्रीविद्याशंकरभारती स्वामी (म्हणजे पंचगंगा नदीच्या तीरीं असलेल्या आणि जेथे महालक्ष्मीचें स्थान आहे अशा करवीर क्षेत्रीं स्थापन झालेल्या सिंहासनाचे पदाधिष्ठित श्रीविद्याशंकरभारती स्वामी) असा उल्लेख असतो. यावरून पंचगंगेचा कांठ आणि महालक्ष्मीचें देवालय या दोन गोष्टींमुळेंच शंकराचार्य कोल्हापुरांकडे आकर्षित झाले असावेत, हें स्पष्ट होतें. याच बिरुदावलीवरून मठाकरितां पंचगंगेच्या कांठची जागा कां निवडली गेली असावी, हें समजून येतें.

या निवडीस आणखी एक कारण सांगतां येईल. मठ म्हणजे समाधीची जागा हें विसरून चालणार नाहीं. समाधि ही पवित्र नदीच्या कांठीं असावी अशी इच्छा असणें स्वाभाविक आहे; आणि म्हणून शंकराचार्यांनीं आपल्या मठासाठीं आणि पर्यायानें सामाधीसाठीं पंचगंगेच्या कांठीं जागा निवडली असावी, असें मानतां येईल.

जातांजातां आणखी एका मुद्याचा उल्लेख करतां येईल. महालक्ष्मीचें देवालय स्थापन होण्यापूर्वीं लोकांची प्रवृत्ति नदीकांठावर ब्रह्मपुरीजवळ घरें बांधून रहाण्याची होती. देवालयाच्या स्थापनेनंतर या प्रवृत्तींत बदल होऊन लोकांना असें वाटूं लागलें कीं, आपलें घर देवालयाजवळ असावें आणि स्मशान मात्र पंचगंगेच्या कांठीं असावें. म्हणून या कालांत देवालयाजवळ लोकवस्ती वाढूं लागली आणि ब्रह्मपुरीजवळ स्मशानांची वाढ होऊं लागली. याला धर्माचा देखील अपवाद दिसून येत नाहीं. पूर्वीं हिंदूंचें स्मशान नदीकांठींच होतें व अद्यापही तें तेथेंच आहे. नंतर मुसलमान लोक आले व त्यांनीं देखील आपली रहाण्याची जागा देवालयाजवळ करून आपलें स्मशान केसापुरांत केलें. छत्रपतींनींसुद्धां कोल्हापुरास राजधानी केल्यावर आपला वाडा देवालयाजवळ बांधला आणि नदीकांठच्या सरकारी बागेत (केसापुरामध्येंच) आणि पंचगंगेच्या घाटावर आपल्यासाठीं खास स्मशानाची जागा राखून ठेविली. या सर्वसाधारण नियमाला, ज्याचें घर आणि समाधि एकत्रच असते, असा संन्यासी शंकराचार्य अपवाद झाल्यास नवल काय?



**९. जैनांचें आगमनः**—इ. स. ५ व्या व ६ व्या शतकांत आलतें वगैरे गांवीं जैन मुनींचा विहार असावा, याला पुरावा मिळतो. तरी कोल्हापुरांत व त्याच्या आसपास जैन धर्माचा खास प्रसार अदमासें इसवी सनाच्या १० व्या किंवा ११ व्या शतकांत झाला असावा, असें वाटतें. श्रवणबेळगोळ येथें सांपडलेल्या शिलालेखामध्यें (तारीख इ. स. ११६३) माघनंदी नांवाचे 'कोल्हापुरे तीर्थकृत' म्हणजे कोल्हापुरांत धर्मप्रसार करणारे असा उल्लेख आहे. * यावरून यापूर्वीं थोड्याच कालामध्यें कोल्हापुरांत जैनधर्माचा प्रसार झाला असावा असें वाटतें. या माघनंदीचा निंब सामंत नांवाचा एक शिष्य होता, असा उल्लेख शिलालेखामधून आढळतो. याच निंबसामंतानें बांधलेलें एक देऊळ आजही श्रीमहालक्ष्मीच्या आवारांत आहे. (या देवालयांत सध्यां शेषशायीची स्थापना आहे.) महालक्ष्मीच्या देवालयाजवळच जें रंकभैरव देवालय आहे तें पूर्वीं जैन देऊळ असावें असें वाटतें. या पुराव्यावरून असें खात्रीपूर्वक म्हणतां येईल कीं, कोल्हापुरांत जैन धर्माची स्थापना झाली तरीं जैन लोकांनीं देखील महालक्ष्मीचें देवालय हेंच आपलेंही केंद्र मानलें, आणि त्याच्याजवळच आपलीं देऊळें बांधून वस्ती करण्यास सुरुवात केली.

कोल्हापूर व आसपासच्या प्रदेशांत आज जो जैन समाज आहे त्याचा उगम दोन मार्गांनीं झाला असावा. एक मार्ग म्हणजे माघनंदीसारख्या आचार्यानें केलेल्या प्रचारामुळें कांहीं लोकांनीं जैन धर्माची दीक्षा घेतली असावी, आणि दुसरा मार्ग म्हणजे विजापूर येथें मुसलमानांचें राज्य स्थापन झाल्यावर त्या भागांतील जैन लोक आश्रयार्थ येथें निघून आले असावेत. पण नगररचना शास्त्राच्या दृष्टीनें जर असे प्रश्न विचारले कीं, माघनंदींनीं कोल्हापूरला आपलें स्थान कां ठेविलें किंवा विजापूरकडून जैन लोक आश्रयासाठीं कोल्हापूरला कां आले, तर त्याला एकच उत्तर देतां येईल. तें म्हणजे कोल्हापूरला त्यावेळीं श्रीमहालक्ष्मीच्या देवालयामुळें प्राप्त झालेलें धार्मिक, सामाजिक व राजकीय महत्त्व. महालक्ष्मीच्या निरनिराळ्या नांवांत "पद्मावती" हें एक नांव आहे. पद्मावती ही शिलाहारांची कुलदेवता. पुढें ही देवी कोल्हापूरच्या राजघराण्याची कुलदेवता झाली; मग त्यांचे धर्म कोणतेही असो. या भागांतील जैनामध्यें "पद्मावती" पूजनीय देवता आहे. याचा अर्थ असा कीं, जैन लोकांच्या कोल्हापूर निवासालादेखील अप्रत्यक्षरीत्या महालक्ष्मीच कारण आहे.

पुढें हिंदूंच्या आक्रमणामुळें जैन लोकांनीं आपल्या वस्ती स्वतंत्रपणें शुक्रवारांत, रविवारांत आणि कोटभागांत स्थापिल्या (अदमासें १३ व्या किंवा १४ व्या शतकांत). हळूंहळूं जैनांचें कोल्हापूर हें एक प्रमुख स्थान बनलें. त्यांचे दोन मठही येथें आले आणि आधुनिक कोल्हापूरच्या निर्मितीला त्यांनीं ही मोठी मदत केली.

**१०. नवीन पेठाः**— कोल्हापूरच्या वाढल्या धार्मिक व राजकीय महत्त्वामुळें या कालांत कोटभागांत आणि पूर्वीच्या सहा नैसर्गिक केंद्रांत वस्ती वाढली हें तर खरेंच; पण शहराच्या सर्व

* तस्य श्रीकुलभूषणाख्यसुमनेः शिष्यो विनेयस्तुतः । सद्वृत्तः कुलचन्द्रदेवमुनियः सिद्धान्तविद्यानिधिः ॥
तच्छिष्योजनि माघनन्दिमुनियः कोल्हापुरेतीर्थकृद् । राद्धान्तार्णवपारगोऽचालधृतिश्चरित्रचक्रेश्वरः ॥

[illegible] कांहीं नवीन वसाहती उदयास आल्या. [illegible] शनिवार आणि सोमवार या [illegible] पेठांचा [illegible] उल्लेख करतां येईल. त्याचप्रमाणें एवढ्या मोठ्या शहरास विशेषतः नवीन घरें [illegible] काम असतांना कुंभार व लोणारी लोकांची मोठ्या प्रमाणावर जरूर लागणार हें उघड होतें. म्हणून त्यांच्याकरितां ( सध्यांच्या पाण्याच्या तिकटीजवळ ) किल्ल्याच्या बाहेर, खंदकापलीकडे एक सखलांतील व पाणेरडी जागा देण्यांत आली. थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, शहरानजीक उत्तम शेती असलेली अथवा तळ्यांनीं व्यापिलेली जागा सोडून उरलेल्या सर्व ठिकाणीं वसाहतींची स्थापना झाली किंवा जुन्या वसाहतींत वाढ झाली.

**११. १८४४ चें कोल्हापूरः**—प्रत्यक्ष १८४४ सालीं कोल्हापूर शहर कसें होतें याचा नकाशा उपलब्ध नाहीं. पण १८६२ सालच्या कोल्हापूरचा नकाशा उपलब्ध आहे. अर्थात् मध्यंतरींच्या १८ वर्षांच्या कालांत कांहीं फारसा बदल झाला नसल्यामुळें या नकाशावरून त्या वेळच्या कोल्हापूरची स्पष्ट कल्पना येते. हा नकाशा पुढील पानावर दिला आहे.

आतांपर्यंत केलेल्या वर्णनावरून या नकाशासंबंधीं विशेष कांहीं सांगावयाची जरूर आहे असें वाटत नाहीं. फक्त दोन गोष्टींचा उल्लेख केला तर पुरें आहे. पहिली गोष्ट म्हणजे त्यावेळीं कोल्हापुरानजीक असलेल्या अनेक सुंदर बागा. पद्माळ्याजवळील शेरीबाग, हत्तीबाग आणि बेलबाग; रावणेश्वराजवळील खुद्द महाराजांसाठीं राखून ठेविलेली खासबाग; कुंभारांच्या घराजवळ असलेली ( सध्यांच्या शाहू उद्यानाजवळ ) लालगिरी बाग; गंगावेशीजवळील धोत्री बाग, केसापुरांतील नदीकांठची सरकारी बाग, बाबूजमालजवळील खंबाळा बाग, साकोलींतील इनामदार बाग आणि फिरंगाईजवळील बावडेकर बाग ( सध्यां बावडेकर वाडा असलेली जागा ). या वेळची लक्षांत येण्यासारखी दुसरी गोष्ट म्हणजे कोल्हापुरांतील अनेक तळीं. रंकाळें, पद्माळें, सिद्धाळें, वरुणतीर्थ, फिरंगाई, खंबाळें, रावणेश्वर, कोटितीर्थ, सुसरबाव, महारतळें, कपिलतीर्थ, साकोली, कुंभारतळ यांचा यामध्यें प्रामुख्यानें उल्लेख करतां येईल. याखेरीज अनेक कुंडें व डबकीं ठिकठिकाणीं होतींच.

कोल्हापूरच्या या स्थितीचें वर्णन दोन जुन्या ओव्यांत काव्यात्मकतेनें केलें आहे. त्या ओव्या अशाः—

कोल्हापूर शहर । जसं त्रिचवाचं तळं ।
वस्ती केली तुझ्यामुळं । अंबाबाई ॥ १ ॥
कोल्हापूर शहर । पाण्याच्या डबक्यांत ।
फुलाच्या झुबक्यांत । अंबाबाई ॥ २ ॥

नकाशावरून ज्याची कल्पना येत नाहीं अशा गोष्टी म्हणजे शहराचें आरोग्य व स्वच्छता. या बाबतींत त्यावेळच्या कोल्हापूरची स्थिति कशी होती, हें तत्कालीन दोन इंग्रज अधिकाऱ्यांच्या लिखाणावरून समजून येईल.






इ. सन १८२८ सालचा कोल्हापूर शहराचा नकाशा

इ. स. १८२६ सालीं कर्नल जेम्स वॅल्श् या नांवाचा एक लष्करी अधिकारी कोल्हापुरांत आला होता. त्यानें अनेक शहरांच्या आठवणींचें एक पुस्तक १८३० सालीं प्रसिद्ध केलें. त्यांत त्यानें १८२६ च्या कोल्हापूरचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे:—

"कोल्हापूर हें बेळगांवच्या उत्तर दिशेला सुमारें ६० मैलाच्या अंतरावर वसलें आहे. हें स्थळ पंचगंगा नदीच्या दक्षिण तीरावर सखल प्रदेशांत आहे. त्याच्या पूर्वेकडे एक खोल नाला असून पश्चिमेकडे एक नाला व एक सरोवर आहे. तसेंच दक्षिणेकडेहि एक लहानसें सरोवर आहे. अशा रीतीनें तें जवळ जवळ चहूंकडून पाण्याने वेढिलेले आहे. हे शहर वांकडें तिकडे व वाईट रीतीने रचलेले आहे. कोटाच्या सभोंवतीं एक रुंद खंदक असला तरी तो बळकट नाहीं. आंत दगडाच्या व विटाच्या इमारती असून त्याला सपाट छपरे आहेत. रस्ते अरुंद व चिंचोळे असून ते पाहून मला Buenos Ayres ( ब्युऑनॉस एरीज शहर ) ची आठवण झाली. कोटांतील तोफखान्यापेक्षां या रस्त्यामुळें शत्रूंना अधिक धोका आहे असें मला वाटतें. राजवाडा मध्यभागीं असून चहूंकडे सर्व प्रकारची दुर्दर्शनीय घाण पसरली आहे.

"....कोटांत चहूंकडे असलेल्या या गचाळ रस्त्याने घोड्यांवरून जात असतां आम्हांला आमच्या घोड्यांना पुढे पाऊल टाकण्याला स्वच्छ जागा मिळणे फार कठीण गेलें. इतके घाणेरडे दुसरें शहर पाहिलेलें मला सर्व आयुष्यांत आठवत नाहीं. यासारख्या दुसऱ्या कोणत्या शहराची मला कल्पना करवत नाहीं व त्याचे वर्णन करण्याला मी असमर्थ आहे."

त्याचप्रमाणे दुसरा पुरावा प्रसिद्ध पोलिटिकल एजंट मेजर ग्रॅहॅम यांचा उपलब्ध आहे. त्यांनी १८५४ सालीं लिहिलेल्या अहवाल्यांत कोल्हापुरचे पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे:—

"कोल्हापूर शहर हें आतां फारच वाढलेलें असून त्याचा आकार ४॥ मैलपेक्षांहि अधिक आहे. पण संस्थानच्या मानानें राजधानीचें ठिकाण होण्याला ते सर्वस्वी अयोग्य आहे. तसेंच जुलमी राजाचे रहिवासी, सरदार व अधिकारी यांनीं हे शहर गजबजून गेलें आहे. त्यांतच इं बेळच्या पद्धतीप्रमाणे सरकारी सैन्याचीहि भर पडली आहे. अशा प्रकारें संस्थानांतील लोकसंख्या येथे तापदायक रीतीनें कोंबली गेली आहे. स्वच्छतेचे व आरोग्याचे कसलेहि निय नसल्यामुळें येथें प्लेगचा उपद्रव होतो. १८४४ सालीं एका पंधरवड्यांत ८००० लोक मृत्यूला बळी पडले.

"तटाच्या आंत रस्ते करण्याच्या बाबतींत कसलेहि नियम पाळले गेलेले नाहींत. घरें विटांचीं असून त्यांना गवतीं छपरें आहेत. इमारती फार गैरसोईच्या असून रस्ते इतके अरुंद आहेत, कीं तेथून एकादी बैलगाडीहि जाणें कठीण आहे.

"थोड्याच काळापूर्वीं प्रत्येक दिशेला सांचलेल्या घाणीविषयीं हें शहर प्रसिद्ध होतें. शहरांत जिकडे तिकडे दुर्गंध सुटला असून तें रोग व मृत्यु यांचें जणूं कांहीं आगरच होतें."




# आधुनिक कोल्हापूर

## ( इ. स. १८४४ ते इ. स. १९५४ )

आधुनिक कोल्हापुराची सुरवात इ. स. १८४४–४८ पासून झाली असें म्हणतां येईल. कारण १८४४ मध्यें ब्रिटिश सरकारनें संस्थानचा कारभार आपल्या हातीं घेतला व तो पहाण्यासाठीं मेजर ग्रॅहॅम यांची नेमणूक केली व १८४५–४८ च्या दरम्यान रेसिडेन्सीच्या* इमारती बांधल्या गेल्या. अशा रीतीनें कोल्हापूर शहराच्या इतिहासांत एक नवीन राजकीय केंद्र निर्माण केलें गेलें.

**२. रेसिडेन्सीसाठीं जागेची निवड:**—ब्रिटिश सरकारच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें ब्रिटिशांनीं कोल्हापूरच्या रेसिडेन्सिकरितां निवडेली जागा संस्थानांतून आपल्याकडे घेऊन त्यावर त्यांनीं आपला प्रत्यक्ष अंमल ठेविला. या जागेची कल्पना देण्यासाठीं असें म्हणतां येईल कीं, त्या जागेंत



**रेसिडेन्सी** ( आतांचें जिल्हाधिकारी निवासस्थान )

कलेक्टर, जिल्हा न्यायाधीश व जिल्हा पोलिस अधिकारी यांचे राहण्याचे बंगले; पोलिस हेडक्वार्टर्स, रेसिडेन्सी क्लब, जिल्हा इंजिनीयर यांची कचेरी इत्यादि इमारती व यालगतचा ताराबाई पार्कपर्यंतचा

---

* कोल्हापूर येथें जो ब्रिटिश सरकारचा प्रतिनिधि असे, त्याला प्रथम "पोलिटिकल सुपरिंटेंडेंट" असें नांव होतें. नंतर "पोलिटिकल एजंट" असें नांव देण्यांत आलें व शेवटीं "रेसिडेंट" असें अभिधान दिलें गेलें. या निरनिराळ्या नांवांमध्यें जो राजकीय व कारभारविषयक फरक आहे त्याचा या ऊहापोहाशीं कांहींही संबंध नसल्यामुळें या प्रकरणांत फक्त "रेसिडेन्सी" व "रेसिडेंट" हेच शब्द वापरण्यांत आले आहेत.

सध्यांचा सर्व भाग यांचा समावेश होत असे. प्रथम कोल्हापूरला लष्करच होतें आणि म्हणून त्यावेळची रेसिडेन्सीची हद्द फारच मोठी होती. नंतर येथील लष्कर हलविण्यांत आलें व हद्द थोडी कमी करण्यांत आली. शिवाय जसजशा शहराच्या गरजा वाढूं लागल्या, तसतशी रेसिडेन्सीपैकीं जागा तोडून ती निरनिराळ्या कामांसाठीं देण्यांत येऊं लागली. शेवटीं १५ ऑगस्ट १९४७ ला रेसिडेन्सीच्या स्थापनेनंतर अदमासें शंभर वर्षांनीं रेसिडेन्सी हलविली गेली व या सर्व हद्दीवर संस्थानचा अधिकार पुनः मान्य करण्यांत आला.


रेसिडेन्सीकरितां हीच जागा कां निवडली गेली, हें सांगतां येणें शक्य आहे. इ. स. १८२८ सालीं कर्नल वेल्श यानें काढलेला नकाशा पान १९१ वर दिला आहे. त्यावरून दिसून येतें कीं, किल्ल्याकडे जाण्याकरितां त्यावेळीं दोन मुख्य रस्ते होते. त्यांपैकीं पहिला म्हणजे जेथें सध्यां शिवाजी पूल आहे तो होय ( हल्लींचा रत्नागिरीचा रस्ता ). पण त्याखेरीज आणखी एक रस्ता बावडा खेड्याजवळ होता व तो जास्त महत्त्वाचा होता. कारण शहरांत न येतां तो परभारें बेळगांवकडे जाई. ( हा रस्ता सध्यां अस्तित्वांत नाहीं. पण याच्याच अनुरोधानें जुना पुणें–बेंगळोर रस्ता तयार केला गेला होता व शिरोलीनजीक पूल बांधल्यावर तो बदलून सध्यां आहे तसा केला गेला. ) रेसिडेन्सी ही मुख्यतः लष्करी बाब असल्यामुळें त्याकरितां मोक्याची जागा निवडली जाणार हें उघड आहे. या ठिकाणीं मोक्याची जागा म्हणजे नदी ओलांडल्याबरोबर एकाद्या मुख्य रस्त्याला लागून असलेला व लष्करी हालचालीस सोयीचा असा प्रशस्त माळ. ब्रह्मपुरीजवळ किल्ल्याकडे जाणारा जो रस्ता आहे, ती जागा आपल्या मुक्कामासाठीं औरंगजेबानें निवडली हें खरें असलें, तरी ती इतकी लहान आहे कीं, रेसिडेन्सीला ती सोयीची झाली नसती. शिवाय ही जागा गांवाच्या अगदीं जवळ आहे व ब्रिटिश लोक शक्यतों गांवापासून दूर रहाण्याचा प्रयत्न करीत. याखेरीज बावड्याजवळचा रस्ता हा जास्त महत्त्वाचा होता, हें वर सांगितलेंच आहे. या सर्व कारणास्तव बावड्याजवळ रेसिडेन्सीकरितां जागा निवडली जाणें, हें क्रमप्राप्तच होतें. त्यामध्यें खुद्द रेसिडेंटसाठीं जो बंगला बांधला त्याची जागा सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीनें निवडली गेली असावी, हें कलेक्टरचें निवासस्थान पाहिल्याबरोबर चटदिशीं लक्षांत येतें.

**३. रेसिडेन्सीमुळें शहरवाढीस झालेली मदत**:—रेसिडेन्सीच्या स्थापनेमुळें शहराच्या वाढीवर फार दूरगामी परिणाम झाले. ते परिणाम समजून घेणें अवश्य आहे.

रेसिडेन्सीचा पहिला परिणाम असा झाला कीं, कोल्हापुरांत एक नवीन व एक निव्वळ राजकीय केंद्र निर्माण केलें गेलें. मागे सांगितलेंच आहे कीं, इ. स. ८०० पासून ते तहत इ. स. १८४४ पर्यंत कोल्हापूरचे राजकीय केन्द्र हें महालक्ष्मीच्या देवालयालगत होतें. पण ही धर्म व राजकारण यांची युती रेसिडेन्सीमुळें मोडली व राजकारणासाठीं एक स्वतंत्र केन्द्र निर्माण झालें. अर्थात् सर्व राजकीय सत्ता एकदम बदलली नाहीं. कारण महाराजांचें निवासस्थान रेसिडेन्सीच्या स्थापनेनंतरही देवालयाजवळच राहिले. पण १८७७–८४ या काळांत रेसिडेन्सीजवळच नवा राजवाडा बांधला



गेला व महाराज तेथें राहूं लागले—निदान त्यांनीं जुन्या राजवाड्यांत रहाणें सोडून दिलें—तेव्हांपासून रेसिडेन्सी हें कोल्हापूरचें पूर्णतया राजकीय केंद्र व देवालय हें फक्त धार्मिक केंद्र अशी परिस्थिति निर्माण झाली.




**नवा राजवाडा**

नव्या राजवाड्यासाठीं रेसिडेन्सीजवळ जागा निवडली जावी, ही एक मौजच आहे. १७८२ सालीं राजधानी कोल्हापुरला आली तेव्हां महाराजांना वाटलें कीं आपला वाडा देवालयाजवळ बांधला जावा. १८७७ सालीं नवा राजवाडा बांधण्याचा प्रश्न निर्माण झाला त्यावेळीं लोकांना वाटलें कीं छत्रपतींचा वाडा रेसिडेंटच्या वाड्याजवळ असावा. शंभर वर्षांत आमचे " देव " कसे बदलले, याचें हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

रेसिडेन्सीचा दुसरा परिणाम म्हणजे रेसिडेन्सीसभोंवतीं एका विशिष्ट प्रकारची वसाहत होऊं लागली. ब्रिटिश लोक गांवापासून दूर रहाण्याचा प्रयत्न करीत, हें मागें सांगितलेंच आहे. म्हणून कलेक्टरांचे बंगले हे गांवापासून बऱ्याच दूर अंतरावर बांधले गेले. पण कलेक्टरचा बंगला हें एक राजकीय केंद्र असल्यामुळें, त्यासभोंवतीं हळूंहळूं वसाहती होऊं लागल्या. सरकारी कचेऱ्या, इतर अधिकाऱ्यांचे बंगले, मिशनऱ्यांच्या संस्था, श्रीमंत व्यापारी अगर जमीनदार यांचीं घरें, पेन्शनर अधिकाऱ्यांचे बंगले वगैरेंचा अशा वसाहतींत समावेश होत असे. अशा रीतीनें प्रत्येक जिल्ह्याच्या

ठिकाणीं एक British Suburb अथवा " ब्रिटिश किंवा ब्रिटिशधार्जिणें उपनगर " निर्माण झालें. हाच प्रकार रेसिडेन्सीच्या बाबतींत होणें अपरिहार्य होतें.

कोल्हापूरच्या रेसिडेन्सीमुळें नवा राजवाडा आला. महाराज आल्यावरोबर कागलकर, विशाळगडकर, इचलकरंजीकर, हिंमतबहादर वगैरे जहागीरदार मंडळीहि आली. या रेसिडेन्सीचा अधिकार कोल्हापुरावरच नव्हे तर इतर दक्षिण संस्थानांवरही चालत असल्यामुळें सांगलीकर, मुधोळकर, जमखिंडीकर, वगैरेंनीं आपले बंगले येथें बांधले. एका ख्रिश्चन चर्चची स्थापना झाली. रेसिडेन्सी क्लब निघाला. एवढेंच नव्हे तर ब्रिटिशांचा आवडता " रेसकोर्स " ही जवळच स्थापिला गेला. अधिकारी व पेन्शनरही येऊं लागले. याची सुरवात पोलो मास्तर व डफळे यांनीं केली व नंतर ताराबाई पार्कच स्थापन झाला. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे रेसिडेन्सीच्या सभोंवतीं इतर जिल्हाप्रमाणें कोल्हापुरांतही एक सुंदर " ब्रिटिश उपनगर " निर्माण झालें.

**४. कोल्हापुरांतील दळणवळणाचीं आधुनिक साधनें**:—रेसिडेन्सीचा तिसरा परिणाम म्हणजे कोल्हापूर हें दळणवळणाचें मोठें केंद्र बनलें हा होय. रस्त्यांचें केंद्र होण्यासारखी नैसर्गिक परिस्थिति कोल्हापुरला आहे हें खरें; पण रस्ते केल्याखेरीज तिचा उपयोग कसा होणार ? रेसिडेन्सी स्थापन झाल्यापासून ते श्रीशाहू महाराज गादीवर येईतोंपर्यंत ( इ. स. १८४४ ते इ. स. १८९४ पर्यंतचा काळ ) संस्थानांत सतत अज्ञान कारकीर्द होती व येथील सर्व कारभार रेसिडेंटच्या देखरेखीखालीं केला जात असे म्हणून या कालांत ब्रिटिश सरकारचें दळणवळणाचीं साधनें निर्माण करण्याचें जें सर्वसाधारण धोरण होतें तें कोल्हापूर संस्थानांतही अंमलांत आणलें गेलें. याचाच परिणाम म्हणून कोल्हापूरला अनेक रस्ते जोडले गेले. पुणें व बेंगलोर येथील मुख्य लष्करी ठाण्यांना जोडणारा रस्ता ब्रिटिश सरकारनें फार झपाट्यानें केला व तो पुणें व बेंगलोर यांच्यामध्यें असलेल्या सर्व लष्करी ठिकाणांवरून नेला. या धोरणामुळें हा रस्ता कोल्हापुरावरून आंखला गेला इतकेंच नव्हे, तर तो रेसिडेन्सीजवळून काढला गेला. त्याचप्रमाणें समुद्राला जाण्यासाठीं अंबाघाट फोडून कोल्हापूर–रत्नागिरी हा रस्ता केला. येथील रेसिडेंटचा संबंध मिरज, सांगली येथील संस्थानिकांशीं असल्यामुळें कोल्हापूर–सांगली व कोल्हापूर–मिरज असे रस्ते तयार झाले. कोल्हापूर हें प्रत्येक पेठ्याला व जहागिरीला जोडण्यासाठीं कोल्हापूर–पन्हाळा, कोल्हापूर–बावडा, कोल्हापूर–राधानगरी, कोल्हापूर–गारगोटी, कोल्हापूर–इचलकरंजी, कोल्हापूर–गडहिंग्लज–आजरा ( संकेश्वरावरून ) असे रस्ते आंखले गेले. अनेक ठिकाणीं पूल बांधण्यांत आले. चिकोडीरोड-फोंडा रस्त्यामुळें ( यांतील बराच भाग संस्थाननें केला ) कोल्हापूर हें सावंतवाडी, विजयदुर्ग, मालवण या भागास जोडलें गेलें व शेवटीं १८९१–९२ ला मिरजेहून रेल्वेही आणली गेली. या सर्व कार्यक्रमामुळें कोल्हापूर हें एक फार मोठें असें रस्त्यांचें केंद्र बनलें. अंबा व फोंडाघाट फोडल्यामुळें कोल्हापूरला जवळजवळ " कोंकणचें द्वार " म्हणण्याइतकें महत्त्व आलें व पुणें–बेंगलोर रस्त्यामुळें व आगगाडीमुळें त्याचा देशविभागाशीं पूर्णपणें संबंध जोडला गेला.



कोणत्याही ठिकाणाला व्यापारी महत्त्व यावयाचें झाल्यास प्रथम तेथें दळणवळणाचीं साधनें निर्माण व्हावीं लागतात. विसाव्या शतकांत कोल्हापूरला फार मोठें व्यापारी महत्त्व आलें व येथें शाहूपुरीसारखी एक प्रचंड व्यापारी पेठ निर्माण झाली हें खरें; पण या वैभवाचा पाया इ. स. १८४४ ते १८९४ या कालांत वर सांगितलेलीं दळणवळणाचीं साधनें निर्माण करून घातला गेला, हें कबूल करणें भाग आहे. थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, रेसिडेन्सी ही जरी लष्करी संस्था होती व तिचें कार्य जरी पूर्णपणें राजकीय होतें तरी तिच्या कार्यांतून अप्रत्यक्षपणें कोल्हापूरच्या आजच्या व्यापारी वैभवाचा पाया घातला गेला.

**५. रेल्वे स्टेशनच्या जागेची निवड**:—इ. स. १८९१–९२ सालीं कोल्हापुरला रेल्वे आणण्यांत आली, हें वर सांगितलेंच आहे. यामुळें निर्माण झालेलें कोल्हापूर स्टेशन हें कोल्हापूर शहराचें व्यापारी केंद्र होय.

**६. कोल्हापुरांत व्यापारी केंद्राची स्थापना**:—इ. स. १८९४ सालीं छत्रपति श्री[illegible] महाराजांनीं अधिकारसूत्रें धारण केलीं. यापूर्वीच्या ५० वर्षांत दळणवळणाचीं साधनें निम[illegible] करून कोल्हापूरला व्यापारी केंद्र स्थापन करण्याची शक्यता कशी निर्माण केली गेली होती




वर परिच्छेद ४ मध्यें सांगितलेंच आहे. या अनु[illegible] परिस्थितीचा संपूर्ण फायदा घेऊन कोल्हापुरांत अत्यंत प्रभावी असें व्यापारी केंद्र निर्माण करण्याचें [illegible] श्रीशाहू छत्रपतींच्या दूरदृष्टीलाच द्यावें लागेल.

अधिकारारूढ झाल्यानंतर थोड्याच काळांत श्री[illegible] छत्रपतींच्या लक्षांत आलें कीं, स्टेशनसभोंवतीं [illegible] व्यापारी पेठ करतां येणें शक्य आहे. म्हणून [illegible] शाहूपुरी वसाहत स्थापन करण्याची आज्ञा इ. स. १८[illegible] मध्यें केली व इ. स. १९०४ ते इ. स. १९२० या [illegible]ांत त्यावेळचे संस्थानचे इंजिनीयर रावसाहेब विचारे [illegible] भास्करराव जाधव

## कोल्हापूर रेल्वे स्टेशन

नगररचनाशास्त्राच्या दृष्टीनें या केंद्राकरितां जागा कोणत्या तत्त्वावर निवडली गेली व तिचे परिणाम काय झाले, हें प्रथम पाहिलें पाहिजे. त्यावेळचे या कामासंबंधी जे कागदपत्र उपलब्ध आहेत त्यावरून असें दिसून येतें कीं, रेल्वे स्टेशनासाठीं दोन जागा निवडण्याची शक्यता होती. सध्यां रेल्वेची आंखणी टेंबलाई टेंकडीच्या उत्तर बाजूनें झालेली आहे ती तशीच ठेवून किंवा ती

कोल्हापूर संस्थानामध्यें दरसाल १२९६ खंडी गूळ तयार होतो व त्याची किंमत १,२०,५३९ रु. होते असा उल्लेख आहे * ही पद्धत गेल्या शतकामध्यें वाढतच राहिली व इ. स. १९०१ सालच्या आंकड्यावरून त्यावेळीं आदमासें १४५०० एकरांत उंसाची लागवड होती असें दिसून येतें. पण दुर्दैवाची गोष्ट म्हणजे इतक्या मोठ्या प्रमाणांत येथें गूळ निर्माण होत असूनही त्यावेळीं कोल्हापुरांत गुळाची व्यापार पेठच नव्हती. त्यावेळीं येथील बहुतेक गूळ कोंकणांत जात असे; आणि त्या व्यापाराचें राजापूर हें मुख्य केंद्र असल्यामुळें कोल्हापूरचा गूळ "राजापूर गूळ" या नांवानें कोंकणांत खपत असे. कांहीं कालानंतर सांगलीला एक चांगली व्यापार पेठ निर्माण झाली. मग कोल्हापूरचा गूळ सांगलीला अधिकाधिक प्रमाणांत जाऊं लागला. परंतु तेव्हांसुद्धां कोल्हापुरलाच व्यापारी पेठ निर्माण करावी, अशी योजना येथें कोणालाही सुचली नाहीं.



शाहूपुरी व्यापार पेठेंतील गूळबाजाराचें दृश्य.

* ग्रॅहॅमचा रिपोर्ट पान : २२१.



श्रीशाहू छत्रपतींनीं अधिकारसूत्रें घेतल्यावरोबर एक वर्षाच्या आंतच स्टेशनजवळ नवीन वसाहत करण्याची आज्ञा केली, हें वर सांगितलेंच आहे. पण नुसती आज्ञा करूनच ते थांबले नाहींत. गूळ व शेंग यांचा व्यापार कोल्हापुरलाच झाला पाहिजे, अशी त्यांची महत्त्वाकांक्षा होती. म्हणून त्यांनीं आजूबाजूच्या व्यापाऱ्यांना कोल्हापुरास यावयाचें आमंत्रण दिलें. ज्यांनीं यावयाचें कबूल केलें त्यांना शाहूपुरीमध्यें फुकट प्लॉट देण्यांत आले. एवढेंच नव्हे तर करामध्येंही सवलती देण्यांत आल्या. विशेष महत्त्वाची गोष्ट ही कीं, शाहूपुरी पेठेची स्थापना करतांना अगदीं प्रथमच "उघड व्यापारा"चा नियम स्वीकारला गेला. त्यावेळच्या सांगली पेठेमध्यें "छुपा" सौदा करण्याची पद्धत होती. म्हणजे सौदा बोलणारा व्यापारी हातरुमालाखालीं आपलीं बोटें झांकून त्या बोटांनीं आपला सौदा सुचवीत असे व अशा रीतीनें ठरलेल्या सौद्याची रक्कम माल विकणारा आणि विकत घेणारा या दोघांखेरीज कोणालाही समजत नसे. या पद्धतीमध्यें अनेक लपंडाव चालण्याची शक्यता होती, हें उघड आहे. म्हणूनच ही पद्धत कोल्हापूर पेठेंत बंद करण्यांत आली. इतक्या जुन्या काळांतदेखील शेतकऱ्यांच्या हितांकडे लक्ष देऊन शाहूपुरी पेठेची स्थापना झाली असावी, याबद्दल कौतुक वाटतें.

शाहूपुरी पेठेचा इतिहास अदमासें पन्नास वर्षांचा आहे. पण इतक्या थोड्या कालावधींतही तिची फारच प्रचंड प्रमाणांत वाढ झाली. इ. स. १९०४ सालीं या पेठेला नुकती सुरवात झाली होती, असें म्हटलें तरी चालेल. अवघ्या पन्नास वर्षांनंतर इ. स. १९५२–५३ सालच्या हंगामामध्यें या पेठेंत गूळ १७ लक्ष पासष्ट हजार रवे (किंमत अदमासें २॥। कोटी रु.) व शेंगपोती (किंमत अदमासें ५० लक्ष रु.) ची आवक झाली. या पेठेच्या वाढीमुळें शहराचाच फायदा झाला असें नसून, सर्व कोल्हापूर संस्थानचाही फायदा झाला. त्याचें सर्व श्रेय श्रीशाहू छत्रपतींनाच द्यावें लागेल.

**७. कोल्हापूर हें शैक्षणिक व सांस्कृतिक केंद्र बनलें:**—गेल्या शतकामध्यें कोल्हापूरला शैक्षणिक व सांस्कृतिकदृष्ट्या अखिल महाराष्ट्रीय जीवनांत मोठें महत्त्व आलें. या कार्याचीही सुरवात श्री शाहू छत्रपतींनींच केली. महाराष्ट्रांतील ब्राह्मणेतर समाज शैक्षणिकदृष्ट्या फार मागासलेला आहे व त्याचें शिक्षण झाल्याखेरीज तो आपली उन्नति करून घेऊं शकणार नाहीं, हें त्यांना दिसून आलें व त्यांनीं ब्राह्मणेतर समाजांत शिक्षणप्रसार होण्यासाठीं फार जोराचे प्रयत्न केले. कोल्हापूर संस्थानांत आधुनिक पद्धतीच्या शिक्षण संस्था स्थापन करून त्यांनीं त्यांत मागासलेल्या समाजाकरितां अनेक सवलती दिल्या. मागासलेल्या जातींतील गरीब विद्यार्थ्यांनीं शिक्षण घ्यावें म्हणून अनेक वसतिगृहें काढण्यास मदत केली; मागासलेल्या समाजांतील शिकलेल्या तरुणांना आपल्या संस्थानांत नोकऱ्या देण्यास सुरवात केली आणि अस्पृश्यता नाहींशी करण्यासाठीं अनेक प्रयत्न केले. एवढेंच नव्हे, तर बहुजनसमाजाच्या पायांत अडकविली गेलेली धार्मिक बेडी तोडण्यासाठीं जोराचे प्रयत्न केले व सत्यशोधक चळवळीला पाठिंबा दिला. या सर्व गोष्टींमुळें बहुजनसमाजांत प्रचंड जागृति झाली, हें मान्य केलें पाहिजे.

श्रीशाहू महाराजांनी बहुजनसमाजाच्या उन्नतीसाठीं जे प्रयत्न केले, त्यामुळें कोल्हापूरला सर्व महाराष्ट्रांत महत्त्वाचें सांस्कृतिक स्थान मिळालें. श्रीशाहू महाराजांच्या कारकीर्दींत सर्व महाराष्ट्रांतील बहुजनसमाज कोल्हापुराकडे आपलेपणाच्या दृष्टीनें पाहूं लागला व त्याची कोल्हापुराकडे येण्याची प्रवृत्ति वाढूं लागली. या केंद्राच्या निर्मितीचा मानही व्यापारी केंद्राच्या निर्मितीप्रमाणें श्रीशाहू छत्रपतींना द्यावा लागेल.

श्री राजाराम महाराजांनींसुद्धां श्रीशाहू महाराजांची शैक्षणिक परंपरा चालू ठेविली व त्यांत भर घातली. त्यांच्या कारकीर्दींत कोल्हापुरांत तीन कॉलेजें मोठ्या प्रमाणांत चालविलीं जात होतीं. मागासलेल्या समाजासाठीं वसतिगृहें, शिष्यवृत्त्या इत्यादि सोयी बऱ्याच मोठ्या प्रमाणांत उपलब्ध होत्या. या धोरणाचा असा परिणाम झाला कीं, दक्षिण महाराष्ट्रांत कोल्हापूर हें सर्वांत मोठें शैक्षणिक केंद्र बनलें व त्यामुळेंही कोल्हापूरच्या शहरवाढीस फार मदत झाली.



श्रीराजाराम छत्रपति महाराज

श्रीशाहू व श्रीराजाराम यांच्या कारकीर्दींत कोल्हापूर शहराला शैक्षणिक व सांस्कृतिक महत्त्व आलें. पण दुर्दैवानें शहरामध्यें कोणतीही जागा "शैक्षणिक केंद्र" म्हणून निर्माण झाली नाहीं. जर शहराच्या बाहेर एकादी मोठी व सोयीस्कर अशी जागा पाहून तेथें राजाराम कॉलेज बांधलें गेलें असतें, तर पुण्यामध्यें ज्याप्रमाणें फर्ग्युसन कॉलेज हें शैक्षणिक केंद्र बनलें व त्यासभोंवतीं डेक्कन जिमखान्याची वसाहत झाली, त्याप्रमाणें कोल्हापुरांतही एक शैक्षणिक केंद्र स्थापन झालें असतें व त्याभोंवतीं एक चांगली वसाहत निर्माण झाली असती. कॉलेजकरितां एक स्वतंत्र जागा निवडून तेथें चांगली वसाहत करावी अशा तऱ्हेचे विचार जवळजवळ वीस वर्षें चालू आहेत. पण प्रत्येक वेळीं कांहींना कांहीं अडचणी येऊन ही योजना मागें पडत आहे.

हा मुद्दा सांगण्याचें कारण एकच. कोल्हापूरला धार्मिक, राजकीय व व्यापारी केंद्रें आहेत; पण या शहराला अत्यंत मोठें शैक्षणिक महत्त्व असूनही शैक्षणिक केंद्र मात्र अद्याप निर्माण झालेलें नाहीं! ही उणीव उद्यांच्या कोल्हापुरांत शक्य तितक्या लवकर भरून काढावी लागेल.

**८. कोल्हापुरांतील उद्योगधंद्यांची वाढः**—मेजर ग्रॅहॅम याच्या रिपोर्टप्रमाणें इ. स. १८५४ मध्यें पुढील उद्योगधंदे कोल्हापुरांत होतेः—



(१) सोन्याचांदीचे कारागीर:—हा धंदा फारच मोठ्या प्रमाणांत चालत असल्याचें मेजर ग्रॅहॅमनें वर्णन केलें आहे. अनेक शतकांपर्यंत कोल्हापूर हें तीर्थ व राजधानी असल्यामुळें या धंद्याला महत्त्व येणें साहजिकच आहे.

(२) लोहार आणि घिसाडी.

(३) भांड्यांचे व्यापारी. (तांब्या–पितळेच्या)

(४) कुंभार व लोणारी : हाही धंदा त्यावेळीं फार मोठ्या प्रमाणांत असावा असें वाटतें.

(५) तेली.

(६) कोष्टी : हा धंदा देखील पुष्कळ मोठ्या प्रमाणावर होता. कारण ग्रॅहॅमनें यांची संख्या ३७५ होती, असें नमूद केलें आहे.

(७) बुरूड.

(८) चांभार व ढोर.

या वर्णनावरून सर्वसाधारणपणें असें वाटतें कीं, ४०,००० लोकवस्तीला आवश्यक असे सर्व उद्योगधंदे त्यावेळीं अस्तित्वांत होते. एवढेंच नव्हे तर कोल्हापुरांत तयार झालेला माल बाहेरही जात असे.

गेल्या शंभर वर्षांमध्यें अर्थातच या चित्रांत पुष्कळ फरक पडलेला आहे. पूर्वींचे तेली व कोष्टी हे वर्ग जवळजवळ नामशेष झाले व पूर्वीं नसलेले असे अनेक नवीन उद्योगधंदे या कालांत अस्तित्वांत आले. अशा धंद्यांमध्यें श्रीशाहू छत्रपति मिल्स, कोल्हापूर शुगर मिल, चित्रपट निर्मितीचीं केंद्रें, तेलाच्या चार गिरण्या, दळणाच्या चक्क्या, छापखाने, बेकरीज, विडी कारखाने, साबण कारखाने, मोटार दुरुस्तीचे कारखाने, मेकॅनिकल वर्क्स शॉप्स इत्यादींचा उल्लेख करतां येईल. कोल्हापुरांत उद्योगधंद्यांच्या वाढीला फारसा वाव नाहीं. पण येथील जनतेंत कलाकौशल्य चांगलें असल्यामुळें आधुनिक काळाला उपयुक्त व मुख्यतः कारागीराच्या कसबावर अवलंबून असलेले असे बरेच धंदे निर्माण झाले. एकंदरींत असें म्हणतां येईल कीं, गेल्या शंभर वर्षांत कोल्हापूरला उद्योगधंद्यांची पुष्कळच वाढ झाली आणि त्यामुळें लोकांना जास्त प्रमाणावर काम मिळूं लागलें व शहराच्या संपत्तींत भर पडली.

**९. लोकसंख्येची वाढः**—येथपर्यंत दिलेल्या सर्व वर्णनावरून हें लक्षांत येईल कीं, इसवी सनाच्या ९ व्या शतकापूर्वीं कोल्हापूरला फक्त नैसर्गिक महत्त्व होतें. त्यानंतर महालक्ष्मीचें देवालय स्थापन झाल्यामुळें कोल्हापूरला धार्मिक महत्त्व आलें. पुढें लवकरच कोल्हापूरला राजकीय महत्त्वही प्राप्त झालें. गेल्या शंभर वर्षांत पूर्वींचें नैसर्गिक अथवा धार्मिक महत्त्व कमी न होतां शहराचें राजकीय महत्त्व खूपच वाढलें. कोल्हापूर दळणवळणाचें केंद्र बनल्यामुळें त्या दृष्टीनेंही शहराला १९ व्या शतकाच्या अखेरीस महत्त्व प्राप्त झालें. नंतर श्रीशाहू व श्रीराजाराम यांच्या कारकीर्दींत कोल्हापूरला व्यापारी, सांस्कृतिक, शैक्षणिक व औद्योगिक महत्त्वही आलें. याचा अर्थ असा कीं,

इ. स. १८५४–१९५४ या शतकांत कोल्हापूरला एकसमयावच्छेदेंकरून राजकीय, व्यापारी, सांस्कृतिक, शैक्षणिक व औद्योगिक महत्त्व आलें. याचा परिणाम होऊन गेल्या शंभर वर्षांत कोल्हापूरची लोकसंख्या अत्यंत वेगानें वाढली तर त्यांत नवल तें काय?

कोल्हापूर शहराच्या लोकसंख्येचे उपलब्ध असलेले आंकडे खालीं दिले आहेतः—

| सन | | लोकसंख्या |
|---|---|---|
| १८५४ | .... | ४०,००० |
| १८७१ | .... | ३७,६६२ |
| १८८१ | .... | ३९,९१० |
| १८९१ | .... | ४७,३७४ |
| १९०१ | .... | ५४,३७३ |
| १९११ | .... | ४८,१२२ |
| १९२१ | .... | ५५,५९४ |
| १९३१ | .... | ७२,४९२ |
| १९४१ | .... | ९३,१६६ |
| १९५१ | .... | १,३६,८३५ |

वरील आंकड्यांवरून दिसून येईल कीं, शहराच्या लोकसंख्येंत इ. स. १९२१ पासून फार मोठी वाढ झाली आहे. अर्थात् याचें एक कारण म्हणजे हिंदुस्थानच्या आर्थिक जीवनांत क्रांति होऊन सगळीकडेच या कालामध्यें शहरांची लोकसंख्या वाढूं लागली, हें होय. पण त्याचें मुख्य श्रेय वर नमूद केलेल्या कारणांनाच द्यावें लागेल.

**१०. नव्या वसाहतींची वाढः**—(१८४४–१९४४) या वाढत्या लोकसंख्येची सोय करण्यासाठीं कांहींतरी तरतूद करणें, हें गेल्या शतकांतील राज्यकर्त्यांचें प्रमुख कर्तव्य होतें. पण विलीनीकरण होईतोंपर्यंत ही जबाबदारी नगरपालिकेवर नव्हतीच, असें म्हटलें तरी चालेल. कारण जरूर लागेल त्याप्रमाणें नवीन वसाहती स्थापन करणेचा अधिकार दरबारनें आपणांकडे राखून ठेवला होता. त्यामुळें गेल्या शतकांत कोल्हापूर शहरांत ज्या नवीन वसाहती झाल्या, त्या सर्व (गेल्या दहा वर्षांतील एक–दोन अपवाद सोडून) दरबारनेंच स्थापन केल्या आहेत.

या वसाहतींची आंखणी एका विशिष्ट तऱ्हेनें कां झाली, हें समजून घेण्याकरितां दोन मुख्य सिद्धांत नजरेपुढें ठेवावे लागतात. त्यांतील पहिला सिद्धांत म्हणजे या सर्व वसाहती मुख्यतः दोन आधुनिक केंद्रांसभोंवतीं व त्यांच्याच प्रभावानें निर्माण झाल्या. हीं दोन केंद्रें म्हणजे रेसिडेन्सीचें राजकीय केंद्र व रेल्वे स्टेशनचें व्यापारी केंद्र. दुसरा सिद्धांत म्हणजे दोन वसाहत केंद्रांच्यामधील जागा सहसा मोकळी न रहातां थोड्याफार कालांतरानें घरें बांधण्यासाठीं उपयोगिली जाते. या दोन सिद्धांतांचा उपयोग केल्यास गेल्या शतकामध्यें कोल्हापूर शहरांतील वसाहती एका विशिष्ट अनुक्रमानें कां झाल्या हें समजून येतें.



यांपैकीं सर्वांत जुनी वसाहत म्हणजे रेसिडेन्सीच्या केंद्रासभोंवतींची. तिची सुरवात इ. स. १८४५ मध्यें झाली. पण तिची वाढ फारच सावकाश होत आहे. याचें मुख्य कारण म्हणजे रेसिडेन्सीच्या हद्दीवर हिंदुस्थान सरकारचा ताबा होता व रेसिडेन्सीच्याजवळ गर्दी होऊं नये म्हणून त्यांनीं मुद्दामच ती सर्व जागा शक्य तेवढी मोकळी ठेवण्याचा प्रयत्न केला. निव्वळ अपवाद म्हणून राजेरजवाडे, जहागिरदार वगैरे कांहीं मंडळींना जागा दिल्या. अगदीं अलीकडे व रेसिडेन्सीचें लष्करी महत्त्व कमी झाल्यावर, 'ताराबाई पार्क' या श्रीमंत वसाहतीस त्यांनीं परवानगी दिली. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ब्रिटिश अमदानींतील सरंजामशाही व नोकरशाही यांपैकीं अत्यंत वरच्या दर्जाच्या व अगदीं थोड्या अशा लोकांची सोय करणें, एवढाच या वसाहतींचा उद्देश होता.

एक अपवाद खेरीज करून हा उद्देश सफलही झाला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. गांवाजवळ महारवाडा हें कांहीं आर्यांच्या वसाहतीचें चिन्ह नाहीं. ब्रिटिश अमदानींत जीं सुंदर अँग्लो–इंडियन उपनगरें वसविलीं गेलीं, त्यामध्येंही एक महारवाडा असे. तो म्हणजे या बड्या साहेबांसाठीं लागणाऱ्या बबर्जी, खानसामा वगैरे नोकरांनीं रहाण्यासाठीं केलेली वसाहत. कोल्हापुरांतील दरिद्री व घाणेरडा सदर बाजार, हा या सुंदर उपनगरांचा आधुनिक "महारवाडा" होय.

यानंतरची दुसरी वसाहत म्हणजे "शाहूपुरी". ही वसाहत रेल्वे स्टेशनासभोंवतीं इ. सन १८९५ ते इ. स. १९२० पर्यंतच्या काळांत पुरी झाली. या वसाहतीची कारणमीमांसा व तिची जोरदार वाढ कां झाली, याचें वर्णन वर परिच्छेद ६ मध्यें केलेंच आहे.

शाहूपुरी वसाहत पुरी झाल्याबरोबर जुनें शहर आणि जितीच्या ओढ्यापर्यंत आलेली ही नवीन वसाहत यामधील खुली शेती लोकांच्या डोळ्यांवर येऊं लागली; आणि वाढत्या लोकवस्तीची सोय करण्यासाठीं त्या भागांत वसाहत करणें नगररचनाशास्त्राच्या दृष्टीनेंही अपरिहार्य झालें, म्हणून त्या वेळेला दिवाणबहादूर अण्णासाहेब लठ्ठे यांनीं ही लक्ष्मीपुरी वसाहत स्थापिली व ती इ. स. १९२६–३७ या कालांत पुरी झाली.

या वसाहतीनेंही लोकांची गरज पुरी होईना म्हणून इ. स. १९२९ सालीं "राजारामपुरी" वसाहत करण्यांत आली. या वसाहतीची निवड देखील अपरिहार्यतेनें झाली असें म्हणावें लागेल. कारण ज्या काळांत ही वसाहत स्थापन केली, त्यावेळीं शहरापासून ते शाहू मिलपर्यंत सर्व जागा व्यापिली गेली होती. म्हणून पहिला उघडा माळ या वसाहतीसाठीं निवडला गेला, हें साहजिक आहे.

राजारामपुरी वसाहत झाल्याबरोबर रेल्वे लाईन आणि राजारामपुरी यामधील खुली जागा डोळ्यांवर येऊं लागली व तेथें वसाहत होणें अपरिहार्य झालें. अशा रीतीनें "साइक्स एक्स्टेन्शन"चा जन्म इ. स. १९३३ सालीं झाला.

जातां जातां आणखी एक मुद्दा येथें मांडावासा वाटतो. कोल्हापुरांतली पहिली नवीन वसाहत शाहूपुरी ही इ. स. १८९५ सालीं स्थापन झाली. त्यावेळीं नगररचनाशास्त्राचा अभ्यास फारसा झाला नव्हता; अधिकाऱ्यांना अनुभव नव्हता; व लोकमतही तयार झालें नव्हतें. पण जसजसा

काल जाऊं लागला तसतशा या उणीवा भरून येऊं लागल्या. म्हणून पहिली वसाहत फारच सदोष होती. उदाहरणार्थ, शाहूपुरीमध्यें फक्त पूर्व–पश्चिम रस्तेच धरले गेले; दक्षिणोत्तर सरळ रस्ते जवळजवळ ठेवलेच नाहींत. शिवाय सर्व रस्ते सारख्याच रुंदीचे ठेविले व मुख्य रस्ता व भंगी पॅसेज असा फरक केलाच नाहीं. दोन घरांच्या मधील बोळ फारच अरुंद–पांच फूट–ठेवले गेले. शाळा, क्रीडांगणें, बागा वगैरेसाठीं खुल्या जागा ठेविल्या नाहींत. हे व असेच दोष या वसाहतीमध्यें आज दृष्टोत्पत्तीस येतात. पण यानंतर झालेल्या लक्ष्मीपुरी वसाहतीमध्यें हे दोष काढून टाकल्याचें दिसून येतें. येथें मुख्य रस्ता व भंगी पॅसेज असा फरक करण्यांत आला आहे. मुख्य रस्ते भरपूर रुंद ठेवण्यांत आले आहेत. फूटपाथची तरतूद आहे. दोन घरामधील बोळ कमींतकमी दहा फुटाचे आहेत. पूर्व–पश्चिम व दक्षिणोत्तर असे दोन्हीं रस्ते आंखलेले आहेत. सार्वजनिक सोयीसाठीं कॉलेज, शाळा, क्रीडांगण, मोटार स्टॅंड–जागा देण्यांत आली. यावरून शाहूपुरी वसाहतीच्या मानानें लक्ष्मीपुरी वसाहत पुष्कळच निर्दोष झाली. पण यामध्येंही एक मोठा दोष राहिला व तो म्हणजे या वसाहतीकरितां निवडलेली जागा इमारतीस उपयुक्त नव्हती व त्यामध्यें पाया फार खोल जात असे. हा दोषही यानंतर झालेल्या राजारामपुरी वसाहतींत काढून टाकला. कारण त्यासाठीं शेतीखालची जमीन न घेतां चांगला माळ निवडला गेला; पण राजारामपुरींतही कांहीं दोष राहिले. उदाहरणार्थ, तेथील रस्ते हे जमिनीच्या उंच-सखलपणाची दखल न घेतां काटकोन पद्धतीनें आडवे–उभे आंखण्यांत आले आहेत, यामुळें सांडपाण्याचा निचरा करणें कठीण होतें. हा दोषही यानंतर झालेल्या साइक्स एक्स्टेन्शन व ताराबाई पार्क या वसाहतींत काढून टाकण्यांत आला. समाजाचें सर्व शिक्षण बहुधा ‘Trial and Error’ म्हणजे ‘प्रयत्न आणि प्रमाद’ या न्यायानेंच होतं असतें. म्हणून पूर्वीच्या काळीं झालेल्या चुकांबद्दल कोणालाही दोष देण्याची जरूरी नाहीं. उलट पक्षीं, त्या चुकांपासून बोध घेतला गेला व पुढील प्रयोगांत त्या दुरुस्त केल्या गेल्या, याबद्दल धन्यता मानली पाहिजे.

**११. जुन्या शहरांतील खुल्या जागा भरणें (१८५४–१९४४):—** इकडे वर सांगितल्याप्रमाणें शहराबाहेर नव्या वसाहती होत असतांना वाढत्या लोकवस्तीची सोय करण्यासाठीं आणखी एक मार्ग अवलंबिला गेला. तो म्हणजे जुन्या शहरांत अधूनमधून ज्या खुल्या जागा होत्या त्या ठिकाणीं वसाहत करणें. सर्वसाधारण नागरिक हा शहराबाहेर जाण्यास नाखूष असतो. म्हणून वसाहतवाढ करीत असतांना शहरामध्येंच ज्या खुल्या जागा असतात व ज्या खुल्याच ठेवण्याची आरोग्यशास्त्रदृष्ट्या जरूर नसते, त्या जागांना जास्त प्राधान्य दिलें जातें. या तत्त्वास अनुसरून, कोल्हापुरांत गेल्या २०।२५ वर्षांत पुढील वसाहती करण्यांत आल्या.

**(१) खासबागः—**ही खुद्द महाराजांची बाग होती, हें सांगितलेंच आहे. पॅलेस थिएटर व कुस्तीचा आखाडा ही प्रथम या जागेंत बांधली. मग त्यामध्यें राजाराम हायस्कूल, राजाराम कॉलेज, व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग यांना क्रीडांगणासाठीं जागा दिली व राजारामियन क्लब स्थापिला



गेला. यामुळें या भागाला जें शेतजमिनीचें स्वरूप होतें तें नाहींसें झालें व त्यापैकीं जी थोडी जागा शिल्लक राहिली होती, तिला वसाहतीसाठीं साहजिकपणेंच मागणी येऊं लागली. म्हणून या बागेंत एक नवीन वसाहत स्थापन केली गेली.

**(२) साकोलीः—** शिवाजी पेठ व कोटभाग यामधील हा दलदलीचा प्रदेश होता. शिवाजी पेठ शहरांत सामील झाल्यावर साहजिकपणेंच या भागांत वसाहत करावी, अशी मागणी करण्यांत आली. म्हणून येथेंही वसाहत स्थापन केली गेली.

या दोन वसाहतीमागील तत्त्व चुकीचें नव्हतें. पण त्या करतांना कांहीं चुका केल्या गेल्या. उदाहरणार्थ, खासबाग वसाहतींत–जास्तींत जास्त पैसे मिळविण्यासाठीं–रस्ते अत्यंत अरुंद ठेवले गेले. त्याचप्रमाणें साकोली वसाहत करतांना प्रथम त्यामधील पाण्याचा निचरा करावयास पाहिजे होता. पण तें केलें गेलें नाहीं. त्यांतल्या त्यांत सुदैवाची गोष्ट ही कीं, जुन्या शहरामधल्या यापुढें झालेल्या वसाहतीमधून हे दोष काढून टाकले गेले.

**(३) वरुणतीर्थः—**वरुणतीर्थ व पेटाळें मुजविल्यानंतर मंगळवार व नवा बुधवार यामध्यें जी खुली शेतजमीन होती, त्यामध्यें ही वसाहत करण्यांत आली आहे (१९४४–४५).

**(४) रावणेश्वरः—**खासबागेंतील वसाहत झाल्यावर रावणेश्वर तलाव मुजविला गेला. त्यामुळें हा तलाव व जितीचा ओढा यामध्यें असलेली खुली जमीन वसाहतीखालीं घेणें अपरिहार्य झालें. म्हणून या विभागांतही वसाहत स्थापिली गेली (१९४४–४५).

**(५) बेलबागः—**बेलबाग या नांवाची शेतजमीन मंगळवार पेठेंत जुनें गांवालगत होती. शंभर वर्षांत या बागेच्या सर्व बाजूला घरें झालीं. त्यामुळें ही खुली जागा जवळ जवळ गांवांतच आली व तेथें वसाहत करणें अपरिहार्य झालें. म्हणून ही वसाहत इ. स. १९४६ मध्यें केली गेली.

**(६) उद्यमनगरः—**शाहू मिल व जितीचा ओढा यामध्यें बरीच खुली जमीन होती. गांव वाढत वाढत जितीच्या ओढ्यापर्यंत आल्याबरोबर या खुल्या जागेची मागणी होऊं लागली व तेथें १९४५–४६ सालीं लहानलहान उद्योगधंद्यासाठीं नवी वसाहत स्थापन करण्यांत आली.

**(७) मस्कती तलावः—** उत्तरेश्वरांत मस्कती तलावानजीक थोडीशी खुली जागा होती. म्हणून ती जागा ॲक्वायर करून नगरपालिकेनें तेथें नवी वसाहत स्थापन केली (१९५२–५३). या भागांतही एकच वसाहत होण्यासारखी जागा होती.

**(८) गवत मंडईः—**शुक्रवारांत धोत्रीजवळ थोडी शेत–जमीन अगदीं गांवांत होती व त्यापासून शहराच्या आरोग्याला फारच त्रास होत असे, म्हणून नगरपालिकेनें ही जागा ॲक्वायर करून सुधारली व त्यापैकीं एका भागांत गवत मंडईची स्थापना करून बाकीचे प्लॉट्स वसाहती-साठीं विकले (१९५२–५३).

**१२. जुन्या शहराची सुधारणाः**—आतांपर्यंत कोल्हापूर शहराच्या वाढत्या लोकसंख्येची सोय करण्यासाठीं शहरानजीक नवीन वसाहती स्थापन करणें व जुन्या शहरांतील खुल्या जागा भरणें या दोन मार्गांनीं शहराची वाढ कशी करण्यांत आली, याचें वर्णन केलें. आतां या आधुनिक कालांत जुन्या शहराची सुधारणा करण्यासाठीं कसकसे प्रयत्न करण्यांत आले, याचा विचार करूं.

**(१) कोटभागांतील रस्ते आणि गटारें (१८५४–८९):**—इ. स. १८४४ च्या सुमारास कोल्हापुरची स्थिति कशी होती, याचें वर्णन पूर्वी दिलेंच आहे. त्यावरून लक्षांत येईल कीं, त्यावेळच्या अधिकाऱ्यांना शहरामध्यें मुख्यतः तीन दोष दिसत होते—वाईट रस्ते, अस्वच्छता व रोगकारक परिस्थिति. ही परिस्थिति सुधारण्यासाठींच इ. स. १८५४ सालीं नगरपालिकेची स्थापना केली गेली.

नगरपालिकेच्या पहिल्या २५ वर्षांच्या कारकीर्दींत तिनें केलेलें एक मुख्य काम म्हणजे कोट भागांतील रस्ते सुधारणें. तत्कालीन रस्ते फारच अरुंद होते व त्यावेळीं रस्त्याला दगडाची फरशी करणें हाच एक रस्ते दुरुस्त करण्याचा मार्ग म्हणून मानला जात असे. या कामासाठीं नगरपालिकेनें असा ठराव केला कीं, प्रत्येक घरमालकानें आपल्या घरापुढील अर्ध्या रस्त्यास फरशी केली पाहिजे. नगरपालिकेचे नोकर फक्त एक काम करीत—रस्त्याच्या मधोमध दोरी बांधून प्रत्येक घर मालकानें किती भागावर फरशी करायची, हें आंखून देणें. मग प्रत्येक मालकाकडून त्याच्या त्याच्या हद्दीपुरती फरशी केली जाई. अशा रीतीनें फरशी केलेले अनेक बोळ आजही कोल्हापुरांत शिल्लक आहेत. या कालांत नगरपालिकेकडे रस्ते करण्यासाठीं एक कारकून व चार पोलीस शिपाई असा नोकरवर्ग होता. या विचित्र घटनेचा उलगडा वर वर्णन केलेली रस्ते करण्याची पद्धत लक्षांत ठेवली म्हणजे सहजच होतो.

नगरपालिकेनें शहरसुधारण्याच्या दृष्टीनें या कालांत केलेलें दुसरें महत्त्वाचें कार्य म्हणजे कोटभागांत जमिनीखालून वहाणारीं सांडपाण्याचीं गटारें बांधणें हें होय. यांपैकीं अनेक गटारें आजही अस्तित्वांत आहेत व उत्तम काम देत आहेत. हीं सर्व गटारें त्यावेळीं तटाभोंवतालच्या खंदकांत आणून सोडलीं होतीं; किंवा प्रसंगविशेषीं तीं खंबाळे वगैरेसारख्या तळ्यांतही सोडलीं गेलीं होतीं.

अर्थात् रस्त्यांची झाडलोट, दिवाबत्ती, संडास बांधून भंग्याची नेमणूक करणें, इत्यादि कामें नगरपालिका प्रथमपासूनच करीत होती; पण या नेहमींच्या कामांचा तपशील या शहरसुधारणेच्या अहवालांत देण्याचें कारण नाहीं.

**(२) तट पाडणें व खंदक मुजविणें (१८७५–८३):**—थोडक्याच कालांत त्यावेळच्या अधिकाऱ्यांना दिसून आलें कीं, शहराची महत्त्वाची सुधारणा ही नगरपालिकेकडून होणार नाहीं. यासाठीं व महाराजांचें निवासस्थान अथवा संस्थानची राजधानी म्हणून कोल्हापूर शहर सुधारण्याची कांहीं जबाबदारी दरबारनेंही उचलली पाहिजे, असा विचार मान्य केला गेला. याचा पहिला परिणाम म्हणजे त्यावेळच्या दरबारच्या अधिकाऱ्यांच्या दडपणामुळें तट पाडून खंदक मुजविला गेला.



तट पाडावा कीं पाडूं नये याबद्दल त्यावेळीं बराच वाद झाला व आजही त्या प्रश्नावर एकमत नाहीं. बेळगांव, सोलापूर येथें ज्याप्रमाणें किल्ले अद्यापही शाबूत ठेवले गेले आहेत त्याप्रमाणें कोल्हापुरचा किल्लाही ठेवला गेला असता, तर शहरसुधारणाच्या दृष्टीनें कांहीं फारसें बिघडलें नसतें. पण शहराचें सौंदर्य वाढलें असतें असा एक अभिप्राय आहे. पण या मतामध्यें फारसें तथ्य नाहीं. बेळगांवचा किल्ला गांवापासून फार दूर होता; व सोलापूरच्या किल्ल्यांत फारशी वस्ती कधींच नव्हती, म्हणून बेळगांव व सोलापुरचें उदाहरण कोल्हापुरला लागू पडणार नाहीं. कोल्हापुरांत कोटभागांतच अत्यंत दाट वस्ती होती. जर तट पाडून खंदक मुजविला गेला नसता, तर जुना कोटभाग सुधारला नसता; कोटभागाची बाहेरच्या वस्तीशीं आज जी एकरूपता झालेली दिसते ती दिसून आली नसती व मलेरियाचा उपद्रव कमी झाला नसता. म्हणून तट पाडून खंदक मुजविण्याचा निर्णय अपरिहार्य होता असें मानावें लागेल. दरबारनें जुन्या शहराच्या सुधारणेसाठीं घडवून आणलेली ही पहिली महत्त्वाची घटना होय.

**(३) रस्ते रुंदी (१९२५–३०):**—कोटभागांतील रस्ते फारच अरुंद होते, हें मागें सांगितलेंच आहे. बाहेरच्या उपनगरवजा खेड्यांतील रस्ते त्या मानानें जरी रुंद असले, तरी वाढत्या शहराच्या गरजेकडे पहातां अरुंदच होते असें म्हणावें लागेल. यासाठीं रस्ते रुंदी हा एक जुन्या शहराच्या सुधारणेचा मुख्य भाग होता.


नगरपालिकेच्या कायद्याप्रमाणें रस्ते रुंदी करण्याचा मुख्य मार्ग म्हणजे घरें बांधण्याच्या वेळीं तीं घरें मागें हटविणें. नगरपालिकेनें प्रत्येक रस्त्याची रुंदी किती असावी हें ठरवून त्याचा नकाशा प्रथम तयार करावयाचा व मग त्या रस्त्यामध्यें ज्यावेळीं घरमालक आपलें घर बांधावयास काढील, त्यावेळीं त्याला तें घर पूर्वनियोजित रेषेप्रमाणें पुढें अगर मागें घेऊन बांधावयास लावावयाचें, अशी ही पद्धत आहे. या पद्धतीस खर्च फार कमी येतो; पण तिला अनुसरून एखादा रस्ता रुंद व्हावयास ५० ते १०० वर्षें लागतात. म्हणून आडबाजूच्या रस्त्यासाठीं जरी या पद्धतीचा उपयोग करणें शक्य असलें, तरी मुख्य व रहदारीच्या रस्त्यांची रुंदी पाडापाडी करूनच करावी लागते.

जुन्या शहरांतील रस्तेरुंदीसाठीं बरेच वेळां प्रयत्न करण्यांत आला. तट पाडून खंदक मुजवितांना थोडे रस्ते रुंद केले गेले; नंतर भास्करराव जाधव यांनीं १९०४ ते १९१८ च्या दरम्यान प्रयत्न केला; पण या दोन्ही प्रयत्नांना फारसें यश आलें नाहीं आणि रस्तेरुंदीचा पहिला मोठा प्रयत्न अत्यंत तीव्र विरोधाला न जुमानतां श्री. अण्णासाहेब लट्ठे यांनीं १९२५ ते १९३० च्या दरम्यान केला. त्यांच्याच प्रयत्नामुळें टाऊन हॉलपासून तें नगारखान्यापर्यंतचा भाऊसिंगजी रस्ता, गुजरी रस्ता, भेंडी गल्ली, राजाराम रस्ता, (जुना राजवाडा तें रविवार वेशीपर्यंत), महाद्वार रस्ता, (पापाची तिकटी ते जोशीराव गणपतीपर्यंत) शिवाजी रस्ता, (शिवाजी पुतळा ते बिंदु चौकपर्यंत) इत्यादि रस्ते रुंद केले. आधुनिक कोल्हापुराच्या निर्मितीसाठीं केली गेलेली ही एक महत्त्वाची कामगिरी होय.

## कोल्हापूर शहरांतील “ मरीन ड्राइव्ह ”




रंकाळा तलावांतील संध्यामठ व दूरवर दिसणारा शालिनी राजवाडा



पद्माराजे बाग



या रस्ते रुंदीच्या कार्याला त्यावेळीं फार जोराचा विरोध झाला व त्यावर अद्यापही दोन आक्षेप घेतले जातात. पहिला आक्षेप म्हणजे त्यावेळीं लोकांना पाडापाडीबद्दल नुकसानभरपाई दिली गेली नाहीं, हा होय व तो मान्य केला पाहिजे. दुसरा आक्षेप म्हणजे त्यावेळीं रस्ते जितके करावयास पाहिजे होते तितके रुंद केले गेले नाहींत. उदाहरणार्थ, भाऊसिंगजी रोड ( निदान गुजरीपासून नगारखान्यापर्यंतचा भाग ) ६० फूट रुंद करावयास पाहिजे होता व सर्व नगारखाना उघडा दिसेल अशी तरतूद व्हावयास पाहिजे होती, असा मुद्दा कांहीं नगररचनाशास्त्रज्ञाकडून मांडला जातो. पण या आक्षेपांत फारसें तथ्य नाहीं. इतक्या मोठ्या प्रमाणावर रस्ते रुंदी करावयाचा लट्ठे यांनीं प्रयत्न केला असता तर कांहींच कार्य झालें नसतें. म्हणून श्री. लठ्ठेंच्या कार्यावर अशा तऱ्हेचे आक्षेप न घेतां, त्यांनीं लहान प्रमाणावर का होईना, जी रस्ते रुंदी केली, त्याबद्दल त्यांना धन्यवादच दिले पाहिजेत.


श्री. लठ्ठयांनीं केलेल्या रस्ते रुंदीवर घेतां येण्यासारखा आणखी एक आक्षेप आहे; पण तो लोकांना फारसा माहीत नाहीं. नगररचनाशास्त्राचा एक मुख्य नियम आहे कीं, “ घाण ही पडद्याआड करूं नये; समूळ काढून टाकावी” ( Never screen off dirt; remove it in toto ). मुख्य रस्तेच तेवढे पाडापाड करून रुंद केले म्हणजे त्या रस्त्यांना सुंदर व उंच इमारती होतात आणि त्याच्या पाठीमागची घाण दिसेनाशी होते; व घाण दिसेनाशी झाल्यामुळें ती काढून टाकण्या-साठीं जे प्रयत्न सर्वसाधारणपणें झाले असते, ते देखील होत नाहींत, असा या तत्त्वाचा अर्थ आहे. याचीं दोन उत्तम उदाहरणें कोल्हापुरांत पहावयास मिळतात. नगारखाना ते शिवाजी पुतळा, शिवाजी पुतळा ते बिंदु चौक, व बिंदु चौकापासून राजाराम रोडनें पुन्हां नगारखाना, असें फिरले म्हणजे समोर रुंद रस्ता व दोन बाजूस उत्तम इमारती दिसतात; पण थोडें आंत गेल्याबरोबर खाटिक गल्लीसारखी अत्यंत गलिच्छ वसाहत या सुंदर रस्त्यांच्या मागें लपविली गेली आहे, हें दिसून येतें. तोच प्रकार पुनः गुजरी व भेंडीगल्ली यांच्या दरम्यान झांकल्या गेलेल्या कासारगल्ली, महादेवगल्ली वगैरे भागाचा आहे. हा आक्षेप मान्य करणें भाग आहे व त्यापासून जरूर तो बोध घेऊन यापुढील रस्ता रुंदीच्या कार्यक्रमांत ही चूक पुनः होणार नाहीं, अशी दक्षता घेतली गेली पाहिजे.

रस्ते रुंदीबरोबरच श्री. लठ्ठे यांनीं पाडापाड करून दोन नवीन रस्ते केले व ते म्हणजे बिंदु चौक ते आईसाहेब महाराज यांच्या पुतळ्यापर्यंतचा रस्ता ( शिवाजी रोडचा पुढील भाग ) व आईसाहेब महाराजांच्या पुतळ्यापासून तें नगरपालिकेच्या कचेरीपर्यंतचा लक्ष्मी रोड. याविषयीं श्री. लठ्ठे एका गोष्टीचा उल्लेख करून फार हळहळ व्यक्त करीत असत. त्यांच्या पहिल्या योजनेप्रमाणें आईसाहेब महाराजांच्या पुतळ्यापासून तें मोदीखाना तिकटीपर्यंत ( नगरपालिकेच्या कचेरीसमोर आग्नेय कोपऱ्यांत पोलीस उभा राहतो तेथपर्यंत ) लक्ष्मी रोड आंखला होता, पण यामध्यें महाराजांच्या नातेवाईकांच्या मालकीची मोदीखाना इमारत पाडावी लागत होती, म्हणून ती योजना मंजूर झाली नाहीं व हल्लींचा लक्ष्मी रोड काढला गेला. जर लठ्ठे यांची पहिली योजना मंजूर झाली असती, तर

आईसाहेब महाराजांच्या पुतळ्यापासून ते पापाच्या तिकटीपर्यंत सरळ ५०|६० फुटी रस्ता झाला असता व त्यामुळें लोकांची मोठीच सोय झाली असती यांत शंका नाहीं.

**(४) रस्ते रुंदी (१९४१–४७)**:—यानंतर बऱ्याच कालपर्यंत रस्ते रुंदीचें काम हातीं घेतलें गेलें नाहीं; पण रीजन्सी कौन्सिलच्या पाठींब्यामुळें तें पुनः १९४१ ते १९४७ या काळांत मोठ्या प्रमाणांत केलें गेलें. यावेळीं झालेले मुख्य रस्ते म्हणजे सुभाष रोडची लक्ष्मीपुरीपासून तें शेरी बागेपर्यंतची वाढ; महाद्वार रोडची जोशीराव गणपतीपासून तें पाण्याच्या खजिन्यापर्यंत सुधारणा व वाढ; महालक्ष्मीच्या दक्षिण दरवाज्यासमोरील रस्ता, ताराबाई रोड, टेंबे रोड, सेंट्रल रोड, (साठमारी ते रविवार पोलीस गेटपर्यंत) साठमारी ते राजारामपुरी (आंखणी व पुलाचें बांधकाम मात्र) रोड, फिरंगाई रोड, आणि कलेक्टर कचेरीला शाहूपुरीस जोडणारा रस्ता, या काळांत रस्ते रुंदीचें कार्य बऱ्याच मोठ्या प्रमाणांत झालें, यांत शंका नाहीं. मात्र तें निर्दोष होतें असें मानण्याचें कारण नाहीं. ताराबाई रोडला अकारण वळणें दिलीं गेलीं इत्यादि टीका या कालांतील कार्यावर केली जाते व ती बऱ्याच अंशीं बरोबर आहे.

**श्री. जे. पी. नाईक**



शहरसुधारणेचे एक कल्पक

त्याचप्रमाणें या काळांत कपिलतीर्थाजवळचा अदमासें दोन एकराचा ताराबाई रोडवरील भाग निवडून तो संपूर्णपणें साफ करण्यांत आला व लड्डे यांच्या वेळीं घाण पडद्याआड लपविण्याची जी चूक झाली होती, ती टाळली गेली. असाच प्रयत्न खरी भाग व गंगावेस भाग यांमध्यें करण्यांत आला; पण दुर्दैवानें तो पुरा होऊं शकला नाहीं.


या काळांत प्रथमच व फार मोठ्या प्रमाणांवर हातीं घेतलेलें रस्त्यांचें कार्य म्हणजे भंगी पॅसेज करणें. या योजनेमुळें घरांच्या पिछाडीस असलेली घाण कमी झाली व संडासांची संख्या वाढून आरोग्यसुधारणा होण्यास मदत झाली. या काळांत जुन्या शहराच्या सर्व भागांत अनेक भंगी पॅसेज करण्यांत आले.

**(५) तळीं व डबकीं बुजविणें (१८८४–१९५४)**:—कोल्हापुरांत अनेक तळीं व डबकीं होतीं, हें मागें सांगितलेंच आहे. तीं बुजविणें हा शहरसुधारणेचा गेल्या सत्तर वर्षांतला एक महत्त्वाचा कार्यक्रम होता.


या कार्यक्रमाची सुरवात कपिलतीर्थ बुजविण्यापासून झाली, हें मागें सांगितलेंच आहे. हा तलाव नगरपालिकेनें बुजविल्यामुळें अर्थातच त्यावर नगरपालिकेची मालकी आली व तेथें एका



## कोल्हापुरांतील मध्ययुगीन इमारती



जुन्या राजवाड्यांतील नगारखान्याची इमारत



शुक्रवार पेठेंतील जैनमठ

जुन्या राजवाड्याचा एक भाग



भवानी मंडप व लगतचा भाग

मार्केटची स्थापना केली गेली. नंतर श्री. भास्कर जाधवराव यांनी इंद्रकुंड बुजविलें. त्यानंतर लक्ष्मीपुरी वसाहतीच्या वेळीं महार तलाव बुजविला गेला व ती जागा इमारतीसाठीं वापरली गेली. तसेंच सुसरबाग तळें हरिहर विद्यालयासाठीं म्हणून एका खाजगी व्यक्तीस दिलें गेलें. अर्थातच शाळेच्या चालकांनीं तें तळें स्वतःच्या खर्चानीं भरलें व तेथें क्रीडांगण चालू केलें, हें ठीकच. पण अशी मोठी व महत्त्वाची जागा नगरपालिकेकडे न ठेवतां ती एका खाजगी व्यक्तीला दिल्यामुळें आजूबाजूच्या रहिवाशांना फार अडचणी निर्माण झाल्या व त्या अद्यापही कायम आहेत, हें कबूल करणें भाग आहे. त्यानंतर श्री. व्ही. टी. पाटील अध्यक्ष असतांना त्यांच्याच प्रेरणेनें कुंभार तलाव बुजवून तेथें बाग केली. शेवटीं श्री. दत्ताजीराव माने अध्यक्ष असतांना उनक बुजवून तेथें बाग केली गेली. पेटाळें बुजवून ती जागा न्यू एज्युकेशन सोसायटीला दिली गेली. वरुणतीर्थ कोरडें करून नगरपालिकेकडे राखून ठेविलें. पद्माळें कोरडें करून शेतीखालीं आणलें गेलें; मस्कती तलाव बुजवून वसाहत केली; रावणेश्वर तलाव कोरडा करून तेथें एक प्रशस्त क्रीडांगण तयार केलें गेलें; वगैरे थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास घाण तळीं व डबकीं बुजवून आरोग्य सुधारण्याचा कार्यक्रम जवळजवळ पुरा झाला आहे, असें खात्रीनें म्हणतां येईल.

**(६) जुन्या व नव्या वसाहतींचा मिलाफः**—कोल्हापूर शहर हें नऊ केंद्रांसभोंवती वेगवेगळ्या वेळीं स्थापन झालेल्या वसाहतींच्या एकत्रीकरणापासून झालें आहे, हें मागेंच सांगितलें आहे. अनेक वसाहतींचें अशा रीतीनें एकत्रीकरण होत असतांना कांहीं विशिष्ट तऱ्हेच्या समस्या नेहमीच निर्माण होत असतात. कोल्हापूर शहरांत या कारणांमुळें कोणत्या समस्या निर्माण झाल्या आहेत, हें समजून घेणें नगररचनेच्या दृष्टीनें जरूर आहे.

प्रथम आपण कुंभारांच्या वस्तीचा प्रश्न घेऊं. ही वसाहत (कुंभार तलावाजवळची) आज शहरांत मध्यभागीं आहे. पण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, शंभर वर्षांपूर्वीं ती गांवाबाहेर होती. ज्यांनीं ही वसाहत करण्याला परवानगी दिली, त्यांनीं खंदकाच्या पलीकडे, शहराबाहेर सखल व दलदलीची अशी ही जागा निवडून ती कुंभारांना दिली. त्या काळीं हा निर्णय योग्यच होता, असें म्हणावें लागेल. परंतु तट पाडून खंदक बुजविला गेला आणि केसापूर व लगमापूर या बाजूची वस्ती वाढत वाढत कोटभागापर्यंत येऊन पोंचली. म्हणून एका काळीं शहराबाहेर असलेलीं कुंभारांचीं घरें एकाएकीं शहराच्या मध्यभागीं आलीं. याचाच अर्थ असा कीं, कुंभारांच्या वसाहती शहराबाहेर नेण्याचा जो प्रश्न आज निर्माण झाला आहे, त्याचा उगम कोटभाग व शुक्रवार पेठ यांच्या एकत्रीकरणामध्यें आहे.

या शतकाच्या सुरवातीस हीं कुंभारांचीं घरें शहराबाहेर नेण्यासाठीं एक लहानसा प्रयत्न करण्यांत आला. त्या वेळीं कुंभारांकरितां शहरापासून दूर असलेल्या जितीच्या ओढ्याच्या पलीकडे (सध्यांच्या आयर्विन ख्रिश्चन हायस्कूलजवळ) जागा निवडली गेली. शहराची वाढ याच दिशेला



होत आहे, ही गोष्ट त्या वेळेच्या अधिकाऱ्यांच्या लक्षांत न आल्यामुळें ही चुकीची निवड झाली व शाहूपुरी आणि राजारामपुरी या वसाहती झाल्याबरोबर एका काळीं गांवाबाहेर म्हणून केलेली ही कुंभारांची वसाहत पुन्हां गांवामध्येंच आली! कुंभारांचीं घरें गांवाबाहेर नेण्याचा हा जो दुसरा प्रयत्न केला गेला, त्याचा शेवट दुर्दैवानें असा झाला कीं, शहरामध्यें एका ऐवजीं दोन कुंभार वसाहती निर्माण झाल्या. या मागील चुका टाळून कुंभारांचीं घरें शहराबाहेरें कशीं न्यावयाचीं, हा एक उद्यांच्या कोल्हापुरांतील महत्त्वाचा प्रश्न आहे.

निरनिराळ्या वसाहतींच्या एकत्रीकरणापासून ज्या अडचणी निर्माण झाल्या आहेत, त्यांमध्यें सार्वजनिक घड्याळाचें दुसरें उदाहरण म्हणून निर्देश करतां येईल. बिंदूचौकामध्यें जी मोठी सार्वजनिक घडी आहे, ती प्रथम बांधतेवेळीं जागेची निवड योग्यच केली, असें म्हणावें लागेल; कारण त्यावेळीं तेथें महार तलाव होता व गांवाबाहेर आणि पाणेरख्या तलावाच्या कांठाला घडी बांधण्यास हरकत नाहीं म्हणून या जागेची निवड केली असावी. परंतु, महार तलाव बुजवून तेथें लक्ष्मीपुरीची वसाहत स्थापन केल्याबरोबर ही घडी सुंदर इमारतींच्या जवळ आली व ती काढून टाकणें अवश्य वाटूं लागलें. त्याचप्रमाणें वरुणतीर्थाच्या कांठीं पूर्वीं जेव्हां दोन सार्वजनिक घड्या बांधल्या, तेव्हां त्या वेळच्या अधिकाऱ्यांनीं कांहीं चूक केली होती असें मुळींच म्हणतां येणार नाहीं; पण वरुणतीर्थ कोरडें करून तेथें महात्मा गांधींचा पुतळा बसविल्यामुळें या घड्या काढून टाकणें आतां अवश्य झालें आहे.

याच प्रकारचें तिसरें उदाहरण म्हणजे गटारांचें. जुन्या व नव्या वसाहतींतील गटारें एकमेकांना जोडावीं लागतात; पण हें काम योग्य रीतीनें व तातडतोब होतेंच असें नाहीं; याचें उत्तम उदाहरण म्हणजे सायोली व वरुणतीर्थ भाग. जुना कोटभाग व शिवाजी पेठ यांमधील ही सर्व जमीन एका काळीं खुली होती व तिचा उपयोग फक्त शेतीसाठीं होत असे, म्हणून त्यावेळीं कोटभागांतील लोकांनीं आणि तसेंच शिवाजी पेठेंतील लोकांनीं आपलीं सर्व गटारें या शेतजमिनींतच आणून सोडलीं होतीं. पुढें या भागांत वसाहत होऊं लागली व कोटभाग शिवाजी पेठेशीं जोडला गेला; परंतु या सर्व बाजूंनें येणाऱ्या सांडपाण्याचा निचरा मात्र अनेक वर्षेंपर्यंत केला गेला नाहीं म्हणून या भागांत फार रोगकारक परिस्थिति निर्माण झाली होती. ती सुधारण्याकरितां पाण्याच्या खजिन्यापासून तें थेट धोत्रीपर्यंत एक मुख्य गटार काढून त्याला या विभागांतील सर्व गटारें जोडणें आवश्यक झालें. अर्थात् हा प्रश्न फक्त कोटभागाचा शिवाजी पेठेशीं मिलाफ झाल्यामुळें निर्माण झाला, हें उघड आहे; कारण या दोन वसाहती जर स्वतंत्र राहिल्या असत्या आणि त्यामधील जमीन शेतीखालीं राहिली असती, तर हा प्रश्न आलाच नसता.

दोन वसाहतींच्या मीलनामुळें निर्माण होणाऱ्या प्रश्नांचें चौथें उदाहरण म्हणजे रस्त्यांसंबंधींचें होय. जेथें दोन वसाहती एकमेकांत मिळतात, तेथें एका वसाहतींतील रस्ते दुसऱ्या वसाहतींतील रस्त्यांशीं जोडले गेले पाहिजेत, हें उघड आहे; पण असें नेहमींच घडत नाहीं. उदाहरणार्थ,

लक्ष्मीपुरी वसाहतींतील हरिहर विद्यालयासमोरील रस्ता पश्चिमेकडील बाजूला बंद झाला असून, तो जुन्या शहरांतील रस्त्याशीं मिळत नाहीं. अशा तऱ्हेचे आणखी कांहीं दोष राजारामपुरीमध्येंही दाखवितां येतील.

वरील वर्णनावरून लक्षांत येईल कीं, जेथें दोन वसाहती वाढत जाऊन एकमेकांमध्यें मिसळ-तात, तेथें कांहींना कांहीं तरी घोटाळे होतातच. असे आतांपर्यंतचे जे घोटाळे झालेले आहेत, त्यां-पैकीं कांहीं इ. स. १९२१ ते १९४७ च्या दरम्यान जी शहरसुधारणेची जोरदार मोहीम हातीं घेतली गेली होती त्यामध्यें सुधारण्यांत आले आहेत; पण अद्यापहि पुष्कळ बाबी शिल्लक आहेत. त्यांचा पूर्ण विचार करून जरूर ती सुधारणा करणें व यापुढें ज्या वसाहती होणार आहेत त्यांमध्यें अशा तऱ्हेच्या चुका पुन्हां न होऊं देणें, हें यापुढच्या शहरसुधारणेच्या कार्यक्रमांतील एक महत्त्वाचें अंग आहे.

**१३. पाणीपुरवठाः**—कोल्हापूरच्या सुरवातीपासून अठराव्या शतकाच्या जवळजवळ अखेर-पर्यंत शहराचा पाणीपुरवठा हा राज्यकर्त्यांपुढें खास प्रश्न नव्हता. कारण, शहरांत तीर्थे व तळीं अनेक होतीं व त्यांचें पाणीहि विश्वास योग्य होतें. शहराची वस्ती आटोपशीर असल्यानें सांडपाण्याचा निचरा सहज होत असे व त्यामुळें या तीर्थांचें व तळ्यांचें पाणी बिघडत नसे. पण गेल्या दीडशें वर्षांत कोल्हापूरची लोकसंख्या अतोनात वाढली. १८५४ सालीं शहराची लोकवस्ती ४० हजार होती, ती ५० वर्षांनीं ५४ हजार झाली व शंभर वर्षांनीं १ लक्ष ४० हजार झाली. त्यामुळें शहराच्या पाणीपुरवठ्याची विशेष अशी योजना हातीं घेणें आवश्यक झालें.

इ. स. १७८२ सालीं कोल्हापूरला राजधानी आल्याबरोबर पाणी पुरवठ्याची पहिली योजना हातीं घेतली गेली व इ. स. १७९२ सालीं कात्यायनीहून नळ घालून शहरांत पाणी आणलें गेलें. या योजनेचा खर्च पुण्याचे एक श्रीमंत नागरिक बाबूराव केशव ठाकूर यांनीं दिला होता. कात्यायनीहून आणलेल्या नळाचें पाणी शहरामध्यें निरनिराळ्या भागांत ३२ विहिरी खोदून त्यांत सोडलें होतें व त्या विहिरींमधून सर्व लोक प्यावयाचें पाणी घेऊन जात.

ही योजना समाधानकारक नव्हती हें उघडच आहे. म्हणून इ. स. १८८१ ते १८८३ च्या दरम्यान कळंबे तलाव बांधला गेला. त्यावेळच्या अधिकाऱ्यांना कोल्हापूरची लोकसंख्या भावी काळांत किती वाढेल याची नीटशी कल्पना आली नाहीं, म्हणून फक्त चाळीस हजार लोकसंख्ये-साठीं दररोज दहा गॅलन पाणी पुरवावयाचें या हेतूनें या तलावाची आंखणी केली गेली. शहर वाढूं लागल्याबरोबर अर्थातच हें पाणी कमी पडूं लागलें म्हणून इ. स. १८९४ चे सुमारास धरणाची उंची वाढवून तलावांतील पाण्याचा सांठा दीडपट केला गेला.

शाहूपुरी, राजारामपुरी वगैरे वसाहती झाल्यामुळें त्यांना पाणी पुरवठा करण्यासाठीं बापट कॅम्पजवळ पंपिंग स्टेशन बसविण्यांत आलें व टेंबलाईच्या टेकडीवर पाण्याचा खजिना बांधून



शाहूपुरीचा थोडासा भाग, ताराबाई पार्क, नवा राजवाडा, रेसिडेन्सी वगैरे हद्दींत पाणी पुरवठा केला गेला. ( १९२७–३० )

पण शहराची लोकसंख्या फारच वाढली म्हणून यांपैकीं कोणतीही योजना समाधानकारक वाटेना. शहराच्या पाण्याचा प्रश्न कायमपणें सोडवावा म्हणून दरबारनें इ. स. १९४१ ते १९४७ च्या दरम्यान एक मोठी योजना हातीं घेऊन अजमासें रुपये तीस लाख खर्च करून ती पुरी केली. या योजनेचें स्वरूप थोडक्यांत पुढें दिलें आहे:—

( १ ) कळंबा तलावाचें पाणी दगडचुन्यानें बांधलेल्या पाटामधून शहरांत आणलें गेलें होतें; यामध्यें पुष्कळ पाणी झिरपून फुकट जात असे म्हणून जुना पाट बंद करून सीमेंटचे नळ घातले गेले व त्यांतून पाणी गांवांत आणलें.

( २ ) कळंब्याचें पाणी पूर्वीं अशुद्ध स्थितीतच वांटलें जात होतें म्हणून वांटण्यापूर्वीं हें पाणी शुद्ध करण्याची योजना केली गेली.

( ३ ) बापट कँप जवळचें पंपिंग स्टेशन बंद करण्यांत आलें; कारण या ठिकाणचें नदीचें पाणी गांवांतील सांडपाणी मिसळल्यामुळें फार घाण होत असे, असें आढळून आलें होतें.


( ४ ) पंचगंगेच्या कांठावर बालिंग्याजवळ एक नवीन पंपिंग स्टेशन बसविलें गेलें व तेथून पाणी पंप करून आणि शुद्ध करून त्याचा सांठा चंबुखडी–टेकडीवरील नवीन खजिन्यामध्यें केला गेला व तेथून शुद्ध केलेलें पाणी सर्व शहराला पुरविण्याची सोय केली गेली. या योजनेची रचना अशी आहे कीं, तिच्यामधून अडीच लाख लोकसंख्येला दररोज ४० चाळीस गॅलन पाणी देतां येईल.

या योजनेमुळें शहराच्या पाणी पुरवठ्याचा प्रश्न समाधानकारकपणें सुटला आहे हें लक्षांत येईल.

**१४. सुंदर इमारतीः**—कोल्हापूर शहराचा इतिहास लिहितांना त्यामध्यें ज्या सुंदर इमारती आहेत त्यांचा निर्देश करणें अस्थानी होणार नाहीं. या सर्व इमारतींची यादी अगर छायाचित्रें येथें देणें शक्य नाहीं. परंतु त्यांपैकीं कांहींचा निर्देश पुढें केला आहे आणि त्यांपैकीं थोड्यांचीं छायाचित्रें दिलीं आहेत.

प्राचीन काळांतील कोणत्याहि इमारती आज कोल्हापुरामध्यें अस्तित्वांत नाहींत.

मध्ययुगीन काळांतील आज अस्तित्वांत असलेल्या इमारती म्हणजे श्रीमहालक्ष्मी, विठोबा, बिनखांबी गणपती, कपिलेश्वर, रंकोबा, उत्तरेश्वर, रंकाळ्यावरील नंदी वगैरे देवालयें, संध्यामठ, जुना राजवाडा, बाबूजमाल वगैरे मशिदी. शुक्रवारांतील जैन स्वामीचा मठ, शंकराचार्यांचा मठ, गुरुवारां-तील जैन बस्ती, वगैरे.



राजाराम कॉलेजच्या कलाविभागाची इमारत

आधुनिक कालांतील सुंदर इमारतींमध्यें तीन भाग पाडतां येतील. पहिला भाग म्हणजे दरबारनें बांधलेल्या इमारती. यांत रेसिडेन्सी, नवा राजवाडा, छ. प्रमिलाराजे हॉस्पिटल, टाऊन हॉल, पॅलेस थिएटर, नगर वाचन मंदिर, राजाराम कॉलेज, एम्. एल्. जी हायस्कूल, शालिनी पॅलेस वगैरेंचा समावेश करतां येईल. दुसरा भाग म्हणजे नगरपालिकेच्या इमारती; यांत गांधी मार्केट, शिवाजी मार्केट, भाई माधवराव बागल मार्केट, प्राथमिक शाळा वगैरेंचा समावेश करतां येईल. तिसरा भाग म्हणजे नागरिकांनीं बांधलेल्या इमारती; त्यांत लक्ष्मीपुरींतील जैन मंदिर, विशाळगडकरांचा बंगला, नागाळा बंगला, श्री. देवचंद शहा यांचा किरण बंगला, ताराराणी विद्यामंदिर, पद्माराजे हायस्कूल व ताराबाई पार्कांतील कांहीं बंगले यांचा निर्देश करतां येईल.

प्रकरण चौथें

# उद्यांचें कोल्हापूर

(१९५४- )

गेल्या तीन प्रकरणांत आजचें कोल्हापूर शहर गेल्या दोन हजार वर्षांत कसें वाढलें याचें वर्णन केलें. या शेवटच्या प्रकरणांत पुढील कालांत कोल्हापूर शहर कसें वाढूं शकेल अथवा वाढलें पाहिजे, याचा विचार करूं.

**२. कोल्हापूर वाढेल का?** यापुढील कालांत कोल्हापूर शहर वाढेल, कीं कमी होईल कीं तसेंच राहील, हा एक बऱ्याच मतभिन्नतेचा प्रश्न आहे. कित्येकांच्या मतें यापुढील कालांत कोल्हापूरला पूर्वीचें महत्त्व राहणार नाहीं. या मताच्या पुष्ट्यर्थ अनेक कारणें सांगितलीं जातात: (१) आतां छत्रपतींचेंच महत्त्व कमी झाल्यामुळें छत्रपतींचें निवासस्थान म्हणून कोल्हापूर जोमानें वाढणार नाहीं; (२) संस्थानें नाहींशीं झाल्यामुळें कोल्हापूरचें हायकोर्ट गेलें; एवढेंच नव्हे तर जिल्ह्याहून वरच्या दर्ज्याच्या सर्व कचेऱ्या गेल्या. यामुळें प्रांतिक शहराचें स्थान जाऊन कोल्हापूरला आतां फक्त जिल्ह्याच्या शहराचाच दर्जा राहिला आहे; (३) कोल्हापूरला आणखी कांहीं उद्योगधंदे वाढतील असें वाटत नाहीं; (४) सांगली, मिरज व बुधगांव हीं जवळजवळ एकमेकांत मिसळलीं आहेत. हीं तीन शहरें एक करण्याची योजना हातीं घेण्याचा विचार चालू आहे. ती यशस्वी झाल्यास कोल्हापूरपासून ३० मैलांवर एक नवीन २–२॥ लाख वस्तीचें शहर तयार होईल. त्याचा शह लागून कोल्हापूरची वाढ खुंटल्याशिवाय रहाणार नाहीं; वगैरे. या सर्व कारणांचा परिणाम म्हणून असें मानलें जातें कीं, यापुढें कोल्हापूर वाढणार नाहीं; फार तर इथली लोकसंख्या कमी न होतां हल्लींच्या एवढीच राहील असें म्हणतां येईल.

याच्या उलट असा एक विचार मांडला जातो कीं, येत्या १००।२०० वर्षांत कोल्हापूरची लोकसंख्या वाढत वाढत जाऊन ती २ ते २॥ लाख होईल. या मताच्या पुष्ट्यर्थही अनेक कारणें सांगितलीं जातात: (१) कोल्हापूरचा व्यापार वाढतो आहे व येथील उद्योगधंद्यांची वाढ होऊं घातली आहे; (२) कोल्हापूर जिल्ह्यांत नवीन साखर कारखाने निघणार आहेत, धरणें बांधलीं जावयाचीं आहेत; अल्युमिनियमचा कारखाना निघण्याची शक्यता आहे; इत्यादि गोष्टींमुळें कोल्हापूर जिल्ह्यांतील नैसर्गिक संपत्तीचा विकास होऊं लागेल व ज्या प्रमाणांत हा विकास घडून येईल त्या प्रमाणांत शहराची लोकसंख्या व महत्त्व वाढूं लागेल; (३) कोल्हापूरला मेडिकल कॉलेज निघण्याची शक्यता आहे व त्यामुळें या शैक्षणिक केंद्राला फारच महत्त्व येणार आहे; (४) कोल्हापूरची रेल्वे पुढें कोंकणांत नेली जाण्याची शक्यता आहे; अथवा याच जिल्ह्यांत निपाणी-


वरून दुसरा फाटा येऊं शकेल. त्याचाही कोल्हापूरवर परिणाम होईल; (५) संयुक्त महाराष्ट्रामुळें निपाणी कोल्हापूर जिल्ह्यामध्यें येईल व त्यायोगेंही कोल्हापूरचें महत्त्व वाढेल.

**३. शहरवाढीच्या योजनेचें मूलतत्त्वः**—या दोन परस्परविरुद्ध विचारप्रवाहाची फारशी चर्चा करण्याची जरूरी नाहीं. समाजांत नेहमीं आशावादी व निराशावादी व्यक्ती असतात व कितीही पांडित्य केलें तरी त्यांना ठराविक सांच्यांतील विचारसरणीच पटत असते. म्हणून हे दोन मतप्रवाह नाहींसे होतील असें वाटत नाहीं. पण सर्व गोष्टींचा विचार करून असें म्हणतां येईल कीं, यापुढील काळांत कोल्हापूर शहर वाढणारच आहे. पण ती वाढ कदाचित् मागच्या इतकी झपाट्यानें न होतां थोडी सावकाश होईल. यापुढें कोल्हापूर शहरच नव्हे, तर सबंध जिल्ह्याच्या सधनतेवर कोल्हापूर शहराची सधनता व वाढ अवलंबून रहाणार आहे. म्हणून जर कोल्हापूर जिल्हा व त्यांतील सर्व खेडीं सुधारावींत असा येथील लोकांनीं प्रयत्न केला, तर त्याला खचित यश येईल व त्यामुळें कोल्हापूर शहराचीही वाढ होईल. एकंदरींत पहातां हेंच मत जास्त व्यवहार्य वाटतें.

कोल्हापूर शहर जास्तींत जास्त किती वाढूं शकेल ? हल्लीं नगररचनाशास्त्रज्ञांचें मत आहे कीं, शहरें फार मोठीं वाढूं देऊं नयेत व कोणत्याही शहराची लोकसंख्या अडीच लाखांहून अधिक होऊं देऊं नये. म्हणून आपण जर मानलें कीं यापुढील काळांत कोल्हापूरची लोकसंख्या जास्तींत जास्त २॥ लाख होईल, तर तें फारसें चूक होणार नाहीं; कारण त्याहूनही अधिक लोकसंख्या होऊं घातल्यास दुसरें शहर वसविणें अधिक इष्ट होईल. म्हणून नगररचनाशास्त्राच्या दृष्टीनें अशी सूचना करतां येईल कीं, कोल्हापूरची लोकसंख्या जास्तींत जास्त अडीच लाख होणार आहे अशी कल्पना करून योजना तयार करावी. मात्र ही योजना अशी असावी कीं, तिचा अंमल क्रमाक्रमानें ( by stages ) करतां येईल. त्या योजनेंतील पहिला भाग म्हणजे सध्यां आहे त्याच लोकसंख्येची जास्त चांगल्या रीतीनें रहाण्याची सोय करणें हा असावा; व जशी लोकसंख्या वाढेल तसें त्या योजनेचे पुढील भाग अंमलांत आणले जावेत. सध्यां जी पाणीपुरवठ्याची योजना पुरी झाली आहे, ती या कल्पनेवरच आधारली आहे; कारण हल्लीं तिच्यामुळें १,५०,००० लोकसंख्येला रोज माणशीं २० गॅलनप्रमाणें पुरवठा होतो. पण जरूर पडेल तेव्हां २,५०,००० लोकसंख्येला दररोज माणशीं ३० ते ४० गॅलनप्रमाणें पाणी पुरविण्याची शक्यता त्या योजनेंतच आहे. ड्रेनेजची योजनाही अशाच लवचीक तत्त्वावर आंखण्यांत आली आहे. शहरवाढीची योजनाही त्याच तत्त्वावर आंखणें इष्ट होईल.

**४. उद्यांच्या शहराचा विस्तारः**—उद्यांच्या कोल्हापूरची लोकसंख्या २ ते २॥ लाख मानली, तर त्याचा विस्तार कोठें व कसा करतां येईल, याचा आपण आतां विचार करूं.

सध्यां कोल्हापूर शहराचें स्वरूप किती बदलें आहे याची कल्पना रात्रीच्या वेळीं पुणें रस्त्यावरून कोल्हापुराकडे पाहिलें म्हणजे येते. शिरोलीजवळच्या टेकडीवर उभा राहिलें म्हणजे पश्चिमेला शुगर मिलचे दिवे दिसतात; व तेथून थेट वळिवड्यापर्यंत दिव्यांची ओळच ओळ दिसूं लागते.




उद्यांच्या कोल्हापूरच्या सरहद्दी दाखविणारा नकाशा

यावरून चटदिशीं कल्पना येऊन जाते कीं, उद्यांच्या कोल्हापूरच्या मर्यादा नैसर्गिक रीत्याच ठरल्या गेल्या आहेत. **पश्चिमेस व उत्तरेस** पंचगंगा नदी ही एक निश्चित मर्यादा आहे. अगदीं नदीकांठाला शहर फक्त ब्रह्मपुरी, बापट कँप, वगैरेसारख्या एक दोन ठिकाणींच पोहोंचू शकेल. पण नदीकांठची उत्तम शेती जमीन शेतीखालींच राहणें इष्ट आहे व ती दरसाल पुराचे वेळीं पाण्याखालीं बुडते म्हणून सर्वसाधारणपणें असें म्हणतां येईल कीं, सध्यां जो टॉऊन हॉल तें शुगरमिल रस्ता आहे त्याच्या पश्चिमेस शहराची वाढ न होतां ती फक्त पूर्वेकडेच होईल. पश्चिमेकडे रंकाळ्याच्या बाजूला शहर फारसें वाढेल असें वाटत नाहीं. या भागांत केलेल्या फुलेवाडीच्या प्रयोगाला फारसें यश आलेलें नाहीं. म्हणून या भागांत शहरवाढीच्या योजना (एक अपवाद—तो पुढें सांगितला जाईल—खेरीजकरून) आंखल्या जाऊं नयेत असें वाटतें. **दक्षिणेला** नवा तुरुंग, विद्यापीठाचें तपोवन, ढोर वसाहत अगर शेंडापार्क या अखेरच्या मर्यादा आहेत. शहर यापर्यंतही कदाचित् वाढणार नाहीं. पण तें कांहीं वर्षांनीं त्यांच्या जवळजवळ जाईल; व या वसाहती आणि सध्यांचें शहर यामधली जागा भरून निघेल असा तर्क केला, तर तो फारसा चूक होणार नाहीं. **पूर्वेकडे** वळिवडे हें आजही कोल्हापूरचें उपनगर बनलें आहे व तें कायम त्याच नात्यानें रहाणार आहे. पण वळिवड्यापर्यंत सलग वसाहत होणार नाहीं. सध्यांचा पुणें–बेंगलूर रस्ता गांवांत आला आहे व तो गांवाबाहेरून नेण्याचा विचार चालू आहे. त्यामुळें जवळजवळ एक मैल अंतर कमी होत असल्यामुळें ही योजना लवकर पुरी होईल असें वाटतें. हा नवीन रस्ता शिरोली पुलाजवळून, उंचगांवच्या पलीकडून, राजाराम तलावाजवळून पण तो तलाव उजव्या म्हणजे शहराकडल्या बाजूस टाकून पुणें–बेंगलूर रस्त्याला पुनः येऊन मिळतो. हा रस्ता ही शहरवाढीची या बाजूची कमाल मर्यादा मानावी लागेल.

वरील वर्णनावरून उद्यांचें कोल्हापूर जास्तींत जास्त कोणत्या क्षेत्रांत वाढूं शकेल याची कल्पना येईल.

**५. चक्री रस्ता:**—उद्यांच्या कोल्हापुराची जी हद्द वर दर्शविली आहे, तिच्या सभोंवतीं एक वर्तुलाकार चक्री रस्ता आंखला जावा, अशी एक कल्पना बऱ्याच नागरिकांकडून मांडली जाते. कोल्हापूर हें एक अतिशय महत्त्वाचें रस्त्यांचें केंद्र आहे, म्हणून येथें अनेक रस्ते येऊन मिळतात. पण दुर्दैवानें हे बहुतेक रस्ते शहराच्यामधून जात असल्यामुळें मुख्यतः दोन तोटे होतात.

(१) या रस्त्यावरच्या जलद वहातुकीमुळें शहराच्या हद्दींत अपघात होणेचा फार संभव असतो.

(२) शहराच्या हद्दींतील या रस्त्यांचा भाग दुरुस्त ठेवणें फार खर्चाचें होतें व त्याचा सर्व ताण निष्कारण नगरपालिकेवर पडतो.

हल्लीं नगररचनातज्ज्ञांची प्रवृत्ति असले रस्ते शहराबाहेरून काढण्याकडे आहे; **व आम्हालाही** हे लांब पल्ल्याचे रस्ते (Trunk Roads) शक्य तितक्या लवकर शहराच्या हद्दीबाहेर टाकावे

लागतील. हें ध्येय साधण्याचा उत्तम मार्ग म्हणजे नवीन वसाहतीसाठी जो भाग शहराच्या हदींत सामील करावयाचा आहे तो करून मग विस्तार झालेल्या शहरासभोंवती एक चक्राकार रस्ता आंखणें हा होय.

हा सर्व रस्ता एकदम करणेची जरूरी नाही. प्रथम पुणें–बेंगलोर रस्त्यापासून सुरवात करतां येईल. शिरोली पुलापासून सुरवात करून राजाराम तलावाच्या पलीकडून पुन्हां पुणें–बेंगलोर रस्त्याला हा नवीन फाटा जोडतां येईल. त्यानंतर या जोड बिंदूपासून दुसरा रस्ता सुरू करून तो शेंडा पार्क वसाहतीजवळून प्रथम नव्या सुरुंगाकडे, व नंतर तेथून राधानगरी रस्त्याला जोडतां येईल. शालिनी पॅलेसच्या पाठीमागून एक नवीन रस्ता सध्यां काढण्यांत आला आहे व त्यामुळें गगनबावडा रस्ता राधानगरी रस्त्यास जोडला जातो. हा रस्ता ज्या ठिकाणीं राधानगरी रस्त्यास मिळतो त्याच ठिकाणी या नवीन पुणें– बेंगलोर व राधानगरी रस्त्यांना जोडणारा रस्ता मिळविला जावा. अशारीतीनें तीन किंवा चार टप्प्यांनीं हा चक्री रस्ता पुरा करतां येण्यासारखा आहे. उद्यांच्या शहरवाढीमध्यें ज्या अनेक योजना घ्याव्या लागतील, त्यांत या चक्री रस्त्याला बरेंच प्राधान्य द्यावें लागेल यांत शंका नाही.

**६. हिरवा कटिबंधः**—कोल्हापूर शहराची यापुढील वाढ करतांना मागें झालेली एक चूक टाळली पाहिजे. आतांपर्यंतची परंपरा अशी आहे कीं, शहरामध्यें खुली जागा राहूं द्यावयाची नाही आणि प्रत्येक भागावर इमारती बांधावयाच्याच, उत्तम शेती जमिनीचा नाश करून व पायाभराई-साठीं हजारों रुपयांचा फुकट खर्च करून आम्ही आतांपर्यंत लक्ष्मीपुरी, साकोली वगैरे भागांत घरें बांधलीं आहेत. नगररचनाशास्त्राच्या दृष्टीनें ही मोठी चूक आहे, व ती आपण यापुढें दुरुस्त केली पाहिजे.

नगररचनाशास्त्राच्या दृष्टीनें शहराला दोन तऱ्हेचें क्षेत्र लागतें:—

(अ) एक क्षेत्र अशा प्रकारचें असावें लागतें कीं, त्याचा उपयोग मुख्यतः घरें बांधण्याकरितां केला जावा. अशा क्षेत्रांत जी थोडीबहुत जमीन घरें बांधण्याच्या दृष्टीनें निरुपयोगी असते, तिचा उपयोग सर्वसाधारणपणें क्रीडांगणें, बागा, खुल्या जागा ( air spaces ) वगैरेसाठीं केला जातो.

(ब) शहराच्या जीवनाला लागणारें दुसरें क्षेत्र कृषिप्रधान असावें लागतें. त्याचा उपयोग सर्वसाधारणपणें फळफळावळ, फुलें, भाजीपाला वगैरे शहरांतील लोकांना लागणाऱ्या नेहमीच्या वस्तु पिकविण्याकडे केला जातो. या क्षेत्राला शास्त्रीय भाषेंत **हिरवा कटिबंध** ( green belt ) असें संबोधिलें जातें.

कोल्हापूर शहराची या दृष्टीनें पहाणी केली तर असें दिसून येतें कीं, इमारतींसाठीं उपयुक्त क्षेत्र आजच्या शहराच्या दक्षिणेस, पूर्वेस व कांहीं अंशीं उत्तरेस आहे. पश्चिमेकडील बहुतेक सर्व भाग व उत्तरेकडील कांहीं भाग हा नदीकांठचा आहे. या भागांतील जमीन पुराचे वेळीं पाण्याखालीं



बुडते; त्यांत पाया लागत नाहीं; शिवाय ही जमीन चांगल्या कसाची व उत्कृष्ट पीक देणारी आहे. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां पश्चिमेकडील सर्व भाग व उत्तरेकडील नदीकांठचा भाग हे हिरव्या कटिबंधासाठीं राखून ठेवणेंच जनतेच्या हिताचें होणार आहे.

एका काळीं कोल्हापूर शहरासभोंवती अनेक बागा होत्या; व शहराला लागणारा सर्व भाजीपाला आणि फुलें शहराजवळच तयार होत असत. सध्यां फुलें आणि भाजी यांची आयात पुण्याहून करावी लागते. या परिस्थितींत बदल करण्यासाठीं शहराच्या हद्दीतील सुपीक जमिनीचा उपयोग करावा हेंच योग्य. म्हणजे शहराभोंवतालच्या या हिरव्या कटिबंधानें शहराचें आरोग्य आणि सौंदर्य तर वाढेलच; एवढेंच नव्हे तर शहराच्या आर्थिक स्थितीतहि यापुढें भक्कम सुधारणा होईल.

**७. शिक्षणकेंद्राची स्थापना**:—कोल्हापूर शहरामध्यें आतांपर्यंत वेळोवेळीं नऊ केन्द्रें स्थापन झालीं आहेत, हें मागें सांगितलेंच आहे. दुर्दैवानें कोल्हापूरला फार मोठें शैक्षणिक महत्त्व असूनही शहरामध्यें शैक्षणिक केंद्र असें अद्याप स्थापन झालेलें नाही. उद्यांच्या कोल्हापुरामध्यें या शैक्षणिक केंद्राची स्थापना शक्य तितक्या लवकर केली गेली पाहिजे. सध्यां कोल्हापुरामध्यें राजाराम कॉलेज, गोखले कॉलेज, शहाजी लॉ कॉलेज व एस्. एम्. टी. डी. कॉलेज अशी चार कॉलेजें आहेत. शिवाय कॉमर्स कॉलेज व मेडिकल कॉलेज होण्याची शक्यता आहे. या सर्व संस्था एकाच ठिकाणीं करतां येतील अशा रीतीनें प्रशस्त जागा निवडून त्यावर सर्व संस्थांची सोय करतां येईल; किंवा या सर्व संस्थांना एकाहून अधिक केन्द्रांमध्यें विभागून दोन अथवा तीन शिक्षणकेन्द्रें निर्माण करतां येतील. या प्रश्नाचा जास्त तपशीलवार विचार करून आतांच निर्णय सांगणें कठिण आहे. पण या प्रश्नाचा उद्यांच्या कोल्हापूर शहरासाठीं 'मास्टर प्लॅन' तयार करतांना चांगला विचार झाला पाहिजे यांत शंका नाहीं.

**८. मास्टर प्लॅनः**—उद्यांच्या कोल्हापुराचें क्षेत्र सर्वसाधारणपणें ठरल्यावर त्याची तपशील-वार आंखणी करणें जरूर आहे. यालाच शहराचा 'मास्टर प्लॅन' तयार करणें असें म्हणतात. नगरपालिकेच्या या १०१ व्या वर्षी उद्यांच्या कोल्हापूरचा मास्टर प्लॅन तयार करण्याच्या कार्याची सुरवात करावी व १।२ वर्षांत तो पुरा करावा, अशी नगरपालिकेची इच्छा आहे. हा प्लॅन तयार करतांना तो त्यांत कांहीं दोष राहूं नयेत म्हणून तज्ज्ञांचा सल्ला घेतला जाईल व नागरिकांचें मत अजमावूनच अखेरचे निर्णय घेतले जातील; पण यामध्यें जे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होतील त्यासंबंधीं कांहीं विचार लोकमत जागृतीच्या दृष्टीनें येथें दिले आहेत:—

**(१) दगडांच्या खाणी**:—आतांपर्यंत दगडाच्या खाणीसाठीं जागा निवडतांना फार चुका झाल्या आहेत. प्रथम जिवीच्या ओढ्यापलीकडे कोटितीर्थाजवळ खाणींना जागा दिली गेली. ही जागा निवडतांना जरी ती गांवाबाहेरची म्हणून निवडली, तरी शहराची वाढ झाल्याबरोबर ती जागा गांवांतच आली. त्यामुळें या खाणी बंद करून राजारामपुरींत टाकाळ्याजवळ खाणी केल्या गेल्या.

या खाणीदेखील कांहीं कालानें गांवांत आल्या म्हणून कावळ्याच्या माळावर नवीन खाणी काढल्या. त्याही खाणी आतां गांवांत आल्या आहेत. याच्यापासून आपण बोध घेतला पाहिजे; आणि प्रथम खाणी काढावयाच्या व नंतर त्या मुजवत बसावयाच्या हा प्रकार बंद केला पाहिजे; म्हणून यापुढच्या खाणी शहराच्या हद्दीबाहेर आणि शहर जिकडे वाढत नाहीं त्या दिशेला कराव्या लागतील.

**(२) कुंभारांचीं घरें:**—कुंभारांचीं घरें गांवांतून बाहेर काढलीं पाहिजेत हें योग्य आहे. पण या बाबतींतहि पूर्वी झालेल्या चुका टाळल्या पाहिजेत. कुंभारांच्या वसाहतीसाठीं लक्षतीर्थाच्या बाजूस नदीकांठीं जागा निवडावी लागेल. या ठिकाणीं एक मोठा प्रशस्त माळ असल्यामुळें घरें बांधण्यास सोयीचें होणार आहे. शिवाय कुंभारांना लागणारी माती याच ठिकाणीं मिळूं शकते व त्यांच्यासाठीं पाण्याची सोय देखील अगदीं कमी खर्चांत करतां येईल. शिवाय या भागाला शहर वाढत नसल्यामुळें ही वसाहत पुन्हां गांवांत येणार नाहीं.

**(३) लोणाऱ्यांचीं घरें:**—सध्यां लोणाऱ्यांच्या भट्टया गांवांतच आहेत व त्यामुळें आरोग्याला उपसर्ग होतो व आगीचा धोका निर्माण होतो. म्हणून या सर्व भट्टया गांवाबाहेर नेणें जरूर आहे. अशातऱ्हेचे उपसर्गकारक धंदे नेहमीं शहराच्या ईशान्य कोंपऱ्यांत टाकले जातात. कारण त्यामुळें त्यांच्यापासून शहराला घाणीचा त्रास होत नाहीं. (या प्रदेशांत नैऋत्येकडून ईशान्येकडे वारे बहुधा वहात असते म्हणून) लोणाऱ्यांच्या वसाहतीसाठीं शिरोली पुलाच्या आसपास कोठें तरी जागा निवडून द्यावी लागेल.

**(४) गूळ मार्केट:**—शाहूपुरी पेठ ही प्रथम व्यापारासाठीं स्थापन झाली असली, तरी आधुनिक व्यापारी पेठेला ज्या सुखसोयी लागतात, त्या या वसाहतीमध्यें केल्या गेल्या नाहींत व आतां त्या करणें अशक्य आहे. शिवाय शाहूपुरीमध्यें अर्ध्याहून अधिक घरें राहण्यासाठीं वापरलीं जातात व ज्या घरांमध्यें दुकानें आहेत त्यांचाही अंशतः रहाण्यासाठीं उपयोग केला जातो. म्हणून गूळ मार्केटसाठीं एक स्वतंत्र जागा निवडण्यांत आली असून, तेथें एक रेल्वे-स्टेशनहि करणेंत येणार आहे. ही योजना शक्य तितक्या लवकर पुरी करणेंत आली पाहिजे. त्यामुळें पेठेची उत्तम सोय होईल व शाहूपुरींतील सर्व घरें नागरिकांना रहावयासाठीं मिळतील.

**(५) ढोर वसाहत:**— पूर्वी ढोरांचीं घरें रविवारांत होतीं. ती वसाहत यल्लमाच्या माळावर १९२६-२७ सालीं नेण्यांत आली. पण कुंभारांच्या घराप्रमाणेंच हा प्रयोगहि योग्य पद्धतीनें केला गेला नाहीं. त्यामुळें सध्यां रविवारांत आणि यल्लमाच्या माळावर अशा दोनहि ठिकाणीं ढोर वसाहत आहे. शिवाय यल्लमाच्या माळावर ढोर वसाहतीला जागा निवडणें हें चूक आहे. कारण ही जागा शहराच्या नैऋत्य कोपऱ्याला आहे व त्यामुळें त्याची घाण सागरच्या माळावर येईल; त्यामुळें तेथें वसाहत करणें शक्य होणार नाहीं. सर्व गोष्टींचा विचार करतां ढोर वसाहतीला राजाराम तलावाजवळ जागा देणें इष्ट होईल असें वाटतें.



**(६) ड्रेनेज:**—कोल्हापूर शहरांतील सांडपाणी व मैला यांचा निचरा करण्यासाठीं जमिनी-खालून वहाणाऱ्या गटारांची सोय करणें जरूर आहे. या योजनेस नगरपालिकेस अदमासें ६५ लाख रुपये खर्च येईल; पण त्याची तरतूद करून ही योजना हातीं घेतली पाहिजे.

**९. शहरवाढीची एक योजना:**—मास्टर प्लॅन तयार करतांना विसर पडूं नये म्हणून कोल्हापूरच्या रीजन्सी कौन्सिलनें १९४४ सालीं श्री. जी. एस. देसाई या प्रसिद्ध नगररचनाशास्त्रज्ञाचा सल्ला घेऊन जी शहरवाढीची योजना तयार केली होती, ती पुढें देणेंत येत आहे:—

## शहरवाढीची योजना (१९४४)

" या योजनेचा उद्देश सुमारें ५००० एकरांची भर घालून कोल्हापूर शहराची मर्यादा वाढविणें हा आहे. त्यांपैकीं २००० एकरांत पुढील दहा वर्षांत वसाहत करावयाची असून उरलेली ३००० एकर जागा भावी कालांतील प्रगतीसाठीं राखून ठेविली आहे. या पत्रकांत दरबारनें शहरवाढ करण्याचें कां ठरविलें आहे व शहरवाढीची योजना कशा रीतीनें अंमलांत येणार याचा विचार करावयाचें योजिलें आहे.

### शहरवाढीची आवश्यकता

एकंदरींत सगळ्या हिंदुस्थानांतील शहरांच्या लोकसंख्येची वाढ झपाट्यानें झालेली आहे व युद्धोत्तर कालांत शहराची वाढ अधिक झपाट्यानें होईल असें मानलें जातें. पुढील वीस वर्षांत कोल्हापूरची लोकसंख्या दीड लाखानें वाढेल व जवळ जवळ एकंदर लोकसंख्या दोन किंवा अडीच लाख होईल असा तर्क आहे. याविषयीं कांहींजणांचें असें मत आहे कीं, लोकसंख्येचे हे आंकडे फारच कमी कल्पिले आहेत व कोल्हापूर हें पांच लाख लोकसंख्येचें शहर होईल असा त्यांना विश्वास वाटतो. या बाबतींत निश्चित मत व्यक्त करणें केव्हांहि शक्य नाहीं. कोल्हापूरची लोकसंख्या जास्तींत जास्त अडीच लाख होईल असें मी मानतों. कारण शहरांत होणाऱ्या वाजवीपेक्षां जास्त अशा लोकसंख्येला सक्तीनें आळा घातला पाहिजे, या नगररचनेच्या सिद्धांताप्रमाणें मला हा निर्णय घ्यावा लागला आहे. नगररचना करणारे तज्ज्ञ आतां असें मानतात कीं, अडीच लाख लोकसंख्या हें उत्कृष्ट शहराचें लक्षण आहे. कोल्हापूरची रचना करणाऱ्यांनाहि या तत्त्वाप्रमाणेंच आपलें कार्य करावें लागेल आणि म्हणून शहराची लोकसंख्या अडीच लाख होईल असें मी गृहीत धरलें आहे.

या वाढत्या लोकसंख्येला राहाण्यासाठीं योग्य अशी जागा पुरवावयाची असल्यास हल्लींची शहराच्या मर्यादेची वाढ तात्काळ केली पाहिजे हें उघड आहे. सध्यां शहराचा एकंदर आकार ४२९२ एकर आहे. जागेची एवढी मर्यादा शहराला अत्यंत अपुरी आहे, हें पुढील कारणांवरून दिसून येईल:—

(अ) त्यांपैकीं पुष्कळ जागा घरें बांधण्यासाठीं मिळण्याजोगी नाहीं. उदाहरणार्थ, वर सांगितलेल्या शहराच्या मर्यादेंत २८० एकरांचा रंकाळा तलाव व ५२ एकरांचा पद्माळा तलाव यांचा समावेश होतो. तसेंच शेंकडों एकर जमीन पावसाळ्यांत जलमय होते. ही सगळी जागा नगररचनेच्या दृष्टीनें निरुपयोगी आहे. म्हणून वास्तविक रीतीनें २७०० एकर जागा शहरवाढीच्या दृष्टीनें उपलब्ध होण्याजोगी आहे.

(ब) नगररचना करण्याचें एक सामान्य तत्त्व असें आहे कीं, सुमारें एक एकर जागा २५ लोकांसाठीं आवश्यक आहे. या तत्त्वानुसार आम्हांला अडीच लाखांच्या लोकसंख्येला दहा हजार एकर जागा पाहिजे. असें असतां हल्लीं चार हजारांपेक्षां थोडी जास्त एकर जागा आमच्याजवळ आहे.

(क) कोटभागांत फार दाटी झाली आहे. या भागांतील लोकसंख्या सुमारें ३०,००० आहे व ही ११२ एकर इतक्या जागेंत समाविष्ट झाली आहे. आतां नगररचनेची योजना हातीं घेतली असून ही दाटी कमी करण्याचें ठरविलें आहे. नवीन वसाहतीची रचना केल्याखेरीज व तेथें दाट वस्तीच्या भागांतील लोकांसाठीं घरें बांधल्याखेरीज ही योजना तडीला जाणार नाहीं.

(ड) हल्लीं आमच्या शहरांत सार्वजनिक बागा, क्रीडांगणें, शाळा–इमारती व अशा सार्वजनिक संस्थांची फार उणीव आहे. कोल्हापुरासारख्या प्रमुख शहराला या आवश्यक गोष्टी पुरवावयाच्या असतील तर कांहीं भागांत पाडापाडी करणें अपरिहार्य आहे. म्हणून शहरवाढीची योजना हातीं घेतली तरच घरें नसलेल्या लोकांची सोय करतां येईल.

(ई) हल्लीं असलेल्या लोकसंख्येच्या दृष्टीनें शहराचा विस्तार योग्य आहे असा जरी युक्तिवाद केला, तरी तो हल्लींच्या नगरपालिकेच्या हद्दींतील वाढत्या लोकसंख्येला अपुरा पडणार हें कोणीहि नाकबूल करणार नाहीं.

या सर्व कारणांमुळें शहरवाढीची योजना तात्काळ हातीं घेतली पाहिजे हें उघड आहे.

## शहराच्या हद्दींत आणावयाची जागा

नगररचनेच्या सल्लागारांनीं पांच हजार एकर इतकी नगरपालिकेच्या हद्दींत भर घालावी असें योजिलें आहे. त्यांच्या अहवालांतील पुढील उतारा मी उद्धृत करितों:—

"हल्लींच्या शहरांतील लोकसंख्येपैकीं सुमारें वीस हजार लोकांनीं रस्त्याची योजना, शाळांना जागा मिळविणें, क्रीडांगणें, उद्यानें व अशाच सार्वजनिक कार्यांसाठीं दाट वस्तीच्या भागांतून दूर गेलें पाहिजे. ही गोष्ट अर्थातच सावकाशीनें होणार असून त्याला सुमारें ३० वर्षांचा अवधि लागेल. अशा रीतीनें एकंदर १,७६,००० इतक्या लोकांसाठीं प्रथमतः मोकळ्या जागेची तरतूद करणें जरूर आहे. प्रत्येक



एकरीं जास्तींत जास्त ५० लोक गृहीत धरल्यास सर्वांना राहण्यासाठीं ३५४० एकरांची आवश्यकता आहे.

आधुनिक आरोग्याच्या व नगररचनेच्या दृष्टीनें, १,७६,८५० इतक्या लोकसंख्येला क्रीडांगणें, बागा, मोकळी जागा, प्राथमिक शाळा, स्थानिक कचेऱ्या व इतर सार्वजनिक गोष्टी यांसाठीं ७०० एकर जागेची आवश्यकता आहे.

राधानगरी हैड्रो–इलेक्ट्रिक योजनेच्या यशस्वितेमुळें स्वस्त दरांत वीज मिळेल व त्यामुळें अनेक धंदे निर्माण होतील अशी अपेक्षा आहे. म्हणून सुमारें ३०० एकर जागा या उद्योगधंद्यांसाठीं राखून ठेवणें जरूर आहे.

नवीन वसाहतींत आर्ट्स् व सायन्स कॉलेज न्यावें असा दरबारचा हेतु आहे. तसेंच भावी काळांत, शेतकी कॉलेज, इंजिनिअरिंग कॉलेज, कॉमर्स कॉलेज या संस्थादेखील दरबारकडून चालविल्या जातील. म्हणून अशा संस्थांसाठीं जागा राखून ठेवणेंहि जरूर आहे. आर्ट्स व सायन्स कॉलेज व वर उल्लेखिलेल्या भावी काळांत स्थापिल्या जाणाऱ्या संस्था यांसाठीं ३०० एकर जागा पुरेशी आहे. तसेंच सिनेमा-स्टुडिओसाठीं १०० एकर जागा राखून ठेवावी, असेंहि मी सुचवितों. अशा प्रकारें आम्हांला पुढीलप्रमाणें जागेची आवश्यकता आहे:—

१. ३५४० एकर रहिवासी व दुकानें इ.
२. ७०० „ बागा, शाळा इत्यादि सार्वजनिक संस्था.
३. ३०० „ उद्योगधंदे.
४. ३०० „ कॉलेजें.
५. १०० „ सिनेटोन्स व फिल्म स्टुडिओज.

अशा रीतीनें सुंदर व भव्य अशा कोल्हापूर शहराच्या संपूर्ण रचनेला ५००० एकर जागेची आवश्यकता आहे."

ही सर्व वसाहत एकदम करण्याचा विचार नाहीं. २००० एकर जागेंत वसाहत करावी, १०,००० इमारतींचे प्लॉट्स् व इस्पितळें, कॉलेजें, सरकारी इमारती, सिनेटोन्स व फिल्म स्टुडिओज् इत्यादि गोष्टींसाठीं जागेचा पुरवठा करण्याची शहरवाढीची योजना आंखावी असें मी सुचवितों.

## योजनेची प्राथमिक प्रसिद्धि

नगररचनेच्या तज्ज्ञांनीं तयार केलेली शहरवाढीची योजना माझ्या हातीं आली आहे. मला ती योजना मान्य असली तरी तिला एकदम अखेरची मान्यता देण्याच्या मी विरुद्ध आहें. अशा प्रकारच्या महत्त्वाच्या योजनेच्या बाबतींत त्या विषयाचा सर्व बाजूंनीं विचार करणें व सर्व लोकांच्या ज्या सूचना येतील त्यांचाहि विचार करणें आवश्यक आहे. म्हणून

मी त्यांच्या योजनेला तात्पुरती मान्यता द्यावी व लोकमत पाहण्यासाठी प्रसिद्ध करावी असें सुचवितों. या योजनेचा ज्यांच्यावर परिणाम होईल अशांकडून व एकंदर समाजाकडून या योजनेवरील सूचना व आक्षेप मागवावेत. नंतर त्यांचा काळजीपूर्वक विचार करूनच या योजनेला मान्यता देण्यांत यावी.

## सट्टेबाजीला बंदी

आम्हांला एका विशेष मानवी दोषाची खबरदारी घेतली पाहिजे. या योजनेच्या प्रसिद्धीमुळें पुढील दोन अनुचित गोष्टी घडून येतील अशी भीति व्यक्त केली जाते:—

(१) भांडवलदार हे सुचविलेल्या मोकळ्या जागा घेण्याचा अगोदर प्रयत्न करतील व त्यामुळें अशा चढाओढीच्या खरेदीमुळें जागांच्या किंमती भरमसाट वाढतील.

(२) दरबारचे किंवा नगरपालिकेचे नोकर या जागा मिळविण्याचा प्रयत्न करतील. या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी मी पुढील उपाय सुचवितों:—

(१) दरबारच्या गॅझेटमध्यें नोटीस आल्यानंतर सरसुभ्यांच्या लेखी परवानगी-खेरीज कोणाहि व्यक्तीला सुचविलेल्या भागांतील जागा विकतां किंवा खरेदी घेतां येऊं नये.

(२) शहरवाढीच्या योजनेला जरूर असणाऱ्या मालमत्तेबद्दल मोबदला देतांना नोटीस दिल्यावेळचा बाजारभाव विचारांत घेतला जावा व लॅंड ॲक्विझिशन कायद्या-प्रमाणें ती ताब्यांत घेतलेल्या तारखेच्या वेळचा बाजारभाव विचारांत घेतला जाऊं नये.

(३) दरबारच्या किंवा नगरपालिकेच्या नोकराला कौन्सिल किंवा कलेक्टर यांच्या पूर्व मंजुरीशिवाय कोणतीहि जागा खरेदी करण्याला सवड असूं नये.

## सल्लागार मंडळ

या योजनेसंबंधीं लोकमत अजमावण्यासाठी एक सल्लागार मंडळ असणें योग्य आहे. शहरवाढीच्या सर्व योजनांच्या बाबतींत सल्ला देणें हें या मंडळाचें कार्य राहील.

## शहरवाढीच्या योजनेचे भाग

या शहरवाढीच्या योजनेचे दोन भाग करण्यांत आले आहेत:—

१ दक्षिण व पूर्व आणि

२ उत्तर

पहिल्या दोन भागांचा मध्यम व गरीब स्थितींतील लोकांसाठी घरें बांधण्याला उपयोग व्हावयाचा आहे; व उत्तर भाग श्रीमंत व वरच्या दर्जांतील लोकांच्या राहण्यासाठी उपयोगांत आणला जाईल. शहरवाढीच्या खालाच्या जुन्या पद्धतीप्रमाणेंच हें धोरण आहे व त्याला कौन्सिलनें मान्यता द्यावी अशी मी शिफारस करितों.



## गरीब लोकांना घरें बांधण्याच्या सोयी

या शहरवाढीचा मुख्य हेतु गरीब व मध्यम स्थितींतील लोकांना घरें बांधण्याच्या सोयी सुलभ करण्यात हा आहे. या बाबतींत दरबारचें धोरण स्पष्टपणें निश्चित करणें जरूर आहे. या बाबतींत दरबारनें दक्षता घेतली नाहीं तर शहरवाढींतील इमारती बांधण्याच्या नवीन जागा भांडवलदारांच्या हातीं जातील आणि मध्यम व गरीब लोकांना हल्लींप्रमाणेंच कसल्याहि प्रकारच्या घरें बांधण्याच्या जागेशिवाय रहावें लागेल.

शहरवाढीच्या योजनेमुळें १०,००० इमारतीच्या प्लॉट्सचा पुरवठा होईल असा अंदाज आहे. त्यांपैकीं २००० किंवा उपलब्ध होणाऱ्यांपैकीं शेंकडा २० प्लॉट्स विशेषतः गरीब लोकांसाठी साधारणपणें मागासलेल्या जातींसाठी राखून ठेवावेत. या जातींतील लोकांना प्लॉट्स देण्यांत पुढील तत्त्वांचा स्वीकार करण्यांत यावा:—

(१) या जागांवर बिनशेतकी आकार बसूं नये; कारण तो गरीब लोकांना डोईजड होतो.

(२) प्रत्येक प्लॉट अविभाज्य अथवा अविक्रेय राहावयाचा या अटीवर देण्यांत यावा. प्लॉटचा बाजारभाव कमी होईल, पण मालकाला व त्याच्या वंशजांना घरविक्री-मुळें होणाऱ्या नुकसानीपासून सुरक्षितता मिळेल.

(३) गरीब लोकांना प्लॉट्स देतांना, कांहीं सामान्य तत्त्वें डोळ्यांपुढें ठेविली पाहिजेत. उदाहरणार्थ, हरिजन, युद्धांतून आलेले शिपाई, दरबारचे किंवा स्थानिक संस्थेचे नोकर यांना अगोदर संधि द्यावी.

या स्थितींत यांपैकीं कोणत्याहि मुद्यावर निर्णय घेणें हें साहसाचें आहे. मी सुचविलेल्या सल्लागार मंडळाबरोबर या विषयाची चर्चा करून कौन्सिलपुढें मंजुरीसाठी निश्चित योजना ठेवण्याचें ठरविलें आहे. याला स्वाभाविकच कांहीं काळ लागेल; पण मध्यंतरीच्या काळांत वरील धोरणाला सर्वसाधारण मान्यता देणेस हरकत नाहीं.

## मध्यम वर्गांतील लोकांना घरांच्या सोयी

मध्यम वर्गांतील लोकांना घरांच्या जागा पुरविण्याचा प्रश्न थोडासा वेगळ्या प्रकारचा आहे. या लोकांना इमारतीच्या जागा मोफत देण्याची गरज नसली तरी ते जास्तींत जास्त स्वस्त दरांत दिले पाहिजेत. यामुळें त्यांच्याजवळ असलेल्या मोजक्या पैशांत त्यांना घरें बांधण्याला सोपें जाईल व आमचा घरें बांधण्याचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटण्याला मदत होईल.

मध्यम वर्गांतील लोकांना घरांचा पुरवठा करण्याचा सोईस्कर मार्ग म्हणजे को-ऑप. हाउसिंग सोसायटीज स्थापन करण्याला उत्तेजन देणें हा आहे. म्हणून को-ऑप. सोसायटीचे रजिस्ट्रार यांना कांहीं को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीज् यांची स्थापना, खर्च इत्यादिविषयीं योजना सुचविण्याला विनंति करण्यांत यावी. मध्यम वर्गांतील ज्या लोकांना

इमारतीचे प्लॉट्स हवे असतील त्यांना अशा को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे सभासद होण्याला सांगावें. दरबारनें कांहीं इमारतींचे प्लॉट्स या को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या ताब्यांत द्यावेत व सोसायटींनीं हे प्लॉट्स आपल्या सभासदांत वाटून, जेथें आवश्यक असेल तेथें घरें बांधण्याच्या खर्चाचीहि तरतूद करावी.

अगोदरच ज्यांचीं स्वतःचीं घरें आहेत त्यांना को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीजचा व त्यांच्या मार्फत मिळणाऱ्या स्वस्त जागांचा फायदा मिळून देण्याची दक्षता घेतली पाहिजे अशी एक सूचना केली जाते. यासाठीं कोल्हापूर नगरपालिकेच्या हद्दींत ज्यांचीं स्वतःचीं घरें आहेत त्यांच्यापेक्षां ज्यांचीं घरें नाहींत त्यांना अगोदर जागा देण्यांत यावी असा नियम करण्यांत यावा, ही फार चांगली सूचना आहे व कौन्सिलकडून त्याला मान्यता मिळेल अशी माझी खात्री आहे.

### प्लॉट्सची विक्री

अशा रीतीनें मध्यम व गरीब वर्गांतील लोकांसाठीं इमारतींचे प्लॉट्स राखून ठेवल्यानंतर सुमारें शेकडा ४० प्लॉट्स जाहीर लिलांवानें विकतां येतील. असें करणें हें रस्ते तयार करणें, गटारें करणें इत्यादि कामांसाठीं पैसा मिळविण्याच्या दृष्टीनें आवश्यक आहे.

### श्रीमंत लोकांसाठीं घरांच्या सोयी

शहरवाढीच्या योजनेच्या उत्तरेकडील भागांत इमारतींचे प्लॉट्स सुमारें ४ एकरांचे रहातील. हे प्लॉट्स् केवळ श्रीमंत लोकांसाठींच असून जाहीर लिलांवानें विकले जातील.

**मा. र. बागवे,**
सुधारणा मंत्री "

**१०. समारोपः**—उद्यांचें कोल्हापूर म्हणजे अखिल महाराष्ट्रांतील एक आदर्श शहर व्हावयाला पाहिजे. निव्वळ लोकसंख्येच्या दृष्टीनें पाहावयाचें झाल्यास महाराष्ट्रांत कोल्हापूरचा पांचवा नंबर लागतो. पण नागपूर व सोलापूर हीं थोडी बाजूस पडतात व सर्वसाधारण जनता मुंबई, पुणें व कोल्हापूर अशाच क्रमानें महाराष्ट्रांतील शहरें मोजीत असते. शिवाय गोष्ट अशी आहे कीं, लोकसंख्या जरी कमी असली तरी धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक व शैक्षणिक दृष्टीनें कोल्हापुरास जें महत्त्व आहे तें महाराष्ट्रांतील इतर कोणत्याही शहराला नाहीं. या सर्व दृष्टिकोनांतून विचार करितां कोल्हापूरला अखिल महाराष्ट्रांत एक अपूर्व स्थान आहे हें लक्षांत येईल. त्याला साजेसें शहर बनविणें, हें आपणां सर्वांचें कर्तव्य आहे.

या पवित्र कार्याला नगरपालिकेनें आपल्या आयुष्याच्या दुसऱ्या शतकामध्यें प्रवेश करतांना सुरवात करावी व सरकारच्या आणि नागरिकांच्या साहाय्यानें तें शक्य तितक्या लवकर पार पाडावें, अशी आमची इच्छा आहे.

जयहिंद

# आभार

नगरपालिकेच्या इतिहासाच्या कामासारखें सार्वजनिक महत्त्वाचें काम सर्वांच्या हार्दिक सहकार्यानेंच पूर्ण होऊं शकतें. त्यामुळें कोल्हापूर नगरपालिकेचा इतिहास, आजची नगरपालिका व कोल्हापूर शहराचा इतिहास या तीन भागांचा हा ग्रंथ तयार करतांना आम्हांला अनेकांचें साहाय्य घ्यावें लागलें. या सर्वांचा उल्लेख येथें करतां न आला, तरी खालील व्यक्तींचा व संस्थांचा निर्देश न करणें म्हणजे कर्तव्यच्युति होईल असें वाटतें. म्हणून या ग्रंथासाठीं ज्यांनीं ज्यांनीं साहाय्य दिलें त्या सर्वांचे व विशेषतः खालीं नमूद केलेल्या संस्थांचे व व्यक्तींचे मी नगरपालिकेतर्फे आभार मानतों.

१. **संपादक मंडळ:** श्री. जे. पी. नाईक, श्री. रमेश मंत्री व श्री. मा. भी. सोलापुरे.


२. कोल्हापूर शहरची आर्थिक व सामाजिक पाहणी करणारी संस्था दि गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स् अँड इकॉनॉमिक्स, पुणें व तिचे कार्यकर्ते प्रा. धनंजयराव गाडगीळ व श्री. न. वि. सोवनी.

३. ब्रह्मपुरींतील उत्खनन करणारे डॉ. एच्. डी. सांकलिया व डॉ. एम्. जी. दीक्षित आणि दि डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट रीसर्च इन्स्टिट्यूट, पुणें.

४. श्री. भाऊसाहेब सहस्रबुद्धे, प्रोप्रायटर, श्रीज्ञानेश्वर प्रेस, कोल्हापूर.

५. फोटोग्राफर व ब्लॉकमेकर श्री. डी. डी. बराले व फोटोग्राफर श्री. जी. एन्. हळदीकर.

**जी. ए. कदम**
**मुख्याधिकारी**
कोल्हापूर नगरपालिका.




# MAP OF KOLHAPUR CITY

In 1862 Half Reduction of the Original scale 1 Inch to 330 Ft.

DRAWN BY:—G.H. DESHPANDE—ALTEKAR.

(THROUGH THE COURTESY OF Mr. J.B. KARAVADE, Poona)